

# ॥ विचारसूत्र ॥

डॉ. यशवंत मनोहर

# विचारसत्ता

डॉ. यशवंत मनोहर

युगसाक्षी प्रकाशन, नागपूर

■ विचारसत्ता (वैचारिक लेख)
(डॉ. यशवंत मनोहर)
Vicharsatta
Dr. Yashwant Manohar

■ प्रकाशक :
नितीन हनवते
युगसाक्षी प्रकाशन, राहुल अपार्टमेंट,
रिंग रोड, नागपूर-४४० ०२२
मो. ९८२२७००३२२

© डॉ. प्रा. पुष्पलता यशवंत मनोहर
'लुम्बिनी', ४५, लोकसेवानगर
नागपूर-४४००२२
मो. ९४२२१०२३९६

■ अक्षर रचना :
रोहन कॉम्प्युटर, नागपुर
मो. ९२२६०१२०६०

■ मुखपृष्ठ :
जयंत आष्टनकर

■ मुद्रक :
वैभव प्रिंटर्स
वर्धा रोड, नागपूर

■ प्रथमावृत्ती :
१४ ऑक्टोबर २०१२

■ मूल्य : रु. १५०/-

कृष्णा इंगळे
या कास्ट्राईबच्या धुरंधर नेतृत्वाला...

– यशवंत मनोहर

# लेखकीय

'विचारसत्ता' या पुस्तकात माझे अलीकडच्या काळात लिहिलेले काही लेख एकत्र प्रकाशित होत आहेत.

विचार म्हणजे लेखकाचे म्हणणे ! जीवनातील एखाद्या प्रश्नासंबंधी, जीवनात निर्माण झालेल्या एखाद्या पेचासंबंधी वा समाजाच्या आदर्श रूपासंबंधी लेखकाचे काही म्हणणे असते. जीवनात काही लोकांवर अत्याचार होतात, काही लोकांच्या वाट्याला कायम उपेक्षा आणि भटकणेच येते. तर काही लोकांजवळ लाखोकोटींची संपत्ती असते. पाऊस यावा म्हणून प्रार्थना करण्यासाठी कोट्यवधी रुपये एखादे सरकार मंदिरांना देते. तीर्थयात्रांना असेच कोट्यवधी रुपये वाटले जातात. अशा खूप अंधश्रद्धांना खतपाणी घातले जाते. लेखकांचे या संदर्भात समाजाच्या हितासाठी काही म्हणणे असते. हे म्हणणे जेव्हा एकूणच समाजाच्या हिताचे होते तेव्हा ते म्हणणे विचार होते. जातींच्या, धर्मांच्या, वर्गांच्या चौकटींच्या हितासंबंधीचे म्हणणे विचार होत नाही. ते लोकजीवनातील शांतता नष्ट करणारे भांडण होते.

अशा चौकटींमधील भांडणाच्या म्हणण्याला विचार मानू नये. आपल्या मनावर कोणत्याही व्यक्तीने अशा भांडणाची सत्ता प्रस्थापित होऊ देऊ नये कारण या भांडणामुळे समाजातील कोणाही व्यक्तीला सुखी, सुरक्षित होता येणे शक्य नाही.

जे म्हणणे सर्व व्यक्तींचे समान हित मांडते. जाती, धर्म आणि वर्गातीत असे सर्वांचे भले होण्याची उत्कट इच्छा मांडते. ते म्हणणे वा ती इच्छाच विचार या पदवीला पोचते. समाजाने अशा विचारांची सत्ताच सार्वजनिक हिताची सत्ता म्हणून गौरवाने मान्य करावी. या पुस्तकातील वैचारिक लेखांची ही भूमिका आहे. ही भूमिका आजउद्याच्या जीवनासाठी मला फार मोलाची वाटते. या भूमिकेचा विचार वाचकांनी गंभीरपणे करावा असे मला मनापासून वाटते. धन्यवाद !

नागपूर

१४ ऑक्टोबर २०१२

यशवंत मनोहर

# अनुक्रमणिका


लेखकीय -

१. क्रांती

२. डॉ. आंबेडकर आणि ॲनिहिलेशन ऑफ एलिनेशन

३. डॉ. आंबेडकर म्हणजे ग्लोबल क्रांतिसिद्धान्त

४. डॉ. आंबेडकरांच्या जयंतीचे नीतिशास्त्र

५. उघड्या डोळ्यांचा बुद्ध

६. बौद्धांची वाचनसंस्कृती

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

८. एम.ए. मराठीचा अभ्यासक्रम, अध्यापक आणि अध्यापन

९. मार्क्सवादी साहित्यिक : वामन इंगळे

१०. मिलिंद महाविद्यालय : क्रांतिकारी सृजनाची पौर्णिमा

११. माझ्या वाट्याला आलेले मिलिंदचे मातृत्व

१२. मी पुत्र चळवळीचा

१३. मराठी साहित्यिक आणि जात

**परिशिष्ट :**

यशवंत मनोहरांच्या साहित्याची सूची

# क्रांती

कोणताही बदल म्हणजे क्रांती नव्हे. कोणत्याही बदलासाठी होणारे आंदोलन म्हणजे क्रांती नव्हे. कोणत्याही परिवर्तनासाठी होणारा उठाव म्हणजे क्रांती नव्हे. देशातल्या कोणत्याही राज्यात वा केंद्रात काँग्रेसचे सरकार जाऊन बीजेपीचे सरकार येणे किंवा उलट बीजेपीची सत्ता जाऊन काँग्रेस सत्तेवर येणे अशा बदलांना क्रांती म्हणता येत नाही. एकाच घरातील माणसे संपत्तीसाठी भांडतात किंवा एकाच संप्रदायातील माणसे एखाद्या मंदिरावरील ताब्यासाठी भांडतात. पण ही भांडणे आणि त्यांचा उद्देश म्हणजे क्रांती होय असे म्हणता येत नाही.

कशासाठी परिवर्तन, कोणत्या मूल्यांसाठी परिवर्तन, सर्वांनाच न्याय्य ठरेल अशा पर्यायी मानवी संबंधांच्या संहितेचे स्वरूप काय ? या प्रश्नांची कोणाचीही फसवणूक होणार नाही अशी स्वच्छ तार्किक उत्तरे एखाद्या आंदोलनाच्या डोक्यात असायला हवीत तरच त्या आंदोलनाला क्रांतिकारी आंदोलन म्हणता येते. मुळात क्रांतीची गरजच काय असा प्रश्न क्रांतीचा विचार करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाने विचारायला हवा. आपण वावरतो त्या समाजातील व्यक्तींमधील संबंध हे सर्वांच्या हिताचे नाहीत. या संबंधांमुळे काही लोकांकडून काही लोकांच्या न्याय्य मानवी अधिकारांचे हनन होते. स्त्री-पुरुषांमधील संबंधप्रकार स्त्रियांच्या मानवी सन्मानाची पायमल्ली करतो. जातीप्रथेची निर्मिती, तिचे संरक्षण आणि तिचा पुरस्कार या सर्वच गोष्टी समान मानवी प्रतिष्ठेच्या चिंध्या करणारेच आहेत. काहींच्याजवळ हजारो-लाखो कोटींची मालमत्ता आणि कोट्यवधी लोकांना दोन वेळचे नीट जेवण नाही. डोक्यावर छप्पर नाही. बौद्धिक उन्नती करायला शिक्षण नाही. अब्रू झाकायला पुरेसे वस्त्र नाही. एका बाजूने सुविधांचे डोंगर तर दुसऱ्या बाजूने मूलभूत मानवी गरजाही पूर्ण होत नाहीत अशी भीषण दुष्काळी परिस्थिती. माणसांना अगतिक करणारी महागाई आणि माणसांना मतिमंद करणाऱ्या भयंकर अंधश्रद्धा यांचा कहर आहे. मानवी सन्मानाच्या दृष्टीने आणि न्याय्य मानवी अधिकारांच्या दृष्टीने अशी पराकोटीची कोसळण आपल्या समाजाची झालेली आहे.

शिवाय हे चित्र केवळ आजचे नाही. हजारो वर्षांचे हे वयस्कर आणि जवळजवळ कायमस्वरूपी चित्र आहे. या देशाचे धुरीण आणि अभावग्रस्त यांचा अंधश्रद्धांच्या दृष्टीने वर्ग एकच आहे. सामाजिक उच्चनीचतेच्या दृष्टीनेही देशातील बहुतेक सर्व

लोक जातीय या एकाच वर्गात अंतर्भूत होतात. स्त्रियांना दुय्यमत्व देणारे धर्म आणि त्यातील रूढी-परंपरा पुरुषांना आणि स्त्रियांना सारखेच आदरणीय असतात. आर्थिक संपन्नतेच्या दृष्टीने काही एवरेस्टच्या शेंड्यावर आणि बहुसंख्य पायथ्याशी दैन्याच्या आगीत होरपळणारे ही एकूणच स्थिती क्रांतीसाठी अत्यंत अनुकूल अशीच आहे. ही परिस्थिती हजारो वर्षांपासून क्रांतीची वाट पाहत आहे. क्रांतीच्या विरहात ती पार अमानुष झालेली आहे. मानवी समाजपणही या स्थितीपासून रुसून दूर गेलेले आहे. या स्थितीतील अमानवी संबंधांनी जवळजवळ सर्वांचेच मानवी चेहरे विद्रूप करून टाकलेले आहेत.

ही स्थिती आमूलाग्र पातळीवरून बदलू शकणारा सिद्धान्तच क्रांतीसिद्धान्त ठरू शकतो. ही स्थिती बदलणे म्हणजे ज्या मानवी संबंधांचा परिपाक म्हणून ही स्थिती निर्माण झाली ते मानवी संबंध जाळून किंवा पुरून टाकून नव्या मानवी संबंधांची निर्मिती करणे होय. हे अमानुष संबंध धर्मांनी निर्माण केलेले असोत की साहित्याने निर्माण केलेले असोत, तत्त्वज्ञानांनी निर्माण केलेले असोत वा अंधश्रद्धांनी निर्माण केलेले असोत, या सर्व सामग्रीचे पुनर्वसन करण्याची आणि त्यांच्यासंबंधी कठोर निर्णय घेण्याची गरज आहे. माणूस हाच सर्व गोष्टींचा मापदंड आहे. या माणसाला नगण्य करणारा संस्कृतीचा सर्व पसारा प्रश्नार्थक ठरायला हवा. हे सोपे नाही पण क्रांतीसाठी ही कठीण गोष्ट करावीच लागेल.

धर्म बदल मान्य करीत नाहीत. 'बदल' हे कलम धर्मांमध्ये नसतेच. त्यामुळे धर्म बदल सांगत नाहीत. एवढेच नाही तर धर्मांचा बदलाला अत्यंत कडवा विरोध असतो. धर्म परिवर्तनवाद्यांचा नानाप्रकारे छळ करतात. अशा धर्मांना मानणारे लोक धर्मांच्या मूळ शिकवणुकीला चिकटून राहतात. धर्म याप्रकारे मूलतत्त्ववादी असतात. मूलतत्त्ववादी माणसांशिवायची माणसे त्यांना शत्रू वाटतात. धर्म त्यांच्यातही बदल होऊ देत नाहीत. जीवनातही बदल होऊ देत नाहीत. धर्मात बदल करण्याचा अधिकार कोणाही मानवी व्यक्तीला धर्म देत नाहीत. कारण धर्म हे ईश्वरांनी निर्माण केलेले असतात. त्यामुळे धर्म आणि धर्मांची शिकवण त्रिकालाबाधित आणि पवित्र असते. म्हणून धर्मांना आपण मूलतत्त्ववादी मानतो. असे धर्म निर्माण करणारे ईश्वरही मूलतत्त्ववादी असतात. तेही क्रांतीला विरोधच करतात. परिवर्तनाला नियतीचाही विरोध असतो. व्यक्तीच्या वा समाजाच्या जीवनाच्या संपूर्ण कहाणीचा शेवट या सर्व गोष्टी आधीच ठरलेल्या असतात. यामागे पूर्वजन्मीच्या पापपुण्याचे वहीखाते असते. त्यानुसार प्रत्येक व्यक्तीचे दैव ठरते. जे दैवात लिहिलेले असते त्यात कोणत्याही व्यक्तीला बदल करता येत नाही. मूलतत्त्ववादाच्या पुराचे पाणी असे सर्वत्र पसरलेले असते.

याचा अर्थ देव, ईश्वर हे क्रांतीच्या विरोधात असतात. धर्म क्रांतीच्या विरोधात असतात. नियती क्रांतीच्या विरोधात असते. या सर्वांचा प्रचार आणि प्रसार करणारी मंदिरे क्रांतीच्या विरोधात असतात. प्रचंड मेळे आणि यात्रा क्रांतीच्या विरोधात असतात. अशा यात्रांना कोट्यवधी रुपये देणारी सरकारे क्रांतिविरोधी असतात. पाऊस पडावा म्हणून प्रार्थना करण्यासाठी मंदिरांना कोट्यवधी रुपये देणारी, शाळांना तशा प्रार्थना करायला लावणारी सरकारे क्रांतीच्या विरोधात असतात.

एवढेच नव्हे तर सर्व क्रांतिविरोधी पसारा पवित्र मानणारे शिक्षण, राजकारण आणि साहित्यही मूलतत्त्ववादी असते. वरील सर्व पसारा वंदनीय मानणारे अध्यापक, कर्मचारी आणि लोक मूलतत्त्ववादीच असतात. नवससायास, व्रतवैकल्ये आणि पूजा-आराधना या सर्व गोष्टीही मूलतत्त्ववादीच असतात आणि या सर्व प्रकारांनी लोकांना व्यापून असलेला मूलतत्त्ववाद क्रांतिविरोधीच असतो.

हे सर्व सरंजामशाहीचे चारित्र्य असते. राजा, जहागीरदार, जमीनदार आणि तत्सम इतर संपन्न लोक यांचा सरंजामदारवर्गात अंतर्भाव होतो. राजकीय सत्ता आणि आर्थिक सत्ता यांच्या जोरावर हा वर्ग इतर सामान्य जनतेचे शोषण करतो. आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी आणि वृद्धिंगत करण्यासाठी हा वर्ग इतरांचे नागरिकत्वच नष्ट करतो. छोटे शेतकरी आणि मोलमजुरी करून पोट भरणारे बाकीचे सर्वच सरंजामशाहीत अधिकाधिक दरिद्री होतात. या लोकांचे शोषण करण्यासाठी सरंजामदार वर्ग धर्माचा उपयोग करतो. धर्मगुरू, बाबाबुवा, संतमहंत, मंदिरे, भक्ती यांच्याद्वारा लोकांच्या मनात भीती निर्माण केली जाते. ही भीती पापाची आणि नरकाची असते. विज्ञानपूर्व काळात सरंजामदार वर्ग गोरगरिबांचे शोषण करण्यासाठी या हत्यारांचा यशस्वी उपयोग करतो.

हेच भांडवलशाहीतही घडते. विज्ञानाचा विकास होतो. उत्पन्नाची साधने बदलतात. जुन्या सरंजामशाहीतील पात्रांची आता नावे बदलतात. राजे, सरंजामदार आणि बडे जमीनदार आता भांडवलदार होतात. मोठमोठ्या कारखान्यांचे मालक होतात. सरंजामशाहीतील छोटा शेतकरी, बारा बलुतेदार आणि इतर मजूर यातील काही लोक आता कामगार होतात. पूर्वी अल्प मोबदल्यात कष्ट विकणाऱ्या लोकांना भांडवलशाहीत कामगार या नात्याने तेच करावे लागते.

याचा अर्थ सरंजामशाहीतही श्रम करणाऱ्या बहुसंख्य माणसांचे वियुक्तीकरणच (एलिनेशन) होत होते. म्हणजे सामान्य माणूस तिथेही वरच्या मूठभर लोकांचीच श्रीमंती वाढवित होता आणि स्वतः दारिद्र्यात जळत होता. भांडवलशाहीतही त्याच्या

वाट्याला त्याहून वेगळे काही येत नाही. श्रीमंत अधिक श्रीमंत होणे आणि गरीब अधिक गरीब होणे ही प्रक्रिया अबाधितच राहते. शिवाय नवी उत्पादनसाधने आली म्हणून समाजातील माणसांचे जुने संबंध नष्ट होतातच असे नाही. उत्पन्नाची नवी साधने वापरणारी माणसे सरंजामशाहीतील मानसिकतेचा त्याग करतातच असे नाही. म्हणजे सरंजामशाहीतील जातीयवृत्ती, धर्म, अंधश्रद्धा या सर्व गोष्टींना ही माणसे उराशी कवटाळून ठेवतातच. माणसे तीच पण कष्ट करण्याची साधने नवी अशी स्थिती असते. म्हणजे कामगार कारखान्यात कामगाराचा पेहराव धारण करतो आणि घरी आल्यावर आपल्या जातीचा, धर्माचा पेहराव धारण करतो. पण एवढेच नाही. कारखान्यातही खालच्या जातीतील लोकांना तो प्रतिष्ठेच्या जागावर काम करू देत नाही. आपापल्या जातीधर्माच्या रूढी-परंपरांच्या बाहेर तो जात नाही. "My party members are communist in public life an Hindu husbands at home." असे एखाद्या कम्युनिस्ट नेत्याचे म्हणणे आपल्याला काय सांगते ? पुरुष घरात केवळच वेगवेगळ्या धर्माचे हजबंडस् राहत नाहीत. ते वेगवेगळ्या जातींचेही हजबंडस् असतात. ते केवळच हजबंडस् असत नाहीत तर इतरांशी संबंध येऊ न देणाऱ्या जाती असतात; धर्म असतात. असेच अध्यापकांचे, डॉक्टरांचे, इंजिनीअर्सचे, व्यापाऱ्यांचे, आगगाडीतील प्रवाशांचे असते. सर्वांचे हेच असते. ओठात एक पोटात दुसरेच तसे हे आहे. घरात एक बाहेर दुसरेच तसे हे आहे. मनात एक आणि जनात दुसरेच तसे हे आहे. भांडवलदार, जमीनदार आणि राजकारणीही असेच. प्रश्न असा आहे की हा माणूस या सर्व क्रांतीविरोधी गोष्टीपासून मुक्त कधी होणार ? काही थोडे सन्माननीय अपवाद आपण बाजूला ठेवू पण या देशातील बहुतेक माणसे अशा अंतर्विरोधांनी पार चिंध्या चिंध्या झाली आहेत. हे अंतर्विरोधही असंख्य पातळ्यांवरचे आहेत.

आणखी एक : सरंजामशाहीतील राजे, जहागीरदार आणि बडे जमीनदार यांचे वारसदार लोकच स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणसम्राट झाले. साखरसम्राट झाले. राजकीय सत्तेत मंत्री झाले. या लोकांच्या हातात पूर्वीही राजकीय आणि आर्थिक सत्ता होती. संविधानाने तत्त्वतः सरंजामशाही नष्ट केली तरी भूतकाळातील सरंजामशाहीचे वारसच आज सर्व प्रकारची सत्ता भोगत आहेत. राज्यांच्या आणि राष्ट्राच्या आर्थिक नाड्या त्यांच्याच हातात आहेत. सांस्कृतिक सत्ता त्यांच्याच हातात आहे. राजकीय सत्ता त्यांच्याच हातात आहे. पण एवढेच नाही तर सरंजामशाहीतील धुरीणांचे जे चारित्र्य होते तेच यांचेही चारित्र्य आहे. तीच कार्यक्रमपत्रिका हेही राबवतात. तीच लोकांना गारद करणारी, आपल्या वर्चस्वाखाली ठेवणारी हत्यारे

हेही वापरतात. जातीचे आणि धर्माचे हत्यार भूतकाळातील सरंजामदारांप्रमाणेच हेही वापरतात. लोकांमध्ये बौद्धिक जागृती होऊ नये. लोक आपल्या अधीन राहावेत. परिघाबाहेरचे लोक सत्तेत येऊ नयेत, स्पर्धक निर्माण होऊ नयेत आणि आपल्या सत्तेच्या विरोधात कोणी उठाव करू नये याची पूर्ण काळजी हे आजचे नवसरंजामदार घेत असतात.

संविधानाने मालमत्तेच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घातल्या याचा अर्थ भांडवलशाहीलाही मर्यादा घातल्या. हे भांडवलशाहीचे लोकशाहीकरण आहे. राष्ट्राच्या भौतिक संपत्तीची वृद्धी होणे आवश्यक पण या वृद्धीने आर्थिक असमतोल वाढू नये हे सूत्र ही मर्यादा घालण्यामागे आहे. पण प्रत्यक्षात हे घडत नाही. काही भांडवलदारांच्या आणि काही राजकीय नेत्यांच्या, काही व्यापाऱ्यांचा आणि काही बड्या जमीनदारांच्या, काही शिक्षणसम्राटांच्या हातात हजारो-लाखो कोटींची संपत्ती आणि कोट्यवधी लोकांना दोन वेळचे नीट जेवणही मिळत नाही, राहायला निवारा नाही, अंगभर वस्त्र नाही असा अंतर्विरोध समाजवादाचा आदर्श स्वीकारलेल्या आपल्या देशात दिसतो.

लोकशाही समाजवाद हे ध्येय पण अर्थसम्राटांच्या आणि धर्मसम्राटांच्या कलाने चालणारे संविधानद्रोही राजकारण अशी स्थिती आहे. राजकारण करणारे सरंजामशाहीच्या रूढी परंपरांमधून बाहेर पडत नाहीत. नवे विज्ञान, नवे तंत्रज्ञान सेवेला पण हे नवसरंजामदार बाबाबुवाभोळी, देवभोळी वृत्ती सोडीत नाहीत. देशाचे धुरीण जातींचे जहरही मनात श्रद्धेने जपत आहेत आणि हजारो-लाखो कोटींचा भ्रष्टाचारही करीत आहेत. इंग्रजांनी या देशाची थोडीबहुत लूट केली असेल पण त्यांनी या देशाला बदल्यात आधुनिकतेच्या दृष्टीने दिलेही खूप आहे. पण हे स्वकीय राजकारणी आधुनिकतेच्या दृष्टीने देशाला काहीही देत नाहीत आणि इंग्रजांच्या हजारो पटींनी या देशाची लुटमार करीत आहेत. याबाबतीत तर हे इंग्रजांचेही बाप निघाले. संविधानाच्या उद्देशिकतील सेक्युलॅरिझमचा, समाजवादाचा आणि सामाजिक न्यायाचा या सर्वांनी मिळून केलेला हा खून जगात बेजोड आहे.

नेता नवसरंजामदार असेल, भांडवलदारांशी आणि फॅसिस्टाशी हातमिळवणी करणारा असेल तर शक्य त्या मार्गांनी क्रांतीची प्रक्रिया तो नाकारणारच. क्रांतिकारी मने, क्रांतिकारी चळवळी निर्माण होणार नाहीत याचीही तो काळजी घेईल आणि अशी मने वा चळवळी निर्माण झाल्याच तर त्यांना बेचिराख करण्याचे सर्व प्रयत्न तो करील. क्रांती होत नाही त्याचे हे कारण आहे.

क्रांती हे एक सुंदर मानसशास्त्र आहे. अधिकाधिक उज्ज्वल मानवी संबंधांची निर्मिती करीत राहणारे ते गतिमान मानसशास्त्र आहे. माणसाच्या सर्व सुप्त शक्तींचे सतत संवर्धन करीत राहणारे ते मानसशास्त्र आहे. विज्ञानाच्या मनाने ते जुन्या, चूक ठरलेल्या वा अपूर्ण उत्तरांचा त्याग करते. सतत नवे प्रश्न निर्माण करते आणि उत्तरांचा नवा उजेड मानवी प्रवासापुढे अंथरते. कुठल्याही नव्या उत्तराने समाधान नाही आणि कुठलाही प्रश्न शेवटचा नाही. उजेडाकडून सतत उजेडाकडे असेच या वैज्ञानिक मानसशास्त्राचे ध्येय आहे. मानवी मेंदू जितका वापरला जातो तितका तो अधिक सतेज होतो. म्हणून मेंदूची उज्ज्वल शोधक शक्ती वाढवित नेणे हे या क्रांतिमानसशास्त्राचे ध्येय आहे.

क्रांती हे मानवी मनाला निसर्गतः लाभलेले खास असे चारित्र्य आहे. निर्मिती, सतत निर्मिती हे त्याचे ब्रीद आहे. जातिविहीनता आणि वर्गविहीनता हा त्याचा आशय आहे.अंधश्रद्धाविहीनता ही त्याची प्रखर भूमिका आहे. पृथ्वीच्या पाठीवर आपण आलो. इथे प्रकाश आहे. पाणी आहे. हवा आहे. सुंदर निसर्ग आहे. नाना प्रकारचे रंग आहेत. गंध आहेत. सुखे परस्परांमध्ये वाटून घेत आणि एकमेकांची दुःखे हलकी करीत चार दिवस आपण जगू. एकमेकांना न ओरबाडता, एकमेकांना जपत आपण जगू. विकार वजा करीत जगू. एकमेकांना उन्नत करीत जगू. माणसाला उणेपणा आणणाऱ्या, त्याच्या बौद्धिक वाटचालीला कुंठित करणाऱ्या, त्याला परावलंबी करणाऱ्या खुळ्या गोष्टी आपण टाळू. आपल्या चिंतनाचा, साहित्याचा, राजकारणाचा अशा सर्वच गोष्टींचा एकमेव नायक माणूसच आहे. त्याच्या या अधिनायकपणाला आव्हान देणाऱ्या गोष्टींचा निःपात आपण करू. त्याच्या भौतिक आणि नैतिक विकासाचा मार्ग सतत निष्कंटक ठेवण्याचा प्रयत्न आपण करू. तो इहवादी विज्ञाननिष्ठेच्या मेंदूने आणि समाजवादी काळजाने जगण्याला आपले सारसर्वस्व मानील असे जगणे या पृथ्वीच्या पाठीवर निर्माण करू असे सर्वांनाच वाटले पाहिजे. हे क्रांतीचे चारित्र्य आहे. हेच इहवादी मानवी चारित्र्य आहे. या चारित्र्याची प्रस्थापना हे क्रांतीचे ध्येय आहे.

मूलतः माणूस असा सर्वहितैषी होता. मूलतः तो रॅडिकल होता. तो प्रकृतीने समाजवादीच होता. हे त्याचे समाजवादीपण आणि इहवादी विज्ञाननिष्ठपण धर्मांनी, देवांनी आणि जातींनी गिळंकृत केले. त्याला अनिर्बंध तृष्णेचे, व्यक्तिकेंद्रिततेचे प्रशिक्षण दिले गेले आणि माणूस आपल्या समाजवादी आणि विज्ञाननिष्ठ माणूसपणाला पारखा होत गेला. आता त्याला परत त्याच्या समाजवादी आणि इहवादी विज्ञाननिष्ठेच्या सामर्थ्यापाशी आणि सौंदर्यापाशी नेण्याची आवश्यकता आहे. क्रांतीचा

हा कार्यक्रम आहे आणि त्यासाठी त्याला समाजवादापासून आणि विज्ञाननिष्ठ इहवादापासून तोडणाऱ्या सर्व गोष्टी तोडतच, त्यांचा निःपात करीतच त्याच्या मूळ रूपाशी जोडावे लागेल. आजच्या समग्र भौतिक विकासाला तशी नैतिक शिस्त द्यावी लागेल. आमूलाग्र बदल म्हणजे क्रांती. पण आमूलाग्र बदलाचा हा अर्थ आहे. आमूलाग्र बदल म्हणजे क्रांती अशी व्याख्या देऊन प्रश्न संपत नाही. आमूलाग्र बदलाचा आशय रेखीव पद्धतीने मांडला जायला हवा. असे झाले तरच जीवनात घडणाऱ्या अनंत बदलांमधल्या नेमक्या कोणत्या बदलाला क्रांती म्हणावे याचे स्वच्छ आणि विश्वासार्ह उत्तर आपल्याला मिळेल.

अर्थात क्रांतीसंबंधी लोकांच्या मनात खूप गैरसमज आहेत. क्रांती म्हणजे रक्तरंजितता असे काहीएक समीकरण लोकांच्या मनात असते. खूनखराबा, जाळपोळ, दंगली असे क्रांतीचे चित्र लोकांच्या मनात असते. क्रांतिविरोधकांनी लोकांच्या मनात क्रांतीसंबंधी असे अनेक गैरसमज भरलेले असतात. प्रथम लोकांनी क्रांतीसंबंधीची ही भीती वा गैरसमज काढून टाकले पाहिजेत. क्रांती रक्तविहीन असू शकते. जाळपोळविहीन क्रांती शक्य आहे. अशी क्रांती प्रगल्भ मनांची द्योतक असते. शांततामय मार्गाने क्रांती स्वीकारणारी मने बौद्धिक प्रशिक्षणाद्वारा तयार करावी लागतात. नैसर्गिक विविधतेत विरोध की नैसर्गिक विविधतेत एकता यासंबंधीचा विवेक समाजात जागृत करावा लागतो. माणुसकीचे मोल लोकांना पटवून द्यावे लागते. ते समाजाला अंतःकरणापासून पटावे लागते. जातीधर्मांच्या, वर्गांच्या विघटनशील भूमिका सर्वांसाठीच विघातक आहेत. हे लोकांना पटवून द्यावे लागते. जाती, वर्गांच्या अतीत असलेल्या समाजवादी जीवनाचा आनंद केवढा अगाध असतो, ते जगणे केवढे सर्जनशील आणि परस्परउपकारक असते ते समाजाला पटवून द्यावे लागते. असे झाले की क्रांती समाजातून उगवते. ती लादण्याची गरज नसते आणि मग हिंसेचीही गरज नसते.

अशा क्रांतीसाठी भारतात आणि जगात कोणी प्रयत्न केले आहेत काय ते पाहायला हवे. मग धर्मांच्या करवती घेऊन निघालेले जगाच्या पाठीवरचे संबंधित लोक क्रांतीचे कसे कट्टर विरोधक आहेत ते आपल्याला कळेल. दुनियेतल्या सर्व लोकांनी हे स्पष्टपणे लक्षात घेण्याची गरज आहे की, एकसंधता कापणाऱ्या या करवती तुम्हाला आमूलाग्र बदलापाशी किंवा क्रांतीपाशी नेऊच शकत नाहीत. धर्म म्हणजे मूलतत्त्ववाद. वेगवेगळे मूलतत्त्ववाद स्वार्थासाठी फक्त परस्परांमध्ये मारामाऱ्या करू शकतात. मानवी जीवनाला आमूलाग्र परिवर्तनापर्यंत ते घेऊन जाऊच शकत नाहीत. त्यांची निर्मितीच त्यासाठी नसते. क्रांती मारणे हे त्यांचे एकमेव उद्दिष्ट असते.

आहे ती आपली जात टिकविणे हा मूलतत्त्ववादच आहे. वंशपरंपरागत राजकीय आणि आर्थिक सत्ता टिकविणे हा मूलतत्त्ववादच आहे. सत्तापरिवर्तन, जातीअंत आणि वर्गअंत टाळणे हाही मूलतत्त्ववादच आहे. पुरुषसत्ताकाने निर्धारित केलेले स्त्रीला दुय्यमत्त्व देणारे स्त्री-पुरुषसंबंध टिकविणे हा मूलतत्त्ववादच आहे आणि हे सर्व मूलतत्त्ववाद आमूलाग्र बदलाच्या पूर्णतः विरोधातच असतात. हे सर्व मूलतत्त्ववाद क्रांतिविरोधीच असतात. हे सर्व क्रांतिविरोधक मूलतत्त्ववाद लोकशाहीची प्रस्थापना करूच शकत नाहीत. लोकशाही समाजवाद मारण्याचे काम तेवढे हे सर्व प्रकारचे मूलतत्त्ववाद करू शकतात. हे मूलतत्त्ववाद आर्थिक, सामाजिक, राजकीय, वाङ्मयीन आणि शैक्षणिक न्याय प्रत्यक्षात आणूच शकत नाहीत. याचा अर्थ लोकशाही समाजवादाच्या निर्मितीप्रक्रियेतून तातडीने या मूलतत्त्ववादांना हद्‌पार करायला हवे. क्रांतीची ही अट आहे.

जीवनाच्या सर्वच सर्व क्षेत्रांमधील मूलतत्त्ववाद, आपल्या वर्तनात लपून बसलेले आणि कधी उघडपणे तर कधी आडपडद्याने काम करणारे सर्व मूलतत्त्ववाद ज्यांना क्रांती हवी आहे त्यांनी पार खरवडून काढण्याची गरज आहे. ते जाळून टाकण्याची गरज आहे. हे ज्यांना जमत त्यांनी क्रांतीच्या गोलमोल गप्पा करणे सोडून द्यावे. क्रांती हा शब्दही त्यांनी उच्चारू नये.

जे जातीच्या चौकटीत राहून लेखन करतात. जातीचा गौरवाने उल्लेख करीत करीत लेखन करतात ते केवळ स्वतःच्याच जातीचे समर्थन नाहीत तर इतरांच्याही जातींचे समर्थन करीत असतात असे साहित्यिक एकाचवेळी दोन गोष्टी करीत असतात. त्यातली एक म्हणजे ते संविधानाशी द्रोह करीत असतात आणि सरंजामशाहीची भाटगिरीही ते करीत असतात. म्हणजे मूलतत्त्ववादाच्या झेंड्याशिवाय हातात आणि डोक्यात दुसरे काहीही घ्यायचे नाही असाच हा निर्धार आहे. स्वतःला आम्ही भारताचे लोक म्हणणे आणि संविधानद्रोह करणे हा अंतर्विरोध ठरतो. स्वतःला आम्ही भारताचे लोक म्हणणे आणि जातींचे आणि वर्गांचे समर्थन करणे हा अंतर्विरोध आहे. स्त्रीला दुय्यमत्व देणे आणि आम्ही भारताचे लोक आहोत असेही म्हणणे हा अंतर्विरोध आहे. घराणेशाही, जातशाही, भ्रष्टाचारीवृत्ती, अंधश्रद्धा, मूलतत्त्ववाद या गोष्टी रक्तात वागविणे आणि आम्ही विज्ञाननिष्ठ लोकशाही मानतो असे सांगणे हा अंतर्विरोध आहे. हे सर्व अंतर्विरोध क्रांती जन्मालाच येऊ देत नाहीत हे आपण कधीतरी लक्षात घेणार की नाही ?

शेवटी या देशातल्या राजकारण्यांना, साहित्यिकांना, शिक्षणसंस्थांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना काय हवे आहे ? क्रांती हवी आहे की समाजाला, राष्ट्राला

एकाच स्थितीत बांधून ठेवणारा स्थितीवाद हवा आहे ? क्रांती हवी आहे की स्थितीवादाचे मूलाधार असलेले सर्व मूलतत्त्ववाद हवे आहेत ? काय हवे आहे ? खालच्या जाती वर आणि वरच्या जाती खाली म्हणजे क्रांती नव्हे गरिबांना श्रीमंत करणे आणि श्रीमंतांना गरीब करणे म्हणजे क्रांती नव्हे. सर्व मूलतत्त्ववाद्यांना समानता प्रदान करणे म्हणजे क्रांती नव्हे. स्त्रीला स्वतंत्र करणे आणि पुरुषांना गुलाम करणे म्हणजे क्रांती नव्हे. तर क्रांती म्हणजे स्त्री-पुरुषांच्या मानसशास्त्रातून लिंगभावाचे उच्चाटन करणे. क्रांती म्हणजे लिंगभावविहीन आणि जातिविहीन मानसविश्व निर्माण करणे. क्रांती म्हणजे सर्वांना एक वर्ग करणे आणि अनेकवर्गी प्रवृत्तींचे निराकरण करणे होय. एक हृदय, एक चित्त समाजविश्व निर्माण करणे म्हणजे क्रांती. मागल्या पन्नास-साठ वर्षांमध्ये या दिशेने देशातील धुरिणांनी प्रयत्न केले असे दिसत नाही. याचा अर्थ क्रांतीची सर्वथा आवश्यकता असूनही, तसे ध्येय स्वीकारूनही आणि तशी परिस्थिती असूनही येथे क्रांती होत नाही याचा अर्थ या देशात क्रांती बहुतेकांना नकोच आहे असा होतो.

क्रांतीसाठी पहिल्या पातळीवर वर्गीय संघटन असण्याची गरज असते. वर्गीय संघटन म्हणजे जातीचे वा धार्मिक लोकांचे संघटन नव्हे. वर्गीय संघटन म्हणजे क्रांतीध्येयाने एकत्र आलेल्या लोकांचे संघटन होय. पुरुषांना वेगवेगळ्या जातींच्या, पक्षांच्या आणि धर्मांच्या चौकटीत संघटित करणे म्हणजे वर्गीय संघटन नव्हे. अशा चौकटी म्हणजे क्रांती नाकारणारी षडयंत्रेच होत हे लक्षात घेतले पाहिजे. स्त्रियांना वेगवेगळ्या जातींच्या चौकटीत संघटित करणे, पक्षाच्या चौकटीत वा धर्मांच्या चौकटीत संघटित करणे म्हणजे वर्गीय संघटन नव्हे किंवा स्त्रियांना आणि पुरुषांना अशाच कुठल्या तरी चौकटीत संघटित करणे म्हणजे वर्गीय संघटन नव्हे. वर्गीय संघटन म्हणजे धडांचे संघटन नव्हे. वर्गीय संघटन म्हणजे परंपरेने दिलेल्या सर्व क्रांतिमारक अस्मितांचा त्याग करून स्वच्छपणे क्रांतिसिद्धान्ताचा स्वीकार करणाऱ्या माणसांचे सेंद्रिय संघटन होय. लोकशाही समाजवाद आणि इहवादी विज्ञाननिष्ठांचे 'फ्युजन' किंवा जीवैक्य म्हणजे आमूलाग्र परिवर्तनाचे शास्त्र होय. हेच क्रांतीचे तत्त्वज्ञान होय. हे तत्त्वज्ञान जीवननिष्ठा म्हणून स्वीकारणाऱ्या लोकांचे संघटन म्हणजे वर्गीय संघटन होय. असे वर्गीय संघटन आजवरही आपण निर्माण करू शकलो नाही. लोकांच्या मनावर दुटप्पीपणाचे राज्य आहे. अंतर्विरोधांची सत्ता आहे. या सर्व लोकांना क्रांतीविचाराच्या वर्गात एकत्र गुंफता येणे अशक्य नसले तरी सोपेही नाही.

अलीकडच्या काही वर्षांमध्ये वेगवेगळ्या जातींमधील प्रमुख आणि आदरणीय नेत्यांना त्या त्या जातींचे सुभे निर्माण करण्यासाठी, जातींच्या अस्मिता प्रखर

करण्यासाठी पुढे आणले जात आहे. म्हणजे समाजाची एकसंधता तोडण्याचे कार्य कालवर जातींनी, धर्मांनी आणि पक्षांनी केले. आता त्या त्या जातींमधील आदरणीय नेत्यांचा वापर या कामासाठी केला जातो आहे. जातींच्या अस्मिता, पक्षांच्या वा धर्मांच्या अस्मिता जशा समाजाला तोडतात तशा या अस्मिताही समाजाला तोडण्याचेच कार्य करीत आहेत. समाजाला वर्गीय होऊ न देण्याचीच ही प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया क्रांतीच्या सर्व शक्यता मारणारीच प्रक्रिया आहे. अस्मितेची प्रतीके म्हणून पुढे करण्यात येणारे सर्वच जातींचे हे आदरणीय नेते क्रांतीचा विचार मांडतात काय ? त्याचे क्रांतीचे तत्त्वज्ञान कोणते ? त्यांनी क्रांतीचा कोणता सिद्धान्त मांडला? हे सिद्धान्त जातीपुरते आहेत की समग्रलक्ष्यी आहेत, स्थानिक आहेत की वैश्विक आहेत? या अनुषंगाने विश्लेषण झाले पाहिजे. तसे अभ्यास मांडले गेले पाहिजेत. पण असे होत नाही. या सर्व प्रक्रियेमागे जातींच्या आणि धर्मांच्या भूमिकाच काम करतात. आपण क्रांतीचा विचार करीतच नाही. आमूलाग्र परिवर्तनाचा विचारही करीत नाही. आपण जातींचाच विचार करतो असाच या सर्व घटितांचा अर्थ आहे. प्रस्थापितांचा कंपू त्या त्या जातींमधील आणि धर्मांमधील लोकांना आपापल्या जातींमधील आणि धर्मांमधील आदरणीय नेत्यांच्या नावाने चौकटी निर्माण करण्यासाठी आर्थिक सहाय्य करतो. ही सर्वच प्रक्रिया चौकटी घट्ट करणारी, समाजाचे विभाजन कायम ठेवणारी म्हणजे समाजाचे वर्गीय संघटन अशक्य करणारी आहे ही बाब आपल्या लक्षात येत नाही. या समाजात क्रांती होऊ नये असे ज्या प्रस्थापिताला वाटते त्याला आपण मदतच करतो आहोत, त्याची ताकद आपण वाढवितो आहोत असे कोणाला वाटत नाही याचा अर्थ काय? तर आपल्या डोक्यातील भ्रम आपल्याला क्रांतीकडे जाणे शक्य होऊ देत नाही असा त्याचा अर्थ आहे. आपण मनाने अठराव्या शतकातच खितपत पडून राहावे, आपापल्या चौकटीत आपापली गुलामी एन्जॉय करीत राहावे असे प्रस्थापिताला वाटते. प्रस्थापिताच्या इच्छेलाच आपण मान देतो आहोत आणि क्रांती टाळीत आहोत असा त्याचा अर्थ होत नाही काय ?

अलीकडच्या काळात एक विपरीत गोष्ट घडायला लागलेली आहे. त्या त्या जातीतील लोक आपापल्या जातींचे इतिहास लिहायला लागलेले आहे. म्हणजे आपल्या जातीचा उगम कुठे झाला, त्या जातीतील लोकांनी कोणकोणते पराक्रम केले या आणि अशा काही गोष्टी आपल्या जातीचे मोठेपण सांगण्यासाठी लिहिल्या जात आहेत. आपल्या जातीची पाळेमुळे (Roots) शोधण्याचे प्रयत्न होत आहेत. खालच्या जातींपासून वरच्या जातीपर्यंतची काही माणसे अशी पाळेमुळे मांडण्याचे उद्योग करीत आहेत. हा उत्साह क्रांतिविरोधी आहे. चौकटी अधिकाधिक मजबूत

करणारा आहे. समाज तोडणाराही आहे आणि राष्ट्र तोडणाराही आहे. एवढेच नाही तर मानवी जीवनाच्या ठिकऱ्या करणारा आणि सर्व प्रकारच्या भांडणांना दारे उघडून देणारा हा क्रांतिविरोधक उत्साह आहे. ही बाब आपण कधीतरी समजावून घेण्याची गरज आहे. Roots शोधणे म्हणजे जातींची पाळेमुळे शोधणे नव्हे. फांद्या म्हणजे Roots नव्हेत. Roots त्याहीपुढे असतात. अगदी प्रारंभकाळात आपण जातिविहीन होतो. धर्मविहीन होतो. ईश्वर ही संकल्पना त्या काळात निर्माण झाली नव्हती. आपण इहवादी होतो. एका कुटुंबातील सभासद म्हणून आपण जगत होतो. आपण मनाने समाजवादी होतो. या Roots पर्यंत माणसे का जात नाहीत? जातींच्या विघटनशील फांद्यांपाशीच माणसे का थांबतात ? विघटनशील अस्मितांचे हे शोध क्रांतीच्या शक्यता मारणारे आहेत हे आपण कधीतरी समजावून घेणार की नाही हा प्रश्न आहे.

याप्रकारे समाजातील, देशातील हे सर्वच वातावरण क्रांतीला भयंकर मारक आहे. अशा स्थितीत चार विद्वानांनी एकत्र बसावे. गंभीरपणे आणि जबाबदारीने बसावे. एकूणच समाजाच्या हिताचे एक स्वप्न मांडावे. त्या स्वप्नाला सिद्धान्तात परावर्तित करावे आणि सिद्धान्त क्रमाने प्रत्यक्षात उतरविण्याचा कृतीकार्यक्रम मांडावा. त्या अनुषंगाने समाजाचे प्रशिक्षण करावे.

अंतर्विरोधांची आणि विषमतेची आग लागलेल्या जंगलात दुनियेतील सर्वच आंधळे आणि लंगडे असलेले वंचित सापडलेले आहेत. तुझी जात वेगळी आणि माझा धर्म वेगळा हे अहंकार उराशी कवटाळून हे सर्व लंगडे आणि आंधळे परस्परांपासून दूर राहिले तर ? तर भोवतीच्या भयानक आगीत त्यांचा कोळसा होणे अपरिहार्य आहे. पण हे सर्व लंगडे सर्व आंधळ्यांच्या खांद्यावर बसले तर लंगड्यांचे डोळे आगीतून बाहेर पडणारी वाट दाखवू शकतात आणि आंधळ्यांच्या पायांनी सर्व लंगड्यासकट सर्वच आंधळेही आगीबाहेर पडून स्वतःला वाचवू शकतात. आपापल्या चौकटींचा गर्व कुरवाळीत आगीत जळून मरायचे की आपापल्या चौकटी जाळून एकमेकांच्या साहाय्याने आगीवर मात करायची याचा निर्णय दुनियेतील सर्वच आंधळ्यांनी आणि लंगड्यांनी तातडीने घ्यायची ही वेळ आहे. दुनियेतल्या सर्वच लंगड्यांना आणि आंधळ्यांना ही गरज सांगणारा आणि त्यांना वाचविणारा समग्रलक्ष्यी क्रांतिसिद्धान्त आज हवा आहे.

हा क्रांतिसिद्धान्त कोणावरही अन्याय करणारा नसावा. सर्वांच्या कल्याणाचा तो असावा. लोकशाही समाजवाद आणि इहवादी विज्ञानदृष्टी या पायाभूत तत्त्वांचा सम्यक विस्तार असलेला हा सिद्धान्त असावा. हा सिद्धान्त ज्या माईच्या लालांच्या

प्रज्ञा-प्रतिभांशी जुळेल त्या क्रांतिकारी तत्त्ववेत्त्यांसंबंधीचा आणि विचारवंतांसंबंधीचा आदर या सिद्धान्तातून आपोआपच व्यक्त होईल. या सिद्धान्ताला जातीधर्मांच्या चौकटींचा आणि चौकटनिवासी नेत्यांचा अजिबात संदर्भ नसावा. संदर्भ असावा केवळ तार्किक पद्धतीने मांडल्या गेलेल्या सर्वहितैषी क्रांतीचा.

जागतिकीकरणाच्या काळात आणि जागतिकीकरणानंतरच्या पुढल्या काळातही जातींच्या चौकटी, धर्मांच्या चौकटी, पक्षांच्या चौकटी, प्रदेशांच्या चौकटी आणि गटांच्या चौकटी केवळ क्रांतिविरोधाचे कार्य करू शकतात. पण या सर्व अवरोधांना उल्लंघून जाणारा क्रांतिसिद्धान्तच एकूणच मानवी जीवनालाही आणि भारतीय समाजाला क्रांतीच्या प्रकाशमान वास्तवाशी जोडू शकेल. दुनियेच्या पाठीवरील एकूणच मानवी अस्तित्वाला सन्मानाने जिवंत राहण्यासाठी क्रांतीची आणि अशी क्रांती साकार करणाऱ्या क्रांतिसिद्धान्ताची उत्कट तहानभूक प्रदीप्त मात्र करायला हवी.

# डॉ. आंबेडकर आणि ॲनिहिलेशन ऑफ एलिनेशन

आजचे युग हे तत्त्वज्ञानाच्या अंताचे युग नव्हे तर नव्या जगण्यासाठी नव्या तत्त्वज्ञानाच्या निर्मितीचे युग आहे. हजारो वर्षांपासून जगाच्या पाठीवर शोषितांच्या सामाजिक न्यायासाठी लढाई सुरू आहे. एकविसाव्या शतकात या लढाईपुढे आणखी गुंतागुंतीचे नवे पेच निर्माण झालेले आहेत. सामान्य माणसांच्या, शोषित समूहांच्या विजयाची तत्त्वज्ञाने बुद्धापासून मांडली जात आहेतच. पाश्चात्त्य जगात सॉक्रेटिस, मार्क्स अशी खूप नावे आहेत. भारतात फुले, आंबेडकर अशी वंचित समूहांच्या विजयांची मूलभूत तत्त्वज्ञाने मांडणारी आदरणीय नावे आहेत. एकूणच जागतिक स्तरावरील वंचित समूह सामाजिक न्यायाची लढाई जिंकू शकतात. या विजयाची मूलभूत अट मात्र या सर्व वंचितांना पाळता यायला हवी. ती अट आहे एकआवाज होण्याची, एकजीव होण्याची आणि एकमूठ होण्याची. यासाठी या सर्वच वंचित समूहांनी आपापल्या प्रादेशिक, भाषिक, धार्मिक, जातीय अशा सर्वच संकुचित अस्मितांचे विसर्जन करण्याची गरज आहे. कारण या संकुचित अस्मिता या वंचित समूहांना सामाजिक न्यायाच्या रणभूमीवर एकत्रच येऊ देत नाहीत. भांडवली जागतिकीकरणाच्या रोलरखाली चिरडले तरी जा किंवा विघातक अस्मितांचे विसर्जन करून सामाजिक न्यायाची लढाई तरी जिंका. अशी अटच आता या लोकांपुढे आजच्या निर्णायक परिस्थितीने ठेवली आहे. निर्णय जगातल्या वंचित समूहांनी घ्यायचा आहे.

पृथक् पृथक् अस्मितांना जगवायचे की क्रांतीकारी मानवीसमूह म्हणून स्वतःला जगवायचे ? या गोष्टीचा निर्णय आता वंचितांनी डोके ठिकाणावर ठेवून तातडीने घ्यायचा आहे. अर्थात आपल्या परंपरागत विघातक मानसशास्त्राचा त्याग करून हे सर्व वंचित स्वतःला केवळ जगवण्याचेच ध्येय साध्य करू शकत नाहीत तर ते सामाजिक न्यायाची लढाईसुद्धा जिंकू शकतात. भांडवली जागतिकीकरणाचा आशय बदलू शकतात आणि या जागतिकीकरणाचा प्रवाहही वंचितांच्या हिताच्या दिशेने बदलू शकतात.

: एक :

संगणकासारख्या, इंटरनेटसारख्या, मोबाईलसारख्या क्रांतीकारी तंत्रज्ञानाने वंचितांच्या विजयाच्या शक्यता वाढवलेल्या आहेत. या उपकरणांनी दुनियेतील सर्वच

वंचितांना जवळ आणलेले आहे. एका वंचित समूहाचा जगातल्या कोणत्याही वंचित समूहाशी हव्या त्या क्षणी संवाद होऊ शकतो. ही प्रक्रिया केवळच शब्द जवळ येण्याची, माणसांचे देह जवळ येण्याची नाही तर वंचित समूहांची मने, त्यांची सुखदुःखे एकत्र येण्याचीही ही प्रक्रिया आहे. क्रांतीचे हे कलम जगातल्या वंचित समूहांना मागल्या केवळ पाचपंववीस वर्षात उपलब्ध झाले आहे. दुनियेच्या जीवनाने एका अपूर्व वेगात आज प्रवेश केला आहे. वरील सर्वच तंत्रज्ञानाचा वापर मूठभर भांडवलदार आणि नवसाम्राज्यवादी वंचितांच्या विरोधात करीत असतील तर जगातल्या बहुसंख्य वंचितांनीही या तंत्रज्ञानाची शक्ती आपल्या हितासाठी आणि जगातल्या सर्वांनाच एलिनेशनमुक्त करण्यासाठी वापरण्याची गरज आहे.

: दोन :

हे होण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. ही प्रक्रिया धिमी आहे पण ती कार्यरत मात्र निश्चित झालेली आहे. आपण परिवर्तन घडवू शकतो. क्रांतिमनस्क परिवर्तन आपण जन्माला घालू शकतो. सर्व सतत बदलत असते असे जीवनाचे सूत्र सांगून बुद्धाने परिवर्तनाच्या अप्रतिहत प्रवाहाचे उद्‌घाटन केले. जीवनाला एकाच ठिकाणी थांबवणाऱ्या स्थितीवाद्यांच्या निःपाताची एक मोलाची सोय बुद्धाने करून ठेवली. जीवनात सतत बदल होतात हे खरेच आहे. पण हे सर्व बदल चांगलेच असतात असे नाही. काही बदल विधायक असतात तर काही बदल विघातक असतात. याचा अर्थ असा की, परिवर्तनावर सुद्धा विधायकतेचे नियंत्रण असावे लागते. बदल समाजाच्या अहिताला जन्म देणार नाहीत आणि ते डोकेदुखी ठरणार नाहीत यासाठी विचारवंत नावाच्या पहारेकऱ्यांनी डोळ्यात तेल घालून कार्य करावे लागते. बदलाची समीक्षा सतत करावीच लागते. सर्व बदलांची तोंडे मानवी हिताच्या, सामाजिक न्यायाच्या दिशेने वळवावीच लागतात. गावात होणारा सज्जनांचा प्रवेश आणि दरोडेखोरांचा प्रवेश या दोन्ही गोष्टी परिणामदृष्ट्या परस्परविरोधी आहेत. यासाठीच परिणामांचे भान बाळगावे लागते. त्यांच्यावर बारीक नजर ठेवावी लागते. असे सर्वच 'प्रवेश' गाळून घ्यावे लागतात. बदलही असे गाळून वा वळवून घ्यावे लागतात.

: तीन :

मानवी जीवनात घडणारे बदल मानवाला त्याच्या निरामय मानवी सत्त्वापासून (Essence) तोडणारे, त्याला त्याच्या स्वाभाविक गुणवैशिष्ट्यांचा स्मृतिभ्रंश घडविणारे आहेत की त्याचे मूळ मानवी सत्त्व समृद्ध वा प्रज्ञानी करणारे आहेत त्याची शहानिशा मानवी जीवनाच्या पालकांना करावीच लागते. बदल गोष्टींना चांगलेही करतात.

वाईटही करतात. ते परिस्थितीला समंजसही करतात किंवा परिस्थितीचे डोकेही फिरवतात. हे सर्व परिस्थितीच्या संदर्भात घडते याचा अर्थ ते माणसाच्या संदर्भातच घडते.

: चार :

या लेखाच्या प्रारंभी एकूणच जगातील वंचितांच्या सामाजिक न्यायाच्या लढाईचा उल्लेख आलेला आहे. वंचितांच्या सामाजिक न्यायाची प्रस्थापना म्हणजे त्यांच्या मानव म्हणून संभवणाऱ्या न्याय्य हक्कांची प्रस्थापना होय. सर्वच माणसांना समान मानवी अधिकार असायला हवेत. One man One value या सूत्रात हेच समान मानवी अधिकाराचे आणि सामाजिक न्यायाचे तत्त्व अध्याहृत आहे. समाजात सर्वांना समान मानवी अधिकार नाहीत म्हणूनच तर समान मानवी अधिकाराचे तत्त्व सांगावे लागते. माणसांमध्ये भेदभाव केला जातो आणि या भेदभावाच्या आधाराने असंख्य पातळ्यांवर असंख्य लोकांवर अन्याय होतो म्हणूनच तर सर्वांना समानता प्रदान करणारे सामाजिक न्यायाचे तत्त्व पुरस्कारावे लागते.

मानवी समाजात कोणीतरी कोणाला तरी सामाजिक न्याय नाकारतात. जीवनात कोणी तरी कोणाला तरी समान मानवी अधिकार नाकारतात. या प्रक्रियेत ज्यांना मानवी अधिकार नाकारले जातात त्यांच्या माणुसकीची नासधूस होतेच पण जे इतरांना असे अधिकार नाकारतात त्यांच्याही माणुसकीचे दिवाळे निघते. या रूपांतराला, माणुसकीच्या या विरूपीकरणाला किंवा या दुतर्फा उलंगवाडीलाच वियुक्तीकरण (एलिनेशन) म्हटले जाते.

मी कोण आहे ? या प्रश्नाचे मानवी जीवनाच्या प्रारंभटप्प्यावर प्रत्येक माणसाचे एकच एक उत्तर होते 'मी माणूस आहे' हे उत्तर जोवर अस्तित्वात होते तोवर मानवी समाज एलिनेशनविहीन होता. मानवी अस्तित्व एकसंध होते. माणसाचे माणूसपण अभंग होते, ते कुठे, कोणत्याही कारणाने गहाळ झाले नव्हते वा हरवले नव्हते असे म्हणता येते. अशी वियुक्ती, असा उपरेपणा वा सत्त्वहीनता त्या काळात नव्हती. पण समाजाची ही एकमयता संपुष्टात आली. माणसाचे हे Dehumanizetion म्हणजेच वियुक्ती किंवा एलिनेशन होय. वियुक्ती म्हणजे माणसातील माणुसकीचे कोसळणेच असते किंवा तो तिचा मृत्यूच असतो. वियुक्ती हे असे नाणे आहे की ज्याच्या दोन्ही बाजू एकच शिक्षा भोगत असतात. या दोन्ही बाजू म्हणजे समता नाकारणारा आणि विषमतेत जळणारा. या दोन्ही बाजू एकाच आगीत जळत असतात. ही आग माणुसकी जळत असलेल्या चितेची असते. एलिनेशन असे दुतर्फा माणसाला कंगाल करते. माणुसकीच्या दृष्टीने माणसांना श्वास घेणारी प्रेते करून ठेवते.

: पाच :

एलिनेशनची आग कधीतरी विश्वात पसरायला लागली आणि या वणव्याने अखखी दुनियाच आपल्या कवेत घेतली. या महावणव्याचा उगम तृष्णेच्या एका ठिणगीत आहे. कधीतरी एका माणसाला या तृष्णेची लागण झाली. तिने संपूर्ण समूहाचा परिसर व्यापला. तृष्णा व्यक्तीला लाभणाऱ्या सुखांनी समाधान मिळू देत नाही. तर या तृष्णेच्या अघोरीपणाला सुखी होण्यासाठी इतरांची दुःखे लागतात. इतरांच्या दुःखाचा खुराक मग या वृत्तीला सारखा मिळावा लागतो. तृष्णेची आग सतत धगधगत राहण्यासाठी इतरांच्या दुःखांचे इंधन लागते. या इंधनाला कोणतीही मर्यादा ही तृष्णा उरू देत नाही.

याचा अर्थच असा की, तृष्णा खाजगी संपत्तीच्या वृत्तीचा प्रारंभ करून देते आणि अनिर्बंध संपत्तीचा आणि वर्चस्वाचा पाठपुरावा करते. या सर्वच अमानुष प्रक्रियेच्या पोटी शोषण जन्माला येते. हे शोषण मग सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि धार्मिक अशा सर्वच विषमतांना जन्म देते. या विषमतांचे मग केवळच संगोपन ही तृष्णा करीत नाही तर त्यांचे संवर्धनही करण्याचा ती आटोकाट प्रयत्न करते. या सर्व प्रकारच्या विषमतांमधून एलिनेशन साकार होते. माणसांमधील तरतमभाव, त्यांच्यातील उच्चनीचता या सर्वच गोष्टी त्यातूनच पैदा होतात.

: सहा :

वर निर्देशिली ती विषमता आणि नैसर्गिक भेद या दोन गोष्टी एक नव्हत. त्यात गुणदृष्ट्याच मूलभूत तफावत आहे. निसर्गात असंख्य पातळ्यांवर विविधता आहे. निसर्गातील कोणत्याही दोन रूपांमध्ये भेद आहेत पण ती विषमता नव्हे. ती विविधता आहे. झाडे, डोंगर, नद्या, पाने, फुले, पक्षी, पशू यांच्यामध्ये केवढीतरी विविधता आहे. पण ही सर्व वनस्पतीसृष्टी आणि मानवेतर सृष्टीतील वस्तू आणि प्राणी आपल्या वर्गातील घटकांमध्ये सामाजिक आणि आर्थिक विषमता पाळीत नाहीत. त्यांच्यामध्ये जाती-पोटजाती नाहीत. त्यांच्यात त्या कारणांनी होणारे अन्याय-अत्याचार नाहीत. झाडांमध्ये लिंगभेदावरून होणारे अन्याय नाहीत. ग्रामीण शहरी हा भेद नाही. सुशिक्षित-अशिक्षित असा भेद नाही. त्यांच्यात अस्पृश्यता नाही. त्यांच्याच भाषेच्या संदर्भातली भांडणे नाहीत. प्रादेशिक भांडणे नाहीत. धर्मावरून होणारी भांडणे नाहीत. त्यांच्यात विविधता आहे पण वितुष्ट नाही.

: सात :

मानवी जीवनातही विविधता आहे. प्रारंभकाळात ही विविधता विरोधात

रूपांतरित झाली नव्हती. मानवी समाज एकमय होता. एकवर्णी होता. या समाजात वितुष्ट नव्हते. पण तृष्णेचा प्रवाह मानवी मनाच्या नदीचे किनारे ओलांडू लागला. तृष्णेला काटेरी पंख फुटू लागले. मानवी एकसंधता आता तृष्णेच्या भोवऱ्यात सापडली. मानवी सत्त्व वादळात सापडले. स्वयंकेंद्रिततेचा संसर्ग माणसाला झाला. संचयवृत्तीने माणसाने मन घेरले. संचयवृत्तीची वर्तुळे विस्तारू लागली. माणूस पोटाची आग विझविण्यासाठी प्राण्यांची शिकार करायचा. आता त्याच्या तृष्णेने त्याच्या शिकारीवृत्तीला नवे परिमाण दिले. तो माणसांच्या कष्टांची शिकार करू लागला. इतरांच्या स्वातंत्र्याची आणि मानवी अधिकारांची शिकार करू लागला. तृष्णा त्याला अहंकाराचे प्रशिक्षण देऊ लागली. वर्चस्वाच्या प्रवृत्तीला विषारी काट्यांची पालवी यायला लागली. स्वतःला अधिकाधिक उंच साबीत करण्यासाठी पायाखालील माणसांची संख्या वाढविणे अपरिहार्य झाले. त्यासाठी माणूस मग इतर माणसांच्या सत्त्वाचे अपहरण करू लागला. एलिनेशनचा जन्मक्षण असा तृष्णेच्या मोकाट सुटण्याच्या कालबिंदूपाशी नेता येतो.

: आठ :

तृष्णेचे एक स्वाभाविक नियोजन मानवी प्रवृत्तीच्या जन्माआधी होत होते. एक आदिम समाजवादी मानसशास्त्र संचयवृत्तीच्या जन्मापूर्वी मानवी जीवनात होते. परंतु तृष्णेच्या अनिर्बंध जन्माने आपला, परका हे एक नवे दुष्ट नाते निरामय मानवी जीवनात जन्माला घातले. त्यातून परकेपणाचे, उपरेपणाचे आणि तुटलेपणाचे भान जन्माला आले. तृष्णावृत्तीने शोषणासाठी काही लोकांना परकेपणाच्या परिघात ढकलले. ज्यांना असे परकेपणाच्या संकटात ढकलले गेले ते आपल्या स्वाभाविक मानवी सत्त्वाला पारखे झाले. हा तुटलेपणा, हा ब्रोकननेस दुहेरी होता.

जमातींमध्ये चालणाऱ्या लढाईत पराभूत जमातीचे तुकडे होत होते. त्या तुकड्यांचे वेगवेगळे फिरते गट होत होते. हेच Broken Men होत. हे लोक परके ठरले. स्थिर जीवन जगणाऱ्या लोकांसाठी ते पहारेकरी झाले. हे एलिनेशनचेच एक भीषण रूप आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतातील एलिनेशनच्या बाबतीतले हे एक अत्यंत दाहक निरीक्षण आहे. तर मानवनिर्मित वस्तू एक स्वतंत्र, परकीय शक्ती बनते आणि मानवावर सत्ता गाजविते. तो त्या वस्तूपासून दुरावतो आणि तुटलेला हा मानव निर्माण केलेल्या वस्तूचा गुलाम बनतो. असे श्रमाच्या संदर्भातले एलिनेशनचे रूप मार्क्सने सांगितले. आपल्या कृतीच्या निर्मातेपणावर त्याला हक्क सांगता येत नाही. निर्मात्याऐवजी त्याचे गुलामीत आणि वेठबिगारीत रूपांतर होते. या प्रक्रियेत निर्माण होणारे उत्पन्न वेठबिगारीचा प्रकार होऊन जाते. हाही मानवी

स्वत्वाचा एका अर्थी मृत्यूच असतो. या घडामोडीत आपले Natural Being हे रूप माणूस गमावून बसतो.

: नऊ :

लोकांच्या या तृष्णेच्या अतिरेकाने केवळ काही माणसांचीच नव्हे तर झाडून साऱ्याच माणसांची माती केली. इतरांना एलिनेट करणारा माणूस स्वतःही एलिनेट झाला. घाण करणारांनाही रोगाची शिकार व्हावे लागले. घाण न करणारांनाही व्हावे लागले. इतरांना लुटायला गेलेला माणूस स्वतःही लुटला गेला. हे कंगालीकरण इतरांना कंगाल करणारांच्याही जीवावर असे उठले. इतरांना जगवणाऱ्या माणसाचे जगणेही देखणे होऊन जाते. इतरांना मारणारा माणूस मात्र स्वतःही माणूस म्हणून जगू शकत नाही. एलिनेशन हे असे दुधारी शस्त्र आहे. ते इकडच्यांनाही कापून काढते. तिकडच्यांनाही कापून काढते. इतरांना नाकारणारा माणूस स्वतःलाही नाकारून टाकत असतो. बाहेरून बंद असलेल्या घराला इतरांना जाळण्याच्या इराद्याने जेव्हा आतला माणूसच आग लावतो तेव्हा इतरांबरोबर आग लावणाऱ्या आतल्या माणसाचाही कोळसा होतोच. दुनियेच्या विराट घरातील सर्व माणसे एलिनेशनच्या आगीत याच पद्धतीने जळून गेलेली आहेत. जळत आहेत.

मानवी जीवनावर एलिनेशन नाना पद्धतींनी आग पसरते. दुष्ट मानवी प्रतिभेने वेगवेगळ्या काळात एलिनेशनच्या वेगवेगळ्या पद्धतींची दारे उघडून दिली आहेत.

अगदी मुळात माणूस कोणती जात नव्हता. पोटजात नव्हता. वर्ण नव्हता. वर्ग नव्हता. वंश नव्हता. इन्सान की अवलाद फक्त इन्सानच बनत असे असा एक काळ मानवी जीवनात होता. ही निरामयता कधीतरी दीर्घकाळ मानवी जीवनात नांदली. पुढे तृष्णेचा नांगर फिरत राहिला आणि माणसाच्या चेहऱ्यावरील, मनातील ही निरागसता पार उद्ध्वस्तच होत गेली.

जन्माला आलेले मूल कोणत्याही जातीचे नसते. कोणत्या वर्णाचे वा धर्माचेही नसते. कोणत्या वर्गाचेही नसते. वरील सर्वांच्याच अतीत असलेल्या या निरामयतेला समाज, त्यातील एलिनेशनग्रस्त आईबाप आपल्या वाट्याला आलेले एलिनेशन शिकवतात. एक दुभंगलेपणा एका अभंगतेला अशी एलिनेशनची तयार भेट देतो. जीवनाच्या विराट पसाऱ्यात काही शोषक असतात. काही शोषित असतात आणि हे सर्वच आपल्या पोटी जन्माला आलेल्या एलिनेशनरहिततेला अनंत तुकड्यांमध्ये विभागणारा एलिनेशनचा शस्त्रसाठा देतात. देशकाल परिस्थितीनुसार त्याला ईश्वर शिकवतात. आत्मा शिकवितात. जातीचे-पोटजातीचे प्रशिक्षण देतात. धर्माचे धडे

शिकवितात. याप्रकारे एक एकसंधता तोडली जाते. हे प्रत्येक तोडणे त्या लहान मुलाला त्याच्या संपूर्ण माणुसकीपासून तोडते. या प्रक्रियेत त्या मुलाचे मूळ माणूसपण, त्याचे निरामय आणि अस्सल मानवी सत्त्वच पार गारद होऊन जाते. या सर्व गोष्टींचे नियोजन त्याच्यातील मूळ माणुसकीचा निःपात करण्यासाठीच केलेले असते.

: दहा :

जन्माला आलेले मूल आईवडिलांकडून जाती, धर्म घेण्यापूर्वी मुक्त असते. स्वतंत्र असते. मुलाच्या जाणिवांचा परिघ सर्वच माणसांसाठी खुला असतो. त्याचा विचार, त्याच्या मुक्त भावना हेच त्याचे सत्त्व असते. तो 'जात' होतो तेव्हा त्याच्या विचाराला जातीच्या कक्षा प्राप्त होतात. तो धर्म होतो आणि त्याच्या विचाराला त्याच्या धर्माच्या मर्यादा प्राप्त होतात. तो वर्ग होतो आणि त्याचा विचार वर्गीय रूप धारण करतो. त्याचा विचार मग माणसाचा समग्रलक्ष्यी विचार राहत नाही. तो जातीचा विचार होतो. त्याच्या धर्माचा, वर्गाचा विचार होतो. विचाराला असे प्रकारात वाटले जाते. जातविचार, धर्मविचार, वर्गविचार असे विचारांचे सीमांकन होते. विचाराचे, ज्ञानाचे असे वर्गीकरण होते. याचा अर्थ या विचाराचेही एलिनेशन होते. माणसाचे व्यक्तित्त्व एलिनेट झाले की त्याच्या विचाराचे, त्याच्या भावनांचे, त्याच्या संपूर्ण जगण्याचेच असे एलिनेशन होते. मूळ असीमता अशी सीमांमध्ये कोंडली जाते. ही प्रक्रिया माणसाचा एलिनेशनग्रस्तता असा 'लसावि' करते.

काही माणसे ईश्वर ही संकल्पना जन्माला घालतात आणि स्वतःच्या संपूर्ण योगक्षेमासाठी सक्रिय संघर्ष करणारी माणसे आपली काळजी करणारे सर्वशक्तिमान ठिकाण मिळवतात. त्यांच्यातील विचार करणारी यंत्रणा विचार करण्याच्या प्रक्रियेला पारखी होते. एक मृगजळ, एक संभ्रम माणसाला स्वतःचा संपूर्ण विचार स्वतःच करण्याच्या प्रक्रियेपासून तोडतो. चिकित्सा, तर्क या गोष्टी थांबतात. या सामर्थ्याशी माणसाची फारकत होते. मी विचार करणारा प्राणी आहे ही त्याची ओळख ईश्वर ही मृगजळीसंकल्पना मारून टाकते. हा त्याच्या माणूस म्हणून संभवणाऱ्या सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्याचा मृत्यूच असतो. आपले नुकसान टाळण्यासाठी माणसाने ईश्वर निर्माण केला पण आपले विचारकर्ते महान माणूसपण गमावून त्याने आपले भीषण नुकसानही करून घेतले. हे 'दिले हिरण्यमय हाती मृण्मय' तसे झाले.

मी माणूस आहे ही माणसाची ओळख पुसली गेली आणि मी ईश्वराचा अंकित आहे. परावलंबी भक्त आहे असा माणसाचा संकोच झाला. त्यांच्या मेंदूचे हे थिजलेपण आहे. त्याच्या विचारप्रक्रियेची ही भयंकर गोठवणूक आहे. या एलिनेशनने मानवी

इसेन्सचा, त्याच्या सुंदर आणि शक्तिशाली ऊर्जेचा असा भयानक बळी घेतला.

: अकरा :

माणसाने धर्म जन्माला घातले परंतु हे धर्मही त्याच्या माणुसकीला एलिनेशनच्या तुरुंगात घेऊन गेले. माणूस सर्व माणसांचा होता पण पुढे तो त्या धर्मातील काही थोड्यांपुरता सीमित झाला. तो सर्वत्र होता. तो आता कप्प्यात अडकला. तो मुक्त होता पण आता चौकटीत बंद झाला. वाऱ्याला धर्मांच्या, जातीच्या दोरखंडांनी कुठल्यातरी सीमांच्या खुंटांना बांधण्यासारखे हे होते. हेच वर्गांच्या, जातींच्या, पंथांच्या, प्रादेशिक अस्मितांच्या संदर्भात म्हणता येते. मूळ मानवी मन आकाशासारखे अखंड. पण त्याचे धर्मांच्यानुसार जातींच्यानुसार तुकडे झाले. मानवी एकसंधतेच्या काचेचे असे पार तुकडे तुकडे झाले. या वाताहतीला एलिनेशन हेच कारण असते. एलिनेशन माणुसकीची अशीच माती करते.

एलिनेशन माणसाच्या मनाचे तुकडे करते. भक्त, जात, धर्म, वर्ण, वर्ग, वंश अशा विघटनशील आयडेंटिटींमध्ये त्याचे रूपांतर करते. या विघातक आयडेंटिटीज त्याला त्याच्या माणूस या समृद्ध आणि सौंदर्यपूर्ण आयडेंटिटीपासून तोडतात. या आयडेंटिटी कृत्रित असतात आणि सर्वसामान्यांच्या अप्रतिहत शोषणासाठी शोषकांनी निर्माण केलेल्या सोयींसारख्या असतात. या सरळ-साध्या लोकांचा छळ करण्यासाठी निर्माण केल्या गेलेल्या कपटी युक्त्या असतात. शोषितांचे आवाज नेहमीसाठी दाबून ठेवण्याचे हे कारस्थान असते. शोषितांभोवती न तुटणारा तुरुंग बांधण्याची ही प्रक्रिया असते. काही दुष्ट मूठभरांच्या सांस्कृतिक आणि आर्थिक वर्चस्वाची ही संरचना असते.

या एलिनेशनचा हेतूच जीवनात श्रेष्ठ-कनिष्ठता निर्माण करणे हा असतो. यालाच डेरिडा बायनरी अपोझिशन्स म्हणतो. अशा असंख्य पदांच्या जोड्या असतात आणि त्यातील एक पद श्रेष्ठ आणि दुसरे गौण असते. एक पद मालक आणि दुसरे गुलाम हे असते. माणसांमधले हे संबंध निरोगी नसतात. मानवी जीवनाला असंबद्ध करणारे, त्याला बेढब करणारे आणि मानवी सत्वाच्या दृष्टीने जीवनाला पोकळ करणारे संबंध असतात.

पहिल्या पदातील लोकांची संख्या कमी असते. दुसऱ्या पदातील लोकांची संख्या प्रचंड मोठी असते. हा वर्गीय शोषणाचाच अत्यंत चलाख प्रकार असतो. काही ठिकाणी कर्मविपाकाचा, पूर्वजन्मातील पापांचा खोटा हवाला देऊन हे निर्लज्ज शोषण सुरू केलेले असते. हे विषमतेला कन्फर्म करण्याचे, स्थायी करण्याचेच काही निवडक

कुटिलांचे षडयंत्र असते. यामागे कोणताही तर्क नसतो. या एलिनेशनने ज्यांना दुय्यम वा गुलाम केलेले असते ते स्वातंत्र्याला, स्वतंत्र आणि मनाला हव्या त्या सर्जनाला पारखे होतात. ते वेठबिगार म्हणून घडवले जातात. त्यांच्या मनावर तसेच बिंबवले जाते. या वेठबिगारांच्या समूहांना कायम परिघाबाहेर ठेवण्याची शिकस्त केली जाते. ते परिघाबाहेरून परिघावर आणि परिघावरून जीवनाच्या केंद्राकडे म्हणजे सत्ताकेंद्राकडे सरकणार नाहीत यासाठी सत्ताधीश वर्ग नेहमीच त्या त्या काळातील भौतिक विकासानुसार नाना युक्त्यांचे डाव टाकीत असतात.

शोषक आणि शोषित या दोन पदांमधील शोषित हे पद सन्मानवंचित पद असते. हे पद शोषित या पदाचे वस्तूतः रूपांतर करते. ही वस्तू खरेदी-विक्रीसाठी योग्य बनविली जाते. या पदाचे वेठबिगार या अधःपतित अवस्थेत रूपांतर केले जाते. स्त्री हे पद असे अधःपतित केले जाते. निग्रो हे पद असे अधःपतित केले जाते. शूद्र-अतिशूद्र ही पदे अशीच अधःपतित केली जातात. जगात वेगवेगळ्या नावांनी ही अधःपतित पदे आजही वावरतात. इतिहासभरही ती वावरली आहेत.

: बारा :

खूपदा असे घडते की, हे अधःपतित समूह आपल्या माणुसपणाच्या प्रतिष्ठेसाठी युद्धे छेडतात. ते कधी आंदोलने होतात. कधी शतकानुशतके आंदोलनाच्या स्फोटासाठी आत धुमसत राहतात. तर कधी कधी शोषकांच्या भूलथापांना बळी पडून शोषित माणसे आपल्या वाट्याला आलेली सांस्कृतिक वेठबिगारी हा नैसर्गिक वा न्यायाचा भाग मानून बसतात आणि आपल्या एलिनेशनसाठी स्वतःच संरक्षक कवच बनतात. आपल्या वस्तूरूपाला मान्यता देतात. आपल्या वेठबिगारीचे समर्थन करतात. भारतात अध्यात्माच्या नौटंकीने हा अमानुष परिणाम साधला. स्त्रिया, शूद्र-अतिशूद्र यांनी आपल्या वाट्याला आलेले दास्य हजारो वर्षे पवित्र मानले. इतर कोणी त्याच्या गळ्यातील गुलामीच्या दाव्याला हात लावला नाही आणि त्यांनी तसा कोणाला हात लावूही दिला नाही. कधी कधी असे घडते. गुलामच आपल्या गुलामीचे संरक्षण आणि संवर्धन करतात. मग त्यांचे मालक निर्धास्त होतात. ही दुष्ट संस्कारांची आणि एलिनेशनच्या अफूची परमावधी असते.

एलिनेटेड माणसांचा शोषक गट एलिनेटेड शोषितांना हजारो वर्षे वापरतो. दोघांनाही एलिनेशननेच गिळलेले असते. दोघांनाही एलिनेशनने मानसिक अंधत्व बहाल केलेले असते. ते त्यांना त्यांच्या मानवी सत्त्वाचा कंगालपणा, मानवी सत्त्वाचा मृत्यू दिसूच देत नाही. अशावेळी या माणुसकीला पारख्या झालेल्या दोन्ही अंधत्वांना त्यांच्या अंधत्वाची जाणीव कोणी तरी करून द्यायची असते. त्यांचा पोकळपणा,

जाणिवांचा भिकारीपणा त्यांना जाणवून द्यायचा असतो. मृतांना त्यांच्या मृत्यूची जाणीव करून द्यायची असते. असे झाले तर प्रेतेही जिवंत होऊन उठतात. एलिनेशनने केलेली वाताहत परत सर्जनशील करता येते.

एलिनेशनला आज भांडवली जागतिकीकरणाच्या काळात काही गुंतागुंतीचे आयाम प्राप्त होत आहेत. एलिनेशनची ताकद खूपच वाढली आहे आणि त्याने दुतर्फा माणसांना पोकळ करायला प्रारंभ केला आहे. नवभांडवलदार, नवसाम्राज्यवादी आणि सर्वसामान्य मध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय लोक यांच्या माणुसकीच्या अस्सलपणाचे, सत्त्वाचे काही हौद रिकामे झालेले आहेत. काही होत आहेत. एवढ्याही श्रीमंतीत, भौतिक विकासाच्या स्फोटात माणसे आतून रिती झालेली आहेत. आजच्या जगाचा पराक्रम असा की नानाप्रकारची मृगजळे निर्माण करण्यात त्याला अफाट यश येत आहे आणि या मृगजळामागे बेभान होऊन धावणाऱ्या इच्छांची गर्दी निर्माण करण्यातही या जगाला मोठेच यश आलेले आहे. 'समुद्री चहुकडे पाणी पिण्याला थेंबही नाही' तसे हे झाले आहे. 'पाणी बिन मीन पियासी हो मोहे सुन सुन आवत हासी हो' असे कबीर म्हणतात. त्याचा अर्थ आज जास्तच प्रत्ययाला येतो. माणूस अधिकाधिक उद्ध्वस्त होतो आहे. त्याची तहान शमतच नाही. काहिली शमत नाही. माणूसपण उपाशीच राहून जाते. तहानलेलेच राहून जाते असे का होते ? काहीतरी चुकले आहे. तृष्णेने जगाला मनाची वाताहत करणाऱ्या आणि त्याचे कंगालीकरण करणाऱ्या समृद्धीत आणून सोडलेले आहे.

: तेरा :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विराट लेखनातील प्रत्येक शब्द जात, धर्म, वर्ग, लिंगभेद अशा सर्वच पातळ्यांवर लोकांना छळणारे एलिनेशन संपविण्यासाठी साकार झाला आहे. बाबासाहेबांचा प्रत्येक शब्द बंडखोर आहे. या प्रत्येक शब्दाने एलिनेशनविरुद्ध निर्णायक युद्ध पुकारले आहे.

चातुर्वर्ण्य ही श्रमाची नव्हे तर श्रमिकांची विभागणी आहे हे सांगून त्यांनी एलिनेशनच्या मुळालाच हात घातला. ज्याचा जन्म ज्या मजल्यावर झाला त्याच मजल्यावर त्याने मरावे आणि मजल्यावरचा म्हणजे वर्णातला जातीतला जन्म हा पूर्वजन्मीच्या पापापुण्यावर अवलंबून आहे. ऐहिक शोषणासाठी हा निखालस खोटा असा दैवी हवाला दिला जातो. बाबासाहेबांनी या हवाल्याच्या चिंध्या केल्या. या सर्वच वर्णा-जातींमुळे म्हणजे सामाजिक विषमतेमुळे देशाचा आर्थिक विकास कसा अवरुद्ध झाला तेही बाबासाहेब सांगतात. अस्पृश्यता ही निरंतर शोषणाची यंत्रणा

येथील वर्चस्ववाद्यांनी, उच्चवर्णांनी कशी करून ठेवली त्याचे विदारक चित्र बाबासाहेब काढतात. अस्पृश्यता ही सामाजिक रचनेच्या नावाखाली केली गेलेली अत्यंत दुष्ट अशी आर्थिक संरचना कशी आहे तेही बाबासाहेब सांगतात. आर्थिक शोषण आणि सामाजिक शोषण यांचा हेतू एकच असतो म्हणून त्यांचा आशयही एकच असतो. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक ही शोषणाचीच नानाविध रूपे असतात आणि या सर्व शोषणाद्वारे होणारे एलिनेशन सर्वच दुर्बल घटकांची माणुसकी जाळूनच टाकते. हे असे एलिनेशन लादणारी शास्त्रे उद्ध्वस्त करा असे 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट'मध्ये बाबासाहेब सांगतात.

विषमतेचा निःपात, विषमतेमुळे होणाऱ्या शोषणाचा निःपात म्हणजे एलिनेशनचाच निःपात होय. बाबासाहेबांनी आपल्या राज्य समाजवादात शेतीचे राष्ट्रीयीकरण सांगितले. सामुदायिक लागवडीचे समाजवादी सूत्र दिले आणि कोणताही भेद न करता उत्पन्नाचे वाटप हे क्रांतीकारी सूत्र दिले. हे अनियंत्रित तृष्णेचे व्यवस्थापनच आहे.

एलिनेशनग्रस्त मानवी अस्तित्वाच्या संपूर्ण वाताहतीची चिकित्सा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वाङ्मयात मूलगामी पातळीवरून झालेली आहे. पण त्यांच्या लेखनात केवळ वंचितांच्याच एलिनेशनच्या निःपाताचा विचार नाही तर ज्यांनी हे एलिनेशन बहुसंख्यांकांवर लादले तेही माणुसकीला पारखे झालेलेच आहेत. म्हणून त्यांच्याही एलिनेशनच्या निःपाताचा विचार बाबासाहेब मांडतात. त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, ''समतेच्या झगड्यात वरच्यास खाली लोटण्याऐवजी खालच्यास वर ओढणे हाच प्रगतीचा मार्ग श्रेयस्कर आहे.'' (म. शासन : खंड १९, पृ. २९०) बाबासाहेबांना कोणाच्याही माणुसकीची माती होऊ नये असे वाटते. (१९-२९६) असे बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान आहे.

एलिनेशनने सर्वांच्याच माणुसकीचे वाटोळे केलेले आहे. ज्यांनी एलिनेशन लादले त्यांच्याही आणि ज्यांच्यावर लादले गेले त्यांच्याही मानवी सत्त्वाचा विध्वंस एलिनेशनने केला आहे. ईश्वर, जाती, धर्म, वर्ण, वर्ग, वंश अशा सर्वच साधनांनी माणसांना एलिनेशनची आग लावण्याची भूमिका केलेली आहे. जातींचे, जमातींचे, धर्मांचे, अंधश्रद्धांचे, अज्ञानाचे आणि आंधळ्या तृष्णेचे समाजशास्त्र जागतिकीकरणाच्या काळात अर्थशास्त्रालाही एलिनेशनच्या सीमा उल्लंघू देत नाही.

**: चौदा :**

एलिनेशनच्या वणव्यात अखखी दुनिया आज जळत आहे. एलिनेशन संपविणे

म्हणजे त्याचे आधार, त्याचे तत्त्वज्ञान आणि त्यामागील सर्व मानसशास्त्र संपविणे होय. त्यासाठी सर्वच माणसांमधील एलिनेशनने ग्रस्त जाणिवांचा निःपात करण्याची आवश्यकता आहे. आपली हरण केलेली माणुसकी (१८.१.२७) परत मिळविण्याची गरज बाबासाहेबांनी बोलून दाखविली आहे. 'अस्पृश्यतेच्या निर्मूलना'पासून पृथ्वीच्या पाठीवरील सर्वच प्राणीमात्रांच्या अभ्युदयाच्या विचारापर्यंत वेगवेगळ्या पातळ्यांवरील एलिनेशनच्याच निःपाताचा किंवा अनिव्हिलेशनचाच विचार ते मांडतात. One man One value, राज्य समाजवाद, संविधानाची उद्देशिका, मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये आणि धम्मापर्यंत पसरलेला त्यांचा विचार हा एलिनेशनच्या ॲनिहिलेशनचाच मूलगामी विचार आहे. ॲनिहिलेशन म्हणजे एखादी विघातक गोष्ट पुढे कधीही निर्माण होऊ नये यासाठी तिचा मुळापासून निःपात करणे होय.

विद्यमान जागतिकीकरणाला केवळ नावे ठेवून उपयोग नाही. त्यातील चांगले घेतले पाहिजे आणि उरलेल्या वाईटाला समाजवादाचा आशय दिला पाहिजे. हे होऊ शकते. भारत जाती-धर्मांच्या सीमा उल्लंघून एलिनेशनवरती मात करू शकतो. दुनियाही या आगीतून बाहेर पडू शकते. अस्मितांची एकमेकांना कापणारी हत्यारे लोकांनी फेकायला मात्र हवीत. सामंजस्य जन्माला यायला मात्र हवे. तृष्णेचे नियोजन समाजवादाने करायला हवे. एवढे झाले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेले एलिनेशनमुक्त जगाचे स्वप्न, धम्मविश्वाचे सुंदर स्वप्न आपल्या जगण्यात उतरू शकते.

.........................

नागपूर :

दि. १९/४/२०१२

■■

# डॉ. आंबेडकर म्हणजे ग्लोबल क्रांतिसिद्धान्त

एक दिवस असा येईल की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विश्वलक्ष्यी विचारविश्वाची (Discourse) महत्ता जगातील एकूणच सर्व जाणकारांच्या लक्षात येईल आणि क्रांती या शब्दाचा पर्याय म्हणून लोक आंबेडकर या शब्दाचा वापर करतील. आंबेडकर म्हणजे क्रांती असे लोक परस्परांना सांगतील. आंबेडकर म्हणजे ग्लोबल क्रांतिसिद्धान्त अशी मांडणी जगातील विचारवंत करतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारविश्व जगातील विचारवंतांच्या लक्षात मात्र आणून देण्याची गरज आहे.

: १ :

'केवळ माणूसच मर्त्य आहे असे नाही तर विचारही मर्त्य असतात' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटलेले आहे. विचार जेव्हा बदलत्या कालसंदर्भातील आपली प्रस्तुतता पेश करू शकत नाही तेव्हा तो मरतो. बदलत्या भौतिक संदर्भांचे व्यवस्थापन करू शकत नाही आणि नव्या भौतिक स्थित्यंतरांच्या प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर मात करण्याचे उपाय जो विचार सांगत नाही तो विचार मरतो. ज्या विचाराच्या वाट्याला बदलत्या परिस्थितीनुसार त्याची अन्वर्थकता मांडून दाखविणारी बौद्धिक साहसे येत नाहीत असा विचार आपली गती हरवून बसतो. आपल्या जगण्याचे प्रयोजन आपणच नष्ट करून टाकत असतो. सोनेही सतत उजळून घ्यावे लागते. असे झाले नाही तर त्याचेही मूळ उज्ज्वल रूप झाकोळले जाते. 'सब्बं अनिच्चं' असे बुद्ध म्हणतो. याचा अर्थ सर्वच सारखे बदलत आहे. भौतिक संदर्भ बदलतात. प्रश्नांची परिमाणे बदलतात. मानवी संबंधाचे आयाम बदलतात. विचारालाही या सर्व परिवर्तनाच्या प्रक्रियेसोबत धावावे लागते. या सर्व बदलांच्या कसोटीला उतरावे लागते. बुद्ध 'एहिपस्सिको धम्मा' म्हणाला होता. म्हणजे विचाराचा स्वीकार चिकित्सापूर्वकच करा. प्रश्न न विचारता, शंका न घेता कुठल्याही विचाराचा स्वीकार करू नका असे बुद्धाचेही म्हणणे आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेही म्हणणे आहे. ही प्रक्रिया विचारस्वातंत्र्याची महत्ता सांगणारी आहे. विचाराच्या गतिमानतेची प्रस्थापना करणारी ही भूमिका आहे. हे त्यांचे आवाहन पुढल्या सर्व पिढ्यांना आहे. कारण बुद्धाला त्याहीवेळी माहीत होते की कोणतीही शंका न घेता,

कोणताही प्रश्न न विचारता मला स्वीकारा असे म्हणणारा विचार आपले प्रवाहित्व गमावून बसतो. त्याचा Dogma होतो. त्याला मूलतत्त्ववादाचा हट्टीपणा प्राप्त होत जातो. त्याचा न वितळणारा दगड होतो. त्याचे रेजिमेंटेशन होत जाते. त्याचे हिटलरीकरण होत जाते. स्वतः थांबणारा विचार समाजालाही थांबवतो. जो समाज विचार थांबवतो वा विचारांचे थांबलेपण सहन करतो वा पुरस्कारतो तो समाज मानवी समाज म्हणून स्वतःलाच उद्ध्वस्त करीत असतो. असा समाज जीवनाच्या अप्रतिहत परिवर्तनाशी द्रोहच करीत असतो. अशा समाजात विचाराला अविचाराची कळा प्राप्त होते आणि अशा समाजाला पडीक वावराची अवकळा प्राप्त होते.

परिवर्तनशील समाजाचा विचार परिवर्तनशील असतो आणि परिवर्तनशील विचारालाच जगणे मानणारा समाज परिवर्तनाचे पंख लावून नवनव्या उज्ज्वलतेच्या दिशांवर भराऱ्या मारीत असतो. विचाराचे हे महत्त्व आहे. ज्ञानाचीही हीच जीवनसंवर्धक प्रकृती आहे. सोपारा येथे ६ मे १९५५ रोजी दिलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''ज्ञान कधीही पूर्णत्वाला पोचू शकत नसते. आज परिपूर्ण वाटणारे ज्ञानाचे अंग किंवा शाखा भविष्यकाळात अपूर्ण वाटणारच कारण दिवसागणिक त्यात वाढ होत असते. भर पडत असते.'' (खंड १८, भाग ३, पृ. ४४२ : महाराष्ट्र शासन) आपल्या काळाच्या संदर्भातील आपला विचार नव्या संदर्भाशी सामना करणाऱ्या पुढल्या पिढ्यांवर लादला जावू नये हे अपार सामंजस्य जसे या भूमिकेत आहे तद्वतच नव्या पिढ्यांनीही आपला विचार आपणच करावा हा सर्जनशीलतेचा विधायक आग्रहही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञानाची गतिमानता आणि जीवनाचीही गतिमानता अशी प्रस्थापित केलेली आहे.

: २ :

जगातील सर्वांनाच गतिमानतेशी आणि विधायक सर्जनशीलतेशी जोडणारी ही बाबासाहेबांची भूमिका आपण प्रमाण मानायला हवी. हे शब्दप्रामाण्य नव्हे. कोणाही ग्रंथासंबंधीचे वा कोणाही महामानवासंबंधीचे प्रामाण्य नव्हे हे प्रामाण्य विचारांच्या गतिमानतेशी, त्याच्या संवर्धनशील उज्ज्वलतेशी आहे. हे विचारांचे प्रवाहित्व गमावून बसलेल्या अविचाराशी प्रामाण्य नव्हे तर हे थांबू नका, वाऱ्यासारखे धावत राहा, भागो नही बदलो हे सांगणाऱ्या संशोधक विचाराशी आणि वैज्ञानिक प्रवृत्तीशी प्रामाण्य आहे. या प्रामाण्यालाच मी आंबेडकर प्रमाणशास्त्र म्हणतो.

खरे काय आणि खोटे काय हे निवडण्याचा निकष म्हणजे प्रमाण. चांगले काय आणि वाईट काय हे ठरवण्याचा निकष म्हणजे प्रमाण. विघातक काय आणि उपकारक काय ते ठरविण्याचा मापदंड म्हणजे प्रमाण. समता काय आणि विषमता काय ते

ठरविण्याचा निकष म्हणजे प्रमाण. सज्जनपणा म्हणजे काय आणि दुर्जनपणा म्हणजे काय ते ठरविण्याचा निकष म्हणजे प्रमाण. मानुषता म्हणजे काय आणि अमानुषता म्हणजे काय ते ठरविण्याचा मापदंड म्हणजे प्रमाण. मूल्य म्हणजे काय आणि मूल्यद्रोह म्हणजे काय ते ठरविण्याचा निकष म्हणजे प्रमाण. अंधश्रद्धा म्हणजे काय आणि विवेकवाद म्हणजे काय ते ठरविण्याचा मापदंड म्हणजे प्रमाण. प्रतिगामी काय आणि पुरोगामी म्हणजे काय ते ठरविण्याचा निकष म्हणजे प्रमाण. माणसाला लहान करणारे काय आणि माणसाला महान करणारे काय ते ठरविणारा मापदंड म्हणजे प्रमाण. सत्य-सौंदर्य काय आणि असत्य-कुरूपता काय हे ठरविणारा निकष म्हणजे प्रमाण. आंबेडकर प्रमाणशास्त्र याप्रकारे जीवनाच्या प्रत्येकच क्षेत्रातील सर्वांच्या हिताचे काय त्याचा निर्णय देणारे विज्ञान आहे. पृथ्वीच्या पाठीवरील एकूणच मानवी जीवनाच्या सम्यक हिताचा 'समान नागरी कायदा' असे या प्रमाणशास्त्राचे स्वरूप आहे.

शिवाय हे प्रमाणशास्त्र गतिमान आहे. त्या त्या बदललेल्या परिस्थितीत, त्या त्या संदर्भांच्या संदर्भात, त्या त्या वेळच्या लोकांना स्वतःच निर्णय घेण्याचे मुक्त स्वातंत्र्य हे गतिमान प्रमाणशास्त्र देते. तत्त्वज्ञानात विषमतेच्या शिस्तशीर उचापती आणि ओठावर समतेचा बेगड असा अध्यात्मिक दुटप्पीपणा इथे नाही. कुंपणावरचा कावळा जसा सोईने या दिशेनेही पाहतो, त्या दिशेनेही पाहतो तसे यासंदर्भात अध्यात्माचे चालते. आंबेडकर प्रमाणशास्त्र तात्त्विक आणि व्यावहारिक या दोन्ही पातळ्यांवर विषमतेला जाळूनच टाकते. आणि केवळ समतेलाच अधिक उज्ज्वल समतेकडे नेण्याचा आग्रह धरते.

: ३ :

आंबेडकर हे प्रमाणशास्त्र मानवी जीवनाला समग्र क्रांतीकडे बोलावणारे, एका सर्वन्यायी सर्जनशील जीवनशैलीकडे नेणारे आणि मानवी जीवनाला क्रांतीच्या जिवंत आणि निरंतर प्रवाहाशी जोडणारे प्रमाणशास्त्र आहे. क्रांतीची संकल्पना वेगवेगळ्या संदर्भात आणि अर्थांनी मांडली जाते. एकाच विचाराच्या दोन गटांमधील एका गटाकडून दुसऱ्या गटाकडे एखाद्या संस्थेची सत्ता वा राजकीय सत्ता जाणे याही घटनेचे वर्णन क्रांती असेच केले जाते. पण हे सत्तांतर ठरते. मूल्यांतर ठरत नाही.

स्वातंत्र्याच्या प्रेरणेने एक वर्ग दुसऱ्या वर्गाच्या विरोधात उठाव करतो. त्याला सत्तेवरून खाली खेचतो आणि स्वतः सत्तेचा धनी होतो. खालचा वर्ग वर आणि वरचा वर्ग खाली असे या क्रांतीचे स्वरूप असते. ही क्रांतीसुद्धा अपूर्ण क्रांती असते. स्त्री-पुरुष, अभिजन-बहुजन, मजूर-मालक अशी उच्च-नीच श्रेणीरचना समाजात असते. या समाजरचनेत कोणीतरी दुय्यम असतो. कोणीतरी प्रमुख असतो. ही

एकूणच रचना Binary Opposition ची असते. ही Hierarchy तोडण्याला म्हणजे वरचे पद खाली आणि खालचे पद वर करण्याच्या प्रक्रियेलाही क्रांती म्हटले जाते. म्हणजे वर्गांच्या जागा बदलण्यालाही क्रांती म्हटले जाते. या प्रक्रियेत अन्याय करणारा एक गट अन्यायग्रस्तांच्या गटात ढकलला जातो आणि अन्यायग्रस्तांचा गट वर्चस्वपदी पोचतो. ही सुद्धा अपूर्ण क्रांतीच ठरते. इथेसुद्धा क्रांतीचे चक्र अर्धेच फिरते. कारण याही क्रांतीत काही लोकांनाच सुविधा प्राप्त होतात आणि बदल्यात काही लोकांना असुविधांशी बांधले जाते. अशी क्रांती समग्र क्रांतीचे प्रारूप देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मान्य होणे अवघड आहे. कारण बाबासाहेबांना समग्र समाजच दुय्यमताविहीन पाहिजे आणि समान मानवी प्रतिष्ठेचा आदर करणारा पाहिजे.

: ४ :

एकूणच मानवी जीवन म्हणजे माणसांमधील बऱ्यावाईट संबंधांचा पसारा होय. पोटजातींच्या पातळीवरचे संबंध; जातींच्या पातळीवरचे संबंध; वर्गांच्या पातळीवरील संबंध; स्त्री–पुरुषांमधील संबंध; दोन वयोगटांमधील संबंध; दोन प्रांतांमधील, राष्ट्रांमधील संबंध; पती–पत्नीमधील संबंध; भावा–भावांमधील संबंध; आई–मुलांमधील, वडील–मुलांमधील आणि मित्रा–मित्रांमधील संबंध असे असंख्य पातळ्यांवरील संबंध जगात आहेत. हे संबंध नेहमीच केवळ सुखावहच नसतात. तर खूपदा ते दुःखावहही असतात. किंबहुना 'सुख पाहता जवापडे, दुःख पर्वताएवढे' असेच या संबंधांमधून प्राप्त होणाऱ्या सुखदुःखांचे स्वरूप असते.

संबंधांचे महाजाल म्हणजे मानवी दुनिया. एकाचा दुसऱ्यावर विश्वास नाही. एकाला दुसऱ्याबद्दल असूया आहे. कुठे घृणा आहे. कुठे असंख्य पातळ्यांवरील शोषण आहे. बहुतेकांच्या मनांना इतरांच्या सुखांनी आगी लागलेल्या आहेत. दुनियेत प्रेम आहेच. त्या प्रेमाच्या बळावरच तर माणूस इतर खूप नकोशा गोष्टी सहन करतो. पण या प्रेमाचा स्वार्थाने नाना पातळ्यांवर आजवर संकोचच केलेला आहे. स्वयंकेंद्रितताजन्य लोभाने आणि अहंमन्यतेने प्रेमाच्या शुद्धतेवर आणि सौंदर्यावर नेहमीच आक्रमण केलेले आहे. अहंमन्यता, स्वार्थ, लोभ, वर्चस्वीवृत्ती, नाना पातळ्यांवर इतरांना ओरबाडण्याची वृत्ती, शोषणाची अमानुषता, त्यातून उद्भवणारे क्रौर्य या सर्वच गोष्टींनी मानवी जीवनातील स्वस्थतेला, प्रेमाला आणि स्थैर्यालाच आग लावलेली आहे आणि माणसे या आगीत जळत आहेत. हे जळणे कधी दिसते. कधी दिसत नाही. अनिर्बंध, बेबंद आणि मोकाट तृष्णेने माणसांना असे परस्परांना दुःखी करीत सुखाच्या मृगजळामागे धावत राहायला भाग पाडलेले आहे.

: ५ :

प्रश्न येथून सुरू होतो. प्रेम, सदाचार, सहानुभाव या सर्वच गोष्टी मूलतः माणसाच्या मनात आहेतच. पण तृष्णेने या सर्वच गोष्टी उद्ध्वस्त करण्यासाठी धर्म, जाती, वर्ग आणि भौगोलिक अहंकार निर्माण केले. या अनिर्बंध तृष्णेपोटीच नाना पातळ्यांवरची अमानुषता जन्माला आली आहे. त्यामुळे मानवी नातेसंबंधांची नासधूस झाली. प्रश्न या नातेसंबंधांच्या पुनर्वसनाचा आहे. हे सर्व नातेसंबंध तृष्णेच्या तुरुंगातून मुक्त करण्याचा अत्यंत मूलभूत प्रश्न जगापुढे आहे. हा प्रश्न मूलतः मानवी सत्व संरक्षिण्याचा आणि संवर्धित करण्याचाच आहे.

: ६ :

ग्लोबलीकरणाच्या या काळात तर या तृष्णेचा उद्वेगजनक आविष्कार नाना पातळ्यांवर होतो आहे. माणसांचा रितेपणा त्यांच्यात मावेनासा झालेला आहे. माणसांचा एकाकीपणा माणसांना आतबाहेर खायला लागलेला आहे. नाना संकटांनी आभाळ गच्च भरून आलेले आहे. अनिर्बंध अनैतिकतेच्या बेफाम टाचांखाली नैतिकता, जीवनातील चांगुलपणा आणि माणुसकीला आवश्यक ते हार्द तुडविले जात आहे. या दुष्ट भांडवली ग्लोबलीकरणातून बाहेर पडता येईल अशी एक सर्वहितैषी वाट आज आंबेडकर या नावाने आपल्याला उपलब्ध आहे. आंबेडकर नावाचा हा ग्लोबल क्रांतीसिद्धान्त प्रत्यक्षात रूपांतरित करता मात्र यायला हवा.

अन्यायग्रस्तांनी केलेला उठाव, संघर्ष, हिंसा या मार्गाने अन्यायग्रस्तांच्या हातात सत्ता जाणे आणि अन्यायकर्ता वर्ग अन्यायग्रस्तांच्या अवस्थेत ढकलला जाणे अशी क्रांती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मंजूर नाही. याचे एक कारण हिंसा हे आहे आणि दुसरे कारण कोणीतरी या रचनांतरात अन्यायग्रस्त राहतातच. ही क्रांती अपूर्णही आहे आणि विध्वंसकही आहे. अशी क्रांती सर्वांचे हित या मूल्यावर अधिष्ठित नसते. म्हणून अशी क्रांती फार काळ टिकतही नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना रक्तविहीन क्रांती हवी आहे. रक्ताचा थेंबही न सांडता आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवनात आमूलाग्र परिवर्तन आणणारी क्रांती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हवी आहे. रक्तरंजित हिंसेसाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सला विरोध दर्शविला आहे. पण त्यांनी बुद्धाची हिंसेच्या संदर्भातली भूमिकाही 'दि बुद्धा ॲन्ड हिज धम्मा'मध्ये पुढीलप्रमाणे मांडली आहे. ते लिहितात-

"It is quite clear that Buddha meant to make a distinction between will to kill and need to kill. He did not ban killing where there was need to kill. What he banned was killing where there was nothing but the will to kill." (महाराष्ट्र शासन, पृ. ३४६) मारण्याची इच्छा, लहर

आणि मारण्याची गरज या दोन गोष्टींमध्ये बुद्धाने फरक केला आहे. आपल्या दिशेने विंचू यायला लागला तर आपण त्याला मारतो. ती गरजच असते. चिमणीला आपण मारत नाही. चिमणीला मारणे ही अनावश्यकता आणि अकारणता ठरते. लहर ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विंचवाला मारण्याच्या आवश्यकतेचे समर्थन केले आहे. चिमणीला मारण्याच्या अकारण आणि दुष्ट इच्छेचे समर्थन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले नाही. हिंसेसंबंधीचा हा विवेक आपण जबाबदारीनेच समजावून घ्यायला हवा. याचा अर्थ क्रांतीप्रक्रियेतील मार्क्सच्या हुकूमशाहीला आणि हिंसेच्या अकारण इच्छेला बाबासाहेबांनी विरोधच केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सच्या ध्येयासंबंधी मतभेद व्यक्त केला नाही. त्यांचा विरोध ध्येय प्रत्यक्षात आणावयाच्या हुकूमशाहीसारख्या साधनासंबंधी होता. अनेक पातळ्यांवर या साधनाचे धोके त्यांना जाणवत होते. पण बुद्धाबरोबर मार्क्सचा विचार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्क्सचे बौद्धिक प्राचंड्यही ओळखून होते. म्हणूनच त्यांनी १९५४ साली म्हणजे वयाच्या आणि ज्ञानाच्या प्रगल्भावस्थेत म्हटले आहे की, ''कोणी कोठेही जावोत पण आम्ही मात्र जोतीबांच्या मार्गांनी जाऊ. जोडीला कार्ल मार्क्स घेऊ किंवा दुसरे काही घेऊ पण जोतीबाचा मार्ग सोडणार नाही.'' (म.शा., बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग ३, पृ. ४०२) हे नीट समजावून घेऊन आपण विपरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगापुढे ठेवण्याची चूक करू नये. हिंसा महाडसंग्रामातही झाली. अनेक डोकी नाशिक सत्याग्रहातही फुटली. सांडलेले हे रक्त मुकेही राहिले नाही. ते बोलत राहिले. सत्य सांगत राहिले. त्याने प्रबोधनाचे नवे क्षितिज उघडून दिले. त्याने क्रांतीच्या शक्यता जन्माला घातल्या. कोणी काहीही म्हणोत पण बाबासाहेबांची चळवळ स्वतःच सांगत आहे की, क्रांतीच्या प्रक्रियेत रक्ताचा सर्जनशील रोल काही प्रमाणात तरी महत्त्वाचा असतोच. रक्ताला अकारण वेठीला मात्र धरू नये. उगीचच आणि अतिरिक्त हिंसेचा प्रश्न सोडला तर याही बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मार्क्ससोबत फार मोठा मतभेद आहे असे दिसत नाही.

: ६ :

धर्मासंबंधीही मार्क्स आणि आंबेडकर यांच्या भूमिकांमध्ये तफावत नाही. धर्म ही अफूची गोळी आहे असे मार्क्स म्हणतो. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'बुद्ध आणि त्यांचा धम्म'च्या १९९९ च्या आवृत्तीमधील पृ. ४४ ते २५२ वरील मजकूर वाचावा. धर्माचे अफूपेक्षाही भयंकर विनाशकारी रूप बाबासाहेबांनी कसे मांडले आहे ते आपल्या लक्षात येईल आणि १९५६ साली बाबासाहेबांनी कोणताही

एखादा धर्म सोडला असे नाही तर एकूणच धर्मसंस्थेचा त्याग त्यांनी केला हे सत्य आपल्या लक्षात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या डाव्या-उजव्या कोणत्याही टीकाकारांनी बाबासाहेबांनी कोणता तरी धर्मच घेतला अशी अज्ञानी टीका त्यांच्यावर करू नये. त्यांनी धम्म स्वीकारला आणि 'धम्म' हे धर्मातीत जीवनशैलीचेच रूप आहे. धर्म क्रांतीच्या मार्गात संकटाची भूमिका करतो हे खरे आहे आणि म्हणूनच धर्मापासून म्हणजे एका प्रभावी क्रांतीरोधक संस्थेपासून स्वतःला त्यांनी स्वच्छपणे वेगळे करून घेतले.

धम्म पूर्णतः इहवादी आहे. धम्म ईश्वर, आत्मा, स्वर्ग-नरक, मोक्ष-परलोक, पूर्वजन्म-पुनर्जन्म, धर्म अशा सर्वच काल्पनिक, फसव्या आणि समतेला विघातक गोष्टींना नकार देतो. यासंदर्भात धम्म जडवादीच आहे. विश्वाची निर्मिती कोणा देवाने केली असे खोटे तो काहीही सांगत नाही. परिवर्तनापासून, क्रांतीपासून समाज दूर जाईल अशी कोणतीही तरतूद धम्मात नाही. बुद्धाच्या मानसशास्त्रातील नामरूपाचे नीट नियोजन केले तर दुनियेत जाती-वर्ण-वर्ग आणि धर्मविहीन मानवी मने निर्माण करता येतात. कोणते संस्कार वाढवित नेले वा कोणत्या संस्कारांची बेरीज वा गुणाकार केला तर जाततृष्णा, वर्गतृष्णा वा धर्मतृष्णा जन्माला येते आणि कोणत्या कारणांची प्रत वाढविली, कोणत्या संस्कारांची बेरीज वा गुणाकार केला तर एलिनेशनविहीन मानवी मने जन्माला घालता येतात. या संदर्भातील सर्व प्रश्नांची उत्तरे या मानसशास्त्रात आहेत. दुनियेला दुःखात ढकलणारी आजची ही मने कोणत्या कारणांमुळे जन्माला आली आणि कोणती वेगळी कारणे कामाला लावली तर दुनियेला तृष्णेच्या वणव्यापासून वाचविणारी मानवी मने कशी जन्माला येवू शकतात. यासंबंधीचा एक संपूर्ण प्रयोग असे बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचे रूप आहे.

तेव्हा धम्माला बुद्धाचाच धर्म म्हणणे आणि त्याला क्रांतीच्या विरोधात उभे करणे हा विपर्यास आहे. धम्म केवळच क्रांतीसोबत नाही तर तो क्रांतीचा जनकही आहे. भारतीय संविधानातही ही धर्मातीतता बाबासाहेबांनी मांडून ठेवली आहे. ''धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे.'' (अनुच्छेद : ५१, मूलभूत कर्तव्ये) या अनुच्छेदातील धर्मातीतता वादातीतच आहे यात शंका नाही. २५ व्या अनुच्छेदातील धर्मस्वातंत्र्याला घातलेल्या सार्वजनिक सुव्यवस्था, नीतीमत्ता आणि आरोग्य या अटींमुळे धर्माचे ऐहिक जीवनातील अस्तित्व नष्ट झालेले आहे. शिवाय भारतीय नागरिकांना दिलेल्या मूलभूत हक्कांच्या विरोधात हे धर्मस्वातंत्र्य असणार नाही याचीही काळजी संविधानाने घेतलेली आहे. अर्थकारण, राजकारण, समाजकारण

आणि इतरही सर्व ऐहिक बाबीसंबंधी कायदे करताना हे धर्मस्वातंत्र्य शासनाला अडवू शकणार नाही. याचा अर्थ भारताच्या ऐहिक जीवनात धर्माला कोणताही अधिकार नाही.

शासनाच्या व्यवहारात धर्माला स्थान नाही. गैरइहवादी कृत्यांचा वा धोरणाचा पाठपुरावा करणारे शासन सेक्युलर तत्त्वांचा भंग करते म्हणून संविधानाच्या ३५६ व्या अनुच्छेदानुसार बरखास्त केले जाऊ शकते. शासनाला धर्मात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे. मंदिर, मशीद, मठ वा इतर पूजास्थाने यांच्या ऐहिक कारभारासाठी कायदे करण्याचा अधिकार शासनाला आहे. वैयक्तिक कायद्यात सुधारणा आणि समसूत्रता आणण्याचा अधिकार लोकसभेला आहे. (सर्वोच्च न्यायालयाचा निकाल : १९९४) या सर्व गोष्टींचा विचार केला तर भारतीय जीवनात धर्माला कुठे, केवढे आणि कोणते स्थान आहे ते आपल्या लक्षात येते. पण विशेष लक्षात घ्यावयाचे ते हे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मविषयक म्हणजे धर्मातीत भूमिकेचाच हा सर्व अविष्कार आहे.

याचा अर्थ असा की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्लोबल क्रांतीसिद्धान्तात धर्माला कुठेही अवकाश नाही. या सिद्धान्तात आवश्यक असेल तेवढ्या हिंसेला वाव असला तरी अकारण हिंसेला कोणतीही जागा त्यात नाही.

: ७ :

मानवी जीवनातील दुःख हाच आंबेडकर नावाच्या ग्लोबल क्रांतीसिद्धान्ताचा विषय आहे. माणसांनी, त्यांच्या तृष्णांनी निर्माण केलेले दुःख समग्र मानवतेला भाजून काढीत आहे. एकूच तृष्णेलाच मानवी जीवनातून नष्ट करणे हा काही या दुःखावरचा इलाज नव्हे. समग्र तृष्णा मानवी जीवनातून नष्ट करणे शक्यही नाही आणि ते योग्यही नव्हे. पण अतिरिक्त, अनिर्बंध तृष्णा ही मात्र जीवनात दुःख निर्माण करते. तेव्हा या तृष्णेचे नीट नियोजन करता यायला हवे. खरे म्हणजे One man One Value हे तृष्णेचे नियोजनच आहे. या तत्त्वाला प्रत्यक्षात आणण्यासाठी धडपडणारी लोकशाही हे तृष्णेचेच नियोजन आहे. मैत्री आणि करुणा हे तृष्णेचेच नियोजन आहे. भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये हेही तृष्णेचेच नियोजन आहे. भारतीय संविधानाची प्रास्ताविका आणि समाजवादासकट तिच्यातील सर्व ध्येयवाद हे तृष्णेचेच नियोजन आहे. धम्मनैतिकता हेही तृष्णेचे नियोजनच आहे. तृष्णेला लगाम घालण्याची Methodology भारतीय संविधानातही आहे आणि धम्मातही आहे.

तृष्णा नष्ट करणे नव्हे तर तिचे सर्वांना हितावह ठरेल असे नियोजन करणे हा कळीचा मुद्दा आहे. One man One value, समाजवाद, विज्ञानदृष्टी, सुधारणावाद आणि मानवतावाद या तत्त्वांमधून तृष्णेच्या नियोजनाचे एक पद्धतीशास्त्र (Methodology) उभे राहते. हे आंबेडकरी पद्धतीशास्त्र होय.

या पद्धतीशास्त्रात खाजगी मालमत्ता बसत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही बाब भिक्खूसंघाचा हवाला देऊन तर मांडलीच पण त्यांनी 'स्टेटस् ॲन्ड मायनॉरिटीज'मध्ये मांडलेल्या समाजवादातूनही हा आशय भक्कमपणे उभा केला आहे. भारतातील वर्गसंघर्षाचा, तत्त्वज्ञानातील संघर्षाचा इतिहासही बाबासाहेबांनी विस्ताराने मांडलेला आहे. साम्राज्यतृष्णा, वर्चस्वाची अमानुष तृष्णा या देशातील समतेला कशी जाळत आली तेही त्यांनी विस्ताराने सांगितले आहे.

सद्सद्विवेकाला पटत नाही. जे तर्काला मान्य होत नाही ते खरे मानू नका. सर्वांच्याच कल्याणाचे जे आहे तेच आदरणीय माना 'Refrain from all evil; cultivate the good; cleanse your own thoughts" (361) "Be wise, be just and choose good company" (363 : The Buddha and his Dhamma) डॉ. बाबासाहेब आंबेडकर माणसांना परमसुखाचे एक महासूत्र देतात. धर्म, जात आणि वर्ग हे निर्माण होण्यापूर्वीच्या मानवी जीवनातील शुद्धतेच्या सौंदर्यापाशी ते माणसाला जायला सांगतात. धर्मांनी, जातींनी आणि वर्गांनी एकसंध माणसाला तोडले. मानवी मने विद्वेषाच्या आणि भांडणांच्या वणव्यात फेकली. जाती-धर्मविहीन आणि वर्गविहीन माणसाच्या मनाची Integrity - सेंद्रियता उद्ध्वस्त केली गेली. सर्वच माणसे ब्रोकन मेन झाली. आपल्या मूळ शुद्ध माणूसपणाला ही माणसे पारखी झाली. तृष्णेच्या मोकाट हत्याराने केलेल्या एकसंध माणूसपणाच्या या चिंध्या माणसाला आजवरही सतत छळत आहेत. या तुटलेपणापासून वा एलिनेशनमधून माणसाला मुक्त करणारी श्रेष्ठ नीती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली आहे. तिचे नाव प्रज्ञानी करुणा असे आहे. बुद्धिवादी माणुसकी असे ते नाव आहे. हेच आंबेडकरी लॉजिक होय. सामाजिक न्याय हा या लॉजिकचा प्राण आहे.

: ८ :

जहाजाला भोक पाडले तर जहाज बुडते. जहाजाला भोक न पाडणारे निरपराधच केवळ मग बुडत नाहीत तर जहाजाला भोक पाडणारेही बुडतात. 'ब्रोकन' सिद्धान्ताचेही तसेच आहे. ज्यांना तोडले गेले ते तर तुटतातच पण ज्यांनी तोडले तेही तुटतात. एलिनेशनचेही तसेच आहे. माणुसकीपासून ज्यांना परावृत्त केले जाते तेच केवळ परावृत्त होत नाहीत तर ज्यांनी परावृत्त केले तेही परावृत्त होतात. 'तेच पतित की जे

आंखडिती प्रदेश साकल्याचा' तसे हे आहे. सर्वांच्याच संपूर्ण हिताच्या स्वप्नाची जे दुर्दशा करतात ते स्वतःही अधःपतित होऊनच जातात. माणुसकी मारणारांची माणुसकीही या दुष्ट प्रक्रियेत मरूनच जाते. झाडही मरते आणि कुऱ्हाडही वाचत नाही. जगात हेच झालेले आहे आणि ते तृष्णांधतेमुळे झालेले आहे. आंबेडकर नावाचा ग्लोबल क्रांतीसिद्धान्त या ब्रोकननेसच्या, या एलिनेशनच्या निर्दय आगीत जळणाऱ्या दुनियेला वाचवू शकणारा सिद्धान्त आहे. हा सिद्धान्त सांगतो की आपण वाचू शकतो. आपण फक्त इतरांना वाचवायला शिकलो पाहिजे. आपण या आगीवर मात करू शकतो. आपण फक्त जळणाऱ्या इतरांना विझविणारे व्हायला पाहिजे. इतरांना विझविणारांना हे इतरही मग जळू देत नाहीत. आंबेडकर या ग्लोबल क्रांतिसिद्धान्ताला असे एकमेकांना जपणाऱ्या माणसांचे विश्वजीवन अभिप्रेत आहे.

: ९ :

नाना पातळ्यांवरील श्रेणीबद्धता हे आजच्या विश्वजीवनाचे स्वरूप आहे. या संरचनेतील माणसांच्या संबंधांमध्ये सौंदर्य नसते. अशा संरचनेत गटा-गटांमधल्या, व्यक्ती-व्यक्तीमधल्या संबंधातील हार्दतेचे पाट आटूनच गेलेले असतात. ही श्रेणीरचना, ही उतरंडीची (Hierarchy) रचना बदलता येते. मानवी जीवनातील गटांची, समूहांची आणि त्यातील माणसांची रचना Vertical म्हणजे उतरंडीची नसावी. ती Horizontal अर्थात समस्तर असावी. या संरचनेत कोणीही दुय्यम असू नये. कोणीही हीन गणला जावू नये. सर्वच एकाच सामाजिक-आर्थिक प्रतिष्ठापातळीत असावेत. सर्वच उच्च-उच्च या एकाच श्रेणीत असावेत. आंबेडकर या ग्लोबल क्रांतिसिद्धान्तामधून उच्चनीचता पूर्णपणे अशी वजाच आहे. हा आंबेडकर ग्लोबल क्रांतिसिद्धान्त श्रेणीविहीन मानवी जीवनाचा क्रांतिसिद्धान्त आहे. हा सिद्धान्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना केवळ भारताच्याच नव्हे तर एकूणच विश्वाच्याही श्रेणीविहीन जीवनाचे निर्माते, System Builder ठरवतो. हा आंबेडकर नावाचा ग्लोबल क्रांतिसिद्धान्त ईश्वरविहीन, धर्मविहीन, जाती आणि वर्गविहीन अशा एकमय मानवी ज़ीवनाचा सिद्धान्त आहे. हा सिद्धान्त एकश्रेणीमय मानवी संरचनेचा सिद्धान्त आहे. पण आजच्या विश्वजीवनाची वस्तुस्थिती अशी विपरीत आहे की सरंजामी आणि भांडवली शोषणयंत्रणांनी एकूणच जगातील वंचितांच्या मानसशास्त्राला ईश्वर, धर्म यांचे भयानक भयशिक्षण देऊन ईश्वरातीत आणि धर्मातीत क्रांतिसिद्धान्ताच्या विरोधात उभे करून ठेवलेले आहे. आंबेडकरक्रांतीच्या मार्गातील अवरोधाची ही दुष्ट भिंत तोडण्याची नितांत गरज मात्र आहे. मानवी मनाला चिकित्सेचे डोळे येतील तेव्हा ही भिंत आपोआपच तुटून जाईल असे हा आंबेडकर नावाचा ग्लोबल क्रांतिसिद्धान्त मानतो.

: १० :

हुकूमशाही कामगारांची असो की कारखानदारांची असो, उच्चवर्णियांची असो की उच्चवर्गीयांची असो, कोणाचीही हुकूमशाही आंबेडकर या ग्लोबल क्रांतिसिद्धान्ताला पूर्णतः अमान्यच आहे. त्यामुळे हुकूमशाहीच्या कमी वा अधिक कालावधीचा विचार करणे ही बाब या क्रांतिसिद्धान्तात बसत नाही. हुकूमशाही या शब्दाच्या पोटात हुकूम; हुकुमत हे शब्द दंडुके घेऊन उभे आहेत आणि त्यांच्यात वर्चस्व अभिप्रेत आहे. सक्ती अभिप्रेत आहे. अशी सक्ती वा वर्चस्व आंबेडकर या ग्लोबल क्रांतिसिद्धान्तात बसत नाही. अंगुलीमालाचे सुजनीकरण बुद्धाने केले. हे चांगूलपणाचे असीम शक्तीसौष्ठव आहे. ही मानवी सज्जनपणाची ताकद आहे आणि ती हुकमापेक्षा आणि सक्तीपेक्षाही मोठी आहे. हुकमाने माणसे काही काळ नरमतील पण संधी मिळताच वा पळवाटा मिळताच ती परत दुष्टत्वाने काटेरी होतील. बंडे फसतात. अपूर्ण क्रांत्या फसतात त्याचे हे कारण आहे. ही बंडे वा क्रांत्या लोकांवर लादलेल्या असतात. त्या लोकांनी विचारपूर्वक स्वीकारलेल्या नसतात. त्या लोकमानसातून झाडावर फुले यावीत तशा उगवलेल्या नसतात. पण अंगुलीमाल परत डाकू होत नाही. तो परत कोणाला मारीत नाही. परत कोणाची बोटे तोडत नाही. कारण त्याच्यातील सुजनता त्याने स्वतःच पत्करलेली, त्याच्यातूनच उगवलेली सुजनता असते. ती तात्कालिक नसते. ती चिरंतन टिकणारी असते. हीच निब्बाणमनस्कता असते. अंगुलीमालाची सुजनता संपूर्ण दुनियेच्या मनात वस्तीला यायला हवी. यासाठी हुकूमशाही उपयोगाची नाही. उलट हुकूमशाही आहे त्या गोष्टींना आणखी वाईट करून ठेवते. आजारांना दुर्धर करून सोडते. आंबेडकर हा ग्लोबल क्रांतिसिद्धान्त कोणत्याही प्रकारच्या; कोणाच्याही आणि कुठल्याही हुकूमशाहीला जवळ फिरकू देत नाही त्याचे हे कारण आहे.

: ११ :

आंबेडकर हा ग्लोबल क्रांतिसिद्धान्त One man One value हा आदर्श डोळ्यांपुढे ठेवतो. त्यासाठी संविधानाच्या मार्गाने आणि लोकशाहीच्या पद्धतीने हा सिद्धान्त कार्य करतो. या सिद्धान्ताच्या पोटात समाजवाद, सामाजिक न्याय, इहवाद आणि विज्ञाननिष्ठ दृष्टी, संधी आणि दर्जाची समानता या संपूर्णच मानवी जीवनाला समस्तर अंथरणाऱ्या गोष्टी असतात. हे सर्व प्रशिक्षणाने, प्रबोधनाने व्हावे. जुने मानसशास्त्र पुसून टाकीत नव्या मानसशास्त्राची रुजवात व्हावी असे या सिद्धान्ताचे म्हणणे आहे. सज्जनतेविरुद्धचे मानवी मनातील संस्कार विसर्जित करा. मने बदला. मानसशास्त्र बदला. सरंजामी आणि भांडवली दुष्ट संस्कारांच्यामधून बाहेर पडा. असे

हा सिद्धान्त सांगतो. लोकशाही हे शोषणविहीन मानवी जीवनाचे मानसशास्त्र आहे. मानसिक परिवर्तन या शक्तीवर त्याचा विश्वास आहे. पशूंचा मार्ग निर्घृण हिंसा एवढाच असतो तर सद्सद्विवेक आणि विचारविनिमय ही माणसाची शक्ती असते. पशू आणि माणूस यांच्यात हाच मूलभूत फरक असतो. माणसाच्या या शक्तीवर आंबेडकर क्रांतिसिद्धान्ताचा विश्वास आहे.

One man One value या तत्त्वाचे सामाजिक साम्राज्य प्रस्थापित करण्यासाठी, श्रेणीविहीन मानवी जीवन पृथ्वीवर बहरून येण्यासाठी इहवादाच्या बैसकेवर विराजमान झालेल्या समाजवादाने दुनिया प्रफुल्लित होण्यासाठी मूलगामी मानसिक परिवर्तनाची गरज आहे. इथे एका धडाक्यात होणारा सत्ताबदल अभिप्रेत नाही असे सत्तांतर आंबेडकर या ग्लोबल क्रांतिसिद्धान्ताला नको आहे. या दिशेने होणारे, भौतिक परिस्थितीतील बदलांना सामावून घेत न्याय देणारे निरंतर परिवर्तन या आंबेडकर नावाच्या क्रांतिसिद्धान्ताला अभिप्रेत आहे. भौतिक जीवनातील गतिमान बदलांच्या आणि विकासाच्या हातात इहवादाचे ज्वलंत फलक देणारे आणि समाजवादाची वाटचाल सुंदर आणि गतिमान करणारे निरंतर परिवर्तन असेच या आंबेडकर ग्लोबल क्रांतिसिद्धान्ताचे ध्येय आहे. तोच त्याचा उद्देशही आहे आणि त्यातच त्याचे पद्धतीशास्त्रही आहे.

आकाश सर्वांचे आहे. पृथ्वीवरील निसर्ग सर्वांचा आहे. पृथ्वीवरील हवा आणि पाणी सर्वांचे आहे. चांदणे सर्वांचे आहे. पृथ्वीवरील सुखेही सर्वांचीच आहेत आणि दुःखेही सर्वांचीच असावीत. सुखे तर सर्वांनी समसमान पद्धतीने वाटून घ्यावीतच पण नैसर्गिक आणि मृत्यूसारखी दुःखेही माणसांनी समाजवादी मनांनी वाटून घ्यावीत. हा नैसर्गिक, पर्यावरणीय, नैतिक आणि सांस्कृतिक समाजवाद आहे.

आंबेडकर या ग्लोबल क्रांतिसिद्धान्ताला हवे आहे ते विश्वजीवन असे श्रेणीविहीन आणि शोषणविहीन आहे. भारतीय संविधानाची प्रास्ताविका प्रत्यक्षात जगणाऱ्या प्रबुद्ध माणसांसारखे ते आहे.

नागपूर

३० मार्च २०१२

■■

# डॉ. आंबेडकरांच्या जयंतीचे नीतिशास्त्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती भारताच्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये, या राज्यांमधील सर्व लहानमोठ्या गावा-नगरांमध्ये आणि गावा-नगरांमधील मोहल्ल्यांमध्ये अत्यंत उत्साहाने साजरी होते. शिवाय जगातल्या पाकिस्तान, अमेरिका आणि इंग्लंड अशा अनेक देशांमध्येही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी केली जाते.

१४ एप्रिल या दिवशी जगाच्या उत्साहाला आणि कृतज्ञताभावाला जी अपूर्व भरती येते तिला जयंत्यांच्या जगात तोड नाही. अंतराळातील सर्व ग्रहगोलांना कृतज्ञतेचे सर्वात जास्त, सर्वात उंच आणि सर्वात तेजःपुंज मनोरे पृथ्वीवर याच दिवशी दिसत असतील. गौरवाचे हे सर्वश्रेष्ठ मिथक आहे. १४ एप्रिलच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जन्म घेतला आणि जगाच्या दिनदर्शिकेमधला हा दिवस इतर सर्वच दिवसांपेक्षा अनन्यसाधारण असा जिवंत दिवस ठरला. या दिवसाच्या जिवंतपणाची ती परमआविष्कृती ठरली.

भारताच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पहिल्यांदाच भारतातील प्रत्येक व्यक्तीला संविधानिक एकमूल्यता दिली. भारतीय संविधानाद्वारा त्यांनी विज्ञाननिष्ठ आणि समतामय भारताच्या निर्माणाचा प्रकल्प दिला. हे तत्त्वज्ञान सर्वच व्यक्तींच्या मानवी सन्मानाचे आणि स्वाभिमानाच्या प्रतिष्ठेचे महान तत्त्वज्ञान आहे. भारताचे संविधान भारताच्या भौगोलिक सीमांमधील नैतिक, भौतिक आणि नैसर्गिक सौंदर्याची मांडणी करते तर धम्म भारतासकट संपूर्ण विश्वाच्याच नैतिक, भौतिक आणि नैसर्गिक सौंदर्याची मांडणी करतो. शिवाय संविधानात धम्माचे सर्व संकल्प आहेत आणि धम्मात संविधानाचा सारांश आहेच.

संपूर्ण जगात आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि नैतिक अशी सर्वच पातळ्यांवर अव्यवस्था आहे. हजारो वर्षांपासून दुनिया या अराजकात कधी गुदमरत आहे तर कधी धुमसत जगत आहे. भौतिक विकासाच्या लोंढ्याबरोबर नेहमीच सामाजिक न्यायाच्या तत्त्वापुढे आव्हाने उभी राहतात. सामाजिक न्यायाचा पराभव होऊ नये. यासाठी मग महामानवांना आकाश-पाताळ एक करावे लागते. क्रांतीचे शक्तीवर्धक रसायन पाजून सामाजिक न्यायाला बुलंद करावे लागते. आपली युगप्रवर्तक बुद्धिशक्ती वापरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे केले. भरकटलेल्या

संपूर्ण युगापुढे त्यांनी माणुसकीची वाट अंथरली. संपूर्णच मानवी जीवनासाठी सामाजिक न्यायाचे बुद्धिवादी संविधान लिहिले. हे संविधान पूर्ण प्रज्ञानी आहे. पूर्ण जबाबदार आहे आणि पूर्ण प्रवाही आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अत्यंत गंभीर, अत्यंत जबाबदार विचारवंत होते. अभ्यास, चिंतन आणि लेखन हेच त्यांचे जीवन झाले होते. एकूणच भारतातच नव्हे तर समग्र जगातच बंधुता अर्थात सामाजिक न्याय निर्माण व्हावा यासाठी त्यांनी स्वतःच्या आयुष्याला एका आंदोलनाचे रूप दिले. हे सर्व करताना त्यांनी अन्नपाण्याकडे दुर्लक्ष केले. स्वतःच्या सुखांकडे दुर्लक्ष केले आणि प्रकृतीकडेही दुर्लक्ष केले. वाचन, चिंतन, लेखन आणि माणसाची सर्वांगीण मुक्ती हेच महाव्यसन त्यांना जडले होते. जीवनाची नवनिर्मिती करू शकणाऱ्या या सुंदर व्यसनांशिवाय त्यांना इतर कोणतेही व्यसन शिवले नाही. सुपारी, पान, तंबाकू, सिगरेट वा मद्य अशा कोणत्याही गोष्टीला त्यांच्याजवळ जाण्याची कधी हिंमतच झाली नाही. मला आनंद कशाचा होतो ? या प्रश्नाचे उत्तर त्यांनी पुढीलप्रमाणे दिले होते. जे मला जीवनाच्या पुनःर्निर्माणाचा विचार शिकवते तेच मला आवडते. तेच माझे रंजन करते आणि तेच मला आनंद देते. असे ते म्हणाले होते. नाटक, चित्रकला, संगीत आणि साहित्य या कलांच्या संदर्भात त्यांनी मांडलेली भूमिका अत्यंत उदात्त आहे. समाज उन्नत व्हावा, जीवन समुन्नत व्हावे. त्याचे प्रज्ञान वाढावे. तो समंजस आणि सुशील व्हावा. तो सुजन आणि सर्जनशील व्हावा. तो उच्च अभिरुचीसंपन्न आणि चिकित्सक व्हावा अशी त्यांची सुंदर धारणा होती. 'मनोरंजन हा आजार आहे आणि हा आजार ज्या समाजाला होतो त्याच्या अधःपतनाला पर्याय नसतो' असे आर.जी. कालिंगवूड हा विचारवंत म्हणाला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण आयुष्य पाहिले तर त्यातून कॉलिंगवूडच्या धारणेपेक्षा वेगळी धारणा निष्पन्न होत नाही. डॉ. बाबासाहेबांच्या हयातीतही त्यांचा अफाट दरारा होता. हा दरारा त्यांच्या विद्वत्तेचा होताच पण हा दरारा त्यांच्या चारित्र्याचाही होता. त्यांच्या गंभीर व्यक्तिमत्त्वाचाही हा दरारा होता. त्यांच्या बोलण्यातून, लेखनातून आणि वागण्यातूनही त्यांची चारित्र्यसंपन्न बौद्धिक उंची प्रकाशित होत असे त्यांच्या समकालात त्यांचे मोठमोठे समकालीनही त्यांना वचकून वागत असत. त्याचे कारण या त्यांच्या चारित्र्यसंपन्न परम बौद्धिक व्यक्तिमत्त्वात आहे.

अशा या क्रांतिमानवाची जयंती महाराष्ट्रात, देशात आणि जगातही अनेक वर्षांपासून साजरी केली जाते. अनेक वर्षे या जयंतीचे स्वरूप त्या वर्षभरात समाजाने शिक्षणक्षेत्रात, साहित्यक्षेत्रात, राजकारणाच्या क्षेत्रात, अर्थकारणाच्या क्षेत्रात आणि

नैतिकतेच्या क्षेत्रातही आंबेडकरी प्रमाण शास्त्रानुसार काय कमावले आणि काय गमावले त्यांची मांडणी करणाऱ्या चिकित्सासत्रासारखे होते. आपण किती वाटचाल केली, ती अभिप्रेत वाटचाल करण्यात आपण कुठे आणि का कमी पडलो. यासंबंधीचा जमाखर्च मांडून दाखविणाऱ्या संगीतीचे स्वरूप अगदी कालपरवापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीला होते. जयंती ही मोठ्या आरशासारखी होती आणि त्यापूर्वीच्या संपूर्ण वर्षाला त्या आरशापुढे उभे करून त्याने केलेल्या कमाईचा चेहरा त्या आरशात पाहण्याचा कठोर समारंभ तो होता. महाराष्ट्रातल्या, देशातल्या आणि जगातल्याही जयंतीच्या सर्व कार्यक्रमांमधून बाबासाहेबांचे क्रांतीचे स्वप्न मोहोरून आलेले असे. जयंतीचा कणन्कण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसंबंधीच्या कृतज्ञतेने झंकारून उठलेला असे. वक्त्यांच्या आणि श्रोत्यांच्याही मनात जबाबदारीचे पंचशील फुलत असे. मने बुद्धिवादाने पोलादी होत आणि सर्वांच्याच काळजांवर माणुसकीच्या वेली बहरत. वक्त्यांच्या भाषणांमधून उग्र, महाउग्र आंबेडकरच उगवत असे आणि वामनदादा, नागोराव पाटणकर, राजानंद गडपायले अशा कवी, गायकांच्या गाण्यामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरच श्रोत्यांच्या मनातून उधाणत राहत.

बाबासाहेब आंबेडकरांची जयंती हा विचारांचा उत्सव होता. तो क्रांतीची जुळवाजुळव करणारा प्रज्ञामंच होता. ती पुढील प्रवासाच्या नियोजनाची कार्यशाळा होती. मागल्या काळात झालेल्या चुका दुरुस्त करण्याचा निर्धार करण्याचा तो सर्जनकाळ होता. चुकाच होणार नाहीत यासाठी कोणाच्या डोळ्यात कोणते तेल घालायचे यासंबंधीचा निर्णय घेण्यासाठी आयोजिलेली ती महासभा होती.

अलीकडच्या काही वर्षांमध्ये जयंती वेगवेगळ्या पद्धतींनी साजरी व्हायला लागली आहे. निखळ रंजनाकडे तिची वाटचाल व्हायला लागली आहे. निखळ रंजनासाठी गायनाचे कार्यक्रम व्हायला लागले आहेत. जुगलबंदी पूर्वीही होत असे पण आता केवळ रंजनाखातर जुगलबंदी व्हायला लागली आहे. हिंदी सिनेमांमधील अचकटविचकट गाणी लावली जातात. जोराजोरांनी डीजे लावले जातात. त्या गदारोळात नाचण्याचा धुमाकूळ सुरू असतो. मिरवणुकीत नाचण्याचा कल्लोळ सुरू असतो. संदलचा भयानक गदारोळ सुरू असतो. हे सर्व महागडे कार्यक्रम करण्यासाठी लोकांकडून वर्गण्या गोळा केल्या जातात. इतरांच्यापेक्षा आपला रंजनधमाका मोठा असावा यासाठी नाचगाण्यातून रंजकता वाढविण्यासाठी स्पर्धा लागतात. त्यासाठी लागणारा पैसा मिळविण्यासाठी कोणत्याही पक्षाचे राजकारणी, उद्योजक वा धनदांडगे लोक चालतात. मोठे रंजन, मोठा आचकटविचकटपणा, मोठी उत्तानता, या स्पर्धांमधून संघर्ष पेटतात. मारामाऱ्या होतात. नाचा प्रकारच्या अनुचित गोष्टी घडतात. वर्गण्यांमधून

जमा होणाऱ्या पैशाचा हिशोब दिला जात नाही. वर्गण्या कोणकोणत्या कामांसाठी उपयोगात आणल्या जातात हे लोकांना चांगले माहीत आहे. या संदर्भात खूप वेगवेगळ्या गोष्टी कानावर येतात. यां सर्वच प्रकारांमुळे कार्यकर्त्यांमध्ये नानाप्रकारचे ताणतणाव निर्माण होतात. फटाके उडवले जातात. नीळ उधळला जातो. त्यातून वायूप्रदूषण, ध्वनीप्रदूषण होतेच. आजूबाजूच्या लोकांना या सर्वच प्रकारांचा भयंकर त्रास होतोच पण अशा सर्व प्रकारांमुळे वैचारिक प्रदूषणही होते आणि ते फारच विघातक आहे. बाबासाहेबांची जयंती हा धार्मिक कार्यक्रम नव्हे. बाबासाहेबांची जयंती हा आनंदाचा उत्सव आहेच पण तो विचारांच्या आनंदाचा उत्सव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जडवादी चिंतन मांडले. जडवादी चिंतनाला कालसंगत नवे प्रगमनशील आयाम दिले. जडवादाच्या संकोच पावलेल्या रक्तवाहिन्या नवी ऊर्जा देऊन मुक्त केल्या. जडवादाला माणुसकीचे काळीज आणि निखळ इहवादाचा मेंदू दिला. कोणत्याही काळाची चौकट या जडवादी माणुसकीच्या निरामय प्रवाहाला रोखू शकणार नाही अशी त्रिकालबाधित गतीनीती त्याला दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचा उत्सव म्हणजे या विचाराच्या आकलनाचा, सन्मानाचा आणि क्रांतिदृष्ट्या त्याला सक्षम करण्याचा उत्सव असला पाहिजे.

जगाच्या पाठीवर आज नवनवी तत्त्वज्ञाने आणि विज्ञानातील नवनवे थक्क करणारे शोध साकार होत आहेत. माहितीतंत्रज्ञानाचे महाजाल आपल्याभोवती निर्माण होत आहे. या सर्वातूनच जशी काही उत्तरे आपल्या पदरात पडत आहेत तद्वतच काही नवी आव्हानेही आपल्यावर कोसळत आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेत दरदिवशी नवनवे भोवरे निर्माण होत आहेत. मानवी नैतिकतेला दरदिवशी नवनव्या कठोर परीक्षांना बसावे लागत आहे. इतर कोणाच्याही आधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीने या सर्व भोवऱ्यांचा विचार केला पाहिजे. हे सर्व भोवरे निर्माण होण्यामागची धार्मिक, सामाजिक, वैज्ञानिक, आर्थिक आणि नैतिक कारणे जयंतीने विशद करून सांगितली पाहिजेत. तद्वतच या भोवऱ्यांना पराभूत करून पुढे जाता येण्याचे उपायही जयंतीने सांगायला हवेत. इतर कोणाच्या जयंतीची ही जबाबदारी नसेल पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीला ही जबाबदारी टाळता येणे शक्य नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीला चिंतनशिबिराचे रूप प्राप्त व्हायला हवे. भ्रष्टाचाराचे प्रश्न, दहशतवादाचे प्रश्न, जातीयतेचे प्रश्न, धर्मांधतेने निर्माण केलेले प्रश्न, महागाईचे प्रश्न, शिक्षणक्षेत्रातील नैतिकतेच्या मृत्यूचे प्रश्न, राजकारणाच्या शीलभ्रष्टतेचे प्रश्न, लोकांच्या चारित्र्याचे प्रश्न, स्त्रियांच्या सम्यक माणुसकीच्या प्रस्थापनेचे प्रश्न, अल्पसंख्याकांचे प्रश्न, पर्यावरणाचे प्रश्न, अंधश्रद्धांचे प्रश्न असे

असंख्य प्रश्न आहेत. जयंतीच्या कार्यक्रमात या प्रश्नासंबंधी युद्धपातळीवरून चिंतन व्हावे. जयंतीला चिंतनाचा, वैचारिक प्रबोधनाचा आणि बौद्धिक सर्जनाचा चेहरा प्राप्त व्हावा.

तरुण, तरुणी, वृद्ध, गृहिणी, अध्यापक, कार्यकर्ते, सामाजिक-सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संघटना अशा सर्वांसाठीच जयंतीने वैचारिक दिशेची मांडणी करावी. त्या दिशेने काम करावयाची पद्धत सांगावी. लोकांना करावयाच्या कामाचे कालबद्ध नियोजन जयंतीने तयार करावे आणि लोकांना अशा कामात गुंतवावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीने वाचनाचे, ग्रंथालयाचे, संशोधनाचे महत्त्व लोकांना समजावून सांगावे. जयंतीने लोकांना बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान सांगावे. भारतातील आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील कोणत्या परंपरेशी या तत्त्वज्ञानाचे स्वीकाराचे आणि नकाराचे कसे नाते आहे ते समजावून सांगावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाच्या विरोधी छावणीत जाणे व त्या छावणीशी प्रकट-अप्रकट संबंध ठेवणे कसे विघातक आहे, तो वैचारिक भ्रष्टाचार कसा होतो ते जयंतीने गंभीरपणे सांगितले पाहिजे.

गंभीर विषयांवरील निबंधस्पर्धा, वादविवादस्पर्धा, ग्रंथस्पर्धा, काव्यवाचनाचे कार्यक्रम जयंतीनिमित्ताने घ्यावेत. जयंतीमंडळांनी विचारविनिमय करून व्याख्यानांच्या विषयांची आणि वक्त्यांची यादी तयार करावी आणि सर्वच जयंतीमंडळांना ती यादी पाठवावी. जगात झालेल्या वेगवेगळ्या क्रांत्यांची कारणे, स्वरूप आणि फलश्रुती या अनुषंगाने लोकांच्या जाणिवा प्रगल्भ कराव्यात. बुद्धाने केलेल्या क्रांतीची मांडणी करावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या क्रांतीची महत्ता लोकांना समजावून सांगावी. गाण्यांचे कार्यक्रमही असू नयेत असे नाही पण तेही लोकांना विचारप्रवृत्त करणारेच असावेत. काही चांगली नाटके दाखविता येतील. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथावर परीक्षा घेता येतील. अनेक ठिकाणी 'अठरा तास अभ्यास' हे अभियान राबविता येईल. जयंतीसाठी वर्गण्या कोणाला मागायच्या, कशा मागायच्या यासंबंधीचे नीतीशास्त्र लोकांना सांगता येईल. जबाबदारीचे चारित्र्याचे, वैचारिक निष्ठांचे धडे लोकांना देता येतील.

जयंतीचा दिवस हा संकल्पदिवस मानायला हवा. आपण आजवर करीत आलो त्यापेक्षा यापुढे जास्त काम करण्याचा संकल्प प्रत्येकाने या दिवशी करावा. आपण आजवर जितके चांगले वागलो त्यापेक्षा अधिक चांगले वागू हा संकल्प या दिवशी करावा. वर्षभरात अमूक एवढ्या रकमेचे गंभीर, वैचारिक ग्रंथ आम्ही विकत घेऊ आणि वाचू असा संकल्प या दिवशी करावा. खोटे न बोलण्याचा, व्यभिचार

न करण्याचा, कोणत्याही प्रकारे नशापाणी न करण्याचा संकल्प या दिवशी करावा. बापाने आदर्श बाप, आईने आदर्श आई, मुलाने आदर्श मुलगा, मुलीने आदर्श मुलगी, पत्नीने आदर्श पत्नी, शेजाऱ्यांसाठी आदर्श शेजारी, मित्रांसाठी आदर्श मित्र, सहकाऱ्यांसाठी आदर्श सहकारी आणि सर्वांनीच आदर्श माणूस होण्याचा संकल्प या दिवशी करावा. कुठल्याही खुळचटपणाला, अंधश्रद्धांना आणि कर्मकांडांना आम्ही आमच्या जवळपासही फिरकू देणार नाही. हा संकल्प या दिवशी करावा. वाट्याला आलेले काम अत्यंत चोखपणे, इमानदारीने आणि इतरांना प्रेरणादायी ठरेल या पद्धतीने मी करीन असा संकल्प या दिवशी प्रत्येकाने करावा. मुले तत्त्वज्ञानी होतील, विचारवंत होतील, गणिती होतील, शास्त्रज्ञ होतील आणि समाजपरिवर्तनाच्या लढाईतील निष्ठावंत सैनिक होतील यासाठी प्रत्येक कुटुंबाने या दिवशी संकल्प करावा. क्रांतीचे चक्र अर्धेच फिरले आहे आणि आम्हीच ते पूर्ण फिरवू हा संकल्प या दिवशी करावा. कोणावरही अन्याय होणार नाही असा समाज घडविण्याची प्रतिज्ञा या दिवशी प्रत्येकाने करावी.

महाराष्ट्रातील निदान काही महत्त्वाच्या शहरांमध्ये काही समंजस कार्यकर्त्यांनी आता जयंतीला गंभीर रूप देण्याचे प्रयत्न चालविलेले आहेत. निबंधस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा घेणाऱ्या, गंभीर विषयांवर व्याख्याने आयोजित करणाऱ्या आणि 'अठरा तास अभ्यास' हा क्रांतिकारी उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबविणाऱ्या आणि बाजारू मनोरंजनाला कुठलाही वाव न देणाऱ्या, ध्वनिप्रदूषण-वायूप्रदूषण टाळणाऱ्या आणि संपूर्ण गावा-शहरातील सर्वच लोकांना सहभागी करून घेणाऱ्या जयंतीमंडळांना काही जबाबदार जयंतीमंडळे आता पारितोषिके देण्याचा उपक्रम राबवित आहेत. ही मला फार क्रांतिकारी घटना वाटते. मी स्वतः नाशिक, परभणी, पुणे, लोणेरे, धुळे अशा अनेक ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या अशा उपक्रमात सहभागी झालो आहे. ही चिन्हे मला फार सर्जनशील वाटतात. या नव्या घडामोडी मला फार आशादायी वाटतात. अशा जयंतीमंडळांना प्रोत्साहन मिळेल यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत.

याच सर्जनशील घडामोडींचा हवाला देऊन मी म्हणेन की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करणाऱ्या कोणीही हे लक्षात ठेवावे की आपण युगाला नवा आशय देणाऱ्या, युगाची दिशा आणि आशय बदलणाऱ्या एका अनन्य प्रज्ञावंत क्रांतिमानवाची जयंती साजरी करीत आहोत. कुठल्याही व्यसनाला आपल्या जवळपास फिरकू न देणाऱ्या, लाचारी आणि अगतिकता जाळून टाकायला सांगणाऱ्या महामानवाची जयंतीसाजरी करीत आहोत. कष्टांनाच जीवन मानणाऱ्या आणि संघर्षाला

जीवनसत्त्वे मानणाऱ्या युगनायकाची जयंतीआपण साजरी करीत आहोत. आपण एका अपूर्व गांभिर्याची आणि जबाबदारीची जयंती साजरी करीत आहोत. याचे स्वच्छ भान बाबासाहेबांची जयंती साजरी करणाऱ्यांना असले पाहिजे. आपण एका महान चारित्र्याची आणि कोणाहीपुढे कधीही न वाकलेल्या अपूर्व बाणेदारपणाची जयंती साजरी करीत आहोत याचे भान जयंतीकर्त्यांना असले पाहिजे.

बाबासाहेबांच्या जयंतीला जयंतीकर्त्यांनी परमजडवादी आणि उदंड मानवतावादी नैतिकता मानले पाहिजे. 'बाबासाहेबांची जयंती' या दोन शब्दांचा अर्थ प्रज्ञानमनस्कता हाच आहे. वृत्तीगांभीर्य हाच आंबेडकरजयंतीचा मथितार्थ आहे. या जयंतीच्या क्षितिजातून निघणाऱ्या वाटा थेट क्रांतीच्या मैदानातच माणसांना घेऊन जातात. म्हणूनच मला वाटते की बाबासाहेबांची जयंती ही क्रांतीची व्याख्या ठरली पाहिजे. हे होऊ शकते. पण त्यासाठी मी म्हणतो ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचे नीतीशास्त्र बाबासाहेबांची जयंती करणारांच्या वागण्या-बोलण्याचे नियंत्रकतत्त्व वा जयंतीचे अनुशासन झाले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ नष्ट करण्यासाठी भारतातील आणि जगातीलही अनेक फॅसिस्ट संघटना, धर्मसंस्था आणि राजकीय पक्ष उघडपणे वा गुप्तपणे डोळ्यात तेल घालून काम करीत आहेत. याचे कारण इहवाद आणि सामाजिक न्याय याच क्रांतितत्त्वांवर ही चळवळ उभी आहे. अंतर्विरोधातीत असे विश्वक्रांतीचे तत्त्वज्ञान केवळ या चळवळीजवळ आहे. भारतातील आणि जगातीलही लोकांना इहवाद आणि सामाजिक न्याय यांची प्रस्थापना नकोच आहे. याचा अर्थ या सर्वच लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर नको आहेत. यावेळी आंबेडकर नको असणारांना मदत होईल असे आपले वर्तन असू नये. आपण बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचारापासून दूर जावे, आपल्या मनातील आंबेडकर वजा होत जावा, आपण प्रवाहपतित व्हावे, आपण मनोरंजनाच्या पुरात वाहत राहावे, आपण करमणुकीच्या उत्सवात बेभान व्हावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विरोधकांना वाटते. आपण बौद्धिकदृष्ट्या दलित राहावे, वैचारिकदृष्ट्या कंगाल राहावे असे येथील प्रस्थापिताला मनापासून वाटते. बाबासाहेबांच्या चळवळीतील तारुण्य मनोरंजनाच्या आणि चंगळवादाच्या नादी लावले की आंबेडकरी चळवळ संपविण्यासाठी इतर काही करायची गरजच नाही हे प्रस्थापिताला माहीत आहे. निष्ठा आणि विचार यांचा पक्केपणा डळमळीत केला की माणसाला उद्ध्वस्त करणे फार सोपे होऊन जाते. प्रस्थापिताने हे विनाशक जाळे आपल्या तरुण पिढीवर टाकलेले आहे. या जाळ्यात सापडून उद्ध्वस्त व्हायचे की हे जाळे पार उद्ध्वस्त करून डॉ. बाबासाहेबांना विजयी

करायचे याचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची रंजक पद्धतीने जयंती साजरी करणाऱ्या सर्वांनीच गंभीरपणे करायला हवा आहे. आपल्यातील क्रांती विझविणारे जयंतीचे रूप तातडीने बदलण्याची आणि बाबासाहेबांच्या ग्लोबल क्रांतीविचाराशी जोडणारे जयंतीरूप साकार करण्याची गरज आहे. या लोकांनी बाबासाहेबांच्या जयंतीच्या उद्देशाचेही वाटोळे केले असे म्हणण्याची संधी दुनियेला मिळणार नाही याची काळजी आपण घ्यायला हवी.

■■

# उघड्या डोळ्यांचा बुद्ध

रेषांच्या मनस्वी शब्दांमधून आणि रंगांच्या अपर्यायी नादमयतेतून जीवनाची परमोत्कट मर्मे चितारणाऱ्या कवितेला कलाजग चित्र म्हणते. त्यामुळे चित्र म्हणजे रंगरेषांच्या लिपीतून चित्रकारांनी लिहिलेली कविता अशी चित्राची व्याख्या करता येईल. आदिम चित्रकलेचा जन्म जीवनसंघर्षाच्या पोटी झाला. जीवन जगण्याच्या, जीवन जगण्यायोग्य करण्याच्या आदिमानवाच्या धडपडीत चित्रांनी विश्वासू ऊर्जेची भूमिका अदा केली. सर्वांच्याच समान मानवी प्रतिष्ठेचे चित्र रंगवणाऱ्या आंबेडकरवादी चित्रचळवळीचे नाते आदिम चित्रकलेच्या भूमिकेशी जुळते. विश्वविचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्णच विश्वाच्या सर्वांगीण सौंदर्याचा ध्येयफलक ज्या चित्रचळवळीच्या हातात दिला त्या चित्रचळवळीला आंबेडकरवादी चित्रचळवळ म्हणायला हवे.

: एक :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना चित्रकलेची विशेष रुची होती. चित्रे पाहायला त्यांना आवडत आणि आपल्यालाही सुंदर सुंदर चित्रे निर्माण करता यावीत असे त्यांना मनापासून वाटे. बी.आर मडिगलेकर यांच्याकडून त्यांनी चित्रकलेचे प्रशिक्षण घेतले होते. चित्रकलेचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी अनेक पुस्तके विकत घेतली होती. चित्रे काढण्यात आणि रंगविण्यात ते तल्लीन होऊन जात असत. 'पेंटिंग अॅज अ पास्ट टाइम' या चर्चिलच्या पुस्तकाने त्यांना हा जबरदस्त नाद लागला होता.

: दोन :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र आयुष्य हे अंतहीन महायुद्धासारखे होते. भोवतीच्या जीवनातील सर्वंकष विषमतेविरुद्ध, या विषमतेच्या सर्व तत्त्वज्ञानांविरुद्ध आणि त्यांच्या उगमाविरुद्ध हे महायुद्ध कायम धगधगत होते. मानवी सन्मानाच्या प्रस्थापनेच्या मार्गातील अवरोध म्हणजे विषमता ! हे अवरोध रूढी-परंपरांच्या द्वारा साकार होतात. या सर्वच यंत्रणा देव-दैववादाच्या माध्यमातून शोषकांच्या फायद्याची आणि त्यांच्या वर्चस्वाची समाजरचना एकाच ठिकाणी थांबवतात. ही प्रक्रिया मानवी सन्मानाच्या प्रस्थापनेकडे जीवनाला नेणारे परिवर्तन मारते.

: तीन :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विषमतेला पर्यायशून्य ठरवणाऱ्या मानसशास्त्रांशी, विचारांशी, श्रद्धा-संस्कारांशी, कलांशी आणि तत्त्वज्ञानाशी जिवाच्या आकांताने भांडले. चित्रकलेसकट सर्वच कलांना आणि तत्त्वज्ञानांना त्यांनी 'चरथ' म्हटले. परम मानवी सौंदर्याच्या आणि सत्याच्या सर्जनासाठी आकांत मांडा असे त्यांनी सर्वच प्रतिभांना सांगितले. कलावंतांना त्यांनी या संदर्भात थांबण्याची सवलत दिली नाही. त्यांनी चालणारा बुद्ध हवा असे म्हटले. त्यांनी स्वतः डोळे उघडे असलेल्या बुद्धाचे चित्र काढले. दुनियेला छळणाऱ्या दुःखांच्या निर्दय टोळ्या पाहण्यासाठी डोळे उघडे असणे आवश्यकच असते. दुःखांच्या हल्ल्यांनी केलेली मानवी जीवनाची वाताहत मिटल्या डोळ्यांना दिसू शकत नाही. सिद्धार्थाने उघड्या डोळ्यांनी दुःखांमध्ये होरपळणारी दुनिया वाचली. डोळ्यांच्या या अनुभवांनी त्याच्या मेंदूला दुःखनिर्मूलनाचे तत्त्वज्ञान व्हायला सांगितले. उघड्या डोळ्यांचे मिथक तत्त्वज्ञानाच्या जन्माची हकिकत झाले आहे. हा डोळ्यांचा आणि मेंदूचा नद्याजोडणी प्रकल्प होय. बाबासाहेबांच्या चित्रातला उघड्या डोळ्यांचा बुद्ध हे ज्ञानमीमांसेतले एक मध्यवर्ती कलम आहे. हे तर्कसूत्र विद्रोही आहे. ते क्रांतिगर्भाचे जिवंत रूपक आहे.

: चार :

मला चालणारा बुद्ध हवा असे म्हणणारे बाबासाहेब बुद्धाला बुद्धाच्याच सब्बं अनिच्चंच्या, चरथ भिक्खवेच्या संकल्पनेशी जोडून घेतात. उघड्या डोळ्यांचा बुद्ध चितारून बाबासाहेब बुद्धालाच सम्यक दृष्टीच्या आणि सम्यक ज्ञानाच्या मर्माशी जोडतात. उघड्या डोळ्यांचा बुद्ध हे त्यांचे चित्र बावीस प्रतिज्ञांएवढेच विद्रोही आहे. 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' इतकेच बंडखोर आहे. 'रिडल्स इन् हिंदूइझम' इतकेच स्फोटक आहे आणि भारतीय संविधानाला दिलेल्या प्रज्ञानाएवढेच सर्जनशील आहे. बाबासाहेबांनी जन्माला घातलेले हे बुद्धाचे उघडे डोळेच आंबेडकरी चित्रचळवळीचा उगम आहेत. या उघड्या डोळ्यातूनच आता सर्व आंबेडकरवादी चित्रकारांनी आपली चित्रे काढावीत. हे उघडे डोळेच आता आंबेडकरवादी चित्रकारांसाठी प्रेरणांची दीक्षाभूमी झालेले आहेत.

: पाच :

रेषा आणि रंग माणसांच्या समग्रच वृत्ती-प्रवृत्तींची, संवेदना-भावना-विचारांची भाषा बोलतात. रंग कधी अगतिक, रागीट, संतप्त, कठोर, पहाडी, फडफडणारे, उसळणारे, उधाणणारे, उत्साही, जबाबदार, सेक्युलर, बाणेदार, स्वाभिमानी, भेदक,

तृषाक्रांत होतात. तर कधी बाणासारखे, आईसारखे, मित्रासारखे, प्रियेसारखे, कडाडत्या विजांसारखे आणि बुद्धासारखे होतात. हे रंग कधी बरसते ढग होतात. उजेडाच्या मैफली होतात. परिवर्तनाचा आवाज होतात. कधी ते सर्वांना पोटाशी घेणारे बुद्धिवादी आंबेडकर होतात. हेच रेषांच्याही वेल्हाळण्याच्या आणि कडाडण्याच्या संदर्भात म्हणता येते. रेषांचा खेळ मांडण्याच्या पद्धतींना अंत नाही. रेषांच्या पोटातील असंख्य नवलाचे आकार चित्रकार बाहेर काढतो. यातील काही आकार कधी वेदनांनी आक्रंदत असतात तर कधी अस्वस्थतेने धुमसत असतात. कधी अनावर पेट घेत असतात. काही आकारांना परिवर्तनाच्या निष्ठा असतात. काही आकार चौकटी तोडणारे असतात. काही झेपावणारे आकार असतात. अनिष्टांवर आसूड ओढणारे काही आकार असतात. काही आकार चळवळ होतात. काही आकार मोर्चे होतात. काही हाका होतात. काही आकार चांदण्याचे असतात. काही आकार बुद्धाचा मेंदू होतात. काही प्रतीत्यसमुत्पाद होतात. काही आकार क्रांतिदिशेवर रोखलेले बाबासाहेबांचे बोट होतात. तर काही आकार अंधाराला उजेड होण्यास भाग पाडणारे आंबेडकरही होतात.

: सहा :

रंगबद्ध आणि रेषाबद्ध कविता म्हणजे चित्र ! मानवी सौंदर्याच्या समग्रतेचा आणि परिपूर्णतेचा शोध हे या रंगरेषांचे ध्येय असते. रंगांना-रेषांना नाद असतो. लय असते. आवाज असतो त्यामुळे रंग-रेषा आपणाला संगीतासारख्या ऐकायला येतात. रंग-रेषा ही कलेची ग्लोबल लँग्वेजच असते. ही लँग्वेज जेव्हा सत्याकडे पाठ फिरविते तेव्हा सौंदर्यही तिच्याशी अबोला धरते. खरे चित्र आईच्या काळजासारखे असते ते समतेच्या स्वप्नासारखे असते. खरी चित्रे पाहताना आपणाला परिवर्तनाचे पंख फुटतात. आपल्या मनात माणुसकीचे आभाळ दाटून येते. आपल्या मनाच्या अवकाशाचे किनारे पार वितळूनच जातात.

: सात :

चित्रकाराचे वर्गचारित्र्य, त्याचे भूमिकाचारित्र्य त्याच्या चित्राच्या संहितेतून प्रकटते. वर्गचारित्र्यही नाना स्वरांचे असते. त्यानुसार कलावंतांच्या भूमिका संभवतात. त्या त्या भूमिकांच्यानुसार कलावंतांच्या चित्राचा Significant Content and Form ठरतो. या भूमिकांच्या अनुषंगाने जागतिक चित्रक्षेत्रात अभिजाततावाद, वास्तववाद, अतिवास्तववाद, स्वच्छंदतावाद, दृकप्रत्ययवाद, जनकला असे अनेक संप्रदाय जन्माला आले आहेत. यातील काही संप्रदाय स्थितिवादी आहेत तर काही परंपरांच्या चौकटी तोडणारे आहेत. 'अभिव्यक्ति के सारे खतरे उठाने होगे' असे म्हणणारे आहेत. द.ग.

गोडसे यांनी या सर्व थांबलेल्या आणि प्रगमनशील संप्रदायांचे शास्त्रधाटी आणि लोकधाटी, गणितमानी आणि गतीमानी असे दोन वर्ग कल्पिले आहेत. भारतातील ऐहिक जीवनाची जडवादी कल्पना संपन्न, समृद्ध आणि विशाल होती हेही त्यांनी 'पोत' या त्यांच्या प्रबंधात (पृ. १५) सांगितले आहे. अशी इहवादी चित्रनिर्मिती जीवनाच्या संघर्षात सैनिक म्हणून लढते. अशा चित्रांतील रेषा पोलादी, आक्रमक आणि ओजस्वी असतात. अशी चित्रे चांदण्याचे आणि अग्नीचे दुधारी पण सेंद्रिय व्यक्तिमत्त्व धारण करतात.

: आठ :

निसर्गातील वाघा-सिंहांसारख्या हिंस्त्र पशूंसोबत, वादळा-पुरांसारख्या नैसर्गिक उत्पातांसोबत, विषारी सापांसोबत संघर्ष करता करता आदिम चित्रप्रतिभांनी चित्रे काढली. आंबेडकरवादी चित्रकारांच्या पूर्वजांना आणि समकालिनांनाही वाघासिंहापेक्षा अधिकच हिंस्र असलेल्या माणसांसोबत, विषारी सापांपेक्षाही भयंकर रूढी-परंपरांसोबत आणि वादळे-पूर या नैसर्गिक उत्पांतापेक्षाही भयंकर अशा विषमतांच्या, बहिष्कृतीच्या उत्पातांसोबत संघर्ष करावा लागला आणि करावा लागत आहे. येथील चैतन्यवादी चकव्याने त्यांच्या मानवी जगण्याच्या हक्कांची सनदच जाळून टाकली होती. हे सर्व मनात वागविणाऱ्या आंबेडकरवादी चित्रप्रतिभांनी हजारो वर्षांच्या नकाराचा हा पहाड धुळीस मिळविला. आपल्या आणि पृथ्वीच्या पाठीवरील सर्वांच्याच सन्माननीय मानवी जगण्याचा जळता प्रस्ताव त्यांच्या आंबेडकरी रंगरेषांनी जगापुढे मांडला.

आंबेडकरी चित्रचळवळ अश्रूंचा अनुवाद अंगार असा करते. ती निषेधाच्या विद्युतरेषांनी विद्रोहाचे घनाकार निर्माण करते. ती प्रतिकार होते. विषमतेवरचा निकराचा हल्ला होते. पण त्याहीपेक्षा ती नवनिर्मितीचा महोत्सव होते. नव्या शोषणविहीन जगाची तहानभूक चित्रबद्ध करण्यासाठी ती तेवढ्याच मनस्वीपणे निर्मितीच्या वादळात उतरते.

: नऊ :

काही प्रज्ञावंतांनी आता आंबेडकरवादाची मांडणी केलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातले एक महान System Builder आहेत. आंबेडकर हा समग्रलक्ष्यी जीवनविचार आहे. संपूर्ण मानवी जीवनाच्याच कल्याणाचे ते गतिशील, परिवर्तनशील संविधान आहे. या तत्त्वज्ञानाला जन्मप्रेरणा मानणारी आंबेडकरवादी चित्रचळवळ प्रतिक्रिया देण्यात गुंतून राहण्याऐवजी विश्वसमाजाच्या नव्या नमुन्याचे संकेत

चितारण्याला अधिक महत्त्व देते. म्हणून या चित्रकलेचे सौंदर्यशास्त्र आता प्रतिकाराच्या सौंदर्यशास्त्राच्या (Aesthetic of Resistance) सीमा ओलांडून Aesthetic of Reconstruction चे, जीवनाच्या पूर्ण निर्मितीचे सौंदर्यशास्त्र उभारीत आहे. अध्यात्म, सरंजामशाही, भांडवलशाही ही सर्व बहुसंख्याकांना वियुक्त –Alienate करणारीच शोषक षडयंत्रे आहेत. या सर्व तृष्णेच्याच अमानुष मेथड्स आहेत. या बहुरूपी शोषणव्यूहाच्या विरोधात आंबेडकरवादी चित्रांच्या सौंदर्यशास्त्राने एक घाव दोन तुकडे युद्ध पुकारले आहे. हे आंबेडकरवादी चित्रांचे सौंदर्यशास्त्र मानवी जीवनाला संपूर्ण बुद्धिवादाच्या, सम्यक समाजवादाच्या विश्वासू प्रकाशात अनुवादित करू पाहते. या उजेडाच्या विरोधात काम करणाऱ्या सर्व भ्रमांमधून, सर्व अंधश्रद्धांमधून मानवी जीवनाला मुक्त करू इच्छिते. हेच आंबेडकरवादी चित्रचळवळीचे प्रयोजन आहे.

या चित्रचळवळीचा आविष्कार आजवर असंख्य नियतकालिकांच्या, पुस्तकांच्या मुखपृष्ठांमधून, त्यातील रेखाटनांमधून, पोस्टर पोयट्रीमधून आणि अनेक आंदोलनांच्या लाटांमधून उद्रेकून आलेल्या चित्रनिखाऱ्यांमधून झालेला आहे.

आज जागतिकीकरणाच्या अमानुषतेवर या चित्रचळवळीने जिहाद पुकारला आहे. आंबेडकरी चित्रचळवळीतील रंगरेषा पुन्हा नव्या सैन्यात भरती होत आहेत. प्रस्थापिताच्या फसव्या नियमांची मोडतोड त्या करीत आहेत आणि प्रतिगाम्यांचे चित्राशय धगधगत्या रंगरेषांच्या सुरुंगानी उडवून देत आहेत. आंबेडकरी चित्रचळवळीला आपल्या श्वासांचे माहेर चांगले माहीत आहे. आपल्या पुढल्या आव्हानांचेही तिला भान आहे. अशावेळी रंगरेषांना आवश्यक त्या रणनीतीचा नकाशाही या चळवळीच्या हातात आहे.

# बौद्धांची वाचन संस्कृती

प्रतिभावंतांनी आणि प्रज्ञावंतांनी आजवर जगात अफाट वाङ्मय निर्माण करून ठेवले आहे. या विराट वाङ्मयविश्वात काही साधारण दर्जाचे वाङ्मय आहे. काही चांगले वाङ्मय आहे काही उत्तम वाङ्मय आहे. हे सर्व वाङ्मय कोणालाही एका आयुष्यात वाचता येणे शक्य नाही. पण एवढे कशाला, एखाद्या मोठ्या ग्रंथालयातील सर्व ग्रंथसुद्धा एखाद्या व्यक्तीला वाचता येणे शक्य नाही. किंबहुना जगातले उत्तमोत्तम ग्रंथसुद्धा एका आयुष्यात कोणालाही वाचता येणे शक्य नाही.

अशा स्थितीत वाचकाला निवड करावी लागते. आपल्याला आवडणारे आपल्या उपयोगाचे ग्रंथ निश्चित करावे लागतात. ही ग्रंथांची निवड या संपूर्ण ग्रंथसागरातून करणे सोपे नाही. पण या सर्व विराटातून दोन कारणांमुळे निवड शक्य होते. त्यातले एक कारण असते आपली आवड आणि दुसरे कारण असते विवक्षित पद्धतीची आपली गरज, आपली गरज पक्की झाली की निवड निश्चित होते आणि आपण ग्रंथांच्या विराट पसाऱ्यातून आपल्याला हवे ते आणि तेवढेच ग्रंथ निवडून घेतो.

: १ :

आपली आवड आणि वाचनासंबंधीची आपली गरज कशी निश्चित होते ? ही गरज आपल्या जीवनविषयक भूमिकेनुसार शक्य होते ? आपण म्हणजे आपली जीवनमूल्ये. आपले आयुष्य म्हणजे आपण प्रमाण मानलेल्या जीवनमूल्यांचा आविष्कार होय. घरात, शैक्षणिक संस्थात किंवा चळवळीत आपल्यावर काही संस्कार होतात. त्यातून आपल्या बऱ्या-वाईट आवडीनिवडी निर्माण होतात. या आवडी निवडींना विवक्षित मूल्यांची बैठक असते. या प्रक्रियेतून आपली अभिरुची तयार होते. विशेष अशी रुची म्हणजे अभिरुची. या अभिरुचीमुळे आपल्या भावनांना आणि विचारांना विशिष्ट दिशा प्राप्त होते. आदर्श जीवन कोणते ? या प्रश्नाच्या उत्तराची एक संहिता आपल्या मनात तयार होते. त्या संहितेच्या सोबतीने आपले मन त्या आदर्शाच्या दिशेने धावायला लागते. या धावण्याच्या प्रक्रियेत वाचनासंबंधीची आपली आवडही पक्की होत जाते आणि आपल्या वाचनविषयक गरजांनाही रेखीवपणा प्राप्त होत जातो. ग्रंथांची निश्चिती, वाचनाचा आपला वेग, त्यामुळे आपल्या मनात निर्माण होणारा विचारांचा उत्सव आणि त्यामुळे आपल्या मनाला येणारा विवक्षित भावनांचा

आणि विचारांचा मोहोर या अशा सर्वच प्रक्रियेतून आपली वाचनसंस्कृती सिद्ध होत जाते.

: २ :

बौद्धांची वाचन संस्कृती म्हणजे काय या प्रश्नाचाही थोडा विचार व्हायला हवा. १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला बावीस प्रतिज्ञांचा धम्म ज्यांनी स्वीकारला तेच बौद्ध लोक होत असे म्हटले पाहिजे. हा धम्म पूर्णतः बुद्धिवादी, विज्ञाननिष्ठ, इहवादी आणि प्रत्येकच माणसाच्या सामाजिक न्यायाची प्रतिष्ठा प्रस्थापित करू इच्छिणारा धम्म आहे. मानवत्वाच्या सन्मानाची नैतिकता जडवादाच्या उजेडात प्रस्थापित करणे ही धम्माची जन्मप्रतिज्ञा आहे.

बौद्धांच्या वाचनसंस्कृतीचे हेच मर्म आहे. काय वाचायचे ? कसे वाचायचे आणि कशासाठी वाचायचे ? काय वाचू नये ? का वाचू नये ? या सर्व प्रश्नांची उत्तरे मानवत्वाच्या सन्मानाची नैतिकता जडवादाच्या उजेडात प्रस्थापित करणे या धम्मध्येयाच्या पोटातच दडलेली आहेत. या प्रश्नांची उत्तरे ज्या उद्देशात दडलेली आहेत तो उद्देशच बौद्धांची वाचनसंस्कृती निश्चित करतो. बौद्धांच्या वाचनविषयक अभिरुचीला प्रतीत्यसमुत्पादाचा प्राण आहे. हीच विज्ञाननिष्ठा होय. या वाचनविषयक अभिरुचीला एका अव्याहत परिवर्तनाचा ध्यास आहे. प्रज्ञेच्या आणि करुणेच्या डोळ्यांनी बौद्ध वाचक ग्रंथाचेही वाचन करतो आणि जीवनाचेही वाचन करतो. जडवादाच्या उजेडात मानवत्वाच्या सन्मानाची प्रतिष्ठा प्रस्थापित करण्याच्या दिशेने होणारे वाचन असे बौद्धांच्या वाचनसंस्कृतीचे रूप आहे.

बौद्धांची वाचनसंस्कृती ही घटना अत्यंत गंभीर आहे. अत्यंत जबाबदार आहे. पूर्णपणे निष्ठावंत आहे आणि चारित्र्याने इथूनतिथून सर्जनशीलही आहे. ही संस्कृती रंजनवादी वाचनसंस्कृती नव्हे. ती टाइमपास वाचनसंस्कृती नव्हे. क्रांतीचा फलक या वाचन संस्कृतीच्या हातात आहे. ही वाचनसंस्कृती एका अर्थाने सैनिक वाचनसंस्कृती आहे. नव्या माणसाच्या, नव्या विश्वाच्या निर्माणाच्या युद्धात ती सैनिकाचे काम करीत आहे. ही वाचनसंस्कृती ग्रंथालयाला युद्धभूमी मानते. बौद्धांची वाचनसंस्कृती एका संग्रामसंस्कृतीची नागरिक आहे. या अर्थाने बौद्धांची वाचनसंस्कृती म्हणजे आंबेडकरी मिशनच आहे असे म्हटले पाहिजे.

: ३ :

बौद्धांच्या वाचनसंस्कृतीची वृत्ती अंतर्मुख आहे. या वाचनसंस्कृतीचे एक विवक्षित पद्धतीशास्त्र आहे. या वाचनसंस्कृतीला दोन गोष्टींवर एकाग्रता करायची

असते. एक गोष्ट जीवन कसे आणि का आहे ? दुसरी गोष्ट जीवन कसे असावे आणि ते तसे कशाने होईल ? बौद्धांच्या वाचनसंस्कृतीचा परिघ या प्रश्नांनी निश्चित केलेला आहे. त्यामुळे ही संस्कृती वाचकाचा आपल्या वाचनावर ताबा असावा अशी अपेक्षा करते. वाचनाच्या प्रवाहात वाचकाने वाहू नये. घोडा जसा लगामी असावा लागतो तसे वाचनही वाचकाच्या कह्यात असावे असे ही संस्कृती मानते.

बौद्धांची वाचनसंस्कृती निष्ठापूर्वक हे मानते की वाचनाचा आपला जगातील महान आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर हाच आहे. हा आदर्श कसा आहे ? या महामानवाने जगातले थोर थोर ग्रंथ पचवले आणि संपूर्ण जगाला नवल वाटावे असा उजेडाचा ग्रंथ तो झाला. बाबासाहेब आंबेडकरांना जाळणारे जीवन त्यांनी पेटत पेटत वाचले आणि स्वतःच्या पेटण्याच्या उजेडात त्यांनी जगातील अंधार कापणारे ग्रंथ वाचले. अमानुषतेचा, विषमतेचा आणि तुच्छतेचा पुरस्कार करणाऱ्या ग्रंथांचा पराभव करणारे ग्रंथ त्यांनी लिहिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बौद्धांच्या वाचनसंस्कृतीचे परमादर्शच आहेत. त्यामुळेच बौद्धांची वाचनसंस्कृती चिकित्सकच असली पाहिजे. बौद्धवाचक जे वाचतो त्याची समांतरपद्धतीने त्याच्या डोक्यात चिकित्सा सुरू झाली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान विचारवंतांचे लेखन समजावून घेत वाचल्यामुळे ही चिकित्साप्रक्रिया डोक्यात सुरू होते. या चिकित्सेअभावी हेही खरे, तेही खरे अशा बाळबोध पातळीवरच वाचन खेळ मांडत राहते. वाचनाने आपल्या डोक्यात बाबासाहेबांचे पद्धतीशास्त्र निर्माण व्हावे असे बौद्धांच्या वाचनसंस्कृतीला वाटते.

वाचनाने वाचकाच्या डोक्यात सत्य, चांगुलपणा, सौंदर्य, निसर्ग, माणूस अशा सर्वच गोष्टींसंबंधी काही मापदंड तयार होतात. हे मापदंड ग्रंथ वाचताना निरक्षीरविवेकाची भूमिका करीत असतात. त्यामुळे वाचकाचे मन भरकटत नाही.

: ४ :

वाचन भूमिकेपरत्वे बदलते, ते बदललेही पाहिजे. निखळ वाचकांचे वाचन वेगळे असते. लेखकांच्या वाचनाचे स्वरूप वेगळे असते. वक्त्यांचे वाचन आणखीच वेगळे असते. अध्यापकांचे वाचन आणखीच वेगळ्या पद्धतीने चालते. विद्यार्थ्यांचे वाचन ही बाब आणखी कितीतरी वेगळी असते. आपल्या गरजांच्यानुसार वरील सर्व घटकांचे वाचन चालते. पण हे सर्वच वाचन गंभीर असते.

बौद्ध वाचनसंस्कृतीची ही अपेक्षा आहे की वाचनाने वाचकाला अधिकाधिक प्रकाशातच न्यावे. वाचनाने वाचकाला अनिष्ट गोष्टींशी लढायचे बळ द्यावे. वाचनाने

परिवर्तनवादी काय आणि परिवर्तनविरोधी काय याचे प्रखर भान वाचकाच्या मनात जागे करावे. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य ज्याने जबाबदारीने वाचले तो माणूस ओशोचा गौरव करणारे पुस्तक लिहूच शकत नाही. समरसतेचा पुरस्कार करून शकत नाही. कोणत्याही बाबाबुवाकडे जाऊच शकत नाही. ज्याला बाबासाहेब कळले तो वाचक बावीस प्रतिज्ञांकडे पाठ फिरवूच शकत नाही. तो कर्मकांडाच्या फोलफटात रमूच शकत नाही.

: ५ :

बौद्ध वाचक गंभीर आणि जबाबदार असतो. म्हणूनच तो दैनिकातील बातम्या फक्त वाचत नाही. तो दर्जेदार दैनिकातील अग्रलेख प्राधान्याने वाचतो आणि अग्रलेखाच्या आणि त्याच्या बाजूच्या पानावरील विश्लेषणावर लेखही जरा काळजीपूर्वक वाचतो. बौद्धांच्या वाचनसंस्कृतीत राशीभविष्य वाचणे बसत नाही. अशाच अनेक अनावश्यक गोष्टी बसत नाहीत.

दर्जेदार दैनिकातील एखादा लेखही आपल्यापुढे वेगळी दिशा अंथरू शकतो. एखादे प्रज्ञानी पुस्तक आपल्या आयुष्याला क्रांतिकारी वळण देऊ शकते. एखाद्या लेखातील किंवा पुस्तकातील एखादा विचारही आपल्या मनात प्रचंड ऊर्जा निर्माण करू शकतो. अंधारात चमकणारी वीज आपल्या पायापुढची वाट उजळून टाकते. त्याप्रमाणे एखादा विचारही अंधारातून चालणाऱ्या आपल्या मनाची वाट उजळून टाकत असतो.

त्यामुळेच घेतलेली पुस्तके कपाटात बंद करू नयेत. पुस्तके म्हणजे पिंजऱ्यातील पोपट नव्हेत. पुस्तकांना आपल्या मनात उडू द्यावे. मुक्तपणे उडू द्यावे आणि आपल्या मनांनाही उन्नयनाच्या असीम आकाशात पोट भरून उडू द्यावे असे बौद्धांच्या वाचन संस्कृतीला वाटते.

बौद्धांच्या वाचनसंस्कृतीला वाटते की वाचकाने प्रखर सत्यवादी व्हावे. तडजोड करणारे रक्त वाचकाच्या मनातून नाहीसे व्हावे. लोक कोणाचेही अंधभक्त होऊ नयेत. विरघळणारी ढेकळे होऊ नयेत. बौद्धवाचकांनी लाचारीला स्वाभिमान मानू नये आणि स्वतःला विकून उरलेले प्रेतवत जगणे सुंदर आणि श्रीमंत हारांनी सजवू नये. बौद्ध वाचकांनी पुस्तके हा घराचा प्राण मानावा. हा प्राण घरात नसेल तर इतर वैभवशाली गोष्टींनी घर जिवंत होऊ शकणार नाही. घरात शिरताच ग्रंथ आणि घरातील बौद्धिक वातावरण पाहून हे घर बौद्धांचे आहे असे माणसांना वाटले पाहिजे असे बौद्धांच्या वाचन संस्कृतीला वाटते. बौद्धांच्या घराला बाबासाहेबांचे बुद्धिवादी,

सतत अभ्यासू आणि सर्जनशील व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले पाहिजे असे बौद्धांच्या वाचन संस्कृतीला वाटते.

: ६ :

तरुणांनी, कार्यकर्त्यांनी आणि विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व साहित्य समजावून घेत वाचावे. अनेक लोक पुस्तकांवर नजर फिरवतात. पुस्तकात मनाने शिरतच नाही. केवळ बाबासाहेबांचे ग्रंथ वाचावेत असे नाही तर जगातील सर्वच महत्त्वाच्या विचारवंतांचे ग्रंथ तौलनिकदृष्ट्या वाचावेत. त्यातून बुद्धीला धार चढते. हे सर्व करून तरुणांनी, कार्यकर्त्यांनी आणि विद्यार्थ्यांनी आजच्या संदर्भातले क्रांतिकारी आंबेडकर आपल्या मनात तयार करावेत असे बौद्धांच्या वाचन संस्कृतीला वाटते.

वरील सर्वांनीच कथा, नाटके, कादंबऱ्या आणि कविताही वाचाव्यातच पण विचारवंतांचे आणि तत्त्वज्ञांचे गंभीर लेखनही वाचावे. त्यातील महत्त्वाची मते लाल शाईने अधोरेखित करीत असे लेखन वाचावे. ललित साहित्य तत्त्वज्ञानाप्रमाणे वाचू नये आणि तत्त्वज्ञान ललित साहित्यासारखे वाचू नये. उपहासप्रधान आणि उपरोधप्रधान वाङ्मयही खूप काळजीने वाचावे. वाचले त्याचे मनन चिंतन करावे. त्यातून आपल्यालाही काही नवे सुचण्याची शक्यता असते. अशा शक्यतांचा पुरेपूर उपयोग करून घ्यावा. आज इंटरनेटवर जगातल्या हव्या त्या प्रज्ञावंतांसोबत आपण उच्च वैचारिक जीवन जगू शकतो. असे खूप प्रज्ञावंत आपल्याला नवनवे पंख देतात. उडायला नवे आकाश देतात. बौद्धांच्या वाचन संस्कृतीला असे वाटते की ही सर्व जागतिक ज्ञानाची लूट बौद्ध वाचकांनी करावी. स्वतःला गोगल सिटीझन करू नये. तर स्वतःला ग्लोबल सिटिझन म्हणून घडवावे असे बौद्धांच्या वाचनसंस्कृतीला वाटते.

: ७ :

इंजिनिअरिंग, विज्ञान, वाणिज्य, वैद्यकशास्त्र वा कला अशा कोणत्याही विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाचा फडशा पाडण्याआधी बाबासाहेबांनी केलेल्या क्रांतीचे साहित्य वाचावे. तद्वतच अडचणीवर मात करीत महान झालेल्या जगातील शास्त्रज्ञांचे, तत्त्वज्ञांचे, साहित्यिकांचे साहित्यही वाचावे असे झाले तर त्या त्या शाखेतील विषयांचा अभ्यास विद्यार्थी अधिक डोळसपणे, अधिक ज्वलंत मनाने आणि अधिकच जिद्दीने करतील असे बौद्धांच्या वाचनसंस्कृतीला मनापासून वाटते.

: ८ :

बौद्धांची अशी वाचनसंस्कृती झपाट्याने विकसित व्हायला हवी. त्यातून समाजाची, वक्त्यांची, उद्योजकांची, प्राध्यापकांची आणि साहित्यिकांचीही एक प्रज्ञानी अभिरुची जन्माला येईल. 'Reconstruction of the world' करू शकणारी आंबेडकर संस्कृती बौद्धांच्या या वाचनसंस्कृतीच्या पोटीच जन्माला येऊ शकते.

■■

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे मानवी आकारातील अखंड धगधगते क्रांतिसंगर. या क्रांतिसंगराला कृतज्ञतापूर्वक अभिवादन !

हे क्रांतिसंगर हजारो वर्षे इथं ठाण मांडून बसलेल्या अमानुष गुलामगिरीला आग लावीत सुरू झालं आणि एकूणच जगातील अन्यायग्रस्तांच्या मुक्तीचं स्फोटक तत्त्वज्ञान झालं. माणुसकीच्या इज्जतीचा हा जाहीरनामा चवदार तळ्याच्या पेटलेल्या पाण्यानं लिहिला आणि सर्वच दुःखांसाठी तो दिगंताएवढा असीम झाला.

हा सोसाट्याचा आंबेडकरवारा भारताच्या जळत्या मातीतून उगवला आणि जाती, धर्म, भाषा, राष्ट्रे यांच्या सीमा तोडून वैश्विक झाला. या सुरुंगाच्या भीतीनेही भेदांच्या भिंती हादरल्या. या मानवी प्रभंजनाचं बोट धरून दुनियेतील सर्वच दुःखं आता रणमैदानावर येत आहेत. सूर्यालाही प्रकाशाचं कर्ज देणाऱ्या या महासूर्यासंबंधी अन्यायग्रस्तांचे काफिले म्हणतात –

**''तुझे शब्द आता अम्हा युद्धशाळा**
**तुझी याद भीमा तमातील ज्वाळा''**

बाबासाहेब एकाचवेळी युद्धही होते आणि बुद्धही होते. क्रांतीही होते आणि शांतीही होते. शोषितांसाठी त्यांच्या डोळ्यात आसवं होती आणि गळ्यात ज्वालामुखी होता. हे विश्वाच्या समान नागरी कायद्याचं महान सर्जनशील रूप होतं.

बाबासाहेबांनी दुःखांच्या उगमांनाच आग लावली. पराभूतांसाठी ते विजयाची प्रेरणा झाले. अन्यायग्रस्तांना संघर्षात आणणारी अन्यायाची मीमांसा झाले. विझलेल्या उमेदींमध्ये ते प्रकाशाचा झंझावात झाले. काळोखात कुढणारांची पहाट ते झाले. ज्ञानाच्या या अथांगानं केलेली अनाथांच्या मायची भूमिका अपूर्वच होती.

बाबासाहेब नावाच्या गडगडाटानं वाट चुकलेल्या युगाला बुद्धिवादाचा विश्वासू मेंदू दिला. दुष्टांनाही सज्जन करणारं पद्धतीशास्त्र दिलं. आपल्याला कोणीही खोटं ठरवू शकत नाही हा या परमसत्याचा दावा होता. दुष्टता जाळणारे करुणेचे ग्रहगोल त्याच्या हातात होते. विषमतेच्या सर्वच हिटलरी मुजोऱ्या त्याच्यापुढे मोडून पडल्या. या विश्वप्रज्ञेचं परिपूर्ण महिमान सांगणारा शब्द अजून जन्मायचा आहे.

बाबासाहेबांचं आयुष्य म्हणजे कायम धगधगती युद्धभूमी. या भूमीवर निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या फौजा होत्या. या युद्धभूमीनं क्रांत्यांचा इतिहास लिहिला.

सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्याच्या सज्जन जगाची नवी संहिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केली. मानवतेच्या अब्रूसाठी सद्विवेकाचं भौतिक विकासाकडे धावत राहणारं ऐहिक नीतीचं संविधान दिलं. दर्जाच्या आणि संधीच्या सौंदर्याचं गणराज्य निर्माण केलं आणि सर्वहारांच्या प्रतिभांनी बाबासाहेबांना कृतज्ञतेनं अभिवादन केलं.

बाबासाहेब आंबेडकर म्हणजे उजेडाचं, संघर्षाचं आणि प्रज्ञानाचं महाकाव्य होय. समान मानवी हक्कांच्या स्वप्नलोकात जाण्यासाठी आवश्यक असा विश्वासार्ह पासवर्ड म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांना सर्वच कृतज्ञतांचं विनम्र, विनम्र अभिवादन !

■ ■

# एम.ए. मराठीचा अभ्यासक्रम, अध्यापक आणि अध्यापन

मी १९७९ साली नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागात रुजू झालो. त्यावेळी आणि त्यानंतरच्या काळात या विभागात डॉ. प्रभुदेसाई, डॉ. द.भि. कुळकर्णी, प्रा. म.शं. वाबगावकर, डॉ. म.रा. जोशी, मी आणि डॉ. आशा सावदेकर असे सहा अध्यापक होतो. सर्वच अध्यापक नामवंत होते. नागपूर विद्यापीठाचा स्नातकोत्तर मराठी विभाग हा केवळ नागपुरातीलच नव्हे तर एकूणच विदर्भामधील विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचा आणि आदराचा भाग होता. विभागातून शिकून गेलेले आणि विदर्भातील वेगवेगळ्या महाविद्यालयांमध्ये मराठीचे अध्यापन करणारे प्राध्यापक त्या त्या भागात असलेल्या महाविद्यालयातील बी.ए. झालेल्या विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागात जायला सांगत. मराठीत एम.ए. करायचे असेल तर विभागातच जा असा कळकळीचा सल्ला ते विद्यार्थ्यांना देत.

याला कारण विभागातील नामवंत अध्यापक हे होते. पुसद, दिग्रस, मंगरूळपीर, गोंदिया, गडचिरोली, बुलडाणा अशा विदर्भाच्या सर्व भागातून त्याकाळी विद्यार्थी विभागात येत. डॉ. यशवंत मनोहर विभागात आहेत. डॉ. द.भि. कुळकर्णी आहेत असे गौरवाने सांगितले जाई आणि या नावाखातर आणि विभागातील इतरही अध्यापकांमुळे विद्यार्थी विभागात येत. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची रीघ लागे. शेकडो विद्यार्थ्यांचे अर्ज आम्हाला नाकारावे लागत असत. इतकी गर्दी त्याकाळी प्रवेशासाठी होत असे.

अलीकडच्या काळात विभागातील प्रवेशाच्या संदर्भात प्रश्न निर्माण झालेला आहे. अत्यंत कमी विद्यार्थी इथे प्रवेश घेतात. याची दोन प्रमुख कारणे आहेत. एकतर विभागात दोनच अध्यापक आहेत. विभागप्रमुख म्हणून डॉ. काळे यांना अध्ययनाव्यतिरिक्त इतर खूप कामे करावी लागतात. ती सर्व कामे आपणास माहीत आहेतच. दुसरे अध्यापक आहेत डॉ. शैलेंद्र लेंडे ! दोघेही चांगलेच आहेत पण विभागात या दोघांनी सर्व अभ्यासक्रम कसा पूर्ण करायचा ? मदतीला मग बाहेरची काही नवी प्राध्यापक मंडळी येतात. कॉन्ट्रिब्युटरी म्हणून बाहेरून येणारे प्राध्यापक आपल्या महाविद्यालयांमधील अध्यापन सांभाळून विभागात येतात. त्यामुळे विभागासंबंधीच्या, विद्यार्थ्यांसंबंधीच्या आपुलकीलाही मर्यादा येणे स्वाभाविक आहे.

विभागाला द्यावयाच्या कालावधीलाही मर्यादा पडणे स्वाभाविक आहे. या सर्वच गोष्टींचा एम.ए. पातळीवरच्या त्यांच्या अध्यापनावर परिणाम होणेही साहजिकच असते.

विभागात स्थायी, गुणवंत आणि नामवंत अध्यापक असले तर विभागाचे अध्यापकीय पर्यावरण बदलेल की नाही ? म्हणून विभागात किमान चार-पाच नव्या अध्यापकांची नियुक्ती तातडीने होण्याची गरज आहे. असे झाले तर चार-पाच अध्यापकांना अध्ययनक्षेत्रातील प्रतिष्ठाप्राप्त पदावर काम करण्याची संधी मिळेल. संशोधनासाठी आणि स्पेशलायझेशन निर्माण करण्यासाठी त्यांना आवश्यक ते वातावरण मिळेल. विद्यार्थ्यांना त्यांच्या या सर्व तयारीचा फायदा होईल. विद्यार्थ्यांची विभागातील संख्या वाढेल. विभाग गजबजून जाईल.

विभागाला आज लागलेली ओहोटी थांबविण्यासाठी उत्तम, मान्यवर प्राध्यापकांची नियुक्ती करणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्रातील इतर सर्वच विद्यापीठांमधील मराठी विभागांमध्ये पाच-पाच, सहा-सहा अध्यापक आहेत. विभाग समृद्ध वाटतात. जिवंत वाटतात. आपल्या विद्यापीठाचा मराठी विभाग मात्र दिवसेंदिवस कंगाल आणि दयनीय होत चाललेला आहे.

यावर गंभीर अध्यापकांची विभागात नियुक्ती हा एक उपाय आहे आणि दुसरा उपाय आहे विद्यापीठकक्षेतील वेगवेगळ्या महाविद्यालयांना दिलेली मराठी एम.ए.ची केंद्रे बंद करणे. नागपुरात एखाद्याच ठिकाणी असे केंद्र असावे. उर्वरित ग्रामीण विभागातही एखादेच केंद्र असावे. तेही चांगले अभ्यासक-अध्यापक असण्याच्या अटीवर ठेवावे.

मी विभागात होतो त्यावेळी अख्ख्या विदर्भातून विद्यार्थी विभागात येत असत. आता नागपुरातील विद्यार्थीही एम.ए.च्या अनेक केंद्रांमुळे विभागात येत नाहीत. या संपूर्ण केंद्रांवर एम.ए.ला कोण शिकवितात याची पडताळणी विद्यापीठाने घेतली आहे काय ? मी खात्रीपूर्वक सांगतो की विद्यापीठाला अशा गोष्टींची गरजच वाटत नाही. असे का होते हा प्रश्न आहे.

समृद्ध ग्रंथालये महाविद्यालयांमध्ये असावीत पण समृद्ध म्हणजे काय ? भरपूर धार्मिक आणि रंजनपर पुस्तके असणे म्हणजे ग्रंथालय समृद्ध असणे नव्हे. त्या त्या वाङ्मयप्रकारातील महत्त्वाच्या साहित्यकृती असलेले, वैचारिक, समीक्षापर साहित्य भरपूर असलेले ग्रंथालय म्हणजे समृद्ध ग्रंथालय होय. पण या समृद्ध ग्रंथालयाचा उपयोग अध्यापक करतात काय ? विद्यार्थी करतात काय ? याची शहानिशा कोणीतरी

करण्याची गरज आहे की नाही ? वास्तव असे आहे की वरिष्ठ महाविद्यालयात शिकविणारे आणि एम.ए.ला शिकविणारे बहुतेक अध्यापकही आणि विद्यार्थीही ग्रंथालयांचा उपयोग करीत नाहीत. अभ्यासक्रमात नेमलेली पुस्तकेही बहुतांश विद्यार्थ्यांना माहीत नसतात. तिथे संदर्भग्रंथांकडे कोण जाईल ! मार्गदर्शिकांवरच काम भागविणारे अध्यापक आणि विद्यार्थी सामान्यतः दिसतात. मार्गदर्शिकांवर बंदी आणता येईल काय? विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना मार्गदर्शिकांपासून वाचविता येईल काय? हे असे काही केल्याशिवाय जबाबदार अभ्याससंस्कृती निर्माण होणे शक्य नाही. मराठीच्या अध्यापन आणि अध्ययनक्षेत्रात एक अत्यंत गंभीर बौद्धिक वातावरण निर्माण होण्यासाठी याची नितांत गरज आहे.

आज अध्यापकाला अखंड अभ्यास, चिंतन आणि गंभीर लेखन करायला भाग पाडण्यापेक्षा अध्यापनबाह्य इतर कामेच खूप करावी लागतात. यातून सिलॅबस कोणत्यातरी पद्धतीने पूर्ण करणारे आणि तसा रेकॉर्ड नीट ठेवणारे लोक तयार होतील पण मराठीचे, महाराष्ट्राचे ज्ञानक्षेत्र समृद्ध करणारा प्राध्यापक निर्माण होणार नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाचे आणि विद्यापीठाचे याकडे लक्ष आहे असे मला वाटत नाही. अध्यापकांचा बुद्ध्यांक वाढतो आहे काय, त्यांचा बौद्धिक दर्जांक वाढतो आहे काय ? याकडे कोणाचे लक्ष आहे असे दिसत नाही.

विद्यापीठाने अग्रक्रमाने लक्ष द्यावे असा हा मुद्दा आहे. येण्याजाण्याच्या वेळांच्या नोंदी, काय शिकवले त्याच्या नोंदी, महाविद्यालयातर्फे निघणाऱ्या ज्ञानपत्रिकांमध्ये (Journals) आलेल्या लेखांच्या नोंदी, चर्चासत्रांना उपस्थित राहण्याच्या नोंदी, आय.एस.बी.एन. क्रमांक या सर्व बुद्ध्यांकाबाहेरच्या कर्मकांडामध्ये मराठीचे अध्यापन थिजून चालले की काय याची शंका येते. निके सत्त्व पाखडणे आणि फोले निवडणे ही कळा आज अध्यापनाला येत आहे असे वाटते.

वरिष्ठ महाविद्यालयातील अध्यापक अभ्यापनासाठी पूर्वतयारी करतात काय?, कशी करतात याचा विचार विद्यापीठाने केला आहे काय ? एखादा गद्यपाठ वा कविता शिकविण्यासाठी महत्त्वाचे संदर्भग्रंथ, संदर्भलेख पाहिले जातात काय ? कोण पाहणार ?

प्राध्यापकांकडे स्वतःची अशी ग्रंथालये आहेत काय ? त्या ग्रंथालयात कोणती पुस्तके आहेत ? ती संबंधित प्राध्यापक वाचतात काय ? वाचनाचा पुरावा काय ? हे कोण पाहणार ?

नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागात एकच प्रोफेसर का ? शिवाजी, मुंबई,

पुणे अशा विद्यापीठांमध्ये एकाहून अधिक प्रोफेसर्स आहेत. विभाग स्थापन झाल्यापासून असा प्रयत्न कोणी का केला नाही ? विभाग वाढेल, तो समृद्ध होईल ही भीती तर संबंधितांच्या मनात नव्हती आणि नाही ?

चर्चासत्रे खूप घेतली जातात. पण बहुतेक चर्चासत्रांमध्ये जीव नसतो. बहुतेक प्राध्यापक प्रमाणपत्रासाठी उद्घाटनाला उपस्थित राहतात. चर्चासत्रांना त्यामुळे अवकळा आलेली आहे. चर्चासत्रे कोणत्या विषयावर घ्यावीत या प्रश्नाचा विचार सांस्कृतिक, वाङ्मयीन, आर्थिक पर्यावरणाच्या संदर्भात करण्याची गरज आहे. मोठमोठ्या हॉटेलांमध्ये घेतल्याने, भारी खर्च केल्याने चर्चासत्र मोठे होत नाही. चर्चासत्र विषयाच्या अन्वर्थकतेमुळे आणि त्या अन्वर्थकतेला न्याय देणाऱ्या निबंधांमुळे मोठे होते. चर्चासत्राने त्या विषयासंबंधी सर्वच अध्यापकांना अभ्यासाच्या नव्या प्रेरणा पुरवायला हव्यात. अभ्यासाच्या नव्या वातावरणाची रुजवात त्या विषयामुळे आणि त्या अनुषंगाने झालेल्या विचारमंथनामुळे व्हावी. अध्यापकांच्या बौद्धिक क्षमतेने पुढल्या पायरीवर झेप घ्यावी. हे झाले नाही, जबाबदार आणि गंभीर अभ्याससंस्कृती चर्चासत्रातून निर्माण झाली नाही तर इतक्या अध्यापकांचा वेळ आणि शासनाचा पैसा पाण्यात गेला असे होईल.

आजचे जागतिक संदर्भ, आजच्या गरजा, अद्ययावततेच्या अपरिहार्यता यांचा चर्चासत्राच्या विषयांच्या निवडीत विचार होतो काय ? की धार्मिक, सामाजिक वा प्रादेशिक श्रद्धा या विषयांच्या निवडीत कार्य करतात ? हे सर्व वाङ्मयबाह्य आणि आवश्यकताबाह्य होत नाही काय ? हेच मायनर आणि मेजर प्रोजेक्टस्च्या संदर्भातही म्हणता येते. हेच अध्यापक वेगवेगळ्या महाविद्यालयांनी मिळविलेल्या जर्नलसमधून करतात त्या लेखनातूनही दिसते. या प्रोजक्टस्साठी शासनाकडून दरवर्षाला किती पैसा दिला जातो ? हे प्रोजेक्टस कशासाठी घेतले जातात, ज्ञानवृद्धीसाठी की मिळणाऱ्या लाखो रुपयांसाठी ? लाखो रुपये मिळाले नसते तर या प्रोजेक्टस्वर या लोकांनी काम केले असते काय ? शिवाय पैसा मिळाल्याने होणारे काम आणि ज्ञानासंबंधी असलेल्या उत्कट निष्ठेपोटी होणारे काम यात काही फरक संभवतो काय? मला वाटते उत्कट ज्ञाननिष्ठेविना आर्थिक फायद्यासाठी केलेली कामे वाया जातात.

प्राध्यापकांना आज उत्तम पगार मिळतो ही आनंदाची बाब आहे. पण या पगारामुळे प्राध्यापक सुस्त होऊ नये. त्यांनी अधिकच प्रखरपणे सत्यशोधक व्हावे. त्यांनी प्रस्थापित यंत्रणेचे गुलाम होऊ नये. हा बलदंड पगार त्यांची तोंडे शिवण्यासाठी सुई-दोरा ठरणार नाही याची काळजी त्यांनी घ्यावी. प्रस्थापितांची कठोर समीक्षा करीत त्यांनी स्वतःचे परिवर्तनरूप प्रखर करावे. मिळणाऱ्या या पगारात ते उत्तम जगू

शकतात आणि संशोधनाचे उत्तम कामही करू शकतात. अर्थात आतून वाटले तर! म्हणून असे आतून वाटणारे प्राध्यापक निर्माण केले जावेत. या अंतःप्रेरणा निर्माण झाल्या तर मग असंख्य लोक गरीब असलेल्या आणि अर्धपोटी वा उपाशी राहणाऱ्या लोकांच्या या देशात शासनाचा पैसा या प्राध्यापकांवर उगीचच वाया जाणार नाही.

हेच रिफ्रेशर आणि ओरिअेंटेशन कोर्सेसच्या संदर्भात म्हणता येते. हे कोर्सेस प्राध्यापकांनी अद्ययावत आणि कालसंदर्भात बहुश्रुत असावे यासाठी आहेत. विद्यार्थ्यांना अद्ययावत आणि बहुश्रुत राहायला शिकविणारा, त्यांना जीवनात निर्माण होणाऱ्या नवनव्या समस्यांवर मात करायला सक्षम करणारा प्राध्यापक स्वतः सक्षम नाही, अद्ययावतही नाही आणि बहुश्रुतही नाही ही गोष्टच या कोर्सेसच्या आयोजनामुळे सिद्ध होते. आपण अध्यापक असण्यास पात्र नाही याची प्राध्यापकांनीच दिलेली कबुली म्हणजे हे कोर्सेस होत. स्वतः सतत घडत राहिल्याशिवाय प्राध्यापकांना विद्यार्थ्यांना घडविण्याचा अधिकार कसा प्राप्त होणार ? अद्ययावत आणि बहुश्रुत असण्याचे आपले कर्तव्य प्राध्यापक बजावित नाहीत त्यामुळे देशभर या कोर्सेसवर शासनाचे दरवर्षी अगदी कोट्यवधी रुपये खर्च होतात. या कोर्सेसचे आयोजन करण्यासाठी उभाराव्या लागणाऱ्या यंत्रणांसाठी शासनाचे कोट्यवधी रुपये खर्च होतात. शिवाय हे कोर्सेस करणाऱ्या प्राध्यापकांना टी.ए.डी.ए. ही मिळतो. एकेका प्राध्यापकाला तीन-तीन कोर्सेस करावे लागतात. तरीही पुढे फार फरक पडतो असे नाही. एकूण जवळ जवळ पालथ्या घड्यावर पाणी अशी स्थिती आहे. कोट्यवधी लोक गरिबी रेषेखाली असलेल्या, अनेकांना जीव द्याव्या लागणाऱ्या, अनेकांना अर्धपोटी राहाव्या लागणाऱ्या या देशात हा प्राध्यापक आपले काम नीट करीत नाही म्हणून त्याच्यावर एवढा खर्च शासनाला करावा लागतो. ही ज्ञानाच्या, शिक्षणाच्या आणि माणुसकीच्या संदर्भातील अनैतिकता नव्हे काय ? याप्रकारे आपली नियोजित जबाबदारी नीट न पार पाडणाऱ्या या प्राध्यापकाला ऐंशी ऐंसी हजार, लाख लाख रुपये महिना पगार शासन देते. या सर्व गोष्टींचा अर्थ काय होतो? हा प्राध्यापक विद्यार्थ्यांना, समाजाला काही शिकवू शकेल या भ्रमात मात्र शासन आहे. जेव्हा या स्थितीत स्वतः प्राध्यापकानेच बदल करावा. स्वतःच अद्ययावत व्हावे. बहुश्रुत व्हावे. शासनाचा पैसा वाचवावा. प्राध्यापकांना मिळणाऱ्या वेतनाच्या तुलनेत प्राध्यापक ज्ञाननिर्मितीचे, संशोधनाचे, साहित्यनिर्मितीचे आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रखर सक्षमता निर्मितीचे केवढे तरी कार्य करतात असे समाजाने आदराने म्हणावे हे चित्र निर्माण व्हायला हवे.

आज शासन ६० व्या वर्षी निवृत्त होणाऱ्या या प्राध्यापकाला आणखी दोन वर्षे देते. म्हणजे हा प्राध्यापक आता ६२ व्या वर्षी निवृत्त होणार. साठ वर्षांपर्यंत हा

प्राध्यापक शिकवित होता. हा निष्कर्षही शासनाने काढून टाकला आणि त्यानंतरही तो प्रामाणिकपणे शिकविणारच आहे अशीही समजूत शासनाने करून घेतलेली आहे. हे सर्वच तर्कापलीकडचे आहे. सरसकट सर्वच प्राध्यापकांसंबंधी अशी स्थिती नाही. पण ज्यांच्यासंबंधी हे संभवते त्यांनी या आरोपातून मुक्त व्हावे. शिवाय साठ वर्षांवरील मुदतवाढही नाकारावी. निवृत्तीनंतर आपली ललित–वैचारिक लेखनाची आणि संशोधनाची कामे करावी.

लाखाच्या वर वेतन ज्यांचे गेले त्या प्राध्यापकांना आणखी दोन वर्षे देणे याचा अर्थ देशातल्या लाखो प्राध्यापकांना या दोन वर्षात शासन देणार तो पैसा किती असेल ? परत शिकविण्याची बोंब आहेच. मला प्राध्यापकांबद्दल काहीही म्हणावयाचे नाही. पण हे सर्व अमानुष, अतार्किक आणि अशैक्षणिक उद्योग सुरू करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लोकांची डोकी जरा तपासायला हवीत असे मात्र मला वाटते. हजारो तरुण–तरुणींना प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक ती पात्रता असूनही प्राध्यापक होता येत नाही. त्यांचे विवाह थांबून असतात. त्यांना संसार थाटता येत नाही. त्यांची घरे मोडकळीस आलेली असतात. नोकरीअभावी हे तरुण–तरुणी वैफल्याच्या आगीत जळत राहतात. शिवाय हे लोक नव्याने नियुक्त होतील तेव्हा त्यांचे वेतन कमी असेल. त्यांच्या वेतनाखातर शासनाचा जो पैसा जाईल तो साठ वर्षानंतर लाखो लोकांसाठी जाणाऱ्या वेतनाच्या पावपटच कमी–जास्त असेल. शासनाची केवढीतरी आर्थिक बचत त्यामुळे होईल. बेकारांना, गरजूंना काम दिल्याचे समाधान शासनाला लाभेल. हे नवीन प्राध्यापक प्रामाणिकपणे आणि मेहनत घेऊन शिकवितील. कारण त्यांना जीवनात उभे राह्यचे आहे ही जाणीव त्यांना असेल.

हेच पासष्ट वर्षापर्यंत मुदतवाढ मिळालेल्या प्राचार्यांच्या संदर्भातही म्हणता येते. खरे म्हणजे ६० नंतर मिळणारी दोन आणि पाच वर्षे खुद्द प्राध्यापकांनी आणि प्राचार्यांनीच नाकारायला हवी होती. असा नकार त्यांची माणुसकी आणि जबाबदार सामाजिक भान अधोरेखित करणारा ठरला असता.

संस्थाचालक प्राध्यापकांच्या, प्राचार्यांच्या नियुक्तीसाठी आज २५–३० लाख रुपये घेतात हे विद्यापीठ अनुदान आयोगाला, विद्यापीठांना अजिबातच माहीत नाही काय ? मग गुणवत्ताधारकांना नोकरी मिळण्याऐवजी अर्थधारकांना नोकऱ्या मिळतात. जवळच्या नातेवाईकांना नोकऱ्या मिळतात. अशा स्थितीत शिक्षणक्षेत्रातील दर्जाचे काय होत असेल याची विद्यापीठ अनुदान आयोगाला वा विद्यापीठांना काहीच माहिती नाही काय ? शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी गुणवत्तेला वाव मिळावा असे या यंत्रणांना वाटत नाही काय ?

प्राध्यापकांना दोन वर्षे आणि प्राचार्यांना पाच वर्षे अधिक मिळाल्याने संस्था प्राध्यापकांचे एक वर्षाचे वेतन घेणार आणि प्राचार्यांचेही असेच होणार. हे झाले नाही तर अपात्र म्हणून त्या त्या प्राध्यापकाला वा प्राचार्याला कुठले तरी कारण सांगून कमी करण्यात येईल अशी चर्चा सुरू झालेली आहे. हे सर्व संभवू शकते असे विद्यापीठ अनुदान आयोगाला वा विद्यापीठांना अजिबात माहीत नाही असे समजावे काय ?

या सर्व अनर्थांची जबाबदारी कोणाची ? या सर्व गोष्टींमागे असलेले शैक्षणिक धोरण कोणते ? कोणाच्या हिताचे ? असे प्रश्न आहेत.

एम.ए. मराठीचा पाठ्यक्रम : विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागाचा प्रमुख असताना १९५८ पासून चालू असलेली साहित्यशास्त्राची पत्रिका मी प्रथम अद्ययावत केली. मुंबई, पुणे अशा विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांच्या तुलनेत नागपूर विद्यापीठातील मराठीचा विद्यार्थी या विषयात मागे असू नये अशी हे करण्यामागची भूमिका होती. भाषाविज्ञानाची पत्रिकाही मी अद्ययावत केली. वैचारिक निबंधाची पत्रिका नव्याने अंतर्भूत केली. आपल्या आजच्या अस्तित्वाचे शिल्पकार कोण आहेत हे तरुण पिढीला कळावे; या शिल्पकारासंबंधी त्यांनी मनात कायम कृतज्ञता बाळगावी आणि पुढल्या पिढ्यांसाठी असे काही करण्याच्या प्रेरणा त्यांनी वेचाव्यात, त्यातून सर्व जगातीलच कालच्या, आजच्या आणि उद्याच्याही परिवर्तनाचा विचार त्यांनी समजावून घ्यावा हा ही पत्रिका निर्माण करण्यामागील गंभीर आणि सर्जनशील उद्देश होता. साहित्यशास्त्र म्हणजे साहित्यकृतीच्या महत्तेचे शास्त्र, तर वैचारिक निबंध म्हणजे त्या महत्तेच्या निर्मितीच्या शक्यता फुलविणारे शास्त्र ! प्रज्ञानी समाज निर्माण करण्याचे, बुद्धिवादी आणि सर्जनशील मनुष्यतेच्या निर्माणाचे शास्त्र ! या दोन्ही पत्रिका परस्परपूरक आहेत. असायलाच हव्यात. त्यासाठी साहित्यशास्त्राच्या पत्रिकेची अद्ययावतता आणि वैचारिक निबंध या पत्रिकेची निर्मिती होती. पण वैचारिक निबंधाची ही पत्रिका एम.ए.च्या एखाद्याच केंद्रावर शिकविली जाते. यामागचे प्रगतीरोधक मानसशास्त्र कोण तपासणार ?

आता तर एम.ए.च्या पाठ्यक्रमात मूलभूत पातळीवरून बदल करायची आवश्यकता निर्माण झालेली आहे. जगाच्या तंत्रज्ञानाच्या आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमधील तत्त्वज्ञानांच्या वादळांपासून कोणालाही आता दूर राहता येणे शक्य नाही. अख्ख्या जगाचेच आज बाजारीकरण आणि माणसाचे शकलीकरण झालेले आहे. माणूस आणि माणूस यांच्यातील, माणूस आणि निसर्ग यांच्यातील, माणूस आणि पर्यावरण यांच्यातील उपकारक संबंधच या युगाने पार उद्ध्वस्त करून टाकलेले

आहेत. सर्वच मानवी संबंधांना एलिनेशनचे (Alenation) ग्रहण लागलेले आहे. एकाकीपणाच्या अरिष्टात मानवी मने सापडलेली आहेत.

यावेळी शिक्षणाने स्वतःला सतत परिवर्तनशील ठेवण्याची आणि काळाच्या नवनव्या आव्हानांना पुरून उरण्याची क्षमता वृद्धिंगत करीत राहण्याची गरज आहे. त्या त्या काळातील अद्ययावत ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान हे सर्वच विषयाच्या विद्यार्थ्यांना परिचित असणे फार गरजेचे आहे. त्यामुळे प्रत्येकच विद्यार्थ्याचा बौद्धिक स्तर समग्रलक्ष्यी होण्यास मदत होईल. कला, वाणिज्य, विज्ञान अशा कोणत्याही विद्याशाखेतील विषय आणि त्यांचे अभ्यासक्रम यांचा सर्व पातळ्यांवरील ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी अनुबंध असणे आवश्यक आहे. शेवटी प्रत्येक व्यक्तीची सर्वांगीण प्रगती व्हावी, व्यक्तीव्यक्तीमधील संबंधांमध्ये आणि समाजात कार्य करणाऱ्या वेगवेगळ्या यंत्रणांमध्ये सामंजस्य, प्रज्ञानी प्रगल्भता आणि एकूण वैश्विक कल्याणाची समग्रलक्ष्यी दृष्टी निर्माण व्हावी हेच तर शिक्षणाचे ध्येय आहे. तेव्हा या दृष्टीने सर्वच विद्याशाखांमधील विद्यार्थ्यांवर मानवी हक्क आणि कर्तव्ये यांचा संक्षेपाने का होईना नेटका संस्कार करणारा भाग सर्व विषयांच्याच अभ्यासक्रमात असायला हवा. शिवाय मानवाच्या प्रज्ञा-प्रतिभांच्या आविष्काराशी आणि नवनव्याने साकार होणाऱ्या जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमधील नवलपूर्ण आविष्काराशी निर्माता म्हणून आणि ज्ञाता म्हणूनही वेगवेगळ्या क्षेत्रांमधील अध्यापकांचा आणि विद्यार्थ्यांचाही घनिष्ठ संबंध असायलाच हवा. संगणकासारख्या उपकरणांचा वापर त्यासाठी सर्वांना करता यायलाच हवा. ही सगळी प्रक्रिया मॅट्रिकआधीच व्हावी. विद्यार्थी पुढल्या काळात कोणत्याही विद्याशाखेकडे आणि त्या विद्याशाखेतील कोणत्याही विषयाकडे जावो. हे सर्व तंत्रज्ञान तो जिथे जाईल तिथे त्याला अत्यंत उपकारकच ठरणार आहे.

एम.ए. मराठीच्या आठ वा अधिकही पत्रिकांचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे असावा असे मला वाटते-

**एम.ए. भाग १**

१. साहित्यशास्त्र

२. वैचारिक निबंध आणि तत्त्वज्ञान

३. तौलनिक साहित्य, इंग्रजी

४. आधुनिक कविता

**एम.ए. भाग २**

१. भाषाविज्ञान

२. वाङ्मयेतिहास

३. विशेष ग्रंथकार

४. भाषांतर विद्या, संशोधनपद्धती, पटकथालेखन, चित्रपट संवादलेखन, प्रशासकीय मराठी लेखन. ग्रंथनिर्मितीशी संबंधित भाषिक कौशल्ये इ.

एम.ए. भाग १ च्या साहित्यशास्त्रात पूर्वआधुनिक, आधुनिक आणि उत्तरआधुनिक, आधुनिकवाद, उत्तर आधुनिकवाद या संकल्पनांमधील संबंध आणि संबंधित सर्व सिद्धान्त, संरचनावाद आणि चिन्हमीमांसा, उत्तर संरचनावाद आणि विरचनावाद, इतिहासवाद, नवइतिहासवाद, वसाहतवाद, उत्तरवसाहतवाद आणि सांस्कृतिक समीक्षा. मानसशास्त्राशी संबंधित साहित्यसिद्धान्त, वाचकवादी समीक्षासिद्धान्त, शैलीविज्ञान, स्त्रीवादी साहित्यसिद्धान्त, पर्यावरणीय साहित्यविचार, वंचितलक्ष्यी साहित्य सिद्धान्त : मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद. अपोह सिद्धान्त, साहित्य आणि भाषिकसिद्धान्त, रससिद्धान्त, पोतसिद्धान्त आणि सौंदर्यमीमांसा इत्यादी. या पत्रिकेचा अभ्यासक्रम असा अद्ययावत करता येईल. हा अभ्यासक्रम दोन पत्रिकांमध्येही सहज विभागता येईल..

२) वैचारिक निबंधात तत्त्वज्ञान म्हणजे काय ते विद्यार्थ्यांना माहीत व्हावे. तत्त्वज्ञानातील प्रमुख संकल्पनाचा परिचय व्हावा आणि एकूणच जागतिक तत्त्वज्ञानातील वैचारिक संघर्ष संक्षेपाने आणि नेटकेपणाने विद्यार्थ्यांना ज्ञात करून द्यावा. वैचारिक निबंधाने समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत कोणते कार्य केले. आपल्या आजच्या अस्तित्व-संस्थापनेत या निबंधाची कोणती भूमिका आहे आणि कल्याणकारी समाजरचनेसाठी भवितव्यात हा निबंध कसा सहायक होऊ शकतो अशा गोष्टी या पत्रिकेने विद्यार्थ्यांच्या मनात स्पष्ट कराव्यात. अंधश्रद्धा, धर्मांधता, जातीसंस्था, स्त्री-पुरुष विषमता यांचा विघातकपणा मांडत या पत्रिकेने विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन आणि सहृदयवृत्ती निर्माण करावी. तशा निबंधलेखनाच्या आणि परिवर्तनाच्या प्रेरणा जागवाव्यात. याही पत्रिकेच्या दोन पत्रिका करता येतील.

३) तिसऱ्या पत्रिकेचा आवाका वैश्विक आहे. जगातील निवडक उत्तमोत्तम साहित्यकृतींशी या तुलनेद्वारे विद्यार्थ्यांचा परिचय व्हावा. त्यासाठी त्यांना इंग्रजी भाषा चांगली अवगत व्हावी. म्हणजे इंग्रजी भाषा त्यांना वाचता यावी, तिच्यातले आणि तिच्यात अनुवादित झालेले साहित्य समजावून घेता यावे. त्यांच्यात गुणदृष्ट्या तुलना करता यावी. असे झाले तर प्रगल्भ वाङ्मयीन मने तयार होतील. विद्यार्थ्यांच्या वैश्विक मनाची निर्मिती या प्रक्रियेतून होईल आणि त्यासाठी इंग्रजी भाषा येणे

आवश्यक आहे. इंग्रजी भाषा वाचता, समजावून घेता, बोलता आणि लिहिता येणे अनिवार्य आहे. असे एक वातावरण शिक्षणक्षेत्रात तयार झाले तर विद्यालयीन जीवनापासूनच शिक्षक विद्यार्थ्यांची त्यादृष्टीने निर्मिती करतील. तशी शैक्षणिक मांडणी असावी. ही पत्रिकाही दोन पत्रिकांमध्ये वाटता येईल.

४) आधुनिक कवितेच्या या पत्रिकेत उत्कटपणे सर्जनशील असलेल्या एका साहित्यप्रकाराचा अभ्यास अभिप्रेत आहे. साताठ कवींची पुस्तके नेमावीत आणि ती वैचारिक निबंधाच्या भूमिकेला पूरक असावीत. साहित्यशास्त्रातील काही नव्या सिद्धान्तानुसार अभ्यासक्रमातील काही कविता, काही कवितासंग्रह वा काही कवी, एक प्रवाह, एक प्रवृत्ती यांचा अभ्यास केला जावा. उदा. विरचनावाद, चिन्हमीमांसा, उत्तर संरचरनावाद, शैलीविज्ञान, मार्क्सवाद, आंबेडकरवाद हे वंचितलक्ष्यी, समग्रलक्ष्यी साहित्यसिद्धान्त इत्यादी. या पत्रिकेच्याही दोन पत्रिका करता येतील.

एम.ए. भाग २ च्या भाषाविज्ञान या पत्रिकेत पाश्चात्त्य जगातील आणि आपल्याकडील सर्व भाषासिद्धान्त विद्यार्थ्यांना शिकविले जावेत. साहित्यशास्त्रातील त्या त्या सिद्धान्ताशी या सिद्धान्तांचा संबंध कसा आहे त्याचा अभ्यास व्हावा.

२) ही पत्रिका वाङ्मयेतिहासाची असावी. या पत्रिकेत १३ व्या शतकापासून २०१० पर्यंतचा कालखंड अभ्यासाचा विषय व्हावा. या पत्रिकेत प्रत्येक ग्रंथकार, त्यांची प्रत्येक कृती अभ्यासाचा विषय होऊ नये. ते शक्यही नाही आणि त्याची गरजही नाही. बदलत्या परिस्थितीनुसार मराठी साहित्यात कसे बदल झाले, त्यात वेगवेगळ्या प्रवृत्ती कशा आल्या ? प्रवाह कसे आले ? आशय आणि अभिव्यक्तीमधील स्थित्यंतरे कशी आली ? असा सांस्कृतिक आणि वाङ्मयीन स्थित्यंतरांचा आलेख विद्यार्थ्यांना या पत्रिकेतून मिळावा. वेळ आणि गरज यानुसार ही पत्रिकासुद्धा दोन पत्रिकांमध्ये विभागता येईल.

३) विशेष ग्रंथकार आधुनिक काळातीलच असावा. तो बदलत्या सांस्कृतिक स्थित्यंतराशी संबंधित असावा. हा एक नमुनाअभ्यास व्हावा. म्हणजे या पत्रिकेत एका लेखकाचा नमुनाअभ्यास, आधुनिक कविता या पत्रिकेत एका साहित्यप्रकाराचा नमुनाअभ्यास आणि वाङ्मयेतिहासाच्या पत्रिकेत बदलत्या सांस्कृतिक आणि संलग्न वाङ्मयीन प्रवृत्तींचा-स्थित्यंतरांचा अभ्यास असा तीन पातळ्यांवरून मराठी साहित्याचा संपूर्ण अवकाश विद्यार्थ्यांच्या मनात तयार होईल आणि या तिन्ही पातळ्यांवरून, शिवाय सांस्कृतिक आणि वाङ्मयीन या दोन्ही पातळ्यांवरून मराठी साहित्याचे यथायोग्य आकलन करण्याची क्षमता साहित्यशास्त्र आणि वैचारिक निबंध

या दोन पत्रिका करतील. एक पत्रिका विद्यार्थ्यांना श्रेष्ठतम जीवनमूल्ये शिकविल. दुसरी श्रेष्ठतम वाङ्मयीन मूल्ये शिकविल. या विविध मूल्यांमधील संघर्षाची मीमांसा शिकविल.

इथे साहित्याच्या अभ्यासाचे वर्तुळ पूर्ण झाले. आता रोजगाराभिमुखही असे काही विद्यार्थ्यांना देता यायला हवे. अनेक विद्यार्थ्यांना त्याची गरज असते. म्हणून एम.ए. भाग २ ची ही शेवटची पत्रिका पुढीलप्रमाणे आपल्याला तयार करता येईल. भाग १ च्या अभ्यासात इंग्रजीवर त्याने हुकूमत मिळविली आहेच. तिचा इथे त्याला उपयोग होईल. भाषांतराचा प्रचंड उद्योग देशात आणि जगात सुरू आहे. जगातल्या इतरही भाषांमधील महत्त्वाचे ज्ञान, तत्त्वज्ञान, संशोधन आणि साहित्यकृती इंग्रजीत उपलब्ध होतात. म्हणजेच जगातील श्रेष्ठ ज्ञानाच्या, विज्ञानाच्या, संशोधनाच्या वा साहित्यकृतींच्या अनुवादाचे मोठे काम या विद्यार्थ्याला करता येण्याची शक्यता आहे. संशोधनपद्धतीचा नेटका पाठही त्याला इथेच द्यावा. पटकथालेखन, संवादलेखन यांना चित्रपट आणि दूरदर्शनवरील निरनिराळ्या मालिकांमुळे खूपच महत्त्व आलेले आहे. पुढे हे महत्त्व आणखी वाढण्याची शक्यता आहे. तेव्हा मराठीत एम.ए. करणारांना याही क्षेत्रात रोजगार उपलब्ध होण्याचा मोठा अवकाश आहे. प्रशासनातही आणि ग्रंथनिर्मिती व्यवसायातही हे विद्यार्थी रोजगार मिळवू शकतात. वरील सर्वच अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक ते (प्रत्येक पत्रिकेसाठी किमान एक) गृहपाठ तयार करावेत. शिवाय मासिक चाचण्यांचे आयोजन व्हावे. अर्थात वरील निश्चित ध्येय-धोरणानुसार तपशिलासंबंधी पुनर्विचार करता येईल.

मराठीच्या विद्यार्थ्याने आता सर्वांगीण व्हायला हवे. त्याची उठबस जागतिक संदर्भातच व्हायला हवी. तो जगातील सर्वच नवनव्या उलाढालींच्या सतत संपर्कात असायला हवा. कालचा शिक्षक आणि शिक्षणही कालबाह्य झालेले आहे तेव्हा अध्यापकाने आणि शिक्षणाने सतत केवळ कालसंगत नव्हे तर काळाच्या पुढेही असले पाहिजे. यासाठी विद्यार्थ्यांनी आणि अध्यापकांनी सतत घडतच राहायला हवे. ज्याने अपूर्ण असण्याचा निर्णय घेतलेला असतो तोच स्वतःला पूर्ण ठरवतो. मराठी या विषयाशीच नव्हे तर कोणत्याही विषयाशी संबंधित विद्यार्थ्याने वा अध्यापकाने स्वतःला पूर्ण समजण्याचा अप्रगल्भपणा करू नये. पूर्णत्वाचे चारित्र्यच असे असते की ते सतत पुढे असते. कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात ते भूतकाळ तर होतच नाही पण ते वर्तमानही होत नाही.

आता हा सर्व नवा अभ्यासक्रम शिकविणे अध्यापक मान्य करतील काय ? आज बहुतांश अध्यापकांनी मेहनत घेण्याच्या वृत्तीशी फारकत घेतलेली आहे. पदवी

पातळीवरही अभ्यासक्रम बदलणे अध्यापकांना आवडत नाही. कारण नव्याने अभ्यास करायची गरज असते. काही वर्षांपूर्वी कुसुमावती देशपांडे यांचे 'पासंग' हे समीक्षेचे पुस्तक आम्ही पदवीच्या अभ्यासक्रमात लावले होते. अध्यापकांनी विद्यार्थ्यांना कळत नाही असे म्हणत ते पुस्तक काढायला लावले. अध्यापकांच्या या वृत्तीचे मानसशास्त्रीय विश्लेषण व्हायला हवे. त्यातून अशैक्षणिक आणि असभ्य निष्कर्ष बाहेर येतो. असे सगळे विचित्र आणि साकल्याने वाईट आहे.

पण अध्यापकांना आता नव्या आव्हानांना सामोरे जावेच लागेल. त्यांनी कोणतीही कारणे पुढे करणे, कोणतीही पळवाट काढणे यापुढे विद्यार्थ्यांचे नुकसान करणारे ठरेल.

प्रामाणिक असणे, अखंड अभ्यास-चिंतन-लेखन करणे आणि पूर्णतः अद्ययावत असणे या गोष्टी अध्यापकाला कोणी सांगण्याची गरज असेल तर अध्यापक स्वतःच आपल्या अध्यापकपणाचा अवमान करतो आहे; आपल्या अध्यापकपणाशी फारकत घेतो आहे असे म्हणावे लागेल. प्राध्यापकांनी स्वयंस्फूर्तीने संशोधन करावे. मोठमोठे प्रकल्प घ्यावेत आणि सतत काम करीत राहावे. ज्याला काम करायचे असते तो युजीसीच्या अनुदानाची वाट पाहत नाही आणि युजीसीने प्राध्यापकांना प्रोजेक्टस्च्या नावाने कितीही पैसा वाटला तरी संशोधनाचा दर्जा सुधारणे शक्य नाही. तेव्हा प्राध्यापकांच्या मनात आतून उत्कटपणे जिज्ञासा निर्माण होण्यासाठी काय करायला हवे याचा विचार व्हायला हवा. संशोधन, अभ्यास आणि लेखन हा प्राध्यापकांचा स्थायी स्वभाव व्हायला हवा. हे झाले तर युजीसीच्या अनुदानाच्या कुबड्यांची गरज नाही आणि हा स्थायी स्वभाव प्राध्यापकाचा होऊ शकला नाही तर युजीसीच्या लक्षावधी रुपयांच्या अनुदानाचा उपयोग नाही. आता पालथ्या घड्यावर पाणी ओतणे सुरू आहे. या प्रक्रियेनुसार पाणी वाया जाणे अपरिहार्यच आहे.

प्रामाणिक संशोधन, अभ्यास आणि लेखन हा प्राध्यापकांचा स्वभाव होत नाही तोवर गडगंज पगार देऊनही उपयोग नाही. त्यांना महाविद्यालयाच्या वा विद्यापीठाच्या परिसरात सात-सात तास थांबवूनही उपयोग नाही. जाण्या-येण्याच्या वेळी त्यांच्या सह्या घेऊनही उपयोग नाही. मनातच नसेल तर या सर्व गोष्टींच्या पोहऱ्यात काय, कसे आणि कुठून येणार ? प्राध्यापकांच्या मनात जर ज्ञानाची उत्कट जिज्ञासा नसेल तर वरील सर्व गोष्टी निरर्थक, निष्फळ कर्मकांडात जमा होणे टळणार नाही.

माझ्या अनेक प्राध्यापक विद्यार्थ्यांना आधीच्या घरात वा बांधणार आहात त्या नव्या घरात केवळ पुस्तकांसाठी एक खोली तयार करा हे मी सांगतो. तिथे

टेबल, खुर्ची, तुमची लेखनाची सामग्रीही ठेवा. अध्यापनाचा काळ, झोपण्याचा काळ आणि इतर आवश्यक कामासाठी जाणाऱ्या किरकोळ कळाची बेरीज करा आणि उरलेला सर्व काळ अभ्यास, चिंतन आणि लेखनाला द्या. महाविद्यालयात जितके तास तुम्ही थांबता तितके सर्व तास तुम्ही अध्यापन करीत नाही. अध्यापनाव्यतिरिक्त जो वेळ मिळेल त्या वेळेत तुम्ही कुठेही जाऊ नका, रिकामे बसू नका. अध्यापनाव्यतिरिक्तचा प्राध्यापकांना सर्व वेळ ग्रंथालयातच जावा. तिथे आपल्या विषयातील नवीन काय आले ते पाहावे, वाचावे. शिवाय लिहायला घेतलेल्या पुस्तकाच्या संदर्भात, वा लिहायला घेतलेल्या लेखाच्या संदर्भात अभ्यास करावा. टिपणे घ्यावीत. लेखन करावे. महाविद्यालयातील अध्यापनविरहीत काळात प्राध्यापकाने अभ्यासातच रमायला हवे. याप्रकारे महाविद्यालयातील दोन-तीन तास, घरी गेल्यानंतर रात्री अकरा-साडेअकरापर्यंत आठ-नऊ तास असा दररोज अकरा-बारा तास अभ्यास व्हायलाच हवा. यापेक्षा जास्त झाला तर उत्तमच पण कमी तर अजिबात होऊ नये.

आणि घरातील आपल्या ग्रंथालयात प्लस अभ्यासिकेत घरातील कोणालाही प्रवेश देऊ नये. या खोलीत प्राध्यापकाने दार बंद करून बसावे आणि आपल्या बुद्धीला ज्ञानाची सर्व दारे उघडी करून द्यावी. दूरदर्शनवर फक्त १५ मिनिटे बातम्या बघाव्यात. एखादी महत्त्वाची चर्चा कधीमधी पाहावी. एखादी गंभीर आर्ट फिल्म एखादेवेळी पाहावी. यासाठी आठवड्यातून पाच-सात तासांच्या वर वेळ जाऊ देऊ नये.

दोन-तीन वर्तमानपत्रे तरी प्राध्यापकांनी घ्यावीत. वर्तमानपत्रे पहिल्या शब्दापासून शेवटच्या शब्दापर्यंत चाटून-पुसून वाचण्याची गरज नाही. शीर्षकांवरून नजर फिरवावी. एखादी महत्त्वाची बातमी वाचावी. महत्त्वाचा आणि आपल्या विषयाशी संबंधित वाटल्यास अग्रलेख आणि त्या पानावरील वा शेजारच्या पानावरील एखादा लेख अधुनमधून वाचावा. राशीभविष्याचा अभ्यास प्राध्यापकांनी करू नये. अशाच इतरही गोष्टीमध्ये प्राध्यापकांनी रस घेऊ नये.

तेव्हा आता गरज आहे जुन्या व्याख्या बदलण्याची. नव्या प्रगमनशील व्याख्या निर्माण करण्याची आता गरज आहे. आता पाठ्यक्रमाची व्याख्या बदला. आता शिक्षणाची आणि अध्यापनाचीही व्याख्या बदला. विद्यार्थ्यांची व्याख्या बदला. स्वप्नाची व्याख्या बदला. प्रवासाची दिशा बदला. वाटेपुढले क्षितिज बदला. आपण बदललो की काळ बदलतो. काळ बदलण्यासाठी आधी स्वत:ची डोकी बदला. डोळ्यांवर पट्ट्या बांधू नका. गांधारी पुनरुक्त करू नका. डोळे बदलता येत नाहीत

तेव्हा त्यातील नजर बदला. नजरेतील स्वप्न बदला. स्वप्न बदलले की भवितव्य बदलते. 'हम है नये अंदाज क्यूं हो पुराना' हे ऐकायला ठीक आहे पण आपले अंदाज, विचार करण्याची आपली पद्धती या गोष्टी जुन्या का असतात? आपल्या समजुती, आपल्या भावना, आपले विचार जुने का असतात ? या सर्वच गोष्टी आपण जुने असतो म्हणून जुन्या असतात. नवे अंदाज, नवी स्वप्ने, नवी ध्येये, नव्या समजुती, नवी जीवनशैली या सर्वच गोष्टी आकाशातून पडत नाहीत. आपण नवे होतो कारण आपल्या झाडाला नव्या अंदाजांची पालवी आलेली असते. माणूस नवा होतो, कारण त्याच्या नवे होण्याला नव्या अंदाजांचा मोहोर आलेला असतो. म्हणून ज्यांचे अंदाज जुने असतात ते नवे ठरूच शकत नाहीत आणि जे नवे होतात त्यांचे अंदाज जुने राहूच शकत नाहीत. असे नसेल तर 'बोले तैसा चाले'ला काय अर्थ आहे ? आम्ही नवे आहोत पण आमचे अंदाज जुने आहेत. या अंतर्विरोधानेच तर आमच्या चारित्र्याची एकसंधता नष्ट करून टाकली आहे.

तेव्हा आज-उद्याच्या वेगवान युगात विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांनाही सतत घडत राहण्याचे, नवे होत राहण्याचे, अन्वर्थक ठरत राहण्याचे शिक्षण हीच आजची गरज आहे.

नागपूर :
दि. १ फेब्रुवारी २०१२

■■

# मार्क्सवादी साहित्यिक वामन इंगळे

प्रा. देविदास कठाणे, प्रा. वीरेंद्र इंगळे आणि काटोलमधील त्यांचे इतरही सर्व सहकारी यांना मी मनापासून धन्यवाद देतो याचे कारण वामन इंगळे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा परिचय घडविणारा गौरव विशेषांक ते प्रकाशित करीत आहेत. या सर्व मित्रांच्या हातून एक मोलाचे वाङ्मयीन कार्य घडत आहे त्याबद्दलही मी मनःपूर्वक धन्यवाद द्यायलाच हवेत. आणखी एका कारणासाठी मी त्यांना धन्यवाद देतो. ते कारण हे की त्यांनी संपादित केलेल्या या गौरव विशेषांकासाठी मी प्रस्तावना लिहावी अशी विनंत त्यांनी मला केली. मी असे मानतो की त्यांनी हा माझा बहुमानच केला आहे. त्यांनी केलेल्या या बहुमानाबद्दलही मी या मित्रांना मनापासून धन्यवाद देतो.

: एक :

एकूणच मराठी साहित्याला झगमगते काही योगदान देणारे जे चार-दोन साहित्यिक काटोलच्या परिसरात आहेत त्यात वामन इंगळे हे एक अत्यंत महत्त्वाचे नाव आहे. व्यक्तीचे मोठेपण ठरविण्याच्या, व्यक्तीचा गौरव करण्याच्या काही सर्वसामान्य पण गैरपद्धती पुढीलप्रमाणे आहेत. एखादी व्यक्ती आपल्या जातीची आहे म्हणून त्या व्यक्तीला मोठे ठरविण्याचा मोह अनेकांना होणे स्वाभाविक असले तरी गैर आहे. एखादी व्यक्ती आपल्या गावातली वा गावाच्या परिसरातील असल्यामुळेही एक स्वाभाविक हळवेपण निर्माण होते आणि हे हळवेपण व्यक्तीचा गौरव करते हेही स्वाभाविकच असले तरी गैर होय असे आपण मानले पाहिजे. आणखी एका कारणामुळे अनेक माणसे साहित्यिकांचा गैरगौरव करीत असतात. विचारसाम्य हे ते कारण असते. पण साहित्याच्या क्षेत्रात विचारसाम्यामुळे साहित्यिकांना मोठे ठरवून टाकणे हीसुद्धा वाङ्मयातील अंधश्रद्धाच असते. मार्क्सवाद वा आंबेडकरवाद मानणारे सर्वच साहित्यिक श्रेष्ठच असतात असा नियम बांधणे योग्य नव्हे. यातले काही साहित्यिक उत्तम असतात. काही चांगले असतात तर काही अत्यंत सामान्य असतात. पण याही पद्धतीने म्हणजे केवळ विचारसाम्य या कारणामुळेही साहित्यिकाला मोठे ठरविण्याचा प्रयत्न होतच नाही असे नाही. इतर अनेकांना वरील कारणांमुळे वामन इंगळेंचा गौरव करण्याचा मोह होणे शक्य आहे. त्याबद्दल माझी तशी कोणती तक्रारही नाही, पण मला स्वतःला वरील कोणत्याही

दृष्टीने वामन इंगळेंचा गौरव करणे उचित वाटत नाही. मी अशा कोणत्याही चौकटीत उभे राहून इंगळेंकडे पाहण्याचे टाळतो आहे.

मी काटोलजवळच्या येरल्याचा आहे. काटोलला माझे पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण झाले. इंगळेंच्या घरी मी खूपदा गेलो. त्यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या घरी जेवलो. त्यांच्यासंबंधीच्या भल्याबुऱ्या काही आठवणी माझ्याही खात्यावर जमा आहेत. पण मी हे सर्व इथे सांगणार नाही. या विशेषांकात वामन इंगळेंच्या मित्रांनी अशा खूप आठवणी सांगितल्या आहेत. इंगळेंचा स्वभाव, त्यांच्या सवयी, त्यांची अलीकडे कोसळलेली प्रकृती, त्यांच्या या काळातील वागण्या-बोलण्यासंबंधीचे बरेवाईट अनुभव अशा खूप गोष्टी अनेकांनी इथे लिहिल्या आहेत. या सर्व आठवणींमधून वामन इंगळे यांच्या आयुष्याचे भलेबुरे वास्तव वाचकांच्या लक्षात येईल. मी स्वतः अशा प्रकारच्या आठवणी सांगणार नाही. 'माणूस' वामन इंगळेंबद्दल बोलणे हा मुद्दा वेगळा आहे. साहित्यिक वामन इंगळेंबद्दल बोलणे हा मुद्दा वेगळा आहे. आपण त्यांच्यासंबंधी गौरव विशेषांक प्रकाशित करीत आहोत. त्याचे कारण ते साहित्यिक आहेत हे आहे. वामन इंगळे हे साहित्यिक नसते तर त्यांच्यासंबंधी असा गौरवांक काढण्याचे कष्टही घेण्याची गरजही आपणाला वाटली नसती.

: दोन :

वामन इंगळे यांची एकूण नऊ पुस्तके १९६४ नंतरच्या काळात प्रकाशित झाली आहेत. या पुस्तकांची वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येईल.

अ) कादंबऱ्या :

१. काळा समुद्र : जानेवारी १९६४, मॅजेस्टिक पुणे

२. अजून येतो वास फुलांना (प्रकाशन वर्ष नमूद नाही), नागपूर प्रकाशन, नागपूर

आ) कवितासंग्रह :

१. सूर्यसप्तक : १-६-१९७३, सुनंदा पब्लिकेशन, काटोल

इ) कथासंग्रह :

१. कवचकुंडले : मे १९७३, रविराज प्रकाशन, पुणे

२. मायबाप : (प्रकाशन वर्ष नमूद नाही), साधना, पुणे

३. चणे लोखंडाचे : मे १९७५, सरस्वती प्रकाशन, काटोल

ई) साहित्य-संगीत समीक्षा :

१. शब्द आणि सूर : नागपूर प्रकाशन, नागपूर (प्रकाशन वर्ष नमूद नाही)

२. कानसेनाची तान : नागपूर प्रकाशन, नागपूर (प्रकाशन वर्ष नमूद नाही)

३) साहित्यप्रवाह चिंतन :

१. दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य : मार्च १९७५, कालचक्र प्रकाशन, औरंगाबाद

या नऊ पुस्तकांशिवाय 'व्यक्ती आणि समष्टी' या समाजचिंतनपर पुस्तकाची आगामी म्हणून 'सूर्यसप्तक' या कवितासंग्रहात जाहिरात आली आहे. पण हे पुस्तक प्रकाशित झाल्याचे माझ्या पाहण्यात वा ऐकिवात नाही. शिवाय त्यांनी ''१९५५ ते १९७३ या कालखंडात मी दीडेकशे कविता लिहिल्यात. या संग्रहात त्यापैकी साठेक कविता अंतर्भूत केल्या आहेत.'' असे 'सूर्यसप्तक' या कवितासंग्रहाच्या 'माझे दोन शब्द' या निवेदनात लिहिलेले आहे. याचा अर्थ असा की १९७३ पूर्वीच्या त्यांच्या नव्वद कविता आणि त्यानंतर आलेल्या काही कविता अजून पुस्तकरूपाने प्रकाशित व्हावयाच्या आहेत. त्यांचे 'व्यक्ती आणि समष्टी' हे पुस्तकही अप्रकाशित स्वरूपाचे आहे. अर्थात या व्यतिरिक्तही त्यांचे काही लेखन पुस्तकरूपाने प्रकाशित व्हायचे राहून गेले आहे. त्यात काही समीक्षापर वा ललितलेख असण्याची शक्यता आहे. काही कथाही असण्याची शक्यता आहे. अशा त्यांच्या सर्व लेखनाचा शोध घेऊन ते पुस्तकरूपात प्रकाशित होण्याची गरज आहे.

एक छोटासा मुद्दा : वामन इंगळे यांची एकूण नऊ पुस्तके प्रकाशित झाली. त्यातील चार पुस्तकांवर म्हणजे जवळजवळ अर्ध्या पुस्तकांवर प्रकाशनाची तारीख आणि वर्ष नाही. वामन इंगळेंच्या प्रकाशकांनी अभ्यासकांची याप्रकारे चांगलीच गैरसोय करून ठेवलेली आहे.

वामन इंगळे यांनी १९५५ पासून कवितालेखनाला प्रारंभ केला हे प्रथम लक्षात घ्यायला हवे. १९६४ साली त्यांची 'काळा समुद्र' ही एका स्फोटक विषयावरची कादंबरी प्रकाशित झाली आणि १९७५-७६ च्या आगेमागे त्यांच्या पुस्तकांचे प्रकाशन जवळजवळ थांबले असे दिसते. त्यांचे काही स्फूट लेख-कविता यासारखे लेखनही १९८५ नंतर बंदच झाले असे दिसते. त्यांची प्रकृती उलटे फासे टाकते आणि १९८५ पर्यंत कमीअधिक प्रकाशाच्या झोतात असलेले वामन इंगळे स्वतःच जणू पुढे स्वतःला त्या प्रकाशापासून दूर घेऊन जातात. स्वतःच त्यानंतरच्या उण्याअधिक पाव शतकातील सर्वच सांस्कृतिक आणि वाङ्मयीन घडामोडींशी फारकत घेतात. पण तोपर्यंत किंवा त्यानंतरही मोठ्या आणि जाणकार मराठी समीक्षकांनी वामन इंगळे यांच्या साहित्याची समीक्षा केल्याचे दिसत नाही.

काटोलच्या परिसरातीलच मराठी नवकथेचे एक अग्रदूत कथाकार वामनराव चोरघडे त्यांची कथा गांधीवादी आणि ग्रामीण जीवनातील पात्रे आणि प्रसंग चितारणारी आहे. वामन इंगळ्यांच्या कथनपर वाङ्मयामागे मात्र मार्क्सची जीवनदृष्टी आहे आणि ग्रामीण जीवनातील चोरघड्यांच्या कथेत येऊ शकली नाही ती आणखी अधिकच उपेक्षित स्तरातील माणसे इंगळेंनी मराठी कथेत आणली. अर्थात वामन इंगळेंची प्रतिभा पोचली त्यापुढेही आणखी अतिउपेक्षित जीवन होतेच. तेही जीवन त्यांना साद घालीत होते. पण पुढे त्यांची निर्मितीच मुकी झाली.

: तीन :

वामन इंगळे यांच्या कथानकप्रधान लेखनाची आणि ललित निबंधांची शैली मात्र मोठी ठसकेदार आहे. काटोलच्या परिसरातील बोलीभाषेचे सर्व जिवंत वेल्हाळ अत्यंत नजाकतदार पद्धतीने इंगळेंच्या लेखनातून साकार झाले आहे. वामन इंगळेंच्या बोलण्यातही एक रेखीव बाज होता. सूत्ररूप बोलण्याकडे त्यांचा कल असायचा. त्यांचे बोलणे चर्चेतले असो वा भाषण करतानाचे असो. त्यात एक ठेका असायचा. या बाबतीत मला मधुकर केच्यांशी त्यांचे मोठे साम्य जाणवते. पण केच्यांसारख्या अनेक मित्रांच्या सहवासात राहूनही त्या सर्वांपेक्षा त्यांनी स्वतःचे एक वेगळे व्यक्तिमत्त्व घडवले. या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत अर्थातच मार्क्सवादाचा मुख्य वाटा होता. आपल्या इतर आस्तिक मित्रांपेक्षा इंगळे त्यांच्या कवितेतूनही वेगळे उठून दिसतात. त्याचे कारण मार्क्सवाद होय यात शंका नाही.

तरी आज मी एक खंत बोलून दाखविलीच पाहिजे. 'सूर्यसप्तक'मधील कविता वामनरावांनी खूप पुढे का नेली नाही ? 'सूर्यसप्तक'मध्ये काही महत्त्वाची दिशा होती. वामन इंगळेंच्या व्यक्तिमत्त्वाच्या काही पृथक खाणाखुणा त्यात होत्या. त्यांचे पुढे रेखीव शिल्प होऊ शकले असते पण इंगळे स्वतःच थांबले. स्वतःवर अन्याय करीत थांबले. सूर्यसप्तकमध्ये उमटलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विशेषांना त्यांनी, त्यांचा पाठपुरावा करीत ताकदीने ज्वलंत करायला हवे होते. ते झाले नाही. पण कधी असेही वाटते की त्यांचे कथालेखन, कादंबरीलेखन आणि संगीतविषयक लेखन त्यांची खूप ताकद शोषून घेत होते. त्यामुळे त्यांचे कवितेकडे दुर्लक्ष झाले असावे. अर्थात असा अंदाज फक्त आपल्याला करता येतो. शेळके 'धग'मुळे, मनोहर तल्हार 'माणूस'मुळे तसे वामन इंगळे 'अजून येतो वास फुलांना'मुळे विख्यात व्हायला हरकत नव्हती. पण या कादंबरीकडे कोणाचे फारसे लक्ष गेल्याचे दिसत नाही. The End of Ideology या उत्तर आधुनिकतेच्या विघातक पालुपदाविरोधी भूमिकेचा, मानवी मूल्यांच्या चिरंतनतत्त्वावरील निष्ठेचा आविष्कार वामन इंगळे या

कादंबरीतून करीत होते. एक मोठी कादंबरीप्रतिभा वामन इंगळ्यांमध्ये होती हे या कादंबरीवरून लक्षात येते आणि त्यांच्यातली कथाप्रतिभाही मोठ्या आवाक्याची आहे. त्यांच्या कथाप्रतिभेचे मोल मांडले गेले पाहिजे. वामन इंगळ्यांच्या प्रतिभेतील शक्तीस्थळे जशी आज मांडून दाखविण्याची गरज आहे तशा तिच्यातील मर्यादाही मांडून दाखविण्याची गरज आहे. प्रतिभेमध्ये खूप मोठ्या शक्यता असलेला हा लेखक होता. त्याने घेतली त्याहीपेक्षा मोठी उड्डाणे घेण्याची कुवत त्याच्यामध्ये निश्चितपणे होती. ही उड्डाणे त्याच्या बलदंड पंखात होती, पण ती त्यानेच घ्यायचे का टाळले ? याही प्रश्नाचा विचार होण्याची गरज आहे.

वामन इंगळे यांची वरील सर्वच पुस्तके अगदी वरवरही चाळली आणि त्या त्या वाङ्मयप्रकारांमधील पुस्तकसंख्या पाहिली तरी कथनपर वाङ्मय ही इंगळे यांची विशेष प्रकृती होती असा निष्कर्ष आपल्याला काढता येईल. कारण तीन कथासंग्रह आणि दोन कादंबऱ्या या कथनपर वाङ्मयाने त्यांच्या लेखनाचा अर्धा भाग व्यापलेला आहे ही बाब आपल्या लक्षात आल्याशिवाय राहात नाही. तेव्हा कथनपर लेखन हा त्यांचा प्रधान कल आहे हे उघडच आहे. 'शब्द आणि सूर', 'कानसेनाची तान' या दोन पुस्तकांमधून त्यांनी थोडे साहित्यविषयक आणि मोठ्या प्रमाणात संगीतविषयक लेखन अत्यंत दर्दी अंतःकरणाने केलेले आहे. त्यांच्या संगीतविषयक लेखनाचा बाज आणि त्यातील काळीजकळा बघितल्या तर वामन इंगळेंचे पहिले प्रेम संगीत होते हे म्हणणे भाग पडते. वामन इंगळे यांचे हे संगीतविषयक ललित लेखन वाचले तर त्यातून आपल्या अनुभवात शिरतात ती अत्यंत सौंदर्यमान गद्य तालचित्रे ! इंगळे यांनी विंदा करंदीकरांची तालचित्रे मान मोडून अभ्यासली आहेत आणि पु.ल. देशपांडे यांचे संगीतविषयक ललितलेखन त्यांनी जीव ओतून वाचले आहे हेही आपल्या लक्षात येते. वामन इंगळे पराकोटीचे संगीतमय झाले होते. हे संगीतप्रेम त्यांना एखाद्या मस्त जमलेल्या दीपरागासारखे प्रकाशित करीत होते. हे संगीत खूप काळ इंगळ्यांना सतारीसारखे छेडत आणि खुलवत राहिले.

वामन इंगळे नावाचे एक अनेक फांद्यांचे झाड कथांच्या, कादंबऱ्यांच्या, संगीतविषयक ललितलेखांच्या आणि व्यक्तीचित्रणपर लेखांच्या फुलांनी मोहोरत होते. त्या झाडाचा बुंधा मात्र एका मजबूत विचाराचा होता आणि हा विचार होता मार्क्सचा ! वामन इंगळे मार्क्सवादी होते. ते त्यांनी जाहीरपणे सांगितले. काही वर्षांपूर्वी त्यांची काही पत्रे मला 'वामन मार्क्स' या नावाने आलेली आहेत. स्वतःचे असे नाव त्यांनी कदाचित मनाच्या एका हरवलेल्या अवस्थेत लिहिले असले तरी या विचित्रपणातील 'चित्र'ही मला त्यावेळी दिसले आहे आणि आजही दिसत आहे.

: चार :

वामन इंगळे मार्क्सवादी होते आणि मॉरिस कॉलेजमध्ये प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या कार्यशाळेत ते मार्क्सवाद शिकले हे खरे आहे. मुक्तिबोधांची कविता, कादंबऱ्या आणि समीक्षा, विंदा करंदीकरांची कविता, ललित निबंध आणि समीक्षा हे वामन इंगळे यांचे वाङ्मयीन विद्यापीठ होते. वामन इंगळे यांच्या वाङ्मयीन आणि वैचारिक व्यक्तिमत्त्वाची जडणघडण या लाल विद्यापीठात झाली होती. ही बाब त्यांचे वैचारिक व्यक्तिमत्त्व समजावून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे.

पण एक बाब गंभीरपणे लक्षात घ्यायला हवी ती ही की दि.के. बेडेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध आणि करंदीकर हे तिघेही आयुष्याच्या उत्तरार्धात मार्क्सवादाच्या गाभ्यापासून दूर गेलेले आहेत. पायाभूत मार्क्सवादी मूल्यांच्या शत्रूमूल्यांशी म्हणजे क्रांतीविरोधी मूल्यांशी त्यांनी जवळीक साधली आहे. वामन इंगळेच 'दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य' या पुस्तिकेत पृ. ३० वर म्हणतात – ''शरच्चंद्र मुक्तिबोधांची एक गोष्ट सोडून दिली तर दि.के. सारखा ज्वलज्जहाल बुद्धिवंतसुद्धा पुन्हा जुन्याच आदर्शवादाकडे प्रवास करताना आपण पाहिला आहे.'' ही कथा बेडकरांची असली तरी मुक्तिबोधांनाही याबाबतीत सोडून देता येत नाही. मुक्तिबोधासंबंधी त्यांच्या जीवनसाथी सुरेखा मुक्तिबोध यांनीच (समुचित, एमेजू, १९८५) सांगितले की शेवटी शेवटी ते देवाची पूजा करायला लागले होते. शिवाय 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीच्या सोळाव्या प्रकरणात आवश्यक त्या भौतिक गरजा भागल्यावर अध्यात्माची गरज भासेल. इतिहासाचा झोका भौतिकतेच्या टोकाकडून अध्यात्माच्या टोकाकडे जातो. मार्क्स जग कसे बदलता येईल तेवढे सांगतो. पण भारतीय अध्यात्म मन कसे बदलता येईल ते सांगते. अशा आशयाचे विचार भागवत या पात्राच्या तोंडी मुक्तिबोधांनी घातले आहेत. हे मुक्तिबोधांचेच विचार आहेत हे मानावे लागते याचे कारण मुक्तिबोध या विचारांना कादंबरीत कुठे खोडून काढीत नाहीत. 'सत्याची जात' या कवितासंग्रहातील कविता तर सरळ सरळ त्यांचे ईश्वराशी संवाद करणारे मन व्यक्त करतात आणि विंदा करंदीकर हे पुढे पुढे असेच 'धुंदीत या गतीच्या सारेच पंथ प्यारे' म्हणून परंपरावादाच्या भजनात सहभागी होतात. तरी 'दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य' ही पुस्तिका वामन इंगळ्यांनी दि.के. बेडेकर यांच्या स्मृतीलाच अर्पण केली आहे आणि या पुस्तिकेत विंदा करंदीकर आणि मुक्तिबोध यांच्याबद्दलचा गहन आदरही व्यक्त झाला आहे. वामन इंगळे मार्क्सवादी आहेत याबद्दल माझी तशी कोणती तक्रार नाही. पण चुकीच्या लोकांना मराठी साहित्यातील मार्क्सवादाचे उत्कृष्ट नमुने ते पुरस्कारून ठेवतात याबद्दल मात्र माझी तक्रार जरूर आहे. मार्क्सला

अध्यात्माकडे घेऊन जाणाऱ्या, मार्क्सला इथल्या शोषणाच्या ईश्वरी व्यूहाशी जोडणाऱ्या मार्क्सवाद्यांच्या प्रभावात ते विचार करतात त्यामुळे ते स्वतःवरही अन्याय करतात. मार्क्सवरही अन्याय करतात. विचाराच्या शुद्ध आणि तार्किक प्रस्थापनप्रक्रियेवरही अन्याय करतात.

: पाच :

वामन इंगळे यांच्या मूल्यदृष्टीचा परिचय करून घेण्यासाठी आपणाला 'दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य' या पुस्तिकेचाच आधार घ्यावा लागेल. ही पुस्तिका मार्च १९७५ मध्ये प्रकाशित झाली आहे. हा काळ तेव्हाच्या दलित साहित्याचा आणि अर्थात आंबेडकरवादी साहित्याचा प्रारंभकाळ होय. या काळात या साहित्याची उत्साही चर्चा सुरू झाली होती आणि अजून वाङ्मयगुणांनी श्रेष्ठ ठरतील अशा नव्या साहित्यकृती यावेळी जन्मालाच यायच्या होत्या. या काळात इंगळे या पुस्तिकेत दलित साहित्याची चर्चा करीत होते.

याच पुस्तिकेत वामन इंगळेंनी पृ. २६ वर "प्रायमरी ते मॅट्रिकपर्यंतच्या विद्यार्थ्यांना (की ज्यांचे समाजशास्त्रीय समज कच्चे असतात त्यांना) रामकृष्णांची चरित्रे आणि संतवाङ्मय न शिकविण्याचा निर्णय घेणे आवश्यक होते. इतक्या कच्च्या वयात ईश्वरशरणता आणि चातुर्वर्ण्याचे समर्थन त्यांना शिकविणे हे अस्पृश्यता नष्ट होण्याच्या दृष्टीतून अनैतिक आहे." असे विधान केले आहे. पण या विधानातील आशय केवळ अस्पृश्यतेपुरता मर्यादित करण्याची मात्र गरज नव्हती. एकूणच जातीसंस्था, वर्णसंस्था, अंधश्रद्धा आणि दैववाद नष्ट होण्यापर्यंत या विधानातील आशय पसरवता आला असता पण तरी इंगळ्यांची ही भूमिका लक्षणीय आहे यात शंकाच नाही. या विवेचनाला जोडूनच त्यांचे आणखी एक मत इथे नोंदवायला हवे. "तुकाराम, चोखोबा, नामदेव, कबीर या मंडळींविषयी स्पृश्यास्पृश्य समाजाच्या मनात काही एक प्रेमाची भावना असली तरी मूल्यदृष्ट्या हे दलित वाङ्मयाचे ऐतिहासिक आधार नव्हेत हे स्पष्टच आहे." (पृ. ६) वामन इंगळेंची ही भूमिका अनेकांना अनेक कारणांसाठी पटणार नाही. पण इंगळेंची हे मत तात्त्विकदृष्ट्या एक महत्त्वाचे सत्य सांगते हे मात्र मान्यच करायला हवे. ईश्वरनिष्ठ तत्त्वज्ञाने आणि जडवादी अर्थात ईश्वर, आत्मा, स्वर्ग-नरक, पूर्व वा पुनर्जन्म न मानणारी तत्त्वज्ञाने अशी तत्त्वज्ञानांची विभागणी ही मूलतः दोन परस्परविरोधी जीवनशैलींचीच विभागणी आहे आणि या दृष्टीने इंगळेंचे वरील मत सर्वांनीच जरा काळजीपूर्वक लक्षात घेण्याची गरज आहे. मला वरील मते मांडणारे इंगळे मान्य आहेत. भाविकांची मने दुखावण्याचा धोका पत्करूनही ही मते इंगळे मांडतात. त्याबद्दल त्यांना धन्यवादच द्यायला हवेत.

वामन इंगळे यांची पुढील काही मते मात्र चर्चेला घ्यायला हवीत. त्यातले पहिले मत - ''मराठीतील नवकाव्य हा दलित वाङ्मयाचा खरा पूर्वाधार.'' (पृ. ७) असे आहे. मराठीत नवकाव्याची चर्चा मुख्यत्वे मर्ढेकरांच्या कवितेच्या अनुषंगाने झाली. नवकवितेची वैशिष्ट्ये म्हणजे मर्ढेकरांच्या कवितेची वैशिष्ट्ये हे समीकरणच त्या काळात मांडले गेले होते. मराठीत प्रारंभीच्या मुक्तिबोधांना वा करंदीकरांनाही नवकवी का म्हटले गेले ? इंगळ्यांनी मर्ढेकरांसंबंधी याच पुस्तिकेत पृ. १० वर म्हटले आहे की, ''मर्ढेकरांसारख्या मुकेपणाकडे वळलेल्या आणि तिरप्या प्रतिमांची उतरंड रचणाऱ्या कवीला; संवेदनावादी, आकृतीवादी समीक्षा मराठीत आणणाऱ्या एका हायर सेकंड क्लास कवीला केंद्रस्थान देण्यात आले.'' याचा अर्थ मर्ढेकरांना नवकवितेत केंद्रस्थान मिळणे इंगळेंना मान्य नाही. पण मराठीत नवकवितेचे स्वरूप पाश्चात्त्य कवितेतील इलिएट, पाऊंड यांच्या कवितेच्या अनुषंगाने गृहीत धरले गेले. मराठीतील नवकवितेचे स्वरूप ठरले ते असे - जी कविता अभिव्यक्तीला म्हणजे प्रतिमानावीन्याला, यंत्राधिष्ठित प्रतिमासृष्टीला महत्त्व देते आणि क्षणभंगूरतेला, उदासीला, पराभूत-अगतिक मानसविश्वाला आणि आध्यात्मिक मनोवृत्तीला व्यक्त करते ती नवकविता होय. या व्याख्येत मर्ढेकर फिट्ट बसतात. पण मग खुद्द प्रारंभीच्या मुक्तिबोधांनीही स्वतःला या नवकवितेत का सामील करून घ्यावे आणि वामन इंगळेंनीही त्यांना नवकवी का म्हणावे असा प्रश्न आहे. हिंदीमध्ये नवकविता आणि प्रगतीवादी कविता असे दोन प्रवाह आहेत आणि ते दोन परस्परविरोधी जीवनदृष्टींचे द्योतक आहेत. मराठीत नवकविता विरुद्ध मार्क्सवादी कविता असा संघर्ष खुद्द मुक्तिबोधांनीही आणि वामन इंगळेंसारख्या त्यांच्या चाहत्यांनीही का पेटवला नाही हा प्रश्न मला अजूनही छळतो आहे. 'नवी मळवाट'च्या प्रस्तावनेत जी चूक मुक्तिबोधांनी केली ती चूक वामन इंगळे यांनी आदरपूर्वक पुढे नेलेली आहे. ''नवसाहित्याच्या आणि दलित साहित्याच्या प्रेरणा व प्रवृत्ती आणि स्वरूपही परस्परांहून भिन्न आहे. नव्हे ते परस्परविरोधीच आहे. या कालखंडातील छेदभेद केवळ साहित्यिक स्वरूपाचे नाहीत त्यांच्या बुडाशी सांस्कृतिक विभाजनाचा मोठा भाग आहे. या विभाजनामुळे नवसाहित्य आणि दलित साहित्य हे मराठी साहित्याचे जे महत्त्वाचे घटक आहेत ते दोन विरुद्ध बाजूंना फेकले गेले आहेत. त्यांचा परस्परांशी निकराचा संघर्ष चालू आहे.'' (मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप : १९५० ते १९७५ संपा. पवार-हातकणंगलेकर, पाप्युलर प्रकाशन, १९८६, पृ. ४३१) ही वर्गीय मीमांसा मार्क्सवादी नसलेले प्रा. गो.म. कुलकर्णी करतात. पण नवसाहित्य आणि दलितसाहित्य यांच्यातील हा संघर्षरूप नातेसंबंध, हा वर्गीय नातेसंबंध मार्क्सवादी असलेले वामन

इंगळे का लक्षात घेऊ शकत नाहीत ? हा प्रश्न आपल्याला पडतो. ही वर्गीय मीमांसा इंगळ्यांना सुचली असती तर मर्ढेकर जिचे जनक मानले जातात त्या नवकवितेपासून ते मार्क्सवादी कवी म्हणून प्रारंभीच्या मुक्तिबोधांना वेगळे काढू शकले असते. मार्क्सवादी कवितेचा प्रवाह नवकवितेपासून वेगळा आणि नवकाव्याच्या विरोधी प्रवाह आहे ही भूमिका ते घेऊ शकले असते आणि असे झाले असते तर ''वाङ्मयीनदृष्ट्या जर पाहिले तर मराठीतील नवकाव्य हा दलित वाङ्मयाचा खरा पूर्वाधार.'' (पृ. ७) असे ऐतिहासिकदृष्ट्या आणि मूल्यदृष्ट्याही निखालास चुकीचे विधान करणे प्रयत्न करूनही त्यांना शक्य झाले नसते.

: सहा :

आणखी दुसरे असे की दलित साहित्यिक कोण ? या प्रश्नासंबंधीही अत्यंत चुकीची भूमिका इंगळ्यांनी घेतली आहे. दलित साहित्याचे मूल्यशास्त्र वा प्रमाणशास्त्र त्या काळात वामन इंगळ्यांनी लक्षात घेतले असते तर दलित साहित्याचे नाते जातीशी जोडण्याऐवजी एका जडवादी आणि समतावादी प्रमाणशास्त्राशी त्यांना जोडता आले असते. मग सुर्वे, मुक्तिबोध हे किंवा इतरही लेखक दलित साहित्यिक ठरतात किंवा नाही ? वा किसन फागू बन्सोडे आणि नवसाहित्य या पूर्वाधारांच्या मजबूत खांद्यावर दलित साहित्य उभे आहे काय ? या प्रश्नांची अचूक उत्तरे त्यांना सहज मिळाली असती.

मुक्तिबोध, सुर्वे, श्री.म. माटे अशा अनेक लेखकांना दलित साहित्यिक म्हणायचे की नाही हा मुद्दा पुढल्या काळात स्पष्ट झाला. आंबेडकरवादी साहित्य ही तात्त्वज्ञानिक संज्ञा पुढे आली आणि दलित साहित्य ही संज्ञा मागे पडली. मग आंबेडकरवादी नसलेले म्हणजे हिंदुत्वाच्या कक्षेबाहेर न येणारे किसन फागू बन्सोडे, ना.रा. शेंडे आणि पुढचे सर्व समरसतावादी हे हिंदुत्ववादी असल्याने वा जन्मदलित असल्याने दलित साहित्यिक ठरू शकत असले तरी आंबेडकरवादी साहित्यिक ठरणे कठीण झाले. लोकशाही समाजवाद, बुद्धिवाद, समता-स्वातंत्र्य-बंधुता-सामाजिक न्याय या मूल्यांचा बुद्धिवादी माणुसकी (Rational Humanism) असा एक मजबूत क्रांतिकारी रांधा तयार झाला. लोकशाही मार्गाने हुकूमशाहीविहीन आणि रक्तविहीन समाजवादी क्रांती असे एक क्रांतीसूत्र तयार झाले.

जाणकारांच्या इथे हे लक्षात येईल की आंबेडकरवाद मार्क्सवादाहून थोड्या पण खूप महत्त्वाच्या मुद्यांवर वेगळाही आहे. तो पूर्ण प्रस्तुतही आहे आणि क्रांतीच्या दृष्टीने आणि उज्ज्वल मानवी भवितव्याच्या दृष्टीने अधिक फलदायीसुद्धा ठरतो. क्रांती वरून लादता येत नाही. ती आतून यावी लागते. त्यासाठी मानसिक आणि

वैचारिक जागृतीची गरज असते. आंबेडकरवादाची ही भूमिका आहे. व्यापक अर्थाने मार्क्सवादाचे ध्येय आंबेडकरवादाला मान्य पण साधने आणि पद्धती अमान्य असे हे आहे. पुढचा मुद्दा आता असा की साहित्याची निर्मिती कलावंत करतो. म्हणजे त्याची जीवनदृष्टी साहित्याची निर्मिती करते. कलावंत आपल्या साहित्यात वापरतो त्या प्रत्येक शब्दाची, प्रसंगाची, व्यक्तीच्या हालचालींची तपासणी त्याची जीवनदृष्टी करते. जीवनदृष्टी ही चिकित्साकेंद्राची, निवडमंडळाची भूमिका करते. आंबेडकरवाद ही विवक्षित आणि व्यवच्छेदक अशी जीवनदृष्टी आहे. ती मार्क्सवादापेक्षाही वेगळी आहे. नवसाहित्यिकांच्या आध्यात्मिक, पराभूत आणि स्थितीवादी जीवनदृष्टीपेक्षाही वेगळी आहे. या सम्यक आणि क्रांतिकारी जीवनदृष्टीचा जीवनशैली म्हणून, आपल्या साहित्याच्या निर्मितीचे मार्गदर्शक सूत्र म्हणून स्वीकार करणारा साहित्यिकच आंबेडकरवादी साहित्यिक ठरतो. इथे प्रश्न खाटिक, चांभार, मराठा, ब्राह्मण अशा जातींचा नाही. आंबेडकरवाद स्वीकारला की या जातीच उरत नाहीत. म्हणून जे जाती-वर्णविहीन, वर्गविहीन, धर्मातीत आणि ईश्वरातीत होऊ शकतात, म्हणजे जे बुद्धिवादी आणि करुणामय, मैत्रीमय होऊ शकतात तेच आंबेडकरवादी साहित्यिक ठरू शकतात. हट्टाने कोणी जात, वर्ण वा वर्ग, धर्म म्हणून अस्तित्वात असण्याचा प्रयत्न केला तरी या ना त्याप्रकारे त्यांना आंबेडकरवादी करून घेण्यासाठी आंबेडकरवादी यंत्रणा प्रयत्न करीत राहतील.

या पार्श्वभूमीवर इंगळे यांच्या ''दलितांमधूनच कुणी आंबेडकर निर्माण होणे ही वस्तुनिष्ठ गरज होती. (आणि आज आंबेडकरांना ओलांडून जाणे हीही वस्तुनिष्ठ गरज आहे.)'' (पृ. ३०) या विधानाची चर्चा केली पाहिजे. 'आज' म्हणजे १९७४-७५ साली इंगळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ओलांडून मार्क्सकडे जाण्याची गरज वाटते. तसे त्यांना का वाटते याची ते कोणतीही चिकित्सा करीत नाहीत. आंबेडकर म्हणजे खरे पाहता आंबेडकरवादच होय. यात धम्म अंतर्भूत आहेच. तेव्हा बुद्धाला आणि आंबेडकरांना बाद ठरवून इंगळे कुठे, कसे आणि कशासाठी जात आहेत ? हा प्रश्न आहे. त्यांनी त्या काळात एक तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पूर्ण वाचन केलेलेच नाही. पुढे रशियात कोणत्या घडामोडी घडल्या याचा अंदाज त्यावेळी इंगळे यांना करता येणे शक्यही नव्हते म्हणूनच बुद्धासंबंधीचे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसंबंधीचे इंगळे यांचे विवेचन मार्क्सला पोथी करणाऱ्या उच्चवर्णीय भारतीय मार्क्सवाद्यांइतकेच चुकीच ठरते. या संदर्भातली हिंदुत्ववाद न सोडणाऱ्या ब्राह्मणी मार्क्सवाद्यांची आणि वामन इंगळे यांची मते अगदी तंतोतंत जुळतातच कशी या प्रश्नाचा विचार होणे गरजेचे आहे.

मार्क्सला क्रांतिकारी ठरविण्यासाठी येथील मार्क्सवाद्यांनी बुद्धाला धार्मिक ठरवले. कारण मार्क्स धर्माला अफूची गोळी मानतो. पण १९५६ सालचा डॉ. बाबासाहेबांचा 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथराज जरी वामन इंगळेंनी वाचला असता तरी बुद्ध हा धर्म नसून तो धम्म आहे ही बाब त्यांच्या लक्षात आली असती. वि.दा. सावरकरांनी बुद्धधम्माला धर्म मानले. महायानालाच त्यांनी बुद्धधर्म मानले आणि हिंदूधर्माचा एक पंथ म्हणूनही बुद्धधर्माला त्यांनी घोषित केले. शिवाय हिंदूधर्माचा एक पंथ ठरवून त्याला गौणत्वही दिले. मार्क्सवाद्यांची हीच भूमिका आहे. मार्क्सवादी आणि सावरकर यांच्यातील या विचारसाम्याचे बंधुमानसशास्त्र एकदा नीट लक्षात घेण्याची गरज आहे. रामविलास शर्मा असोत, देवीप्रसाद चट्टोपाध्याय असोत की राहुल सांकृत्यायन असोत या सर्वांनी वेगळ्या पद्धतीने पण सावरकरांनी केला तोच अन्याय बुद्धावर केला. त्यामुळेच ''धर्मांतराच्या घटनेचे महत्त्व प्रवासातील एका महत्त्वाच्या टप्प्याचे आहे. 'हिनयान' पंथातील पुनर्जन्म, मोक्ष, बुद्ध बोधिसत्व म्हणून देव होणे; राजे, व्यापारी, सरदार (आणि ब्राह्मण पंडितही) यांना या धर्माचे आकर्षण असणे या सर्व बारकाव्यांचा अभ्यास करून बाबासाहेबांच्या विचारांचा विकास प्रत्यक्ष चळवळीच्या संदर्भात केला जाईल आणि दलित चळवळ यापुढचाही टप्पा गाठील यात काही संशय नाही.'' (पृ. ३७) भारतीय मार्क्सवाद्यांची बोलण्याची ही जनरल पद्धती आहे. बुद्धधम्माला ते धर्म म्हणतात आणि आपले विवेचन एका झापडबंद मार्क्सवादी पद्धतीने बेततात. इंगळेंच्या वरील अवतरणात एक महत्त्वाची चूकही आहे ती ही की हीनयान आणि महायान यांच्यातील तात्त्विक तफावत त्यांना माहीत नाही म्हणून महायानाची सर्व धर्मवैशिष्ट्ये ते हीनयानाच्या धम्मखात्यावर जमा करतात. मुळात पुनर्जन्म, मोक्ष वगैरे गोष्टी न मानणारा बुद्धाचा धम्म म्हणजे हीनयान किंवा मूळ बुद्धधम्म होय. पुढे काही समरसतावाद्यांनी महायानाच्या रूपाने धर्म जन्माला घातला. याही काळात हीनयानाने आपली मूळ धम्मवैशिष्ट्ये जपली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थातच धर्मरूप महायान दिला नाही तर मूळ बुद्धाचा इहवादी-बुद्धिवादी धम्म दिला. शिवाय बुद्ध बोधिसत्त्व म्हणून देव होणे यातही इंगळे सर्व प्रक्रिया उलटी आणि चुकीची करून टाकतात. एखादी व्यक्ती बोधिसत्त्व आधी असते आणि बोधिसत्त्व पुढे बुद्ध होतो. महायान्यांनी आणि वैदिकांनी बुद्धाचे भौतिक क्रांतीस्वरूप पुसण्यासाठी बुद्धाला देव केले आणि ईश्वर अमान्य करणाऱ्या बुद्धाला विष्णूचा नववा अवतारही केले. वामन इंगळे बुद्धाच्या म्हणजे इहवादी क्रांतीच्या विरोधातले हे षडयंत्र लक्षातच घेत नाहीत.

बुद्धधम्माच्या स्वीकाराचे महत्त्व प्रवासातील एका टप्प्याचे नाही तर ते मानवी

जीवनाची कायम सोबत करणाऱ्या उजेडाचे आहे. मुद्दा तत्त्व आणि तपशील यातील भेद समजावून घेण्याचा आहे. बुद्धिवाद, समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, लोकशाही, समाजवाद, जाती-वर्ण-वर्गविहीनता ही तत्त्वे मानवी जीवनात कधी कालबाह्य ठरतील काय ? ही तत्त्वे प्रत्यक्षात उतरविण्यासाठी उपयोजिल्या जाणाऱ्या त्या त्या काळच्या तपशिलाला काळाची चौकट देता आली तरी वरील मूल्यांची महत्ता आणि गरज कोणत्याही कालसंदर्भात कमी होईल काय ? हा प्रश्न आहे. हे सर्व वामन इंगळे यांनी नीट ध्यानात घेतले असते तर बुद्धाच्या धम्माचे महत्त्व प्रवासातील एका महत्त्वाच्या टप्प्यापुरते आहे असे उच्चवर्णीय मार्क्सवाद्यांनाच आणि अध्यात्मवाद्यांनाच शक्य होणारे झापडबंद विधान त्यांनी केले नसते आणि आंबेडकर ओलांडून जाण्याची गरज आहे असे म्हणण्याचे धाडसही त्यांनी केले नसते आणि "बुद्धदर्शन म्हणजे एक स्वयंसिद्ध आणि शेवटचे तत्त्व नव्हे ही गोष्ट लक्षात घेणे अगत्याचे ठरत नाही काय ?" (पृ. ३३) असा चुकीचा आणि अतिउत्साही प्रश्नही त्यांना पडला नसता. निदान १९९० नंतरच्या काळात ते विचार करण्याच्या अवस्थेत असले असते तर या पुस्तिकेतील आपले जवळजवळ सर्वच विचार त्यांनी स्वतःच बदलून घेतले असते.

: सात :

वामन इंगळे अत्यंत बुद्धिमान होते. त्यावेळच्या सर्वच वाङ्मयीन आणि सांस्कृतिक चळवळींशी त्यांचा जवळचा संबंध होता. काही नवे करू पाहणाऱ्या त्या काळच्या अनेक साहित्यिकांशी त्यांची मैत्री होती. काटोलसारख्या आडगावात राहूनही तत्कालीन नव्या वाङ्मयीन उद्रेकांचा हात त्यांनी कधी सुटू दिला नाही. मराठी साहित्याच्या आघाडीवरील घडामोडींवर त्यांचे बारीक लक्ष असायचे. त्याकाळच्या सर्वच अव्वल दर्जाच्या वाङ्मयीन नियतकालिकांमधून त्यांनी लेखन केले. एक अपवादभूत वाटावी अशी वाङ्मयीन जिवंतता १९८५ पर्यंत तरी काटोलच्या परिसरात वावरली. अनेक मौलिक वाङ्मयीन शक्यतांचा धनी असलेला कथाकार, कादंबरीकार, कवी आणि संगीताचा ललित समीक्षक म्हणून महाराष्ट्राच्या साहित्यमंचावर या जिवंततेने दमदार प्रवेशही केला होता. या शक्यतांचे देदीप्यमान तारांगण फुलण्याची वाटही महाराष्ट्र पाहात होता. वामन इंगळे यांना कदाचित हे शक्यही झाले असते. पण ते धवधवीतपणे शक्य होण्याच्या आधीच वामन इंगळे यांच्या प्रकृतीने त्यांच्यापुढे विस्मृतीचा अंधार पसरला. १९८५ नंतरचे त्यांचे विस्कटलेले जगणे त्यांच्यासाठी जितके यातनादायी होते त्याहून अधिक ते त्यांच्या चाहत्यांसाठी यातनादायी होते. १९८५ नंतरच्या अंधारासकट वामन इंगळेंच्या आयुष्याला यावर्षी पंचाहत्तर वर्षे पूर्ण

होत आहेत. या प्रस्तावनालेखात मी त्यांच्या ललित साहित्यातील मोठ्या वाङ्मयीन शक्यतांचा निर्देश केला. त्यांच्या तात्त्विक भूमिकेतील काही मुद्यांसंबंधी चर्चा केली. हे सर्व वामन इंगळेंना वाचता आले असते, समजावून घेता आले असते आणि चर्चा करता आली असती तर ? तर मला जितका आनंद झाला असता त्याहून अधिक आनंद वामन इंगळेंना झाला असता. पंचाहत्तरीनिमित्त वामन इंगळेंना मी कोणती सदिच्छा देऊ ? ते त्यांच्या दुर्धर मानसिक काळोखातून बाहेर येतील ही आशा नाही, पण वीरेंद्र इंगळे, देविदास कठाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी काढलेला हा गौरव विशेषांक पाहण्यासाठी, वाचण्यासाठी आणि कृतार्थतेने गदगदून येण्यासाठी तरी ते परत १९८५ पूर्वीचे ज्वलंत वामन इंगळे व्हावेत अशीच हार्दिक सदिच्छा मी जरूर व्यक्त करीन.

■■

# मिलिंद महाविद्यालय : क्रांतिकारी सृजनाची पौर्णिमा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५० साली औरंगाबादेला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. मी १९६१ च्या जुलै महिन्यात मिलिंद महाविद्यालयात प्री. युनिव्हर्सिटीच्या वर्गात प्रवेश घेतला. त्यापूर्वीच्या केवळ दहा वर्षाच्या अल्पकाळातही मिलिंद महाविद्यालय एखादे आंदोलन पोचावे तसे महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरही पोचले होते. केवळ दहा वर्षे वयाच्या या ज्वलंत आंदोलनाने आपला एक उदंड दबदबा सर्वत्र निर्माण केला होता.

मिलिंद महाविद्यालय ही केवळ शैक्षणिक संस्था नव्हती. ती आंबेडकरी आंदोलनाची अविभाज्य अशी बौद्धिक छावणी होती. केवळच स्वत:पुरते जगणाऱ्या बिनचेहऱ्याच्या सुशिक्षितांची गर्दी समाजाच्या सुपूर्द करणे हे ध्येय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयाचे असणे शक्य नव्हते. या महाविद्यालयातून शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांच्या रूपाने आमूलाग्र समाजक्रांतीचा कार्यक्रम समाजात जावा, महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अत्तदीप होऊन बाहेर पडावे, स्वतः प्रज्ञेचा आणि करुणेचा इमानदार प्रकाश व्हावे, समाजाच्या ज्या भौगोलिक वास्तवात ते जातील ते वास्तव त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वातील सामाजिक न्यायाने उजळून टाकावे असे बॅनर मिलिंदच्या मस्तकावर होते.

मिलिंदच्या विद्यार्थ्यांनी देव-दैववादाच्या आणि इतरही सर्व अंधश्रद्धांच्या विरोधात निकराच्या लढाया सुरू कराव्यात. समतेसाठी मानवी चांगुलपणासाठी स्वत:च प्रबोधन व्हावे. समाजातील दुष्टपणाला आग लावणारे आंदोलन व्हावे. मिलिंदच्या विद्यार्थ्यांनी वाघ होऊन जगावे. आपल्या प्रज्ञेच्या प्रकाशाने समाज उजळून टाकावा. मिलिंदने केवळ पदवीधरांचा कारखाना होऊ नये. समाजपरिवर्तनाचा वसा घेणारे निष्ठावंत साहित्यिक, विचारवंत, कलावंत, उद्योजक आणि अध्यापक निर्माण करणारी कार्यशाळा त्याने व्हावे. मिलिंद महाविद्यालयाचा जन्म या तेज:पुंज अपेक्षेच्या पोटी झालेला आहे.

: १ :

मी मिलिंद महाविद्यालयात गेलो तो काळ मिलिंदला केवळच महाविद्यालय मानण्याचा काळ नव्हता. कुटुंब मानण्याचा काळ होता. शून्य नसेल तर शून्य निर्माण

करण्याचा आणि शून्यातून समतेचे आणि सामाजिक न्यायाचे विश्व निर्माण करणारी साहसे जन्माला घालण्याचा तो काळ होता.

मी मिलिंदमध्ये प्रवेश घेतला तेव्हा वातावरणात एक झपाटलेपणा, एक ज्वलंतपणा मला दिसला. प्रज्ञान होण्यासाठी आतूर झालेला ज्वालामुखी इथे धगधगतो आहे आणि तो विद्यार्थ्यांच्या मनात पसरू इच्छितो आहे हे मला प्रकर्षाने जाणवले. संपूर्ण महाविद्यालयच एक नवसृजनाचे कॅंडर झाले आहे. महाविद्यालयाने एखाद्या मनस्वी मिशनचे रूप धारण केले आहे. मिलिंद परिसरातील मातीच्या कणाकणाला क्रांतीचे पंख फुटले आहेत आणि ही माती इतिहासाची विरचना करण्यासाठी आणि उज्ज्वल उद्याची नवरचना करण्यासाठी इथे बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या बोधिवृक्षाखाली अभ्यासाला बसली आहे असे मला वाटले. सामाजिक न्यायाचे चवदार तळे सर्वच बहिष्कृतांच्या घरी पोचविण्यासाठी इथली माती प्रसारमाध्यमाचे वादळी मन झाली आहे असे मला वाटले.

मी मिलिंद नावाच्या सृजनोत्सवात सहभागी झालो त्यावेळी हे महाविद्यालय मला केवळ महाविद्यालयासारखे कधी वाटलेच नाही. मला ते धगधगत्या चळवळीसारखे वाटले. आम्ही विद्यार्थी केवळ परीक्षेत पास होण्यासाठी अभ्यास करीतच नव्हतो. पूर्वी कधीही वाट्याला न आलेली तेजःपुंज जिंदगी निर्माण करण्यासाठी, बाबासाहेबांना अभिप्रेत संविधानसंस्कृती निर्माण करण्यासाठी आम्ही झपाटल्यासारखे अभ्यास करीत होतो. मिलिंदमध्ये येऊन आम्ही त्या क्रांतिसंस्कृतीचे गिर्यारोहक झालो होतो.

: २ :

चूल विझू नये, ती सतत धगधगत राहावी यासाठी तिच्यात सतत लाकडे घालावी लागतात. चळवळीचे असेच आहे. चळवळ सतत गतिमान असण्यासाठी तिला सतत कार्यक्रम द्यावे लागतात. यावेळी मिलिंद महाविद्यालय असंख्य सर्जनशील उपक्रमांनी गजबजलेले होते. डॉ. म.ना. वानखडे यांचे कल्पक आणि प्रज्ञावंत नेतृत्व मिलिंद महाविद्यालयाला लाभले होते. वक्तृत्वस्पर्धांनी, वादविवाद स्पर्धांनी मिलिंद गजबजून गेले होते. निबंधस्पर्धा, क्रीडाक्षेत्र या सर्वच क्षेत्रात सारखे काही ना काही घडत होते. बी.आर. कांबळे, एन.डी. कांबळे, नागोरी, मा.फ. गांजरे, भालचंद्र वराळे असे अनेक विद्यार्थी या क्षेत्रात मास्टर होते. सर्व विद्यार्थी त्यांच्याकडे गौरवाने पाहात असत. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी हे खाद्य अनोखे होते. हे बौद्धिक वातावरण नवे होते. आपल्याला या स्कॉलर विद्यार्थ्यांसारखे बोलता यावे यासाठी मुलांमध्ये स्पर्धा लागत असे आणि या स्पर्धेमुळे मुलांच्या

मनांचा अवकाश व्यापक आणि सप्रयोजक होत असे. शिवाय देशाच्या, महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून मोठमोठे विद्वान वक्ते बोलावले जात. त्यांची भाषणे होत. दूरदूरच्या विद्यार्थ्यांसाठी हे वैचारिक उत्सव नवे होते. वक्तृत्व ही लोकांपर्यंत परिवर्तन पोचविण्याची नवी विद्या, व्याख्यान हा नवा बौद्धिक प्रकार त्यांना नव्यानेच दिसत होता. मुले या उजेडाच्या कल्लोळांनी थरारून जात होती.

: ३ :

मी स्वतः पुस्तकांच्या डोहात बुडणारा विद्यार्थी होतो. त्यामुळे महाविद्यालयातील क्रीडाविभागाशी माझा कायम अबोलाच राहिला. पण या फळीचे नेतृत्व त्यावेळी प्रा. शर्मा करीत असत. क्रीडाउत्सवात मिलिंदच्या कोणत्याही चमूचे हरणे प्रा. शर्मांच्या डोळ्यातून ओसंडत असे. त्यांच्या या आकांतस्वभावी अश्रूंनीही खेळाडूंना पुढल्यावेळी विजय खेचून आणण्याचे बळ मिळत असे. विद्यापीठाच्या क्रीडाक्षेत्रात मिलिंदचा दरारा होता. त्यामागे मिलिंदवरील निष्ठांचा दीपस्तंभ होता आणि पराभूतपणा गाडून टाकण्याची उदंड इच्छाशक्ती होती. मिलिंदमधली खेळाडू मुले मला त्या इच्छाशक्तीच्या प्रखर ज्वालांसारखी वाटत. खेळांचा देश मला परदेशच होता पण मिलिंदमधल्या खेळाडूंच्या विजयांनी वा पराजयांनी माझ्याही गळ्यात दाटलेले ढग कधी रडले आहेत. कधी हसले आहेत. हे का होत होते ? हे होत होते याला कारण मिलिंद माझे सांस्कृतिक कुटुंब होते आणि मी त्या कुटुंबातील कविता लिहिणारा एक अतिसंवेदनशील असा छोटासा घटक होतो.

कवितावाचनाचे कार्यक्रम होत. प्रारंभीची एकदोन वर्षे बुजरेपणामुळे मी अशा कार्यक्रमात सहभागी झालो नाही. पुढे व्हायला लागलो. माझी बॅच १९६५ सालची मराठी बी.ए. ऑनर्सची पहिली बॅच. या पहिल्या बॅचला मी आणि अरुणा लोखंडे असे दोघेच होतो. ऑनर्सचे विद्यार्थी म्हणून आम्हाला विशेष सन्मान होता. मी बी.ए. ऑनर्सला असताना कवितावाचनाचा एक मोठा कार्यक्रम झाला. मिलिंदच्या इतिहासात प्रथमच मला 'मिलिंदचा कवी' हा सन्मान कवी वा.रा. कांतांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता.

व्याख्यान म्हणजे काय ? हे मिलिंदला येण्याआधी मला माहीतच नव्हते; पण मिलिंदला यावेळी बौद्धिक भरती आली होती. मिलिंदमध्ये या काळात खूप व्याख्यानमाला झाल्या. साहित्यिकांची, विचारवंतांची व्याख्याने सतत आयोजिली जात. डॉ. सुमंत मुरंजन, डॉ. मा.प. मंगुडकर, आर.आर. भोळे अशा अनेक जाणत्या अभ्यासकांची व्याख्याने मी मिलिंदमध्ये ऐकली. या व्याख्यानांनी मी थरारून जात

असे. एखादी गंभीर व्याख्यानमाला झाली की निदान आम्हा काही विद्यार्थ्यांचे लोंढे ग्रंथालयाकडे वळत. आम्ही अभ्यासाला नेमलेली पुस्तके कमी वाचत होतो. आम्ही त्यावेळी अवांतर वैचारिक ग्रंथ, समीक्षा-ग्रंथ, कथा-कादंबऱ्या वा कवितासंग्रह खूप वाचीत होतो. अनेक विद्यार्थ्यांचा इंग्रजी वाचनाचा सपाटा मोठा होता. ही मुले फाडफाड इंग्रजी बोलत. इंग्रजी बोलू इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला वाटे आपल्याला डॉ. म.ना. वानखडे यांच्यासारखे इंग्रजी बोलता यावे. खूप विद्यार्थी तसा प्रयत्न करीत. गंभीर वैचारिक वाचनाची स्पर्धा त्यावेळी लागे. विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक झटापटी चालत. आपण नवे काय वाचले ते गर्वाने सांगण्याचा, त्यावर चर्चा करण्याचा तो काळ होता. या काळातील व्याख्यानमालांच्या द्वारा ज्ञानाच्या नवनव्या जहाजांमधून मिलिंदमध्ये नवनवे ज्ञान उतरविले जात असे. याप्रकारे काही नवे ऐकण्याची अनावर भूक मिलिंदने दिली. परिणाम असा झाला की औरंगाबादेत कुठेही, कोणाचे व्याख्यान असले तरी आम्ही ते ऐकण्याची संधी सोडत नव्हतो. मिलिंदने आम्हाला ज्ञानाच्या प्रवाहात असे ओढले. काही नवे करण्याचे स्वप्न दिले अतृप्तीची दीक्षा दिली. आपल्या आयुष्याला नवनिर्माणाची कार्यशाळा कर. जागणाऱ्या सूर्यासारखा सतत जागत राहा. जिंदगीच्या जगण्या-मरण्याच्या कळा शब्दात बांधत राहा हे मला तरी मिलिंदनेच शिकविले.

: ४ :

बहुतेक विद्यार्थी खोल्या करून राहात. स्वतःच स्वयंपाक करीत. आम्ही लिहिणारे काही विद्यार्थी सतत एकमेकांच्या खोल्यांवर एकत्र येत होतो. कविता वाचत होतो. चर्चा करीत होतो. बहिष्कृतांवर होणाऱ्या अत्याचारांसंबंधी आम्ही चर्चा करीत होतो. शिक्षणाच्या खेड्यापाड्यातील स्थितीसंबंधी बोलत होतो. खेड्यापाड्यातील गरिबीसंबंधी बोलत होतो. लोकांमधील अंधश्रद्धांसंबंधी बोलत होतो. बाबासाहेबांच्या चळवळीसंबंधी, त्यांच्या कार्यासंबंधी बोलत होतो. याच काळात आमचे व्यक्तिगत जगणे असे सामाजिक जगणे व्हायला शिकले. या काळात आम्ही खूप वाचत होतो. लहानपणापासूनच मी ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म, स्वर्ग या फालतू गोष्टी मानत नव्हतो. त्यामुळे या माझ्या वाटण्याचे भक्कम आधार मी या वाचनातून मिळवित होतो. या काळात आम्ही काही विद्यार्थी साहित्यासंबंधी विशेष आस्था बाळगणारे होतो. आम्ही साहित्यासंबंधी खूप वाचत होतो. चर्चा करीत होतो. लिहीत होतो. मी होतो. सुखराम हिवराळे होते. भगवान भटकर होते. योगीराज वाघमारे होते. कॉमर्सचे नरेशकुमार इंगळे होते. प्र.ई. सोनकांबळे, क्वचित निंबाळकर असत. पी.एस. भोगे होते. चित्रवेडा वसंत देसाई होता. मी, हिवराळे, वसंत असे

आम्ही अनेकदा एकमेकांसोबत उपाशी राहिलो. जे मिळाले ते एकमेकांनी मिळून खाल्ले आणि अभ्यासावर तुटून पडलो. याप्रकारे इथले अख्खे वातावरणच आमच्यासाठी अपूर्व शक्तिवर्धक झाले होते. त्यामुळे आमच्या प्रतिभा अनावर होऊन उधळत होत्या.

शिवाय आम्ही आमच्या मराठीच्या प्राध्यापकांचे खूप लाडके होतो. डॉ. भालचंद्र फडके प्रारंभी होते. पुढे प्रा. रा.ग. जाधव आले. प्रा. गजमल माळी होते. डॉ. श्री.म. पिंगे होते. प्रा. ल.बा. रायमाने होते. प्राध्यापक कक्षात या प्राध्यापकांशी आम्ही तासन्‌तास चर्चा करीत होतो. लिहिले ते वाचत होतो. त्यावर चर्चा करीत होतो. काय लिहावे यासंबंधी चर्चा चालत. मी बी.ए. प्रथम वर्षाला असताना फडके सरकारी नोकरीत रुजू झाले. तेव्हा महाविद्यालयाने त्यांना दिलेल्या निरोपाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे आभाळ आसवांनी सांडताना मी पाहिले. फडक्यांनी मलाही त्या काळात शिकविले होते. प्रा. गजमल माळी, प्रा. रा.ग. जाधव हे माझे आवडते प्राध्यापक होते. पुढे विद्यापीठात प्रा. वा.ल. कुळकर्ण्यांच्या अध्यापनाचा माझ्यावर अपार प्रभाव पडला. पण मिलिंदमध्ये प्रा. माळी, प्रा. जाधव यांच्या अध्यापनशैलीने मला खूप शिकविले. प्रा. रायमाने हेही विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. मिलिंदमधील हे मराठीचे आणि इतरही सर्व विषयांचे अध्यापन समाजपरिवर्तनाच्या चळवळीची ताकद वाढविणारेच अध्यापन होते. एका व्यापक पातळीवरून चाललेले हे नवसमाजनिर्मितीचेच अभियान होते. हे अध्यापन विद्यार्थ्यांच्या मनातल्या सुप्त जिद्दी जागवित होते. जीवनाशी संबंध न आलेल्या मनांना आता ज्वलंत जीवनाच्या ज्वालांची पालवी येत होती. अभाव तुडवून आलेल्या विद्यार्थ्यांना इथे जिंदगीच्या सर्वोच्च शिखरावर पोचवू इच्छिणारे पंख फुटत होते. मिलिंदमध्ये अशी स्वाभिमाननिर्मितीची मोहीम पूर्ण ताकदीनिशी राबविली जात होती. मिलिंदला येणारा अग्निमोहोर पाहूनही तिकडे विषमतेच्या इतिहासाला आग लागत होती. भूतकाळातील सामाजिक दुष्टता जीव देत होती.

: ५ :

'मिलिंद' या नावाने प्रा. रायमाने यांनी प्रथमच हस्तलिखित पाक्षिक सुरू केले होते. प्रा. रायमानेच त्याचे मार्गदर्शक होते. प्रथमांकाचा मी संपादक होतो. या पाक्षिकाने मिलिंदमधील विद्यार्थ्यांच्या मनातील वेदना आणि विद्रोह मांडायला प्रारंभ केला. मी यावेळी बी.ए. ऑनर्सचा विद्यार्थी होतो. या पाक्षिकातून मिलिंदमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांची लघूस्वकथने येत होती. मिलिंद महाविद्यालय याप्रकारे विराट कागद झाले होते. विद्यार्थी या कागदावर आजवरच्या त्यांच्या आयुष्याचा हिशेब

मांडीत होते आणि पुढल्या ज्वलंत आयुष्याचे नियोजनही मांडत होते. मिलिंद महाविद्यालय या काळात एका अपूर्व आंदोलनाला जन्मही देत होते आणि या आंदोलनाच्या साक्षीही आपल्या काळजावर कोरून घेत होते. उजेडाच्या न वाकणाऱ्या इतिहासाला इथे जन्म घेणे भागच होते.

१९६१ ते ७० या दशकातील मिलिद महाविद्यालयाच्या वार्षिकांकांचे गौरवशाली बोलणे कुणीतरी गंभीरपणे ऐकायला हवे. या काळात मुलांच्या प्रतिभा निकरालाच पेटल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या मनातील आग या अंकांनी जपलेली आहे. मजुरांची, भूमीहिनांची, अल्पभूधारकांची, कुठे अर्धपोटी असणाऱ्या गरिबांची ही मुले मिलिंदच्या मातीवर क्रांतीचे जाहीरनामे लिहायला लागलेली होती. हे मूलगामी युगांतर होते. मिलिंदच्या वार्षिकांकांमधून आजच्याही वाचकाला क्रांतीची सूत्रे वेचता येतील असे खूप लेखन या अंकांमधून प्रकाशित झाले आहे.

विद्यार्थ्यांच्या मनांना भरती आली होती. प्रत्येकाच्याच मनाला दरदिवशी नवनवा पीळ भरला जायचा. प्रत्यक्ष निर्धारानेच मिलिंदमधील विद्यार्थ्यांचे आकार धारण केले होते असा तो काळ होता.

: ६ :

१९५० ते ६० या दशकात मिलिंद महाविद्यालय महाराष्ट्रातील बहिष्कृत विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाचे पंख घेऊन गेले. इथे खूप विद्यार्थी आले. पण १९६० ते ७० या दशकात मिलिंद महाविद्यालय महाराष्ट्रात प्रतिभांचे धगधगते पुरावे घेऊन गेले. या दशकातील मिलिंद महाविद्यालय महाराष्ट्राच्या बौद्धिक जीवनात आंबेडकरी लॉजिक घेऊन गेले. आंबेडकरसंस्कृती घेऊन गेले. आंबेडकरवादी साहित्य घेऊन गेले.

या संपूर्ण काळावर डॉ. म.ना. वानखडेंच्या नेतृत्वाच्या गौरवशाली मुद्रा आहेत. ते १९५८ ते ६२ आणि १९६६ ते ६८ या काळातच प्राचार्य होते पण १९५८ नंतरच्या दोन दशकात मिलिंदने महाराष्ट्राच्या जीवनाला एक सांस्कृतिक क्रांती दिली. नवी वाङ्मयीन चळवळ दिली. या सांस्कृतिक क्रांतीचे कॅप्टन डॉ. म.ना. वानखडेच होते. निग्रोंच्या जीवनात आणि साहित्यात घडलेली जिवंत स्थित्यंतरे डॉ. वानखड्यांनी मान मोडून अभ्यासली होती. निग्रोंचे प्रतिकाराचे सौंदर्यशास्त्र आणि जीवनाच्या विद्रोहाचे सौंदर्यशास्त्र त्यांनी जवळून अभ्यासले होते. संपूर्ण जगाच्याच जीवनातील आणि साहित्यातील क्रांतीलढे त्यांना चांगले ज्ञात होते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात उभारलेला आमूलाग्र क्रांतीचा लढाही त्यांनी पाहिला होता. हा लढा अभ्यासलाही होता. एम.ए.ला शिकत असताना मी, सुखराम हिवराळे

आणि नरेशकुमार इंगळे यांच्या मदतीने डॉ. वानखड्यांची कवितेवर आणि पाश्चात्त्य कवितेतील नव्या प्रवृत्तींवर तीन व्याख्याने मिलिंदमध्ये घेतली होती. विषय ठरविताना प्रा. रा.ग. जाधवांचे मार्गदर्शन आम्ही घेतले होते. मिलिंदने महाराष्ट्राला दिलेल्या वाङ्मयीन क्रांतीमधली हीही एक देदीप्यमान पहाट होती. १९६७ साली भुसावळला बौद्ध साहित्यसंमेलन झाले. डॉ. म.ना. वानखडे अध्यक्ष होते. शाहीर अमरशेख उद्घाटक होते. मी, सुखराम हिवराळे, इंगळे असे काही मित्र भुसावळला गेलो. आमच्या कविता आणि आमची भाषणे वानखडेसाहेबांनी ऐकली. आमच्यातील ठिणग्या पाहून ते अंतर्मुख झाले. औरंगाबादेला आल्यानंतर त्यांनी आम्हाला घरी बोलावले. आम्ही गेलो. त्यांनी आमचा सविस्तर परिचय करून घेतला. प्रकाशनाच्या संदर्भातील आमच्या अडचणी जाणून घेतल्या आणि या अडचणींवर मात करण्याचा निर्धार त्यांनी केला. पुढे त्यांनी मिलिंदच्या मैदानावर सायंकाळच्या वेळी अनेक बैठकी आयोजित केल्या. 'सम्मादिट्ठी' या नावाचे नियतकालिक काढायचा त्यांनी निर्णय घेतला. पण नाव काहीसे अवघड वाटत होते म्हणून त्यांनी 'अस्मिता' हे नाव पक्के केले. या बैठकींना स्वतः डॉ. वानखडे अध्यक्ष असत. प्रा. रा.ग. जाधव असत, प्रा. ल.बा. रायमाने, सुखराम हिवराळे असत. मी अधूनमधून असे. कारण मी पैठणच्या महाविद्यालयात मराठीचा प्राध्यापक म्हणून रुजू झालो होतो. प्रा. रा.ग. जाधवांच्या, हिवराळेंच्या सहकार्याने त्यांनी 'अस्मिता' सुरू केले. 'अस्मिता'च्या पहिल्या अंकात दलित साहित्याची सांस्कृतिक आणि वाङ्मयीन भूमिका मांडून दाखविणारी आद्यचर्चा प्रकाशित झाली आहे. ही चर्चा १९ आणि २४ नोव्हेंबर १९६७ रोजी डॉ. म.ना. वानखडे यांनी आयोजित केली होती. या महाचिंतनात स्वतः डॉ. म.ना. वानखडे सहभागी झाले होतेच. शिवाय प्रा. वा.ल. कुळकर्णी, प्रा. मे.पुं. रेगे, प्राचार्य म.भि. चिटणीस आणि प्रा. रा.ग. जाधव हे विचारवंत सहभागी झाले होते. या महामंथनामागचे व्हिजन आणि नियोजन डॉ. वानखडेंचे आहे. दलित साहित्याच्या, आंबेडकरवादी साहित्याच्या महत्तेची मार्गदर्शक तत्त्वे या महाचर्चेने महाराष्ट्राला दिली. दलित साहित्याच्या व्यक्तिमत्त्वाचा जाहीरनामा असे या महाचर्चेचे स्वरूप आहे. म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रेरणेने उद्रेकून आलेल्या वाङ्मयीन चळवळीच्या वाटचालीचा मार्गदर्शक नकाशा या चर्चेने महाराष्ट्राला दिला असे म्हणायला हवे. आंबेडकरी साहित्याच्या चळवळीचे बीजचिंतन या चर्चेने महाराष्ट्राला दिले. पुढल्याच वर्षी डॉ. म.ना. वानखडेंनी मिलिंद साहित्यसभा स्थापन केली. म्हणजे नियतकालिक, साहित्याची आद्यचर्चा, तत्त्वज्ञान आणि त्या तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी करणारी वाङ्मयीन संस्था ही संपूर्ण मांडणी डॉ. म.ना.

वानखड्यांची आहे. या सर्वच अर्थांनी डॉ. म.ना. वानखडे हे आंबेडकरी साहित्यचळवळीचे घटनाकार ठरतात. डॉ. म.ना. वानखडेंच्या या सर्वच क्रांतिकारी उपक्रमांनी मिलिंदचा परिसर वाङ्मयीनदृष्ट्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या ढवळून निघत होता. डॉ. म.ना. वानखडे १९५८ ते ६२ आणि १९६६ ते ६८ या काळात मिलिंदचे प्राचार्य होते. पण मिलिंदने डॉ. म.ना. वानखड्यांच्या नेतृत्वाला १९६२ ते ६६ या काळातही मनातून कधी वजा केले नाही. याचा अर्थ असा की ते प्राचार्य नसतानाच्या मधल्या काळातही आणि १९६८ नंतरच्या काळातही त्यांच्या महानायक नेतृत्वाची प्रभाच मिलिंदमध्ये सर्वत्र दरवळत होती.

: ७ :

आंबेडकरवादी साहित्याला तात्त्वज्ञानिक व्यक्तिमत्त्व देण्याचे ऐतिहासिक कार्य मिलिंदचे आदरणीय प्राचार्य म्हणून डॉ. म.ना. वानखड्यांनी केले. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात अनेक लेखक लिहीत होते. काही छोट्या संस्थाही त्या त्या भागात निर्माण झाल्या असतील पण संपूर्ण महाराष्ट्राला आणि पुढे भारताला कवेत घेणारी व्यापक वाङ्मयीन आणि सांस्कृतिक चळवळ मिलिंदच्या कुशीतून जन्माला आली. मी १९६५ पर्यंत मिलिंदचा विद्यार्थी होतो. १९६७ पर्यंत त्यावेळच्या मराठवाडा विद्यापीठात विद्यार्थी होतो. मिलिंद परिसराला लागूनच विद्यापीठ असल्याने मी १९६७ पर्यंत मिलिंद परिसराचाच घटक होतो. १९६७ साली मी पैठणच्या प्रतिष्ठान महाविद्यालयात मराठीचा प्राध्यापक म्हणून रुजू झालो तरी पुढे १९६९ पर्यंत मी मिलिंदमध्येच मनाने वावरत होतो. या मातीत जीव गुंतला होता. ते माझे माहेर होते आणि त्याची माया सोडवत नव्हती. याही काळात आणि डॉ. वानखडे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगात गेल्यानंतरही मी त्यांच्या संपर्कात होतो. आमचा पत्रव्यवहार होता. या सर्व गोष्टींमधून मला हे जाणवलेले आहे की मिलिंदच्या आयुष्यात ज्या ऐतिहासिक घडामोडी घडल्या, महाराष्ट्राच्या वैचारिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि वाङ्मयीन जीवनाला मिलिंदने स्वतंत्र प्रज्ञेचे मोहरे दिले. त्या सर्व मिलिंदकाळाचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष नेतृत्व डॉ. म.ना. वानखडे यांनी केले.

: ८ :

मिलिंद महाविद्यालयाने महाराष्ट्राला आणि देशाला गौरव वाटावा अशी कर्तृत्वे दिली. अर्जुनराव कस्तुरे, न्या. नरेंद्र चपळगावकर, एम.डी. नलावडे, भालचंद्र वराळे, एन.डी. कांबळे, बी.आर. कांबळे, एम.एल. कासारे, एम.एफ. गांजरे, प्र.ई. सोनकांबळे, सुखराम हिवराळे, भगवान भटकर, योगीराज वाघमारे, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेगावकर, सुखदेव थोरात, कृष्णा इंगळे, उद्धव कांबळे, विजयकुमार

गवई, अविनाश डोळस, प्रमोद वाळके 'युगंधर', राम दोतोंडे अशी खूप कर्तृत्वे मिलिंद महाविद्यालयाने महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या क्षेत्रांना दिली. मला मिलिंदच्या आयुष्यातील सर्वश्रेष्ठ सृजनकाळात, सोन्याप्रमाणे झळाळणाऱ्या काळात मिलिंदचा विद्यार्थी राहता आले हा आता माझ्यासाठी अपार गौरवाचा भाग झाला आहे.

: ९ :

स्वतःचे महत्त्व सांगणारे वा स्वतःचे मूल्यन करणारे विधान इथे मी करणार नाही. मिलिंदने दिलेली संस्कृती मला तशी अनुमती देत नाही. शिवाय माझ्या साहित्याच्या संदर्भात खूप जाणकार बोललेले आहेत. बोलत आहेत. तेव्हा मीच माझ्यासंबंधी बोलण्याचा मुद्दाच उरत नाही. पण काही तपशील लोकांना कळायला हवा यासाठी लिहायला हवे

मी अत्यंत छोट्या खेड्यातला. आईवडील अत्यंत गरीब आणि अशिक्षित. मिलिंद महाविद्यालयात दर महिन्याला शिष्यवृत्ती मिळते हे समजले त्यामुळे मी मिलिंदमध्ये आलो. अन्यथा दहावीपाशीच गरिबीने माझे शिक्षण गिळले असते. पण मी मिलिंदमध्ये पोचलो तेव्हा प्री. युनिव्हर्सिटीची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली होती. मोठ्या हिंमतीने प्राचार्य डॉ. वानखडेंना भेटलो. 'कॉमर्सला प्रवेश घे' म्हणाले. आभाळ फाटलेल्या मनाने 'मी कविता लिहितो सर', एवढे मी त्यांना म्हटले, काय ते त्यांच्या लक्षात आले. त्यांनी मला कवितेमुळे प्रवेश दिला. पुढे पहिली शिष्यवृत्ती तीस रुपये मिळाली. ते तीस रुपये तळहातावर घेऊन खूप वेळ मी पाहातच राहिलो. एवढी मोठी रक्कम मी आयुष्यात प्रथमच पाहात होतो. बाबासाहेबांसंबंधीची कृतज्ञता दोन अश्रू होऊन डोळ्यात तरळली.

मी त्या काळात आपले उच्चार चुकतील म्हणून बोलत नव्हतो. पण पुढल्या काळात आंध्रप्रदेशात, पंजाबमधील पतियाळापर्यंत, भोपाळपासून दिल्लीपर्यंत भाषणे दिली. कविता, समीक्षा, वैचारिक, पत्रे, कादंबऱ्या, प्रवासवर्णन, ललित निबंध असे विविध प्रकारचे लेखन मी केले. महाराष्ट्र शासनाचा कवी केशवसुत पुरस्कार, महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार तसेच नागपूर विद्यापीठाचा सर्वश्रेष्ठ जीवनसाधना हा पुरस्कार, समाजभूषण पुरस्कार, मिलिंद महाविद्यालयाचा प्रतिष्ठेचा मिलिंद समता पुरस्कार असे अनेक पुरस्कार मला मिळाले. विद्यापीठ स्तरावरील बेस्ट टिचर अवार्ड मिळाला. २०१२ मध्ये मारवाडी फाउंडेशनचा पाच लाखाचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार मिळाला. १२ व्या वर्गापासून पुढे सर्वच विद्यापीठांमधून, महाराष्ट्राबाहेरीलही विद्यापीठामधून बी.ए.च्या सर्व वर्गांच्या, बी.एस्सी.च्या आणि वाणिज्यच्या काही

वर्गांच्या अभ्यासक्रमात कविता अभ्यासल्या जातात. एम.ए.च्या पातळीवर सर्वच विद्यापीठात उत्थानगुंफा आणि काही विद्यापीठांमध्ये जीवनायन, रमाई, यशोधरा, सावित्री या कादंबऱ्या नवे साहित्यशास्त्र असे साहित्य अभ्यासले जाते. अनेक संशोधकांना माझ्या साहित्यावर पीएच.डी. ही पदवी मिळाली आहे. खूप संशोधक संशोधन करीत आहेत.

मिलिंदचा विद्यार्थी म्हणून मला आंबेडकरवाद मांडावा लागला. बुद्धिवादी सौंदर्यशास्त्र मांडावे लागले. आंबेडकरवादी मराठी साहित्याचा इतिहास लिहावा लागला. शिवाय मी खूप वैचारिक लढाया सुरू केल्या. खूप लढाया लढलो. समरतसवाद्यांसोबत मी लढाई सुरू केली. ओशोच्या संदर्भात मी लढाई सुरू केली. डॉ. बाबासाहेबांच्या हिंदूकरणाविरुद्ध मी लढाई सुरू केली. बांधिलकीचा विरोध करणारांच्या विरोधात लढाई सुरू केली. कलावादाच्या विरोधात लढाई उभी केली. दलित या शब्दाच्या विरोधात लढाई सुरू केली. एकूण साडेअकरा-बारा हजार मुद्रित पृष्ठांचा प्रपंच माझ्या नावावर उभा आहे.

आज मी सत्तरीच्या अंगणात उभा आहे. आजही मिलिंदसंबंधी तटस्थपणे लिहिता येणे कठीण आहे. या लेखाच्या निमित्ताने आजवरच्या जगण्याचा नकाशा मी मनात अंथरलेला आहे. त्यात बारमाही झुळझुळणाऱ्या भूमिगत नद्या आहेत. निर्धारांचे पोलादी पहाड आहेत. भूतकाळ मी आजही वाचतो; पण भूतकाळात जात नाही. भूतकाळाचे वाचन वर्तमानाचा गुंता सोडवताना दिग्दर्शकाचे काम करते. भूतकाळाला मी शिक्षक मानतो. हा शिक्षक मला त्यातही उपकारक जीवनसत्त्वे तेवढी घ्यायची अनुमती देतो. मी वर्तमानात जगतो; पण या जगण्याला मी वर्तमानाच्या चौकटीत बंदिस्त होऊ देत नाही. काय घडावेच्या स्वप्नाने मी वर्तमानाचा फलक चितारतो आणि चित्रातील स्वप्नाला उद्याच्या उज्ज्वल वास्तवात रूपांतरित करण्यासाठी धडपड करीत राहतो. मी मिलिंदसुत आहे. हे मन मला मिलिंदने दिले. शेवटी एवढेच म्हणेन -

**''मिलिंदने दिलेल्या पंखांनी उंच उंच उडतोच आहे**
**अंधाराशी भांडतोच आहे, चंद्रसूर्याची फुले खुडतोच आहे.''**

■■

# माझ्या वाट्याला आलेले मिलिंदचे मातृत्व

माझ्या संपूर्ण भावनिक आणि बौद्धिक व्यक्तिमत्त्वाचा जन्म मिलिंद महाविद्यालयाच्या पोटी झाला. मला असा ज्वलंत जन्म देणाऱ्या मिलिंदच्या या महामातृत्वाचा मला नेहमीच आदर वाटत आलेला आहे. १९६१ ते १९६५ या काळात मी मिलिंदमध्ये विद्यार्थी होतो. आजच्या माझ्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी याकाळात झाली. एखाद्या शिल्पकाराने आपल्या शिल्पनिर्माणगृहात मोठ्या मेहनतीने एखादे शिल्प घडवावे तसे मला मिलिंद महाविद्यालयाने घडवले असे मला वाटते. आपल्या मुलाच्या तेजस्वी निर्माणासाठी आईने आपली सर्व शक्ती पणाला लावावी त्याप्रमाणे मिलिंद महाविद्यालयाने माझ्या निर्माणासाठी विशेषच सजग आणि चोखंदळ भूमिका अदा केली असे मला वाटते. त्यामुळेच मिलिंदला मी माझे मातृत्व म्हणून सन्मानित करतो.

मला जन्म देणाऱ्या मैनाबाई नावाच्या माझ्या मायमध्ये आणि माझ्या भावनिक आणि वैचारिक व्यक्तिमत्त्वाच्या पिसाऱ्याला जन्म देणाऱ्या मिलिंद महाविद्यालय नावाच्या माझ्या आईमध्ये असलेले एक महत्त्वाचे साम्य मात्र मी सांगायला हवे. माझ्या मायला मुलगी नव्हती. मी तिचे शेवटचे अपत्य. माझ्या जन्माच्या वेळी तरी आपल्याला मुलगी होईल असे तिला खूप वाटत होते. पण माझ्या जन्माने तिचा अपेक्षाभंग केला. त्यामुळे मला ती जवळ घेत नव्हती. दूध पाजत नव्हती. तिच्या स्वाभाविक आणि न्याय्य भुकेमुळे मी पृथ्वीवर पाय ठेवल्यापासूनच तिला नकोसा होतो. पण पुढे मात्र इतर मुलांपेक्षा तिने माझ्यावरच जास्त माया केली. माझ्यासाठी तिने अपार कष्ट केले. मी शाळेत जात नव्हतो तेव्हा वडील मारायचे मला आणि रडायची ती. मी मिलिंदमध्ये शिकायला आलो तेव्हा तिचे आभाळच फाटले. गरिबीला ठिगळे लावीत तिने आम्हा भावांना जगवले. मी काटोलच्या शाळेत शिकत असताना तिने सुटीच्या दिवशी मला निंदायला नेले. स्वतःची पाथ पूर्ण करून ती माझी पाथ पूर्ण करायची. हे पैसे मला वह्या पुस्तकांसाठी आणि पेन घेण्यासाठी उपयोगी पडायचे.

मी नागपूर जिल्ह्यातल्या येरंला या अत्यंत छोट्या खेड्यातला. मी औरंगाबादेला येण्यापूर्वी नागपूरही बघितले नव्हते. औरंगाबाद कुठे आहे, किती दूर आहे हे मलाही माहीत नव्हते. माझ्या आईसकट घरातील कोणालाही माहीत नव्हते.

त्यामुळे औरंगाबाद म्हणजे परका मुलूख. परदेश. तेथे कोणी ओळखीचे नाही. खेड्याबाहेर कधीही पाऊल न टाकलेल्या या मुलाचे कसे होईल ? चिंतेने माझी आई व्याकूळ झाली होती. औरंगाबादेला जायला मी घराबाहेर पाऊल टाकले तेव्हा तिच्या डोळ्यांना झड लागली होती. मी औरंगाबादेला असताना तिला उपासतापास पडले. तरी ती रडली माझ्यासाठीच. तिने या काळात कधी सणासुदीला घरात गोडधोड झाले तर खाल्ले नाही. ताट पुढे आले कि ती मुळुमुळु रडत राहिली. मुलाला तिथे पोटभर जेवण मिळत असेल काय या काळजीने तिचा जीव व्याकूळ होई.

पण पुढे मीच तिचे सर्वस्व झालो. तिच्या इतर मुलांपेक्षा तिने माझ्यावरच जास्त माया केली. तिचे गरीब आणि अशिक्षित आयुष्य माझ्याविषयीच्या अपार गौरवाने आभाळ गच्च भरून यावे तसे भरून राहिले.

मिलिंद या माझ्या सांस्कृतिक आईच्या संदर्भातही असेच घडले. मी मिलिंदचा मुलगा. पण माझ्या आईप्रमाणेच मिलिंदने मला सुरुवातीला जवळ घेतले नाही. मिलिंदनेही मला थोडे दूर लोटून माझी परीक्षाच घेतली. मी १९६१ साली मिलिंदमध्ये आलो. माझ्यातल्या छोट्या पण साहसी कोलंबसाने मिलिंद शोधले होते. त्यासाठी परिस्थितीचे केवढे तरी वादळ पार करून मी आलो होतो. मी मिलिंदमध्ये आलो होतो. पण मिलिंदला मी नको होतो. प्रीयूनिव्हर्सिटीची प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाली होती. मला प्रवेश नाकारला गेला होता. माझ्या संपूर्ण आयुष्यात हा प्रतिमाबंध (Motif, प्रतिमान) खूपदा पुनरावृत्त झाला आहे. प्रारंभी मला खूपदा टाळले जाते आणि नंतर मला इतर कोणाहीपेक्षा कवटाळले जाते. या अर्थाने माझ्या आयुष्यात मी पहाटेशिवाय उगवलो आणि पुढे सूर्यनेच मला जवळ केले. त्याचा हात धरूनच मीही प्रकाशत राहिलो. या कल्पनाबंधाने उदाहरण म्हणून माझी निवड केली असावी असे मला आता वाटते. या कल्पनाबंधाने त्याच्या प्रयोगासाठी माध्यम म्हणून माझी योजना केली असावी असे मला वाटते. या कल्पनाबंधाचे वैशिष्ट्य असे की प्रारंभी मला दुःखाने धाय मोकलून रडावे लागते आणि शेवटी मला परमआनंदाने पिसारत रडावे लागते. दरवेळी प्रारंभी माझ्यापुढे जमीन पहाडासारखी उभी राहते. पुढे मात्र पहाडच जमिनीसारखा माझ्यासाठी जीव अंथरतो. प्रारंभकाळात पाऊस पाठ फिरवितो आणि पुढे मात्र तो जिवलगासारखा पाठ सोडीत नाही. माझा प्रारंभ काट्याकुट्यांमधून सुरू होतो आणि पुढे चांदण्याची रिमझिम मला थोपविता येत नाही. दरवेळी माझा प्रारंभ अडचणींनी आणि संकटांनी फाटत राहतो आणि पुढे मात्र माझे आयुष्य अडचणींवर आणि संकटांवर मात करीत विजयाचे गड सर करीत राहते. दरवेळी माझा प्रारंभ आपुलकीच्या आणि स्नेहाच्या दुष्काळात आक्रंदत राहतो. पुढे मात्र आपुलकीचे

आणि स्नेहाचे चांदणे माझ्या आभाळात मावत नाही. माझ्या भरतीला येणाऱ्या नक्षत्रांच्या फुलांमधून अपूर्वाचा नम्र सुगंध ओसंडून वाहत राहतो.

प्रारंभी मिलिंदनेही माझ्यासंदर्भात माझ्या मायसारखीच पान्हाचोर भूमिका घेतली. प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाल्याने मला प्रवेश मिळणे कठीण झाले. माझे खेड्यातले लहानपण भांबावून गेले. एक छोटासा दिवा वादळात सापडला. मी खूप रडलो. मी भयानक अनाथ झालो होतो.

मोठे स्वप्न घेऊन मी मिलिंदमध्ये आलो होतो. मिलिंदमध्ये येण्यापूर्वी कितीतरी वेळा स्वप्नातल्या स्वप्नात मी मिलिंदमध्ये आलो होतो. मिलिंदच्या कुशीत विसावलो होतो. स्वप्नांच्या डेरेदार झाडावर चढून मी त्यापुढल्या स्वप्नांच्या शक्यतांशी बोललो होतो. स्वप्नांच्या हिंदोळ्यावर बसून मी त्याहीपुढल्या अदृश्य स्वप्नासोबत चर्चा केली होती. खूप शक्यतांचे ताटवे मनात फुलवले होते. खूप संभाव्यतांचे कुंज मनात मोहोरले होते. स्वप्नात मिलिंदची माती मला पोलादाचे पंख देत होती. मी या पंखांनी माझ्या सुंदर आणि सर्जनशील भवितव्याच्या तारांगणात भराऱ्या घेत होतो. मी एका स्वप्नलोकांचा नागरिक झालो होतो. मलाच एका झगमगत्या स्वप्नाचा आकार प्राप्त झाला होता. मी स्वप्नाच्या मनानेच मिलिंदच्या मातीत वावरत होतो. स्वप्नाच्या रमणीय भाषेतच मी स्वप्नांशी बोलत होतो. मी स्वप्नांची संहिता झालो होतो.

पण प्रीयूनिव्हर्सिटीची प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाल्याने मी स्वप्नांच्या आकाशातून एकदम खाली कोसळलो होतो. पार अनाथ झालो होतो. भोवती कोणी ओळखीचे नाही. आता कुठे जावे आणि कसे जावे ? काही कळत नव्हते. गावी जायलाही जवळ पैसे नाहीत. मी खूप अगतिक झालो. भयानक अस्वस्थतेने मला घेरले. मी मिलिंदमध्ये फुलायला आलो होतो. पण माझ्यावर पाळी मात्र कोमेजण्याची आली होती. स्वप्नाने दाटलेले माझे डोळे आता मात्र आसवांनी दाटले. सारे आसमंत फाटून जाईल असा हंबरडा मी झालो.

डॉ. म.ना. वानखडे प्राचार्य होते. मोठी हिंमत करून त्यांच्याकडे गेलो. ते म्हणाले – 'कॉमर्सला प्रवेश घे. मी प्राचार्यांना सांगतो' माझ्या संपूर्ण चेहऱ्यावर आसवांचे ढग दाटलेले. डोळे रडवेले झालेले. मी उद्ध्वस्त झालो होतो. माझ्या ओठात शब्द येत नव्हते. त्याऐवजी डोळ्यात अश्रू येत होते. शब्दांचे काम यावेळी अश्रूंना करावे लागत होते. रडत रडतच मी त्यांना म्हटले 'सर, मला कविता करायची आवड आहे.' वानखडे साहेब कवी होते. साहित्याचे अभ्यासक होते. त्यांना माझे अश्रू कळले. माझा प्रामाणिकपणा आणि माझा उद्ध्वस्तपणा त्यांच्या शोधक नजरेने अधोरेखित केला. माझा प्रवेश अर्ज लगेचच त्यांनी मागविला. मला प्रवेश दिला.

माझे मन परत स्वप्नांचे झाड झाले होते. मी मिलिंदचा विद्यार्थी झालो. पण त्याआधी मला मिलिंदने खूप रडवले होते. खूप अगतिक केले होते. खूप उद्ध्वस्त केले होते. कल्पनाबंधाचा हा मला छळणारा पूर्वार्ध होता.

१९६१ साली शिष्यवृत्तीचे तीस रुपये पहिल्यांदा मिळाले होते. एवढी मोठी रक्कम मी पहिल्यांदाच बघत होतो. तेव्हा ते तीस रुपये हातावर घेऊन मी रडलो होतो. या शिष्यवृत्तीनेच मला मिलिंदमध्ये आणले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या महाविद्यालयात महिन्याला तीस रुपये मिळण्याची सोय नसती तर ? तर कदाचित औरंगाबादेला येणे दूरच राहिले, मी शिकूच शकलो नसतो. त्यामुळेच बाबासाहेबांना कळवळून म्हणावेसे वाटते. 'बाबासाहेब, मला तुम्ही शिकविले. नाहीतर मी खेड्यातील अंधाराच्या पुरात वाहून गेलो असतो. मी कोणाला दिसलोच नसतो. माझे प्रेतही कोणाच्या हाती लागले नसते. पण आज महाराष्ट्रभर आणि देशा-परदेशातही खूप लोक मला ओळखतात. खूप लोक माझ्यावर, माझ्या साहित्यावर प्रेम करतात. बाबासाहेब, याला कारण तुमचे मिलिंद आहे.'

मिलिंदमध्ये मला प्रवेश मिळाला. तो मिळाला नसता तर ? साहित्यावर प्रेम करणारे डॉ. म.ना. वानखडे त्यावेळी प्राचार्य नसते तर ? तर कदाचित मला प्रवेशच मिळाला नसता. पण मिलिंदचा मला त्यावेळी असलेला नकार तांत्रिक होता. तात्कालिक होता. तो माझ्या चिवटपणाच्या चाचणीचा भाग होता असे आता वाटते.

पण या मिलिंदनेच पुढे माझ्यावर अपार माया केली. कदाचित इतर कोणावरही केली नसेल इतकी माया मिलिंदने माझ्यावर केली. मीही मिलिंदचा सर्वात लाडका मुलगा होण्यासाठी जिवाचे रान केले. रात्र रात्र जागलो. खूप अभ्यास केला. घरची गरिबी होतीच. उपाशी राहावे लागे. छावणीमध्ये एक गार्डन आहे. तिथे मी अभ्यास करायला जात असे. छावणीतच मी खोली केली होती. कधी पैसे नसत. खायला काहीही मिळत नसे. त्यावेळी या गार्डनमध्ये मी पाण्यालाच भाकर मानले आणि पाणी पिऊन भुकेला समजावले. खूपदा समजावले. मी पोलादी व्हावे म्हणून मिलिंद महाविद्यालय माझा प्रारंभ आणि माझी आतडी अशी उन्हात वाळवित होते. मी हे एकटाच भोगत होतो. इथे कोणाला काही सांगण्यासारखे नव्हते आणि आई-वडिलांनाही लिहून कळवण्यासारखे नव्हते. वणव्यात मीच हट्टाने शिरलो होतो. पिसाऱ्याला थोडी आग लागणे अपरिहार्यच होते.

मी प्रीयूनिव्हर्सिटीची परीक्षा पास झालो. मॅट्रिकपेक्षा थोडे कमी मार्क्स पडले होते. बी.ए. प्रथम वर्षाला मी प्रवेश घेतला होता. मराठी साहित्य, मानसशास्त्र

आणि राज्यशास्त्र हे विषय घेतले होते. मानसशास्त्र पाटील मॅडम शिकवित. सुंदर शिकवित. मी आपला लाजरा बुजरा. कोपऱ्यात कुठेतरी अंग चोरून बसणारा गरीब विद्यार्थी. डोक्यात आईला-वडिलांना पडणारे उपास फडफडत असत. आईचे माझ्यासाठी रडणे खूपदा डोळ्यात दाटून राही. अशाच हरवलेल्या मनःस्थितीतील मला परीक्षेत पडलेल्या गुणासंबंधी पाटील मॅडमनी विचारले. 'तुला कमी मार्क्स का मिळाले? कुणाच्या प्रेमात बिमात पडलास काय ?' असे त्यांनी गंमतीने आणि अत्यंत आपुलकीने मला विचारले. पण माझ्यातले खेडे त्या गमतीनेही खूप गंभीर झाले आणि त्यापेक्षाही माझ्यातली गरिबी त्यांच्या त्या प्रश्नांनी आतल्या आत खूप रडली. कारण त्याही वेळी मला खूप उत्कटपणे हे वाटले की गरिबी आपल्याला एक वेळ अभ्यास करू देईल पण कोणावर प्रेम करू देणार नाही आणि आपण इथे स्वतःची निर्मिती करायला आलो. स्वतःला उद्‌ध्वस्त करायला आलो नाही आणि याहीवेळी असे वाटले की असे काही घडलेच आयुष्यात तर त्याचाही आरंभ दुःखाच्या रडण्यानेच होणार आणि खूप शेवटी कुठेतरी या संदर्भात आपल्याला अपार आनंदाने पण रडावेच लागणार. अश्रू असे सापेक्ष असतात. धन्यवाद आइन्स्टाइन !

पण मिलिंद नावाच्या या माझ्या मातृत्वानेही माझ्यावर अपार माया केली. त्याच्या मातृपरिसरात असताना केली नाही. केली ती फार थोडी केली. पण पुढे? पुढे तर त्याने आपल्या कोणाही मुलावर केली नाही ती माया आपल्या या पराकोटीच्या बुद्धिवादी आणि उत्कट ललित मुलावर केली. त्याच्यापासून मी जसजसा दूर गेलो तसतशी त्याची माझ्यावरची माया अप्रतिम आणि अथांग होत गेली. भावकवितेसारखी उत्कट आणि मला जन्म देणाऱ्या माझ्या मायच्या मायेसारखी अनन्य आणि अनुपम होत गेली.

छावणीकडून जयसिंगपुऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या उजव्या बाजूने मिलिंदची बाग आहे. त्या बागेत मी तास नसताना तासन्‌तास अभ्यास करीत बसलो आहे. ज्या बोधिवृक्षाखाली मी बसत होतो. तो बोधिवृक्ष खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लावला होता. त्या बोधिवृक्षाची सावली मला माझ्या आईच्या सदिच्छांसारखी वाटे. मिलिंद महाविद्यालयाच्या अपेक्षेसारखी वाटे. या बोधिवृक्षालाही मी पाठ झालो होतो. माझे रडणे त्या झाडाला पाठ झाले होते. माझे तासन्‌तास कविता लिहिणे त्याला पाठ झाले होते. माझ्या मनातील स्वप्नपिसारा त्या बोधिवृक्षाखाली फुलत राही. माझ्या मनातील यातनांचे ढग त्या बोधिवृक्षाखाली दाटीवाटीने उतरून येत असत. माझ्या भावविश्वाला आलेली चांदण्यांची भरती या बोधिवृक्षाखाली शब्दमय होत असे आणि माझ्या मनाच्या ओहोटीने या बोधिवृक्षाची पाने अश्रू गळावेत तशी

गळत असत. मिलिंद हा माझा मनस्वीपणा, हा माझा वेडेपणा कौतुकाने पाहत आहे असे मला त्यावेळीही वाटले होते. आता वाटते मला असे पाहत असताना मिलिंदच्याही डोळ्यांच्या कडा कौतुकाने ओल्या झाल्या असाव्यात.

स्टेडियमच्या बाजूने मैदानावर एक महारुख होता. तो मला माझ्यासारखाच त्या मैदानावर एकटा वाटे. तो महारुख मला उन्हातही एकटाच जळतो आहे असे वाटे. पावसातही एकटाच भिजतो आहे असे वाटे. हिवाळ्यात एकटाच गारठून जातो आहे आणि रात्री एकटाच रडत बसतो आहे असे वाटे. तो मला माझ्यासारखाच वाटे.

मी खूपदा त्या महारुखाखाली एकटाच बसलो आहे. तो एकटा. मी एकटा. या दोन एकटेपणाची बेरीज मी मनात करून पाही. खूपदा तो माझा एकटेपणा माझ्या नकळत पिऊन घेतो आहे असे वाटे. त्याच्या एकटेपणावर मी मनातल्या मनात फुंकर घालीत असे. ग्रंथालयातील खूप पुस्तके किंवा नियतकालिके या महारुखाखाली मी वाचीत बसलो आहे. माझा शोध घेत काही जवळचे मित्र तिकडच्या बागेतल्या बोधिवृक्षाखाली वा या झाडाखालीच येत. मिलिंदने या ज्ञान

झाडांच्या ओटीत मला घातले आहे हे या मित्रांना माहीत होते. त्यामुळे मी सापडण्याची ठिकाणे म्हणजे ही झाडे असे माझ्या काही जिवलग मित्रांना माहीत होते.

मनात स्वप्ने पिसारत होती. स्वप्नांना पंख फुटत होते. पंखात उड्डाणे दाटत होती. त्यावेळी या सर्व गोष्टींचा जितका त्रास व्हायचा त्याहून जास्त आनंद व्हायचा. मला असे वाटायचे की झाडांवर फुले माझ्या वतीने फुलत आहेत. क्षितिजात पहाट माझ्या वतीने होत आहे. सूर्य दररोज माझ्यासाठी प्रकाशाचे नवनवे लेख आणि ठिणग्यांच्या कविता घेऊन येतो आहे असे वाटायचे. या सर्व गोष्टींनी मन तुडुंब भरून वाहत असायचे.

मी फारसा कोणाशी बोलत नसे. कोणाकडे फारसे बघत नसे. उच्चार चुकतील या भीतीने बोलत नसे. संपर्क वाढून आपला एकाकीपणा, आपला मनस्वीपणा धोक्यात येईल म्हणून मी कोणाकडे फारसे बघत नसे. काहीसा आपल्यातच रमणारा विद्यार्थी मी होतो. आपल्याला लागलेली आग विझेल असा पाऊस मी टाळत असे. आपली अस्वस्थता भंगेल अशी स्वस्थता मी टाळत असे. मला बेचैनीच्या सहवासात फार रिलॅक्स वाटत असे म्हणून माझ्या बेचैनीचे अपहरण करणाऱ्या कोणालाही मी जवळ येवू देत नसे.

सुखराम हिवराळे, वसंत देसाई, नरेशकुमार इंगळे यांनी मात्र माझ्या जळत्या

अंतराळाचा अभ्यास करायला प्रारंभ केला होता. माझ्या सुखदुःखाच्या अरण्यात ते कधी कधी हक्काने शिरत असत. ही थोडीच मित्रमंडळी माझ्या काहीशी जवळ आली आणि तरीही मी माझा एकाकीपणा, माझा मनस्वीपणा कोणाला चोरू दिला नाही. माझ्याजवळ दुसरे काहीच नव्हते. एक उत्कट संवेदनशील मन होते. आईचे आसवांनी बोलणारे डोळे माझ्याजवळ होते. थोड्या थोड्या गोष्टींनी व्याकूळ होणारे आणि आतल्या आत जळत राहणारे काळीज माझ्याजवळ होते. ते शब्दांसाठी हंबरत राहत असे. या हंबरण्याची शब्दांशी गाठ घालून देण्यासाठी मला माझ्या एकांताच्या गुहेत सतत कोंडून घ्यावे लागे.

मिलिंद या सर्व झपाटलेल्या काळात डोळ्यात कौतुक घेऊन त्याच्या यशवंत मनोहर नावाच्या मुलाला पाहत असे. आपल्याच धुंदीत जगणाऱ्या मला त्याचे हे पाहणे तेव्हा खूपदा दिसलेच नाही. पण त्याने माझ्यावर प्रेम करायचे मनातल्या मनात ठरवले असावे.

प्रा. ल.बा. रायमाने यांनी हस्तलिखित मिलिंद पाक्षिकाची योजना तयार केली. डॉ. म.ना. वानखड्यांची अनुमती मिळविली. १२-१२-१९६३ साली त्याचा पहिला अंक माझ्या संपादनाखाली प्रकाशित झाला. डिसेंबर १९६३ च्या स्नेहसंमेलनात 'प्रेमा तुझा रंग कसा' या नाटकाचा प्रयोग झाला. त्यात मी नायकाची भूमिका केली. १९६५ च्या कॉलेज मॅगेझिनच्या मराठी विभागाचा संपादक मी होतो. १९६५ साली मी बी.ए. ऑनर्सला होतो. मिलिंदमध्ये प्रथमच यावर्षी ऑनर्स सुरू झाले होते. आमची यावर्षीची ऑनर्सची पहिली बॅच होती. मी आणि अरुणा लोखंडे असे दोघेच विद्यार्थी ऑनर्सला होतो. प्रा. रा.ग. जाधव, प्रा. गजमल माळी, डॉ. श्री.म. पिंगे आणि प्रा. ल.बा. रायमाने आम्हाला शिकवित असत.

यावर्षी विद्यार्थी मंडळाच्या निवडणुकीला हिवराळे उभे होते. मी बुजरा. भाषण म्हणजे मला संकट वाटे. पण सुखराम हिवराळेंनी मला बळेच प्रचारात ओढले. वर्गावर्गात मग मी जमेल तसे बोललो आणि या प्रचारमोहिमेचा भाग म्हणून व्हरांड्यातील गदारोळातही गेलो. प्रा. गजमल माळींनी एका विद्यार्थ्याला पाठविले. मला त्या गर्दीतून प्राध्यापककक्षात बोलावून घेतले. म्हणाले, 'आताच्या आता ग्रंथालयात जा. एखादे चांगले पुस्तक काढून वाचत बैस. तुझी जागा तिथे आहे. ही तुझी जागा नव्हे. हा तुझा स्वभाव नव्हे. हा गदारोळ इथेच राहून जाईल. पण वाचशील ते पुस्तक आयुष्यात तुझी सोबत करील.' मी लायब्ररीत गेलो. वाचत बसलो. आता या सर्व गोष्टीचा अर्थ कळतो आणि मी माझी काळजी घेणाऱ्या मिलिंदच्या मातीला विनम्रमनाने मुजरा करतो.

बी.ए. ऑनर्सच्या वर्गात असताना मिलिंदच्या इतिहासातील Budding Poet ही पहिली उपाधी मिलिंदने मोठ्या गौरवाने कवी वा.रा. कान्ताच्या हस्ते मला दिली. कॉलेज वार्षिकांत तसे छायाचित्र छापले.

**" मिलिंद जय अभिमान आमुचा**
**तू एक तीर्थ महान**
**भीमा वंदुनी गाऊ निशिदिनी**
**मंगल तव जयगान "**

हे मी लिहिलेले मिलिंदगीत काही काळ कार्यक्रमाच्या आरंभी मिलिंद परिसरात गायले जायचे. तीन वर्षे छावणीत खोली करून राहिलो. स्वत:च स्वयंपाक केला. कधी उपाशी राहिलो. याही स्थितीत आम्ही मित्र काव्यमैफली करीत होतो. शैक्षणिक, सामाजिक प्रश्नांवर चर्चा करीत होतो. एकमेकांच्या खोल्यांवर आमच्या बैठकी होत. आमच्या जाणिवांना आता स्पष्ट दिशा मिळू लागली. सामाजिक प्रश्नांचा विचार व्हायला लागला. व्यक्तिगत पातळीवरचे आमचे जगणे आता सामाजिक पातळीवर गडदपणे वावरायला लागले. आमच्या मनांची क्षितिजे जशी मिलिंदमध्ये होणाऱ्या विद्वानांच्या व्याख्यानमालांनी आणि वर्गामधील प्राध्यापकांच्या व्याख्यानांनी विस्तारत होती तशी मित्रांशी होणाऱ्या चर्चांनीही विस्तारत होती.

१९७९ साली मिलिंदच्या मेन होस्टेलमध्ये कमलेश्वरांच्या अध्यक्षतेखाली दलित साहित्यसंमेलन भरले होते. प्रा. गं.बा. सरदार पूर्वाध्यक्ष म्हणून उपस्थित होते. घनश्याम तळवटकर उद्घाटक होते. मला ऐनवेळी कवीसंमेलनाचा अध्यक्ष व्हावे लागले होते. समीक्षेवरच्या परिसंवादात वक्ताही होतो. भालचंद्र नेमाडेही या परिसंवादात एक वक्ते होते. खूप मोठमोठे साहित्यिक या संमेलनात आले होते. या संमेलनात कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.पी. नाथ यांनी Best Product of Milind Campus असा माझा परिचय घनश्याम तळवटकरांना करून दिला होता. त्यावेळी मी मिलिंदच्या या अथांग प्रेमापुढे नतमस्तक झालो होतो. उरात कृतार्थतेचे पावसाळी ढग दाटले होते.

१९९१ साली महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा अध्यक्ष झालो आणि महाराष्ट्रभर भाषणे देऊ लागलो. तेव्हा माझे वर्गमित्र दत्ता वाघमारे यांचे पत्र आले. त्यांनी लिहिले होते. 'यशवंता, वर्गात शेवटच्या बाकावर तू आक्रसून बसायचास. आम्ही सर्व मुले बडबड करायचो. टवाळक्या करायचो. तू कोणाशी बोलत नव्हतास. आता मात्र तू बोलतोस आणि आम्ही सर्व ऐकतो.' या अभिनंदनाने माझे डोळे भरून

आले होते. या गौरवाच्या आसवांचे श्रेय मी मिलिंद या माझ्या मातृत्वाला देतो.

मी १९६५ साली बी.ए. ऑनर्स उत्तीर्ण झालो. प्रथम श्रेणीत मेरिटमध्ये उत्तीर्ण झालो. पण मला बी.ए. ऑनर्सची आयुष्यातली अत्यंत महत्त्वाची, लाडाची आणि खूप कष्टाने मिळविलेली पदवी पदवीदान समारंभात घेता आली नाही. माझ्या कंगालपणाला त्यासाठी डिपॉझिट म्हणून जे काही पैसे भरायचे असत ते भरता आले नाही. पदवीदान समारंभाच्या दिवशी सर्वच लोक आनंदात होते. पण यशवंत मनोहरचे मेरीट मात्र बंद खोलीत दिवसभर हमसून हमसून रडले होते. एकटेच. मित्राला मी बाहेरून खोलीला कुलूप लावायला सांगितले होते आणि मी एकटाच जीव फुटून रडत होतो. गरिबी अशी वाईट असते. ती मेरिटचा आनंदही घेऊ देत नाही. मेरिटलाही अनाथासारखे केविलवाणे रडवते. ती सुंदर भावनांना जवळ करू देत नाही. काळजाच्या मोहोरावरही निखारेच पसरते.

बी.ए. ऑनर्सची पदवी मी गरिबीमुळे समारंभात घेतली नाही आणि पुढे मग कोणतीही पदवी मी समारंभात शक्य असूनही जाऊन घेतली नाही. पुढल्या त्या त्या पदवीदान समारंभाच्या दिवशी मी ऑनर्सच्या वेळच्या दुःखाने हळवा होत राहिलो. त्या दुःखाच्या व्याकूळ स्मरणात बुडत राहिलो.

२०११ साली याच यशवंत मनोहरला मिलिंदने पूर्वी फार मोठ्या लोकांना दिलेला 'मिलिंद समता पुरस्कार' सन्मानाने दिला. त्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कुठल्यातरी व्याख्यानासाठी गेलो होतो. प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान यांनी मला सन्मानाने मिलिंदमध्ये बोलावले. त्यावेळी 'यशवंत मनोहर आमच्यासाठी Legend आहेत' असे त्यांनी म्हटले. त्यावेळी मनातल्या मनात मी मिलिंदची मला देदीप्यमान करणारी माती चुंबून घेतली.

१९६७ साली भुसावळला महाराष्ट्र बौद्ध साहित्य संमेलन भरले होते. डॉ. म.ना. वानखडे अध्यक्ष होते. मी या संमेलनाला गेलो होतो. एम.ए.ला शिकत होतो. कविसंमेलनात आणि परिसंवादातही भाग घेतला होता. संमेलनाचे संयोजक वि.ए. राजगुरू यांनी त्या अनुषंगाने त्यांच्या 'मिसाइल' या २००६ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात लिहिले आहे, ''तेव्हाचा तो पोऱ्या आज उत्कृष्ट संवेदनशील कवी, भारदस्त लेखक, थोर आंबेडकरी चिंतक, विचारवंत डॉ. यशवंत मनोहर म्हणून मराठी जगाला परिचित आहे.'' पण मी अत्यंत नम्रपणे हे सांगितले पाहिजे की या सर्व फांद्यांची, फुलाफळांची उगमभूमी मात्र मिलिंदच आहे.

१९७८ साली प्रकाशित झालेले माझे समीक्षेचे पहिले पुस्तक मी मिलिंद

महाविद्यालयाला अर्पण केले. 'ज्याच्या पोटी माझ्या आयुष्याचा आशय जन्माला आला त्या माझ्या मिलिंद महाविद्यालयाला' असे अर्पण पत्रिकेचे शब्द आहेत. प्रा. रा.ग. जाधव यांनी मिलिंद महाविद्यालयात मला शिकविले. २००७ साली या थोर समीक्षकाने माझ्याबद्दल लिहिले आहे, ''यशवंत मनोहर म्हणजे एक गूढरम्य सर्जनशीलता आहे. निर्मितीक्षमतेच्या त्याच्या रास्त अधिकारात एक चमत्कार आहे. अविश्वसनीय वाटावे असे ते वाङ्मयीन अद्‌भुत आहे. ज्या येरल्याने एका युगसाक्षी प्रतिभावंताला जन्म दिला. एखाद्या अद्ययावत प्रयोगशाळेत येरल्याच्या मातीचे परीक्षण केले पाहिजे... येरल्याच्या मातीत नागसेनवनातील चिमूटभर माती मिसळली आणि त्या वाफ्यातून एक सदाबहार सृजनवेल वाढून गगनावरी गेली तिचे नाव यशवंत मनोहर.'' असे माझ्यासंबंधी आजवर खूप बोलले गेले आहे. बोलले जात आहे. पण हा माझ्या निमित्ताने होणारा मिलिंदचाच मी गौरव मानतो. मी फार काही केले आहे असे मला आजही वाटत नाही. मी सारखा धडपडतो आहे. सत्तराव्या वर्षीही मी स्वतःला स्वस्थ बसू देत नाही हे मात्र खरे. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जिद्दीचा एक छोटासा मेहनती कण मी आहे एवढे मात्र मी जरूर सांगेन. नागसेनवनाच्या चिमूटभर मातीत केवढी अद्‌भुत शक्ती आहे त्याचा प्रत्यय मीही घेतलेला आहे. मिलिंदच्या परिसराची ही अफाट किमया आहे.

मिलिंदच्या याच ऊर्जेने अशिक्षित आणि गरीब आईबापाच्या पोटी जन्मलेल्या खेड्यातल्या एका जिवाला महाराष्ट्राच्या मनात सन्मानाने पोचवले आहे. महाराष्ट्राची वाचनसंस्कृती मिलिंदच्या यशवंत मनोहर नावाच्या सुपुत्रावर खूप प्रेम करते. त्याचे साहित्य वाचताना पराकोटीचे झपाटलेपण अनुभवते. थकलेली, हरलेली आणि उदास झालेली मने त्याच्या साहित्याच्या वाचनाने रीचार्ज होतात. अशा खूप अभिप्रायांनी, थोरामोठ्यांच्या शब्दांनी मन गदगदून येते. पण अशावेळी मन मिलिंदसंबंधीच्या कृतज्ञतेनेच उत्कटून येते. या प्रेमात भिजताना कधी कधी प्रश्न पडतो मिलिंदमध्ये या खेड्यातल्या मुलाला कोण घेऊन गेले ? कोणाची हाक त्याच्या काळजाला बोलावित होती ? हे साहस त्याच्याकडून कोणी करवून घेतले? मिलिंदमध्ये तो गेला नसता तर त्याचे काय झाले असते ? हे सर्वच प्रश्न मनाभोवती फेर धरतात आणि डोळ्यात आसवे दाटतात. गळ्यात ढग दाटतात अशावेळी माझे मन मिलिंद नावाच्या अथांग मातृत्वासाठी कृतज्ञतेचे व्याकूळ तारांगण होते.

■■

# मी पुत्र चळवळीचा

कधी कधी असे घडते की एखादी आईच चळवळ होते आणि कधी कधी एखादी चळवळच आई होते. माझ्या संदर्भात या दोन्ही गोष्टी घडलेल्या आहेत. माझी आई गरीब; पण तिने निंदण-खुरपण करून, मोलमजुरी करून मला शिकविले. जांब नदीच्या पैलतीरावर असलेल्या आंब्याच्या झाडाखाली बापासोबत ती कौले तयार करायला जाई. हे काम करताना त्या आंब्याच्या झाडाला असलेल्या माझ्या पाळण्याला ती झोका देई. तिला उपासतापास पडत. कठीण आणि क्रूर परिस्थितीला वाकवताना तिची दमछाक झाली; पण कष्टांचे डोंगर उपसून तिने मला शिकविले. प्रारंभकाळात शाळेत न जाणाऱ्या माझ्या उनाडपणाला समजाविण्यासाठी तिने खूपदा माझ्यापुढे आपले व्याकूळ काळीज अंथरले.

रेल्वेत गँगमन म्हणून काम करणाऱ्या मोठ्या भावांकडून तिने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव ऐकले होते. त्यामुळे तिच्या गरिबीने आणि अशिक्षितपणाने आपला सर्वात लहान मुलगा शिकावा असा ध्यासच घेतला होता. तिला जास्त काहीही कळत नव्हते. एका छोट्याशा खेड्यात ती राहत होती. त्यामुळे शहर म्हणजे काय, याची तिला कल्पना असण्याचे काहीही कारण नव्हते; पण 'शिकल्यानं बाबासाहेब होते.' असे शाळेत जाणे मान्य नसलेल्या मला काकुळतीने ती सांगायची. माझी आई माझ्यासाठी माझ्या लहानपणी अशी बाबासाहेबांची चळवळ झाली होती.

नववी-दहावीच्या वेळी मी दोन रुपये भाड्याची खोली करून काटोलला राहत होतो. नववी-दहावीच्या परीक्षांच्या वेळी तीन-तीन महिने आई काटोलला माझ्याजवळ राहिली. मी खूप अभ्यास करावा. स्वयंपाक करण्यासाठी माझा वेळ खर्च होऊ नये म्हणून राहिली. माझ्यासोबत तिचे असणेही माझ्यासाठी चळवळ झाले होते. दहावी पास होऊन मी औरंगाबादेच्या मिलिंद महाविद्यालयात शिकायला निघालो तेव्हा आई रडत होती. त्यावेळच्या तिच्या आसवांचा अर्थ 'तू खूप शिक' एवढाच आहे, असे मी माझ्यापुरते मानले होते.

मी औरंगाबादेला शिकत असताना घराला उपास पडत. काही दुःखाचे प्रसंग घडत; पण मला यातले काहीही कळवायचे नाही, असे तिने चार वर्ग शिकलेल्या केशव नावाच्या माझ्या मोठ्या भावाला सांगितले होते. कारण तो अधूनमधून मला पत्र लिहीत असे. 'आपले इकडे काहीही होवो. त्याचे मन अभ्यासात लागणार नाही

असं काहीही त्याले कळवू नका' असे तिचे सांगणे असे. सणासुदीला ती काही खात नसे. माझ्यासाठी रडत राही. कधीतरी मला पुढे हे कळतच असे आणि माझे मन तिच्या एकेका अश्रूला एकेक विद्यापीठच मानून वागत असे. आईने घेतलेल्या या कष्टांनी, तिला पडलेल्या उपासतापासांनी आणि माझ्यासाठी तिच्या डोळ्यांतून सांडलेल्या आसवांनी माझ्या आयुष्यात चळवळीचीच भूमिका केली. माझी आई अशी या संदर्भात माझ्यासाठी चळवळच झालेली आहे. या चळवळीसाठी माझ्या डोळ्यांमधून नेहमीच कृतज्ञता ओसंडत राहील.

: २ :

आपल्या समाजात तीन प्रकारच्या चळवळी चालतात. चळवळीचा एक प्रकार समाजाला मागे नेणारा असतो. चळवळीचा दुसरा प्रकार समाजाला आहे तिथेच खुंट्याला गुरे बांधावीत त्याप्रमाणे खोळंबून ठेवत असतो. चळवळीचा तिसरा प्रकार समाजाला परिवर्तन शिकविणारा असतो. हे परिवर्तन बुद्धिवादाचा, सामाजिक न्यायाचा आणि परस्पर करुणेचा आशय उरात वागवीत असते. मी खेड्यातला. म्हणून चळवळीचा हा तिसरा प्रकार माझ्या खेड्यात १९४६-४७ च्या सुमारास रुजू झाला. शंकरराव, संतोषराव हे माझे मोठे भाऊ रेल्वेत होते. त्यांच्या वेगवेगळ्या ठिकाणी बदल्या होत. नागपुरच्या शासकीय दवाखान्यात वेळप्रसंगी त्यांना यावे लागे. रेल्वेतील त्यांच्या मित्रांसोबत त्यांच्या चर्चा चालत. या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणून त्यांनी आमच्या खेड्यात बाबासाहेबांची जयंती १९४६-४७ सालातच सुरू केली होती. आमच्या घरापुढेच निळा झेंडा लावला होता. जयंतीच्या दिवशी गावातून प्रभातफेरी काढली जाई. काही लोकांच्या हातात निळे झेंडे असत. 'बाबासाहेब कौन है, दलितों का राजा हें', 'बाबासाहेब आंबेडकर जिंदाबाद' अशा घोषणा दिल्या जात असत. भाऊ संतोषरावांनी घरी 'जनता' पत्र लावले होते. त्यानंतर 'प्रबुद्ध भारत'ही लावले होते. काही समजण्याचे ते वय नव्हते. पण चौथी-पाचवीच्या काळात शंकरराव, संतोषराव माझ्याकडून चळवळीसंबंधीचा मजकूर वाचून घेत. आंबेडकरी चळवळ माझ्या मनात अशी हळूहळू रुजू होऊ लागली होती. आठवी-नववीमध्ये मी शिकत होतो तोवर आणि त्या आधीच घरात परंपरेने आलेली भजने, शाहिरी या गोष्टी बंद पडल्या होत्या. चोंडके, ढोलकी या गोष्टींची जागा आता नव्या वाद्यांनी घेतली. शंकररावांनी हार्मोनियम आणि तबला विकत आणला आणि पूर्वी ढोलकी वाजविणारे माझे भाऊ रामाजी आता तबला वाजवू लागले. पूर्वी तुऱ्याची शाहिरी करणारे केशवराव हे माझे भाऊ कव्वाल्या आणि आंबेडकरी चळवळीची गाणी गायला लागले. हे एक मूलभूत स्थित्यंतर माझ्या घरातही आणि आजूबाजूच्या आंबेडकर समाजातही घडून आले.

बुलबुलतरंग वाजविण्याचा छंद मला आधी होताच. हार्मोनियम घरी आल्यावर मला डाव्या हाताने ती सहज वाजविता येऊ लागली. आम्ही गावोगावी दुय्यमचे कार्यक्रम करायला लागलो. चळवळीने या काळात मला असे धरले. मी स्वतःही गाणी रचू लागलो. तीही आम्ही कार्यक्रमात म्हणू लागलो. मला स्वतःला नागोराव पाटणकरांचे हार्मोनियम वाजविणे खूप आवडे. त्यांची गायनाची शैली खूप आवडे. काटोलला शिकत असताना आम्ही तीन-चार कोसांवरही नागोराव पाटणकरांचा कार्यक्रम कुठे असला तर अंधार तुडवत त्या कार्यक्रमाला जात होतो. याच काळात आम्ही नागोराव पाटणकरांच्या गायनाचा कार्यक्रम गावातच जनपद शाळेपुढल्या खारीत घेतला होता. मीच कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले होते.

: ३ :

दहावी झाल्यानंतर मी औरंगाबादेच्या मिलिंद महाविद्यालयात शिकायला गेलो. सातवी-आठवीत बाबासाहेबांच्या चळवळीची गाणी लिहीत होतो. नववी-दहावीत त्या वयाला साजेशा कविता काटोलात असतानाच लिहू लागलो. मिलिंद महाविद्यालयात सुखराम हिवराळे, नरेशकुमार इंगळे यांची भेट झाली. पुढे बंकट पाटील, भा.ल. भोळे, चंद्रकांत पाटील यांचाही परिचय इथेच झाला. नरेश इंगळे कवी होते आणि विद्यार्थी चळवळीत सक्रिय होते. त्यांच्यासोबत विद्यार्थी चळवळीत काही प्रमाणात मीही सहभागी झालो. औरंगाबादेतच एका प्राध्यापकाकडे नरेश इंगळे, सुखराम हिवराळे आणि मी गेलो होतो. ते शाखांसंबंधी फार भरभरून बोलत होते. मी नंतर हिवराळेंना शाखा म्हणजे काय ते विचारले. कारण मला 'विशाखा'मधली शाखा माहीत होती आणि शाखा म्हणजे फांदी एवढेही माहीत होते. हिवराळेंनी मला तो सर्व प्रकार सांगितला. मी धोका ओळखला आणि परत त्या शाखासंमेलनाकडे चुकूनही जायचे नाही, हा निर्णय घेऊन टाकला. त्या काळच्या माझ्या लहान वयालाही त्या विघातक शाखाद्वीपाचा भयंकर राग आला होता. चळवळीत खूपदा प्रवाहांच्या भेटी झाल्या तर कधी एखादे तात्कालिक डबकेही दिसले.

: ४ :

मी मनाने सतत पुस्तकांच्या सहवासात रमत होतो; पण १९६५ साली मिलिंद कॉलेजमधील विद्यार्थी मंडळाच्या निवडणुकीत सुखराम हिवराळेंसाठी पहिल्यांदाच सहभागी झालो होतो. व्हरांड्यात गाण्या-बजावण्याचा आणि नाचण्याचा जल्लोष सुरू होता. मी त्या गदारोळात आहे ही गोष्ट प्रा. गजमल माळी यांच्या लक्षात येताच एका विद्यार्थ्याला पाठवून त्यांनी मला प्राध्यापक कक्षामध्ये बोलावून घेतले. अत्यंत कळवळ्याने म्हणाले, ''ही जागा तुझी नव्हे. हा तुझा स्वभाव नव्हे. तू आताच्या आता ग्रंथालयात

जा. एखादे चांगले पुस्तक वाचत बैस. ते पुस्तक आयुष्यात तुझी सोबत करील. हे असे उत्सव इथेच राहून जातील.'' मी ग्रंथालयात गेलो. अभ्यास करीत बसलो. त्यावेळी मी बी.ए. ऑनर्सचा विद्यार्थी होतो. प्रा. माळींच्या त्या वाक्यांचा अर्थ त्यावेळी तितक्या गांभीर्याने कळला नाही. आता तो कळतो आणि ज्या ज्या वेळी तो प्रसंग आठवतो त्या त्या वेळी अंगावर रोमांच उभे राहतात आणि डोळ्यांत आसू ! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मिलिंद महाविद्यालयात असे खूप अनुभव आले. ज्यांच्या आठवणींनीही काळीज विस्तारते आणि डोक्याची एकाच वेळी खोलीही वाढते आणि उंचीही वाढते.

चळवळीशी सातवी-आठवीत शिकत असतानापासूनच संबंध आला; पण आता हे संबंध अधिक धारदार, डोळस, चिकित्सक आणि सर्जनशील व्हायला लागले. मिलिंद महाविद्यालयात मला कवितेमुळेच प्रवेश मिळाला. पीयुसी.ला मुलांची संख्या पूर्ण झाल्याने प्रवेश बंद झाला होता. मी मोडून पडायला आलो होतो. गावी परतायलाही जवळ काही नव्हते. त्यावेळी मोठी हिंमत करून मी डॉ. म.ना. वानखडे यांना भेटलो होतो. त्यांनी कॉमर्सला प्रवेश घे असे सांगितले. कारण कलाशाखेतील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली होती. त्यावेळी मी 'मला कविता लिहायची आवड आहे' असे त्यांना सांगितले होते आणि डॉ. वानखडे यांनी मला प्रवेश दिला होता. कवितेने माझ्या आयुष्याला असे प्रकाशाचे नवे दार उघडून दिले होते.

त्यावेळी मिलिंद महाविद्यालय हे स्वतःच एका महाआंदोलनाची भूमिका वठवित होते. मी या आंदोलनात उतरलो आणि एक असीम आंदोलन क्रमाने माझ्या मनात उतरत गेले. इतर विषयांचे अत्यंत उत्तम प्राध्यापक इथे त्यावेळी होतेच; पण डॉ. भालचंद्र फडके, प्रा. रा.ग. जाधव, प्रा. गजमल माळी असे मराठीचे नामवंत प्राध्यापक इथे होते. मिलिंदमध्ये डॉ. सुमंत मुरंजनांची व्याख्यानमाला झाली, डॉ. मा.पं. मंगुडकरांनी एक व्याख्यानमाला गुंफली. हिवराळे, इंगळे यांच्या सहकार्याने आणि प्रा. रा.ग. जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार १९६५ साली डॉ. म.ना. वानखड्यांची कवितेसंबंधीची दोन व्याख्याने मी घेतली. या सर्वच संदर्भाच्या द्वारा मिलिंद महाविद्यालय संपूर्ण समाजातील आणि वाङ्मयातील प्रश्नांची गुंतागुंत घेऊन माझ्यात शिरत होते. मी क्षणोक्षणी बदलत होतो. मी अनंत जन्मा ठरत होतो. नित्य नवा दिवस जागृतीचा असे माझ्या संदर्भात घडत होते. सामाजिक विषमतेत आणि गरिबीत करपलेल्या माझ्या मनाला दरक्षणी नवनवी ज्वालांची पालवी फुटत होती. मी मिलिंद महाविद्यालयातील आंदोलनाच्या पोटी जन्माला आलो. या काळात दर सकाळी उगवणारा प्रत्येक सूर्य माझ्यासाठी प्रेरणांची नवी नक्षत्रे घेऊन यायचा. हा सगळा आनंद आजही मला माझ्या अश्रूंच्या मदतीनेच साजरा करावा लागतो. १९७८ च्या

सुमारास मिलिंद महाविद्यालयाच्या मेन होस्टेलमध्ये कमलेश्वरांच्या अध्यक्षतेखाली एक साहित्य संमेलन भरले होते. पूर्वाध्यक्ष म्हणून प्रा. गं.बा. सरदारही संमेलनाला आले होते. या संमेलनात घनश्याम तळवटकरांना डॉ. आर.पी. नाथ यांनी 'बेस्ट प्रॉडक्ट ऑफ मिलिंद कॉलेज' या शब्दांत माझी ओळख करून दिली होती. मिलिंद महाविद्यालय हे मला दरक्षणी नवनवा जन्म देणारे माझे सामाजिक मातृत्व आहे. मिलिंद ही माझ्यासाठी सर्जनशील चळवळ आहे आणि या चळवळीसंबंधी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नेहमीच कृतज्ञतेचे पावसाळी ढग माझ्या डोळ्यांत दाटून येतात.

भुसावळला बौद्ध साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. म.ना. वानखडे होते. हिवराळे, इंगळे आणि मी गर्दीमुळे गाडीच्या संडासात उभे राहून भुसावळपर्यंत गेलो. या प्रवासाचा आजही गौरव वाटतो. भुसावळला झालेल्या चर्चांचा उजेड आजही नवाच वाटतो. या संमेलनात मी परिसंवादातही बोललो होतो आणि कविसंमेलनातही सहभागी झालो होतो. संमेलनात डॉ. वानखड्यांनी आम्हा मिलिंदच्या मुलांच्या प्रतिभा बघितल्या. औरंगाबादेला परत आल्यावर त्यांनी त्यांच्या घरीच एक बैठक बोलाविली. मी, हिवराळे, इंगळे असे आम्ही सर्व मित्र होतो. आम्हा सर्व नव्याने लिहिणाऱ्यांसाठी एखादे हक्काचे नियतकालिक असावे हे डॉ. वानखडे यांनी बोलून दाखविले आणि त्यासाठी त्यांनी हालचाली सुरू केल्या. दलित साहित्याची चळवळ या बिंदूपासून शक्तिशाली झाली. तिला स्वतंत्र वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व प्राप्त होण्याच्या सर्व शक्यता मोकळ्या झाल्या. 'अस्मिता' या नियतकालिकाचा जन्म डॉ. वानखेड्यांच्या प्रयत्नांमधून याप्रकारे झाला. महाराष्ट्रात आणि देशात वादळी वणवे पसरविणाऱ्या या चळवळीचा मी प्रत्यक्ष साक्षीदार आहे. ही अपूर्व अशी आनंदाचीही बाब आहे आणि गौरवाचीही बाब आहे. अस्मितेच्या पहिल्या दोन्ही-तिन्ही अंकात माझे लेखन आहे. डॉ. वानखडे, प्रा. रा.ग. जाधव यांचे प्रारंभीचे नेतृत्व संपविले गेले आणि मीही नंतर पुढल्या अस्मितादर्शपासून दूर झालो; पण या सर्वच गोष्टी अत्यंत आनंदाच्या आणि खूप काही शिकायला मिळाले अशा आहेत.

: ५ :

पहिली चळवळ आयुष्यामध्ये माझ्या वाट्याला माझ्या आईच्या रूपाने आली. पुढे मला संपूर्ण समाजभर, संपूर्ण महाराष्ट्रभर नेणारी चळवळ माझ्या जीवनात मिलिंद महाविद्यालयाच्या रूपाने आली. या दोन्ही चळवळींनी मला वावर दिले होते. पीक काढता येण्यासाठी आवश्यक ती आयुधे दिली होती. आता पुढल्या तेजस्वी लागवडीसाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी माझी होती. या दोन्ही चळवळींनी मला काळजाच्या भाषेत हे सांगितले की, आम्ही तुला क्षितिज दिले. या क्षितिजातून तू

काय म्हणून उगवायचे आहे त्याचा निर्णयही तूच घ्यायचा आहेस आणि प्रत्यक्ष कृतींनीही तूच बोलायचे आहेस.

मी १९६९ मध्ये नागपूरच्या नागपूर महाविद्यालयात रूजू झालो. प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोधांसारखा निष्ठावंत साहित्यपंडित इथे मला भेटला. ते माझ्याशी खूप बोलत राह्यचे. साहित्य, जीवनवाद, भोवतीचा समाज, त्याचे वर्गीय-जातीय स्वरूप अशा चौफेर चर्चा झडत असत. त्यांच्या रूपाने माझ्या आयुष्याला डाव्या चळवळीचे परिमाण मिळाले. मुक्तिबोधांनी केलेल्या या चर्चांनी प्रश्नांकडे पाहण्याचे आणखी काही आयाम माझ्यापुढे ठेवले. या सर्वच चर्चांनी माझे मन अधिकाधिक टणक झाले. अस्वस्थ मी फार पूर्वीपासूनच होतो. आता ही अस्वस्थता आणखी वेगवेगळ्या संदर्भात वाढायला लागली. या वाढणाऱ्या अस्वस्थेने मला खूप आनंद दिला.

: ६ :

१९७२-७३ चा काळ असेल. बाबा दळवी, नागेश चौधरी, अशोक थूल, लता कामत, मी अशी आम्ही मंडळी एकत्र आलो आणि सामाजिक समता समिती स्थापन केली. दिवाळीच्या सुट्यांमध्ये आणि उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये आम्ही सर्वच जण सायकलींनी नागपूर भोवतीच्या पाचपंचवीस खेड्यांमध्ये गेलो. काही वादाच्या प्रश्नांच्या निमित्ताने गेलो. कधी वेगवेगळ्या समाजगटांमध्ये सामंजस्य निर्माण करण्याच्या निमित्ताने गेलो. घरूनच आम्ही भाकरी बांधून नेत होतो आणि एखाद्या खेड्यात झाडाखाली बसून सामूहिक जेवण करीत होतो. अन्याय-अत्याचाराचे प्रश्न असत, पाणी भरण्यासंबंधीचे, अस्पृश्यांवर टाकल्या जाणाऱ्या बहिष्कारासंबंधीचे प्रश्न असत. मे महिन्याच्या भर उन्हात आम्ही खेडोपाडी अशी कामे करीत होतो. लोकांमध्ये सामंजस्याच्या दृष्टीने जागृती निर्माण करीत होतो. अंधश्रद्धांचा विघातकपणा त्यांना समजावून देत होतो. कधी कधी बाबा आढावही आमच्या सोबत असत. एखाद्या गावात आम्ही सभा घेत असू. कुठे तणावाचे वातावरण निर्माण होई. सर्वत्रच मान मिळत असे असे नाही. कुठे कुठे अपमानही होई; पण मान हेही आमचे ध्येय नव्हते. अपमानाने खचून जाणे हेही आम्हाला मान्य नव्हते. काही वर्षे ही कामे आम्ही मित्रांनी एका सामाजिक धुंदीत केलीत. या निमित्ताने बाबा दळवींशी खूपच जवळचे संबंध प्रस्थापित झाले. आपल्या कुटुंबातील एक वडीलधारा जीव हे नवे नाते चळवळीने दिले. ही सर्वच चळवळ माझ्या आयुष्यातील एक असीम आनंदाचा ठेवा आहे. बाबा दळवी नागपूरवरून औरंगाबादेला जाणार होते. तिथल्या लोकमतचे संपादक म्हणून जाणार होते. त्यावेळी उंटखान्यात आम्ही त्यांना निरोप देण्यासाठी सभा घेतली. त्यांना बंगाली शर्ट आणि पायजामा शिवला. हे कपडे त्यांना आम्ही त्याचवेळी

घालायला लावले. शिवचरण थूल होते. मधुकर ताकसांडे होते. अशोक शंभरकर होते. प्रसेनजित ताकसांडे होते. असे आम्ही सर्व मित्र होतो. मी त्यांना या सभेत पँथर म्हटले होते. निरोपाला उत्तर देताना बाबांना आसवे आवरता आली नव्हती. बाबांना मी माझ्या गावीही एका सभेसाठी घेऊन गेलो होतो. तोही आनंद अपूर्वच आहे.

मी या काळात पँथरच्या अनेक सभांमध्ये बोललो. इतर सभा-संमेलनांना तर आम्हीच जातच होतो; पण फुले जयंती, बाबासाहेबांची जयंती अशा कार्यक्रमांना आम्ही जातच होतो. हिंगणघाटच्या पँथरच्या सभेला मी अध्यक्षच होतो. त्या सभेत धाकलीला ज्यांचे डोळे सवर्णांनी काढले होते ते गवई आले होते. माझ्या भाषणानंतर त्यांनी मला मिठी मारली. म्हणाले 'तुझ्या डोळ्यात याही खाचा झालेल्या डोळ्यांनी मला बाबासाहेब आंबेडकर दिसतात.' गवईच्या त्या एका वाक्याने माझ्यापुढे अपूर्व आनंदाचे गाठोडेच सोडले होते. त्याची पावती अश्रूंशिवाय दुसऱ्या कोणत्या पद्धतीने देता येणेच शक्य नव्हते.

मी जमेल तेवढे सामाजिक चळवळीत काम करीत होतो; पण माझे मुख्य क्षेत्र साहित्य हेच होते. बाबरी मशीद पाडली गेली. त्यावेळी माझ्या नेतृत्वाखाली आम्ही नागपुरातील सर्व परिवर्तनवादी मित्रांनी मोर्चा काढला. नामांतराच्या अनेक सभांमध्ये भाग घेतला. मुख्यमंत्र्यांना नामांतराच्या संदर्भात अनेक पत्रे लिहिली. नागपूरला आम्ही नामांतरासाठी मोर्चा काढला होता. त्याची आकाशवाणीजवळ सभा झाली होती. मी अध्यक्ष होतो. त्या सभेत मी नामांतरासाठी आमरण उपोषणाची घोषणा केली होती. उमरेड, वर्धा, नागपूर या भागातील पारधी, मसनजोगी अशा अनेक भटक्या-विमुक्तांच्या तांड्यांवर गेलो. सभा घेतल्या. त्याचे मानसिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. अनेकदा आमच्यासोबत लक्ष्मण माने, नागेश चौधरी, जिंदा भगत अशी मंडळी असत. प्रकाशम जिल्हा ते दिल्ली, उमरगा ते आदिलाबाद अशा असंख्य ठिकाणी आम्ही सभेला गेलो. लोकांत मिसळलो. लोकांना त्यांच्या हक्कांसाठी जागे केले. या चळवळीचा भाग म्हणून मी छोट्या-मोठ्या अनेक पुस्तकांचे लेखन केले. शिक्षक परिषदांना कधी अध्यक्ष म्हणून तर कधी उद्घाटक म्हणून मार्गदर्शन केले. मी तर्कतीर्थांसोबत बोललो. सुशीलकुमार शिंदे यांच्यासोबत भाषणे दिली. शरद पवार, हुसेन दलवाई, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. रावसाहेब कसबे, बाबुराव बागूल यांच्यासोबत सभांमध्ये भाषणे केली. मी असा चळवळीच्या पोटी जन्मलो. चळवळीत उभा राहून लिहिलं. त्याचा परिणाम म्हणून घरी डॉ. श्रीराम लागू आले. गो.म. कुळकर्णी आले. गंगाधर गाडगीळ आले. पु.ल. देशपांडे आले. बाबुराव बागूल आले. त्र्यं.वि. सरदेशमुख आले. डॉ. यू.म. पठाण आले. पुष्पाताई भावे, नारायण सुर्वे, वामनदादा

कर्डक, लक्ष्मण माने, संभाजी कदम, गोविंद तळवळकर, बाबा दळवी, मे.पुं. रेगे, दादासाहेब रूपवते, सुशीलकुमार शिंदे, अजितदादा पवार, वसंत आबाजी डहाके, डॉ. जनार्दन वाघमारे, राजा ढाले अशी असंख्य मान्यवर माणसे घरी आली. चळवळीच्या पोटी जन्म व्हायच्या आधी मी कोणीच नव्हतो; पण मी हा उजेडाचा दिवस पाहिला. त्याला कारण चळवळ.

: ७ :

१९७८ च्या सुमारास डॉ. कुमार सप्तर्षी घरी आले. सोबत सुरेश भट होते. अनंत अमदाबादकर होते. मनोहर वझे होते. मी यावेळी हनुमाननगरात राहत असे. पुण्यात सप्तर्षींनी शंकराचार्यांना आव्हान दिले होते. वातावरण पेटले होते. असा तो काळ होता. माझ्या घरी कुमार सप्तर्षी रात्रभर आपले चळवळीचे अनुभव सांगत होते. भट आपल्या कविता म्हणत होते. आम्हीही आपल्या कविता म्हणत होतो. संपूर्ण रात्र आम्ही अशी जागून काढली होती. सकाळी मेडिकल चौकात चहा प्यायला गेलो होतो. हा सर्व आनंद मला चळवळीने भरभरून दिला.

रावण दहनाच्या विरुद्ध मी, नागेश चौधरी, एल.के. मडावी आणि इतर असंख्य बांधवांसोबत सभा घेतल्या. एक वातावरण तयार करण्यात सहभागी झालो. इ.स. २००० मधली गोष्ट असेल. सरसंघचालक सुदर्शन हे दीक्षाभूमीवर गेले होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला हार घातला होता. या दांभिकपणाचा निषेध म्हणून तो पुतळा आम्ही दुसऱ्याच दिवशी धुवून घेतला. मी होतो. हरिभाऊ केदार होते. नागेश चौधरी होते. रूपा कुलकर्णी होत्या. भा.ल. भोळे होते. जिंदा भगत होते असे खूप लोक होते. नागपुरातील सर्वच परिवर्तनवादी कार्यकर्ते होते. हे नैतिकतेसाठी झालेले आंदोलन त्यावेळी मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय झाले.

उमरेडजवळ राजुलवाडीच्या पारधी बांधवांच्या हिंदूकरणासाठी जोरदार प्रयत्न व्हायला लागले. त्यावेळी १९९४ मध्ये राजुलवाडीला आम्ही एक संमेलन घेतले. लक्ष्मण माने, नागेश चौधरी होते. मी होतो. पन्नालाल राजपूत होता. या संमेलनाद्वारा हे सर्व पारधी बांधव आम्ही बुद्धधम्माकडे वळवले. यावेळी अनेक तांड्यावर आम्ही गेलो. पारधी बांधवांचे प्रश्न समजावून घेतले.

२०११ मध्ये पोलिसांनी या राजुलवडीची नासधूस केली. दूरदर्शन संच फोडले. भांडी फोडली. घरातील सामान फेकले. दारे तोडली. अनेक लोकांना जेलमध्ये टाकले. त्यावेळी आम्ही राजुलवाडीला गेलो. नागेश चौधरी होते. मी होतो. नेताजी राजगडकर होते. आणखी इतर मंडळी होतो.

त्यानंतर लक्ष्मण माने आणि मी राजुलवाडीला गेलो. पन्नालालसोबत आम्ही राजुलवाडीतील सर्वच लोकांची बैठक घेतली. पन्नालालने यावेळी राजुलवाडीतील दीक्षाभूमी आम्हाला दाखविली. तिथला झेंडा दाखविला. स्तूपाची कल्पना दिली. राजुलवाडीच्या या मानसिक प्रवासाचा आदर वाटतो. या सर्व गोष्टींचा एक जबाबदार आणि सक्रीय साक्षीदार मला होता आले याचा आज अपार आनंद वाटतो.

२००० सालातील गोष्ट आहे. विलास भोंगाडेंनी आम्हाला गोसीखुर्दला नेले. बाबा आढाव होते. मी होतो. नागेश चौधरी होते. धरणाच्या खोल खड्ड्यांमध्ये उतरून आम्ही ते विराट काम पाहिले. तिथल्या स्थानिक लोकांशी चर्चा केली. त्यांचे प्रश्न समजावून घेतले. त्यानंतर आणखी वर्षाच्या आतच आम्ही गोसीखुर्दला गेलो. एका खेड्यात सभा घेतली. पुनर्वसनाच्या संदर्भातील त्यांच्या समस्यांचा अभ्यास केला. विलास भोंगाडेमुळे या चळवळीत थोडे का होईना सहभागी होता आले याचा अपार आनंद वाटतो.

याच काळात कधीतरी वर्धेला एका सभेसाठी जात असताना पारध्यांच्या एका तांड्यावर जिंदा भगत मला घेऊन गेले. पुष्पलता मनोहर सोबत होत्या. तेथील पुरुषांचे, स्त्रियांचे अनुभव आम्ही ऐकले. त्यांच्या तक्रारी समजावून घेतल्या. ते कसे जगतात, काय काम करतात, त्यांच्यावर कशी जीवघेणी संकटे कोसळतात ते सर्व ऐकले. आम्ही सुन्न झालो. पुष्पलता मनोहर, जिंदा भगत यांनी त्यांना दिलासा देणारी भाषणे केली. मी या सर्व दुःखात सहभागी झालो.

२००६ हे धम्मक्रांतीचे सुवर्णमहोत्सवी वर्ष. यावर्षी हिंदी मोरभवनात एक मोठा धम्मदीक्षा समारंभ झाला. भाऊ मदनकर आणि शेकडो ओबीसी बांधवांनी माझ्या हस्ते धम्मदीक्षा घेतली. हा एक अत्यंत चित्तथरारक अनुभव होता. अत्यंत गंभीर असा हा कार्यक्रम झाला. मला खूप बरे वाटले.

खैरलांजीला दोनदा गेलो. तेथील सर्व गोष्टींचा अभ्यास केला. या सर्व भीषणतेने सुन्न झालो. लेख लिहिले. त्या संतप्त मनःस्थितीत खैरलांजीवर मी ४० कविता लिहिल्या.

प्रभाकर पावडे, रूपा कुळकर्णी, पुण्याचे मातंग बांधव, लक्ष्मण माने, शिवराज कोळीकर, ओबीसी बांधव अशा अनेकांनी धम्म घेतला. त्या त्या वेळी मी लेख लिहून या धम्मवीरांचे स्वागत केले. त्यांचे मनोबल वाढविले. डॉ. बाबासाहेबांच्या एका महान क्रांतीकार्यातील धुळीचा एखादा छोटासा कण मला होता आले. त्यामुळे जगण्याला ताकद मिळाली.

लक्ष्मण मानेंनी धम्म स्वीकाराची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी घेतलेल्या पहिल्या चर्चासत्रापासून आजवर मी माझी सर्व बौद्धिक शक्ती घेऊन त्यांच्या पाठिशी उभा राहिलो आहे. कधी धम्म चर्चासत्राचा अध्यक्ष तर समारोपकार म्हणून मी जबाबदारीच्या जाणिवेने त्यांना भक्कम साथ दिली. चंद्रपूरपासून धम्मस्वीकार करण्याला जाण्यासाठी त्यांनी माझ्या उपस्थितीतच अभियान सुरू केले. नंतर नागपूरच्या दोन सभा. हिंगणघाट आणि वर्धा येथील धम्म अभियान सभांचा मी अध्यक्षच होतो. या सर्व काळात धम्माच्या संदर्भातील वेगवेगळ्या प्रश्नासंबंधी वेळोवेळी मी त्यांना चिंतनपत्रे लिहिली. त्या पत्रांचे 'लक्ष्मण माने यांना धम्मपत्रे' या नावाचे १०४ पानांचे पुस्तकही प्रकाशित झाले. चळवळीतील या मौलिक सहभागाचा मला अपार गौरव वाटतो.

मी चळवळीला काय दिले हे मी सांगणे सभ्यपणाचे ठरणार नाही; पण चळवळीने मला जे दिले ते गौरवाने सांगणे, हा मी सुसंस्कृतपणाचा भाग समजतो. १९७९ साली भद्रावतीला पहिले आदिवासी साहित्यसंमेलन झाले. त्याचे उद्घाटन करण्याची ऐतिहासिक सुसंधी चळवळीनेच मला दिली. या चळवळीनेच मला आंबेडकरमन दिले. या मनाने मला साहित्यिक केले. वक्ता केले. उदंड प्रामाणिक केले. उदंड बुद्धिवादी केले. याचा मला अपार आनंद आहे. दलित हा शब्द साहित्याला उद्देशून वापरू नये. तो शब्द हा स्वतःच एक दुःखदायक आठवण आहे. जीवनात कोणीही दलित असू नये. कोणी माणूसही दलित असू नये. साहित्यही दलित असू नये म्हणून मी दलित शब्द जाळला वा गाडला जाईल, तो लोकांच्या स्मरणातून हद्पार होईल यासाठी प्रयत्न केले. लेखन केले. आता दलित शब्द क्वचितच कोणी वापरतात. आंबेडकरवादी हीच संज्ञा आता वापरली जाते. चळवळीला स्वच्छ आणि धारदार अधिष्ठान लाभावे, यासाठी मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला बुद्ध रेखीवपणे मांडला. मी बाबासाहेबांच्या सूत्रांना अनुसरून विपश्यनेची मीमांसा केली. ओशोच्या समाधीच्या, ध्यानाच्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर त्यांनी केलेल्या टीकेच्या विरोधात मी लिहिले. मी गोयंकांच्या विपश्यनेविरुद्ध बोलतो. अशा अनेक गोष्टींची सकारण मीमांसा मी केली. समरसतेचे उद्घाटन झाल्यावर माणसे समरसतेकडे पळू लागली. मीही या समरसतेच्या विरोधात लिहिले. शेकडो लोकांनी लिहिले. विलास वाघांनी सुगावाचा मोठा अंकच यासंबंधी काढला. अनेक लोक मला अजूनही सांगतात की, प्रामुख्याने तुम्ही समरसतेवर जी झोड उठविली त्यामुळे लोक थबकले; अन्यथा त्याकाळी पाच-दहा वर्षातच जवळजवळ सगळा आंबेडकरसमाज समरसतेत भरती झाला असता. समरसतेच्या विरोधात लिहिल्याने

माझ्यावर खटला दाखल केला गेला. मला या खटल्याचा गौरवच वाटतो. हे सर्व करायची, लोकांचे राग ओढवून घेण्याची ताकद माझ्यात कुठून आली, या प्रश्नाचा मी विचार करतो आणि माझ्यापुढे माझी माय नावाची एक चळवळ उभी राहते. मिलिंद महाविद्यालय एक चळवळ म्हणून उभे राहते आणि या अशाच सर्व चळवळींना जन्म देणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाची एक महाचळवळ माझ्या डोळ्यांपुढे उभी राहते. तिच्या अशा उभे राहण्यामुळेही मला अपार आनंद होतो.

: ८ :

मी नागपूरचा नव्हे. माझा नागपूरशी १९६९ साली नोकरीच्या निमित्ताने संबंध आला. नागपूरपासून माझे येरला नावाचे खेडे सत्तर मैलांवर आहे. मी तिथे शिकलो. नंतर काटोलला शिकलो. पुढे एकदम औरंगाबादेलाच माझे पूर्ण शिक्षण झाले. नागपुरात मी १९६९ साली आलो तेव्हा भाऊ लोखंडे, ग्रेस यांच्या तोंडून पहिल्यांदा संघ म्हणजे आर.एस.एस. हा शब्द कानावर आला. मला हे काय प्रकरण आहे तेही खूप दिवस कळले नाही; पण नागपुरातील अनेक दलित माणसे, दलित साहित्यिक संघाच्या शाखेवरच तयार झालेली आहेत. अजूनही काही दलित माणसे संघात आहेतच. मोठमोठ्या हुद्यावर आहेत. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपण शाखेवरून सरळ दीक्षाभूमीवर गेलो होतो, असे एका जबाबदार व्यक्तीने लोकसत्तेत मागे लिहिले होते. नागपुरात राहणाऱ्या त्या काळच्या बहुतेक लोकांच्याही संदर्भात हेच खरे आहे. आपण संघाच्या शाखेवर जात होतो, हे नागपूरचे नागपुरात असलेले वा बाहेर कामानिमित्त गेलेले लोक सांगत नाहीत; पण त्यांनी आपला हा गौरवशाली भूतकाळ लोकांपासून कशासाठी लपवून ठेवायचा असा प्रश्न आहे. आज मला असे वाटते की, आपलाही जन्म नागपुरात झाला असता तर आपल्यालाही आपला भूतकाळ लपविण्याची गरज वाटली असती. माझ्या आयुष्यात अशी कोणती तरतूदच नाही, याचा अपार आनंद होतो.

: ९ :

चळवळीत काही उद्वेगजनक गोष्टींचाही अनुभव आला. १९८०-८१ सालातली गोष्ट असेल. दादासाहेब काळमेघ नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्यांनी विद्यापीठाच्या दीक्षान्त सभागृहात सर्वधर्मसमभाव परिषद घेतली होती. सर्व धर्मांचे मोठमोठे पंडित बोलायला आले होते. मी बुद्धधम्माचा प्रतिनिधी म्हणून भाषण केले होते. 'परमेश्वराला फासावर चढवल्याशिवाय देशात समता प्रस्थापित होणार नाही' हे सांगून मी सर्वधर्मसमभावाचे तत्त्व खोडून काढले होते. सर्व धर्म एका बाजूला आणि धम्म एका बाजूला असे चित्र मी उभे केले होते. महाराष्ट्र टाइम्सपासून विदर्भातल्या

सर्व वर्तमानपत्रांमध्ये या संदर्भात वृत्तांत झळकले होते. १९८५ साली जैमिनी कडूनी पहिले महाविद्यालयीन साहित्य संमेलन घेतले होते. मी अध्यक्ष होतो. याहीवेळी 'यशवंत मनोहरांना अटक करा' अशा बातमच्या माझ्या भाषणाच्या अनुषंगाने आल्या होत्या. अमरावती विद्यापीठात फुल्यांवर माझे व्याख्यान झाले होते. माझा पुतळा अमरावतीत जाळला गेला होता. पांढरकवड्याच्या एका भाषणानेही असाच गदारोळ झाला होता. या समाजात सत्य बोलणे असे अडचणीचे आहे, अवघड आहे; पण मी सततच प्रतिगाम्यांना, जातीयवाद्यांना, अंधश्रद्ध लोकांना आणि भांडवलदार, जमीनदार लोकांना न आवडणाऱ्या गोष्टीच ठामपणे सांगितल्या आहेत. याचा मला अपार आनंद वाटतोच; पण सालबर्डीला कुलगुरू दादासाहेब काळमेघांनी एक यज्ञ केला होता. त्या यज्ञात सर्व धर्मांमधील प्रमुखांची एक परिषद घेतली होती. डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन हे बुद्धधम्माची भूमिका मांडणार होते. डॉ. आनंद कौसल्यायन यांना तिथे घेऊन येण्याची जबाबदारी डॉ. भाऊ लोखंडेंवर आणि माझ्यावर काळमेघांनी सोपविली होती. त्या यज्ञात आम्हाला काही काम नव्हते. त्याच्याशी आमचे काही देणे घेणे नव्हते. आम्हाला तिथे बोलायचेही नव्हते. आम्ही दोघेही भंतेजींना तिथे घेऊन गेलो आणि सर्वात जास्त प्रभावी मांडणी भंतेजींनीच केली. हे सर्व लक्षात न घेता श्याम मानवांनी त्या काळच्या 'मनोहर'च्या अंकात एक विद्रोही कवी यज्ञात सहभागी झाले असे लिहिले. त्या काळच्या जनता पक्षाची बाजू घेणारे वक्तव्य त्यांनी घेतलेल्या माझ्या मुलाखतीत मी केले नाही. म्हणून त्यांनी हा राग माझ्यावर काढला. श्याम मानव तर देव, ईश्वर तरी मानतात; पण मी तर भयंकर नास्तिक माणूस आहे. मला चळवळीत काम करताना या गोष्टीबद्दल वाईट वाटले होते. संतापही आला होता.

: १० :

अशीच एक घटना कोणाचेही चांगले होवो, या माझ्या अतिउदार स्वभावामुळे घडली. एका साहित्यिकाला ॲटोरिक्षा घ्यायचा होता. त्याने मला गॅरन्टर केले. मी आपला भोळा. झालो गॅरन्टर. पुढे काय झाले ? तो मनुष्य पैसेच देईना बँकेचे आणि मला नोटिसांवर नोटिसा येऊ लागल्या. कोर्टात हेलपाट्या घालाव्या लागल्या. मन वैतागून गेले; पण माझे एक अत्यंत दिलदार मित्र डी.आर. मेघे होते. त्यांनी मला त्यावेळेला या झंझटीतून मुक्त केले. 'ज्याचे करावे भले तो म्हणतो माझेच खरे' तसे हे आहे; पण या प्रकरणात मला अतोनात मनःस्ताप झाला.

मी १९८९-९० च्या सुमारास दलित साहित्य संसदेचा अध्यक्ष होतो. चंद्रपूर, कल्याण इथे आम्ही मोठमोठी संमेलने भरविली होती. कल्याण संमेलनाच्या वेळची

गोष्ट. शासनाकडून पैसे मिळायचे होते. मंजुरी आम्ही मिळविली होती. आम्ही पैसे न मिळाल्याने अडचणीत होतो; पण तिथे आलेले काही साहित्यिक यशवंत मनोहरांना पैसे मिळाले. ते लोकांना देत का नाहीत, असे सांगत सुटले होते. अशोक खंडाळे आणि रमेश जनबंधू यांना परिस्थिती माहीत होती. संमेलनकाळात मी दररोज पहाटे मुंबईला जाऊन प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होतो. आमच्या प्रयत्नांना यश आले. सर्वांचे देणे घेणे केले. पण वरीलसारख्या अपप्रचाराच्या घटनांनी आनंद कसा होईल?

त्यानंतरचे संमेलन पुसदला घ्यावे असे आम्ही ठरविले. सुधाकरराव नाईकांची दोनदा भेट घेतली. आम्ही सोबत जेवलो. अशोक खंडाळे होते. रमेश जनबंधू होते. तारीख ठरली. संमेलन ११ वे होते; पण एका साहित्यिकाने त्याच तारखेला ११ वे दलित साहित्य संमेलन जाहीर केले. आमचे संमेलन हे मोठे आंदोलन होते; पण ते बंद पाडण्यासाठी कोणीतरी हा खेळ केला आणि नंतर आम्ही आमचे संमेलनच रद्द केले. त्या साहित्यिकानेही त्याच क्रमांकाचे त्याच तारखेला जाहीर केलेले संमेलन घेतलेच नाही. आमचा एक मोठा उपक्रम बंद का पाडला गेला ? ही योजना कोणाची होती ? कोणाची असू शकते ? ते काहीही असो; पण मला या सर्व गोष्टींचा मोठा मनःस्ताप झाला; पण आता अशा काही गोष्टींचे दुःख होत नाही. लोक इतके प्रेम करतात की, या आनंदाच्या पर्वतांमुळे दुःखाच्या या छोट्या छोट्या दगडांकडे लक्षही जात नाही. माझी खात्री आहे. माझ्यासाठी अशी छोटी मोठी दुःखे निर्माण करणारांना काळच समर्पक उत्तरे देईल. कारण मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा प्रामाणिक पुत्र आहे.

आंबेडकरी राजकारणात, समाजात, साहित्यात जो संधीसाधूपणा शिरला, छोट्या छोट्या गोष्टींसाठी माणसे स्वतःला विकायला लागली, आंबेडकरनिष्ठेचे दिवाळे काढायला लागली हे सर्व पाहिले की त्रास होतो. निष्ठांवर अत्याचार करणारे बहुसंख्य आहेत आणि निष्ठावंत अल्पसंख्य आहेत. म्हणून या अल्पसंख्याकांना ही घसरण थांबविता येत नाही. याच्या यातना मोठ्या आहेत. तरी लोभाची मांजरे आपले स्वभाव बदलतील. प्रतिक्रांतीवाद्यांच्या प्रमाणपत्रांचा खोटेपणा कधीतरी त्यांच्या लक्षात येईल अशी आशा व्यक्त करायला हवी असे मी म्हणतो. त्याचे कारण प्रामाणिकपणाला आता भाबडेपणा आणि निष्ठांना अव्यवहारीपणा म्हणण्याचा प्रघात पडायला प्रारंभ झालेला आहे.

■■

# मराठी साहित्यिक आणि जात

मनातील जातीची हरळी मुळापासून उपटून फेकल्याशिवाय कोणताही भारतीय माणूस 'आम्ही भारताचे लोक' या माणुसकीच्या महोत्सवात प्रवेशपात्र ठरू शकत नाही. पण केवळच सामान्य माणसांच्या मनातच नव्हे तर साहित्यिकांच्या मनातही जातींची कबड्डी कशी सुरू आहे ते अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्षपदाचा तमाशा पाहिला की लक्षात येते.

अध्यक्षपद हे सन्मानाचे पद आहे. मराठी साहित्यविश्वाने त्या त्या वर्षी एखाद्या वाङ्मयीन कर्तृत्वाला हा सन्मान आदराने बहाल करावा. सन्मान आणि भीक यातला फरक संबंधितांना अजूनही कळत नाही. सन्मान मागावा लागत नाही. भीक मागावी लागते. पण अ.भा.मराठी साहित्य संमेलनासाठी उभे असणारे उमेदवार महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरही मतांची भीक मागत महिनोन्महिने फिरतात. हात जोडतात. मला मत द्या म्हणतात. अध्यक्षपदाचा सन्मान हा कृतज्ञतेचा भाग आहे. हा सन्मान देऊन साहित्यविश्व त्या विवक्षित साहित्यिकाच्या वाङ्मयीन कर्तृत्वासंबंधी कृतज्ञता व्यक्त करीत असते. पण ही वाङ्मयीन सभ्यता निवडणुकीमुळे पार निकालात निघते.

यावर्षी अध्यक्षपदाच्या निवडणुकीत जातीचा मुद्दा चर्चिला जातो आहे. ह.मो. मराठेंनी हे सर्व आणल्याने त्यांना अटक झाली. पंधरा हजार रुपये दंड भरल्यानंतर सुटका झाली. या सर्वच गोष्टी साहित्यविश्वाची मान खाली जावी अशाच आहेत.

हे सर्व लांच्छनास्पद प्रकार पुढे येतात त्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे काय करायचे आणि साहित्यिकांच्या मनात जातीचा विषारी नाग वस्तीला असावा काय? हे दोन प्रश्न आपल्यापुढे आहेत.

साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक अजिबात नसावी. या निवडणुक पद्धतीमुळे अनेक मोठे साहित्यिक अध्यक्षपदापासून दूरच राहतात. प्रचाराच्या दरम्यान शिवाजी सावंत, दया पवार यांचे मृत्यू ओढवले. हे सर्व निवडणूक बंद केली तर टाळता येईल. साहित्यिकांच्या प्रतिष्ठेची जपणूक करता येईल. पण असे होत नाही तोवर कोणत्याही साहित्यिकाने अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी अर्जच करू नये. असे झाले तर अध्यक्षांची सन्मानपूर्वक नियुक्ती करण्याचा मार्ग मोकळा होईल. ही स्थिती घटना बदलायला भाग पाडेल.

दुसरा मुद्दा जातीचा : जशी राजकीय माणुसकी, आर्थिक माणुसकी, शैक्षणिक

माणुसकी असते तशी वाङ्मयीन माणुसकीही असते. माणुसकीच्या सर्वच विहिरी आता क्रमाने आटत चाललेल्या आहेत आणि ह.मो. मराठेंसारख्या साहित्यिकाच्या मनातील जात आता साहित्य व्यवहारात उघडपणे बाहेर यायला लागली आहे. कोणत्याही सुसंस्कृत माणसाला दुःख व्हावे अशीच ही बाब आहे. जात, धर्म, प्रदेश, भाषा यांचा दुराभिमान साहित्यिकाच्या माणुसकीत बसतच नाही. जीवनाच्या प्रज्ञानाशी लेखकाच्या मनातील जात डोळा कसा भिडवणार? जीवनाच्या मर्माशी संकुचितता कोणता संवाद साधणार?

मला असे वाटते की एखादी व्यक्ती जातही आहे आणि साहित्यिकही आहे हे म्हणणेच बरोबर नाही. तसेच धर्म , प्रदेश, भाषा यांच्याबाबतीतही आहे. या सर्व गोष्टी व्यक्तीत असतात म्हणजे व्यक्तीच्या नेणिवेत त्या असतात. दबा धरून बसलेल्या असतात. जाणिवेच्या ओठात एक आणि नेणिवेच्या पोटात दुसरेच हे अपरिहार्य नसले तरी अशक्य नसते. आणि आपल्या एकूणच भारतीय समाजातील साहित्यिकांनी आणि इतर सर्वच लोकांनीही जाणिवेत अडचणीची ठरते म्हणून जात नेणिवेत सुरक्षित ठेवलेली असते. तेव्हा साहित्यिक आणि माणूस हा दुटप्पीपणा आपल्यात असू नये असे वाटणाऱ्या सर्वच साहित्यिकांनी आणि 'भारताच्या सर्व लोकांनीही' 'आम्ही भारताचे लोक' असे बिनदिक्कत म्हणण्यासाठी आपल्या मनातील जातीला मूठमाती देणेच अनेक दृष्टींनी हिताचे आहे.

𑁋

# यशवंत मनोहरांच्या साहित्याची सूची

**कवितासंग्रह :**

१. उत्थानगुंफा : कॉन्टिनेंटल, पुणे, तिसरी आवृत्ती २००१. पृ. ११०
२. काव्यभीमायन, दुसरी आवृत्ती, युगसाक्षी प्रकाशन, २००७. पृ. ११२
३. मूर्तिभंजन : श्रीविद्या, पुणे १९८५ पृ. ११४, दु.आ.युगसाक्षी, नागपूर, २००७
४. जीवनायन : मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००१ पृ. ११४
५. प्रतीक्षायन, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर २००७ . पृ. ८०
६. अग्नीचा आदिबंध, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००८. पृ. १०४
७. स्वप्नसंहिता, मौज प्रकाशन, मुंबई, २००८, दु.आ.२००९ पृ. १८८

**वैचारिक साहित्य :**

१. डॉ. आंबेडकरांचा बुद्धधम्म : डॉ. आंबेडकर प्रकाशन, यवतमाळ, १९८७ पृ. ७२
२. प्रबोधनविचार : महाबोधी, नागपूर १९८९ पृ. १७६
३. मंडल आयोग : भ्रम आणि सत्य : अशोक खंडाळे, चंद्रपूर, दु.आ. १९९१ पृ. ३२
४. आपले महाकाव्यातील नायक : शंबूक-कर्ण-एकलव्य : संघमित्रा, नागपूर, १९९१ पृ. ४०
५. आपल्या क्रांतीचे शिल्पकार : आंबेडकर-फुले-बुद्ध : महाबोधी, नागपूर, १९९१ पृ. ४८
६. डॉ. आंबेडकर एक शक्तिवेध : संघमित्रा, नागपूर, १९९१ पृ. १२०
७. बुद्ध आणि त्याचा धम्म : सारतत्त्व : प्रियदर्शी, कोल्हापूर, दु.आ. २००४ पृ. ११९
८. आंबेडकर संस्कृती : कल्पना, नागपूर, १९९१ पृ. ४८
९. आंबेडकरवादी विद्रोही निबंध : ऋचा, नागपूर, १९९२ पृ. १६८
१०. आंबेडकरी चळवळीतील अंतर्विरोध : क्रांतीपर्व प्रकाशन, पुणे, १९९८ पृ. ७२
११. डॉ. आंबेडकरांचा बुद्ध कोणता ? : युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, दु.आ. २००५, पृ. ४०
१२. बहुजनक्रांतीचे महानायक जोतीबा फुले : क्रांतीपर्व प्रकाशन, पुणे, १९९८ पृ. ३९
१३. मूल्यमंथन, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, एप्रिल २००४, पृ. ११२
१४. रिपब्लिकन पक्ष : बांधणीची एक दिशा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर २००४, पृ. ६४
१५. शिक्षकांपुढील आव्हाने, २००३, पृ. १६
१६. अध्यापकांपुढील जळते प्रश्न, युगसाक्षी प्रकाशन, २००४, पृ. १६
१७. आजचे शिक्षण आणि अध्यापक, २००४, पृ.१६
१८. समाजपरिवर्तनाची दिशा, धम्मभूमी प्रकाशन, २००५ पृ. १५०
१९. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली ?, युगसाक्षी, २००५, पृ. ३२
२०. डॉ. आंबेडकरांनी विपश्यना का नाकारली ? युगसाक्षी, २००५, दु. आ. पृ. ३२
२१. महाबुद्ध डॉ. आंबेडकर, युगसाक्षी, २००५, पृ. ४०
२२. आंबेडकरी क्रांतीचा जाहीरनामा, समता सैनिक दल, युगसाक्षी, २००५, पृ.२०

२३. धम्मदीक्षा सुवर्णमहोत्सव तुम्हाला काय मागतो?, युगसाक्षी, २००५, पृ. २४
२४. आंबेडकरवादी बौद्धभिक्खू कसा असावा?, युगसाक्षी, २००५, पृ.१६
२५. डॉ. आंबेडकरांची धम्मसंकल्पना, युगसाक्षी २००७. पृ. ३२
२६. डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्तीचे युद्ध, युगसाक्षी २००६. पृ. २४
२७. बुद्धाचा आचारधम्म, युगसाक्षी, २००७. पृ. ३२
२८. धम्मक्रांतीची पन्नास वर्षे, युगसाक्षी, २००६. पृ. ५६
२९. अभिनव बौद्ध आचारप्रणाली, युगसाक्षी, २००७. पृ. ४४
३०. बौद्धांची राजकीय संस्कृती, युगसाक्षी २००७. पृ. ३२
३१. बुद्धाचे तत्त्वज्ञान आणि बौद्धांची भाषा, युगसाक्षी, २००७. पृ. ४४
३२. प्रज्ञाविहार, युगसाक्षी, नागपूर, २००९, पृ. १२८
३३. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण : एक दृष्टिकोन, युगसाक्षी, नागपूर, २०१०, पृ.४०

**समीक्षाग्रंथ :**

१. दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप : नागपूर १९७८ पृ. १३४
२. स्वाद आणि चिकित्सा : धनंजय, नागपूर, १९७८ पृ. ११०
३. बाळ सीताराम मर्ढेकर : साहित्य अकादमी, दिल्ली, १९८७, १९९३ ति. आ. १९९७ पृ. ११९
४. निबंधकार डॉ. आंबेडकर : संघमित्रा, नागपूर, १९८८ पृ. १२०
५. दलित साहित्य चिंतन : संघमित्रा, नागपूर, १९८८ पृ. ११२
६. आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा : प्रियदर्शी, कोल्हापूर, १९९१ पृ. १२२
७. समाज आणि साहित्यसमीक्षा : सुगावा, पुणे, १९९२ पृ. २६८
८. शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविता : संपादन, साहित्य अकादमी, दिल्ली, १९९२ पृ. २३७
९. मराठी कविता आणि आधुनिकता : आंबेडकर धम्म, नागपूर दु.आ. १९९८ पृ. २७२
१०. आंबेडकरी चळवळ आणि साहित्य : अभय प्रकाशन, नागपूर, १९९३ पृ. १४४
११. परिवर्तनवादी जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये: ठिय्या प्रकाशन, नागपूर, १९९८ पृ. ४०
१२. आंबेडकरवादी मराठी साहित्य : भीमरत्न प्रकाशन, १९९९ पृ. ३२०
१३. युगसाक्षी साहित्य : श्रेयस प्रकाशन, हिंगणघाट, २००१ पृ. ४९६
१४. नवे साहित्यशास्त्र : युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००९ पृ. ४१६
१५. विचारसंघर्ष : युगंधरा, यवतमाळ, एप्रिल २००४, पृ. ११२
१६. आंबेडकरवादी महागीतकार : वामनदादा कर्डक, युगसाक्षी, २००५, पृ. १०८
१७. प्रतिभावंत साहित्यिक : आत्माराम कनीराम राठोड, युगसाक्षी, २००५, पृ. ४०
१८. साहित्य संस्कृतीच्या प्रकाशवाटा, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. १५०
१९. दलित साहित्याचे नामांतर : आंबेडकरवादी साहित्य, युगसाक्षी, २००५, पृ. ४८
२०. बुद्धिवादी सौंदर्यशास्त्र, युगसाक्षी, नागपूर २००७ पृ.१२०. दु.आ. २००८
२१. बौद्ध संस्कृती आणि साहित्य, युगसाक्षी, नागपूर, २००९, पृ.१२०
२२. साहित्य आणि समाजक्रांती, सुविद्या, पुणे, २००९, पृ.२०७

२३. काही कवितासंग्रहांच्या निमित्ताने, पद्मगंधा, पुणे, मार्च २०१०, पृ.२००
२४. इहवादी साहित्याची पूर्वदिशा, युगसाक्षी, नागपूर, २०१०, पृ.३२८

**प्रवास वर्णन :**

१. स्मरणांची कारंजी : समुचित, नागपूर, १९८७ पृ. ६८ दु.आ. युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. ८८

**कादंबरीलेखन :**

१. रमाई, युगसाक्षी प्रकाशन, आवृत्ती १६ वी २००७. पृ. ९२
२. मी सावित्री, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००६. पृ. ४८
३. मी यशोधरा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर. पृ. ४०
४. रमाई, मी सावित्री, मी यशोधरा (एकत्रित तिन्ही कादंबऱ्या) युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००४, पृ. १५२

**ललित लेखन :**

**अ) पत्रसंग्रह :**

१. पत्रप्राजक्त, अभिनव पब्लिकेशन, गडचिरोली, २००३ पृ. १५०
२. लक्ष्मण माने यांना धम्मपत्रे, युगसाक्षी, नागपूर २००६. पृ. १०४
३. निळूभाऊ फुले यांना दोन पत्रे : युगसाक्षी, नागपूर, २००६. पृ. १६
४. पत्रपौर्णिमा, युगसाक्षी, नागपूर, २००७. पृ. ९६

**आ) श्रद्धांजलीपर लेख आणि ललितलेख :**

१. सातवा ऋतू अश्रूंचा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर २००५, पृ. ८८
२. वणव्यात हसलेली फुले, युगसाक्षी, २००६. पृ. ८०
३. ऊर्जेचे वेल्हाळ, युगसाक्षी, २००९, पृ.१०४

**गौरवग्रंथ :**

१. डॉ. यशवंत मनोहर : एक प्रज्ञाशील प्रतिभा, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, सप्टेंबर २००४, पृ. २४८. संपा. डॉ. अरुणा देशमुख, डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ. प्रभंजन चव्हाण
२. वेध : एका युगसाक्षी प्रतिभेचा : संपा. प्रा. अनमोल शेंडे, युगसाक्षी, २००७. पृ. २१२
३. यशवंत मनोहर : नवनिर्माणाची कार्यशाळा (गौरवग्रंथ), संपा. प्रा. सुधीर भगत, २००८

**उत्थानगुंफेवरील समीक्षाग्रंथ**

१. उत्थानगुंफा : आकलनाचे आलेख : संपा. डॉ. अरुणा देशमुख, सुगावा प्रकाशन, पुणे, २००५, पृ. २०९

**भाषांतरे :**

रमाई कादंबरी कन्नडमध्ये, हिंदीमध्ये भाषांतरित शिवाय अनेक कविता-लेखांची इंग्रजी, हिंदी, गुजराती, बंगाली भाषांतरे, नियतकालिकांमध्ये प्रकाशित

❖



ज्या विचाराचा विषय माणूस नाही
तो विचार अमानुषच असतो म्हणजे तो विचारच
नसतो. माणसाच्या महानायकत्वाकडे पाठ
फिरविण्याची अक्षम्य चूक करणारा विचार मानवी
जीवनावरील संकटाची भूमिका करीत असतो.
अशा संकटाची सत्ता नष्ट व्हावी आणि सर्वन्यायी
इहवादी 'विचारसत्ता' मानवी मनात निर्माण व्हावी
यासाठी यशवंत मनोहर लिहितात.

युगसाक्षी प्रकाशन
राहुल अपार्टमेंट, त्रिमूर्ती नगर, रिंग रोड,
नागपूर. ४४००२२
फोन : ९८२२७००३२२